म. ग्रं. सं. ठाणे

विषय

लेखक

सन

ालय क्रमांक

पुस्तकाचें नांव

# १

# संकीर्ण

[Us]ed for the Educational Department.

# [T]HÍ FOURTH BOOK

FOR THE USE OF

# GOVERNMENT SCHOOLS.

BY

THE MARÁTHÍ TRANSLATOR AND HIS ASSISTANTS.

RECAST AND REVISED

BY

THE MARÁTHÍ TRANSLATOR, E. D.

**Third Stereotyped Edition.**

*Registered under Act XXV. of* 1867.

Bombay:
GOVERNMENT CENTRAL BOOK DEPOT.

1872.

*Price* 8 *Annas.*

सरकारी शाळांतील मुलांकरितां

# चवथें पुस्तक.

मराठी त्रान्स्लेतर आणि त्यांच्या हाताखालची मंडळी
ह्यांनीं केलें होतें तें,
कायम ठरांनीं छापावयाकरितां
मेहरबान देरेक्तर आफ् पब्लिक् इन्स्त्रक्शन
ह्यांच्या हुकमावरून,
मराठी त्रान्स्लेतर
ह्यांनीं शोधून तयार केलें.

आवृत्ति तिसरी

ह्या पुस्तकाची मालकी सन १८६७ च्या २५ व्या
आक्ता प्रमाणें नोंदिली आहे.

मुंबई.
गवर्नमेंत सेंत्रल बुक दिपो.

इसवी सन १८७२ शके १७९४.
किंमत ८ आणे.

मुंबईमध्यें एड्युकेशन सोसैटीच्या छापखान्यांत छापिलें.

पु. ९

## चवथ्या पुस्तकाची अनुक्रमणिका.

पृष्ठ


| | | |
|---|---|---|
| १ | महाराणी विक्टोरिया ................ | १ |
| २ | स्वामिभक्तीचें उदाहरण. जवानसिंग ...... | ४ |
| ३ | कोणास कोणीं हांसूंनये. ............ | ७ |
| ४ | मनोराज्य.................. | ९ |
| ५ | कालीदासाच्या चातुर्याविषयीं गोष्टी....... | ११ |
| ६ | कविता, मनास बोध. ............... | १३ |
| ७ | कविता, वसंतऋतूचें वर्णन. ........... | १४ |
| ८ | नकाशा. ................... | १५ |
| ९ | तट्टू उधळला असतां त्यास धरण्याची युक्ति.. | १६ |
| १० | भोजनाचा नियम............... | १८ |
| ११ | उदारपणाचें उदाहरण. राजपुत्र भीमसिंग ... | २० |
| १२ | मासे................... | २२ |
| १३ | किडे................... | २५ |
| १४ | कोळी .................. | २८ |
| १५ | कोंबडी आणि कोल्हा............ | २९ |
| १६ | उंदरांची सभा. ............... | ३० |
| १७ | लक्ष्मण मुलगा. ............... | ३१ |
| १८ | गवंडी व मजूर. .............. | ३५ |
| १९ | खोंकड आणि बोका.......... | ३८ |
| २० | लांडा कोल्हा............. | ४० |
| २१ | कविता, स्फुट सवय्या. ........... | ४१ |

| गोष्ट. | | पृष्ठ |
|---|---|---|
| २२ | उत्तर अमेरिकेंतील इंदियन लोक. | ४ |
| २३ | एका बादशाहाचें शहाणपण | ४६ |
| २४ | मुलगा आणि त्याची आई. | ४८ |
| २५ | पोट आणि अवयव. | ५० |
| २६ | ममता | ५१ |
| २७ | परहित. | ५४ |
| २८ | धातूं विषयीं संवाद. | ५७ |
| २९ | वाफेची शक्ति आणि वाफेपासून लाभ. | ६० |
| ३० | पशु, पक्षी, आणि वाघूळ. | ६२ |
| ३१ | धनगर जो व्यापारी झाला होता. | ६४ |
| ३२ | कविता, पद्यात्मक लघु हितोपदेशांतील. | ६५ |
| ३३ | पन्ना नांवाची दाई. | ६७ |
| ३४ | नाणें. | ७० |
| ३५ | मैना. | ७३ |
| ३६ | पाणी. भाग पहिला. | ८० |
| ३७ | —— भाग दुसरा. | ८३ |
| ३८ | गोठ्यांतील सांबर. | ८६ |
| ३९ | वाफेची गाडी. | ८८ |
| ४० | मृत्यूचा दरबार | ९१ |
| ४१ | लावी पक्षीण आणि तिचीं पिलें. | ९३ |
| ४२ | कविता. शबरीचें आख्यान. | ९५ |
| ४३ | कविता. स्फुटश्लोक. | ९७ |
| ४४ | हत्ती. | ९८ |

| | | पृष्ठ. |
|---|---|---|
| ४५ | सिंह. | १०१ |
| ४६ | वाघ | १०४ |
| ४७ | गेंडा. | १०७ |
| ४८ | लांडगा. | १११ |
| ४९ | तरस. | ११४ |
| ५० | अस्वल. | ११[illegible] |
| ५१ | कोल्हा. | ११९ |
| ५२ | कापूस. | १२१ |
| ५३ | कविता. अभंग तुकारामाचे | १२३ |
| ५४ | कोलंबसाची गोष्ट. भाग पहिला. | १२४ |
| ५५ | ———————भाग दुसरा. | १२९ |
| ५६ | ———————भाग तिसरा. | १३५ |
| ५७ | गडबड्या स्वभाव आणि शांत स्वभाव. | १३९ |
| ५८ | एका चित्र शाळेंतील तिघे मुलगे | १४५ |
| ५९ | मोर. | १५० |
| ६० | चहाचें झाड | १५४ |
| ६१ | वेळ लवकर जाण्याचा उपाय. | १५८ |
| ६२ | जनावरांस पदार्थ आयते मिळतात, आणि मनुष्यांस श्रमानें मिळवावे लागतात | १६२ |
| ६३ | शहरामध्यें पाण्याचा पुरावा. | १६६ |
| ६४ | टांचण्या व सुया करण्याचें काम. | १६८ |
| ६५ | पृथ्वीचा आकार. | १७३ |
| ६६ | कविता. अभंग तुकारामाचे | १७६ |

| गोष्ट. | | पृष्ठ. |
|---|---|---|
| ६७ | त्राग्याविषयीं गोष्ट | १८१ |
| ६८ | फिरून यत्न करून पहा. | १८१ |
| ६९ | खरें धैर्य. | १८४ |
| ७० | झोंप. | १८७ |
| ७१ | बंधु प्रीति. | १८८ |
| ७२ | कविता. आर्या दुःशासनवध प्रकरणीं. | १९२ |
| ७३ | सदाचरणाचें धैर्य | १९४ |
| ७४ | अंद्रोक्लीज आणि सिंह. | १९८ |
| ७५ | आवश्यक पदार्थांचा अभाव आणि अंगवैकल्य ह्यां विषयीं. | २०३ |
| ७६ | आंधळ्यां विषयीं. | २०५ |
| ७७ | बहिरे आणि मुके ह्यांविषयीं. | २०९ |
| ७८ | कविता. सुभाषित श्लोक. | २११ |
| ७९ | कविता. सीतेविषयीं, दिंड्या व साक्या. | २१३ |
| ८० | इंग्लंदवर्णन, प्रकरण पहिलें. | २१५ |
| ८१ | ———प्रकरण दुसरें. | २१८ |
| ८२ | ———प्रकरण तिसरें. | २२२ |
| ८३ | ———प्रकरण चवथें. | २२७ |
| ८४ | ———प्रकरण पांचवें. | २३३ |
| ८५ | ———प्रकरण सहावें. | २४२ |
| ८६ | ———प्रकरण सातवें. | २४९ |
| ८७ | ———प्रकरण आठवें. | २५९ |
| ८८ | ———प्रकरण नववें. | २६३ |

| पाठ. | | पृष्ठ. |
|---|---|---|
| ८९ | इंग्लंदवर्णन, प्रकरण दहावें. . . . . . . . . . . | २६९ |
| ९० | ——— प्रकरण अकरावें. . . . . . . . . . | २७३ |
| ९१ | ——— प्रकरण बारावें. . . . . . . . . . . | २७७ |
| ९२ | ——— प्रकरण तेरावें. . . . . . . . . . . | २७९ |
| ९३ | ——— प्रकरण चवदावें. . . . . . . . . . . | २८२ |
| ९४ | कविता. सीताविरहा विषयीं दिंड्या. . . . . . . | २८६ |
| ९५ | कविता. स्फुटश्लोक. . . . . . . . . . . . . . | २८७ |
| ९६ | हिंदुस्थान देश. . . . . . . . . . . . . . . | २८९ |
| ९७ | हिमालय पर्वतांची ओळ. . . . . . . . . . . . . | २९३ |
| ९८ | गंगानदी. . . . . . . . . . . . . . . . . . . | २९७ |
| ९९ | सिंधुनद. . . . . . . . . . . . . . . . . . . | ३०१ |
| १०० | ब्रह्मपुत्र नद. . . . . . . . . . . . . . . . | ३०६ |
| १०१ | हिंदुस्थानांतील भाषा. . . . . . . . . . . . | ३०८ |
| १०२ | पत्रव्यवहार. . . . . . . . . . . . . . . . . | ३१२ |
| १०३ | कविता. सीतास्वयंवर प्रकरणीं वामनीश्लोक. . . | ३१५ |
| १०४ | कविता. अभिमन्यूच्या युद्धाविषयीं ओंव्या. . . | ३१७ |
| १०५ | कवितांच्या शब्दांवरील टिपण. . . . . . . . . | ३२१ |

# चौथें पुस्तक.

## महाराणी विक्तोरिया.




मुलांनो, हा मुखवटा कोणाचा आहे हें तुम्ही जाणतां? हा मुखवटा आपल्या महाराणी साहेब विक्तोरिया ह्यांचा आहे. ह्या राणीसाहेब मोठ्या प्रीतिवंत व परोपकारी व सद्गुणी आहेत. सर्व प्रजांनीं ह्यांच्या आज्ञेंत वागावें हा त्यांचा धर्म आहे; आणि ईश्वराजवळ ह्यांच्या कल्याणार्थ प्रत्यहीं प्रार्थना करावी हें योग्य आहे.

ह्या महाराणी साहेब ग्रेत ब्रितन्‌चा माजी राजा तिसरा जार्ज ह्यांची नात आहेत. महाराणीचा बाप तिसऱ्या जार्जाचा पुत्र होता, त्याचें नांव एदवर्द. त्याचा किताब ड्यूक आफ केंत असा होता. हा राजपुत्र इसवी सन १८२० ह्या वर्षी वारला. तिसरा जार्ज वारल्यावर त्याचा वडील पुत्र जो चवथा जार्ज तो गादीवर बसला. चवथा जार्ज वारल्यावर त्याचा बंधु जो चवथा विल्यम हा गादीवर बसला. चवथा विल्यम वारल्यावर ह्या विक्तोरिया महाराणी गादीवर बसल्या.

आपल्या महाराणीचें जन्म इसवी सन १८१९ ह्या वर्ष झालें. आणि ह्या इसवी सन १८३७ ह्या वर्षी आपल चुलता चवथा विल्यम ह्याच्या मागून गादीवर बसल्या. पुं सुमारें तीन वर्षांनीं, म्हणजे सन १८४० ह्या वर्षी, महाराणि साहेब ह्यांनीं जर्मनी देशांतील साक्स कोबर्ग नांवाचें संस्था येथील राजाच्या घराण्यांतील पुरुष प्रिन्स आल्बर्त ह्याशीं ल केलें. महाराणी साहेबांच्या नवऱ्याचें वय महाराणी साहे बांच्या वया इतकेंच सुमारें होतें. प्रिन्स आल्बर्त साहेब हे स्वभावानें, गुणांनीं, व विद्येनें फारच योग्य होते. महाराणि साहेबांनीं आपल्या गुणवंत पतीबरोबर बेवीस वर्षे पर्यंत सुखाने कालक्रमणा केली. पुढें इसवी सन १८६१ ह्या वर्षी त्यांस पतीचा वियोग झाला.

महाराणी साहेबांस नऊ मुलें आहेत. त्यांत चार मुलगे आणि पांच मुली आहेत. वडील मुलगा हा महाराणीच वारसदार आहे. ह्यास प्रिन्स आफ वेल्स हा किताब आहे आणि त्याच्या बायकोला प्रिन्सेस आफ वेल्स हा किताब आहे राणी साहेबांची वडील मुलगी हिला प्रिन्सेस रायल असा किताब आहे. राणी साहेबांच्या हरएक मुलास रायल हैनेस हा मायना आहे.

महाराणी साहेबांच्या नऊ मुलांचीं नांवें क्रमानें सांगतों.

१ वित्तोरिया आदिलेद, हिचें जन्म इसवी सन १८४० त झालें, आणि पुढें इसवी सन १८५८ ह्या वर्षी प्रश्या देशाच्या राजाचा पुतण्या प्रिन्स फ्रेदरिक विल्यम ह्याशीं तिचें लग्न झालें. हिला दोन चार मुलें आहेत.

मं. लि. ८००



२ आल्बर्त एदवर्द, ह्याचें जन्म इसवी सन १८४१ सांत झालें. पुढें इसवी सन १८६३ ह्या वर्षी ह्यानें देन्मार्क देशाच्या राजाची मुलगी प्रिन्सेस अलेक्जांद्रा हिशीं लग्न केलें. ह्यासही दोन चार मुलें झालीं आहेत.

३ आलिस् माद मेरि, हिचें जन्म इ० स० १८४३ ह्या वर्षी झालें. पुढें इ० स० १८६२ ह्या वर्षी जर्मनी देशांतील हेस नांवाचें संस्थान येथील प्रिन्स फ्रेदरिक लूइस ह्याशीं तिचें लग्न झालें.

४ आल्फ्रेद अर्नेस्त आल्बर्त, ह्याचें जन्म इ० स० १८४४ ह्या वर्षी झालें. ह्या राजपुत्रास द्यूक आफ् एदिंबरो हा किताब आहे. हा राजपुत्र लढाऊ आरमारांतील एका जहाजावरचा सरदार आहे.

५ हेलेना आगस्ता विक्तोरिया, हिचें जन्म इ० स० १८४६ ह्या वर्षी झालें. पुढें इ० स० १८६६ ह्या वर्षी स्लेसविक् होल-स्ताइन् येथील राजपुरुष प्रिन्स क्रिस्त्यन ह्याशीं तिचें लग्न झालें.

६ लूईजा क्यारोलेना आल्बर्ता, हिचें जन्म इ० स० १८४८ ह्या वर्षी झालें.

७ आर्थर विल्यम पात्रिक् आल्बर्त, ह्याचें जन्म इ० स० १८५० ह्या वर्षी झालें. हा महाराणीच्या फौजेंतील एक सरदार आहे.

८ लिओपोल्द जार्ज दंकन आल्बर्त, ह्याचें जन्म इ० स० १८५३ ह्या वर्षी झालें.

९ बिआत्रीस मेरी विक्तोरिया फीओदोर, हिचें जन्म इ० स० १८५७ ह्या वर्षी झालें.

महाराणी साहेबांस विद्येची आवड फार आहे. त्यांनीं केलेले दोन तीन सुंदर ग्रंथ छापून प्रसिद्ध झाले आहेत.

ईश्वरापाशीं आपली प्रार्थना हीच असावी कीं, महाराणी साहेब आणि त्यांच्या कुटुंबाचीं सर्व मनुष्यें ह्यांस सुखी ठेवून महाराणी साहेबांचें राज्य चिरकाळ सुरक्षित राखावें.

---

## स्वामिभक्तीचें उदाहरण.

## जवानसिंग.

मारवाडचा राजा, विजयसिंग, हा आपला शत्रु जो रामसिंग ह्याजपासून पराभव पावून नागोरच्या ठाण्यांत गेला. आणि मराठ्यांनीं नागोरास वेढा घातला असतां शूरपणानें त्यांशीं लढून त्यानें सहा महिने पर्यंत तेथें आपला बचाव केला. पुढें तग निघत नाहीं असें वाटल्यावरून तो साहसबुद्धीनें शत्रूच्या फौजेचा घेरा फोडून निघाला. तो प्रथम बिकानेरच्या राजास शरण गेला, तेथें त्यास आश्रय मिळाला नाहीं, म्हणून तेथून निघून जयपूरचा राजा, इसरीसिंग, हा आपल्या बापाचा घात करणारा व शत्रूचा पक्षपाती, असें जरी माहीत होतें तरी त्यास शरण जाण्याचा बेत त्यानें केला. आणि जयपूरच्या किल्ल्याच्या तटा खालीं जाऊन आंत राजास सांगून पाठविलें कीं, आपली कुमक मागण्यास मी खुद जातीनें आलों आहें, मला आश्रय द्यावा. मग जयपूरच्या महाराजानें त्यास उलट निरोप पाठविला कीं, तुम्हीं धर्मशाळेंत जाऊन उतरावें, मी फार खुषीनें तुमच्या भेटीस येतों. इसरीसिंग हा स्वभावानें कपटी होता, व

शूरपणासही कमी होता. विजयसिंगाचा बाप, बखतसिंग, ह्याचें भय धरून जसा त्याचा कपटानें घात केला होता, तसेंच त्याच्या पुत्राचें भय धरून, व शरणागताचें रक्षण करावें हा जो सज्जनांचा धर्म तो एकीकडे ठेवून, त्या विजयसिंगास कैद करावें असें त्यानें मनांत आणिलें. ह्या विश्वासघातानें विजयसिंग कैदेंत पडला असता, परंतु, त्याच्या पदरीं जवानसिंग म्हणून कोणी शूर ठाकूर होता त्यानें स्वामिभक्ति करून त्याचा बचाव केला. तो असा. जवानसिंग हा अछरोलच्या ठाकुराचा जांवई होता, आणि अछरोलचा ठाकूर हा जयपूरच्या राजाच्या प्रीतींतला होता. त्यापाशीं राजा आपली गुप्त गोष्ट सांगत असे. विजयसिंगास कैद करून ठेवण्याचा जो बेत राजानें मनांत योजिला होता, तो त्यानें ह्या ठाकुरास सांगितला, तेव्हां ठाकुरास भय पडलें कीं, नजाणो ह्या गर्दीत आपल्या जांवयाच्या जिवास धक्का पोहोंचेल. म्हणून त्यानें कोणापाशीं बोलणार नाहीं अशी शपथ घेऊन तो मजकूर आपला जांवई, जवानसिंग, ह्यास सांगितला. त्याच्या मनांत कीं तसा प्रसंग आला तर आपला जांवई सावध राहून आपला बचाव करील. इकडे विजयसिंग हा धर्मशाळेंत जाऊन उतरला होता. त्याच्या भेटीस जयपूरचे महाराज गेले. उभयतांची भेट झाल्यावर एकमेकांस आलिंगन देऊन दोघे एकाच गादीवर बसले. त्यांचें परस्पर आगत स्वागत व कुशलप्रश्न चालले आहेत, इतक्यांत स्वामिभक्तिनिष्ठ जवानसिंग हा त्यांच्या जवळ जाऊन जयपूरच्या महाराजांच्या पाठीमागें त्यांच्या झग्याचा घेर पसरला होता त्याजवर सहज गतीनें जाऊन बसला. जवानसिंगानें आपल्या सासऱ्यापाशीं

शपथ वाहिली होती कीं, मी ही गोष्ट कोणास कळविणार नाहीं, त्याप्रमाणें इमान राखून त्यानें आपल्या धन्यास देखील सूचना केली नव्हती. तरी तो आपल्या धन्याच्या बचावाविषयीं तत्पर होता. तो महाराजांचे मागें बसल्यावर, महाराज पाठीमागें मुरडून म्हणाले, काय ठाकुरजी, आज आपण मागें कां बसलां? त्या सरदाराचा आपल्या धन्याच्या उजव्या हाताकडे बसण्याचा मान होता. तरी त्यानें आजचा प्रसंग तसाच आहे, असें महाराजांस उत्तर देऊन आपल्या यजमानास सुचविलें कीं, हूं, आपण उठून चालते व्हा; नाहीं तर प्राणास मुकाल, किंवा कैदेंत पडाल. हें ऐकतांच विजयसिंग तसाच उठला, आणि बाहेर चालता झाला. इतक्यांत विश्वासघातकी इसरीसिंग हाही उठूं लागला; परंतु त्याच्या झग्याच्या घेरावर जवानसिंग बसला होता म्हणून त्याला उठतां येईना. जवानसिंग आपला खंजीर बाहेर काढून महाराजांच्या उरावर ठेवून त्यांस म्हणाला, माझ्या धन्याला जाऊंद्या. त्याच्या जाण्यास अटकाव कराल तर हाच खुपशीन, पहा. त्याचा धनी विजयसिंग बाहेर चालला होता त्यास तो म्हणाला कीं, आपण घोड्यावर बसून चालते झालां म्हणजे मला सांगून पाठवा. त्याप्रमाणें विजयसिंगानें घोड्यावर बसल्यावर, तुमचीच वाट पाहत आहें, असें सांगून पाठविलें. तेव्हां जवानसिंगानें खंजीर मेणांत घालून इसरीसिंगाच्या पुढें होऊन त्यास मोठ्या नम्रतेनें मुजरा केला. राजा इसरीसिंग हा विश्वासघातकी खरा, तरी अशी स्वामिभक्ति पाहून त्याला गहिंवर आल्यावांचून राहिला नाहीं. त्यानेंही उठून मोठ्या सन्मानानें त्याचा मुजरा घेतला. आणि आपले ठाकूर जवळ होते त्यांस

म्हणाला, पहा हें स्वामिभक्तीचें उत्कृष्ट उदाहरण. असलीं नेकीचीं मनुष्यें ज्याच्या पदरीं त्यापासून जय मिळविण्याची आशा बाळगणें हें व्यर्थ आहे.

---

## कोणास कोणीं हांसूंनये.

लोकांत अशी एक वाईट चाल पडून गेली आहे कीं, कोणाचें कांहीं उणें पाहिलें म्हणजे त्यास दुसऱ्यांनीं हांसावें, त्याचा उपहास करावा, त्याची थट्टा करावी, त्याची निंदा करावी. परंतु कोणी असें मनांत आणीत नाहीं कीं, मीं दुसऱ्याला हांसावें अशी योग्यता व असा अधिकार मजमध्यें काय आहे? कोणाहीमध्यें सर्व गोष्टी निर्दोष आणि पूर्ण असत नाहींत; कांहींना कांहीं उणें असतेंच. ह्यावरून सर्वांनीं सर्वांस हांसावें असें झालें, किंवा कोणीं कोणाला हांसूंनये, असेंही म्हणतां येईल. ह्यास उदाहरण, कोणाचा डोळा फुटका असला, किंवा नाक ाकटें असलें, म्हणजे त्याकडे पाहून लोकांनीं उगीच त्याला ांसावें. तर अवयवांत जो उणेपणा आला हा त्या बापड्याचा ापराध आहे काय? लोक हांसतात म्हणून त्याला आपले अव- ाव नीट करितां येतील काय? किंवा जे हांसणारे त्यांस तरी ाक्ति आहे काय कीं त्याचे ते अवयव नीट करून देतील? ही ोष्ट पराधीन आहे. ईश्वरानें जे मनुष्यास अवयव दिले त्यांस ांगले वाईट म्हणण्याचा अधिकार आम्हां मनुष्यांस काय आहे? शाविश्यींचें जें हांसणें तें त्या आंधळ्याकडे किंवा नकट्याकडे ाागत नाहीं, तें ईश्वराकडे लागतें. ज्यानें अवयव दिले त्याला

हांसल्याप्रमाणें होतें. म्हणून कोणाच्या अंगीं कसाही उणेपणा असो, त्या उणेपणावरून कोणास कोणीं हांसूंनये, हें योग्य आहे. त्यांत इतका विचार करावा कीं, ह्याच्या मध्यें जो उणेपणा आहे तो ईश्वरकृतीचा आहे, किंवा मनुष्यकृतीचा आहे? मनुष्यकृतीच्या उणेपणाला कोणी हांसेल तर हांसो, परंतु ईश्वरकृतीच्या उणेपणास हांसतां कामानये. शरीररचना, शरीरशक्ति, संतति, संपत्ति, मानसिकशक्ति, ह्या गोष्टी ईश्वरकृतीच्या आहेत. ह्यांतील कोणेक गोष्टीचा उणेपणा मजमध्यें आहे म्हणून कोणीं खेद करूं नये, व दुसऱ्यामध्यें तो उणेपणा पाहून हांसूंनये. आतां न्यायानें वर्तणें, सदाचरण राखणें, ईश्वरास भजणें, दुसऱ्याचा मान राखणें, उपकार जाणणें, उपकार करणें, इत्यादि चांगलीं कर्मे, आणि ह्यांच्या उलटीं वाईट कर्मे हीं मनुष्यकृतींत मोजलीं आहेत. तसेंच कारागिरिचे पदार्थ, बुद्धिकौशल्याचे पदार्थ, वादविवाद, युद्ध, गान, नृत्य, कविता, वाद्य, इत्यादि कला मनुष्यकृतींत गणिल्या आहेत. ह्या मनुष्यकृतींत जरी कोठें उणेपणा दृष्टीस पडला तरी हांसूंनये, हा मुख्य पक्ष. कदाचित् हांसावेंसें वाटलें, तर उणेपणा जाऊन पूर्णता येईल अशा रितीनें तरी हांसावें, म्हणजे त्या हांसण्यानें त्यास उत्तम उपदेश व्हावा. दुसऱ्याचा उणेपणा पाहून आपणास हांसूं आलें खरें, पण ह्या गोष्टीचा संतोष मानूंनये; उलटा खेद मानावा. आणि तो उणेपणा आपल्या हातून जितका काढवेल तितका काढण्याविषयीं प्रयत्न करावा. अवरूची चाड सर्वांस आहे. दुसऱ्यांचें हांसणें कोणास सुख देत नाहीं. कोणी वाटेनें पाय निसरून पडला, तर अगोदर इकडे तिकडे पाहतो कीं, कोणी मला हांसला नाहींना,

तशांत जर कोणी त्याकडे पाहून हांसला, तर पडण्याच्या दुःखापेक्षां त्याला त्या हांसण्याचें दुःख फार होतें. याजकरितां दुसऱ्याला हांसून, किंवा थट्टा, निंदा, उपहास वगैरे करून, त्यास दुःख द्यावें, हें सुमनुष्यास योग्य नाहीं.

---

## मनोराज्य.

शेख महंमद म्हणून एक मोठा आळशी माणूस होता. त्यानें बाप जिवंत असतां कोणताही धंदा हातीं धरिला नाहीं. बाप वारला तेव्हां त्यानें शंभर रुपयांचा ऐवज आपल्या मुलास ठेविला.

ह्यापासून चांगला नफा मिळवावा म्हणून त्या शेख महंमदानें त्याचे शिसे, कुप्या, आणि मातीचीं नामी नामी भांडीं खरेदी केलीं. हे दागिने त्यानें एका मोठ्या पसरट हाऱ्यांत एकावर एक रचून ठेविले; आणि एक लहानसें दुकान भाड्यानें घेऊन त्यांत आपल्या पायांजवळ तो हारा ठेवून, भिंतीशीं पाठ टेंकून तो गिऱ्हाइकांची वाट पाहत बसला.

अशा प्रकारें तो बसला असतां, व त्याची दृष्टि हाऱ्यावर लागली असतां, त्याच्या मनांत एकामागून एक चमत्कारिक कल्पना येऊं लागल्या, आणि पुढें लिहिल्याप्रमाणें तो आपणाशीं बोलूं लागला.

तो म्हणाला, माझी दौलत काय ती शंभर रुपये, ती ठोक विकरीच्या व्यापाऱ्याकडे देऊन ह्या हाऱ्यांतील दागिने म्यां खरेदी केले. हे फुटकळ विकून मी लवकर शंभरांचे दोनशें

रुपये करीन. दोनशें रुपयांचे फार दिवस न लागतां चारशें होतील; आणि चारशांचे होतां होतां कालगतीनें सहज चार हजार होतील; व चार हजारांचे आठ हजार खचीत होतील.

ह्या रितीनें मी दहा हजारांचा धनी झालों, म्हणजे हा भांड्यांचा धंदा सोडून मी जवाहिऱ्या होईन, आणि हिरे, मोत्यें, व दुसरीं सर्वप्रकारचीं रत्नें ह्यांचा व्यापार करीन. मला पुष्कळ संपत्ति मिळाल्यावर फार चांगला वाडा पाहून मी विकत घेईन. तसेंच जमिनी, दास, घोडीं, हीं खरेदी करीन. मग मी सुखाचा उपभोग करूं लागेन, आणि लोकांत आपलें नांव गाजवीन.

इतक्यानेंच मी धंदा सोडणार नाहीं. एक लक्ष रुपये गांठीं राहत तोंपर्यंत तो तसाच चालवीन. मी लाख रुपयांचा धनी झालों, म्हणजे राजेलोकांची व माझी बरोबरी सहजच होईल. मग वजिराची मुलगी आपली बायको करण्याकरितां मागण्याची मला योग्यता येईल.

ती थोराची कन्या घरीं आल्यावर ती माझा चांगला बोज ठेवी असा उपाय मी करीन. ह्याकरितां तिनें आपल्या खोलींतून बाहेर पडूंनये अशी मी बंदी करीन. तिच्या भेटीस मी गेलों असतां तेथें थोडाच वेळ राहीन, आणि तिशीं थोडेंच बोलेन.

मग तिच्या दासी येऊन मला विनंती करितील कीं, आपल्या अवकृपेमुळें बिबीसाहेब फार दुखण्यांत पडल्या आहेत, तरी मी कठोरपणा सोडणार नाहीं. नंतर तिची आई आपल्या मुलीस घेऊन, मी मऊ गादीवर बसलों असतां, मजकडे येईल.

मग माझी बायको डोळ्यांत पाणी आणून, माझ्या पायां पडून, मजवर कृपादृष्टि करा, अशी प्रार्थना करील. तेव्हां मजविषयीं पूज्य बुद्धि तिच्या मनांत ठसावी म्हणून, मी पाय आंखडून, ती कांहीं हातांवर लांब जाऊन पडे अशी तिला लाथ मारीन.

शेखमहंमद आपल्या मनोराज्यांत अगदीं गढून गेला होता, आणि त्याच्या मनांत जी गोष्ट आली ती करून दाखवि-ल्यावांचून त्याच्यानें राहवलें नाहीं, म्हणून त्यानें आपला पाय झाडिला, तों हाऱ्यास लाथ लागून त्याच्या मनोरथाच्या ऐश्वर्याचा पाया जीं कांचेचीं वगैरे भांडीं त्यांत होतीं तीं सर्व फुटून त्यांचे लाखों तुकडे झाले.

---

## कालीदासाच्या चातुर्याविषयीं गोष्टी.

**गोष्ट पहिली.** प्राचीन हिंदुराजांत भोजराजा फार विख्यात होऊन गेला. त्याच्या पदरीं विद्वान् लोक पुष्कळ होते, त्यांत नऊ इतके उत्तम होते कीं त्यांस, भोजसभेंतील नऊ रत्नें, असें म्हणण्याचा पाठ पडला होता. त्या नऊ रत्नांत कालीदास कवि हा होता. ह्याचे ग्रंथ ह्या देशांत तर काय, परंतु दूरदेशींही प्रसिद्ध आहेत. ह्याची कविताशक्ति, चातुर्य, आणि धूर्तता ह्यांची लोक वारंवार स्तुति करितात.

भोजराजास कवितेची फार आवड असे. कोणी नवीन कविता करणारा त्याकडे गेला तर तो त्याची चांगली संभावना करी, व त्यास आपल्या पदरींही ठेवी. ह्यामुळें त्याच्या जवळ कवींचा जमाव बराच जमला होता. त्यांत कित्येक एकपाठी होते, म्हणजे नवीन श्लोक एकदां ऐकिला तर ते पाठ म्हणत.

राजाकडे येऊन कोणी कसाही नवीन श्लोक म्हटला, तर त्यांनीं, हा आम्हांला येतो, असें बोलून म्हणून दाखवावा.

एका समयीं कालीदासाजवळ एक कवि आला, आणि म्हणाला, राजाकडे मला नेऊन भेटवाल, आणि माझी कांहींतरी संभावना होईल असें कराल, तर मजवर उपकार होतील. मी नवीन एखादा श्लोक करीन, परंतु राजसभेंत तो नवीन ठरणें कठीण आहे, ह्याला युक्ति काय करावी?

कालीदासानें त्यास सुचविलें कीं, तूं श्लोकांत असें म्हण कीं, राजाकडे माझा एक शंभर रत्नांचा हार येणें आहे; मी म्हणतों हें सभेंत दुसऱ्या कित्येकांसही माहीत असेल. असें केल्यानें श्लोक जुना ठरला तर हार मिळेल, नाहीं तर श्लोक नवीन ठरून चांगली संभावना होईल. त्या कवीनें कालीदासानें सुचविल्याप्रमाणें श्लोक करून राजापुढें म्हणतांच एक पाठयांचीं तोंडें बंद झालीं, व कवीस मोठा लाभ झाला.

**गोष्ट दुसरी.** एकासमयीं कालीदासाकडे कोणी अज्ञान ब्राह्मण आला, आणि म्हणाला, मी कंगाल आहें, माझ्या आंगीं कांहीं गुण नाहीं, परंतु दारिद्र्यानें पीडिलों आहें, हें मनांत आणून आपण मजवर कृपा कराल तर बरें होईल.

कालीदास म्हणाला, बरें आहे, तुला मी एकदां राजाकडे नेईन; पुढें तुझें नशीब. भेटीस जातांना कांहीं नजर नेली पाहिजे, ह्याकरितां कालीदासानें त्या ब्राह्मणाजवळ उंसाचीं चार कांडीं दिलीं.

ब्राह्मणानें बिऱ्हाडीं जाऊन तीं कांडीं पंच्यांत गुंडाळून ठेविलीं. हें पाहून कोणी थट्टेखोर तेथें होता त्यानें त्या ब्राह्मणास नकळत

तीं कांडीं काढून घेतलीं, आणि त्यांच्या जागीं तेवढींच जळाऊ लांकडें घालून ठेविलीं. ब्राह्मण राजाकडे जावयास निघाला तेव्हां तीं कांडीं पुन्हा पाहण्याचें त्यास सुचलें नाहीं. तो राजाकडे गेला, आणि त्यानें ती लांकडांची भेट राजापुढें ठेविली. हें पाहून राजास फार राग आला.

इतक्यांत कालीदास जवळ होता, तो म्हणाला, महाराज, ह्या ब्राह्मणानें लांकडांच्या रूपानें दारिद्र्य पुढें ठेविलें आहे, तें जाळून ब्राह्मणास सुखी करणें महाराजांकडे आहे.

हें ऐकून राजाचें समाधान झालें, आणि त्यानें त्या कंगाल ब्राह्मणास पुष्कळ धन दिलें.

**गोष्ट तिसरी.** एकेदिवशीं भोजराजा शिकारीस गेला तेव्हां कालीदास त्याच्या बरोबर होता. ते फिरतां फिरतां थकून एका लहानशा नदीच्या कांठीं विश्रांतीस बसले. नदींत खडक पुष्कळ होता ह्यामुळें पाणी फार वाजत होतें. हें पाहून भोजराजानें कालीदासास विनोदानें पुशिलें, कविराज, ही नदी इतका आक्रोश कां करिते? कालीदासानें म्हटलें, महाराज, ही लहानपणींच माहेर सोडून सासऱ्यास चालली आहे म्हणून.

---

## मनास बोध.

### श्लोक रामदासी.

मनासज्जनाभक्तिपंथेंचिजावें ॥ तरीदेवतोपाविजेतोस्वभावें ॥
जनींनिंद्यतेंसर्वसोडोनियावें ॥ जनींवंद्यतेंसर्वभावेंकरावें ॥ १ ॥
मनावासनादुष्टकामानयेरे ॥ मनासर्वथापापबुद्धीनकोरे ॥
मनासर्वथानीतिसोडूंनकोहो ॥ मनाअंतरींसारवीचारराहो ॥ २ ॥

मनापापसंकल्पसोडूनियावा ।। मनासत्यसंकल्पजीवींधरावा ।।
मनाकल्पनातेनकोवीषयाची ।। विकारेंघडेहोजनींसर्वछीछी ।। ३ ।।
नकोरेमनाक्रोधहाखेदकारी ।। नकोरेमनाकामनानाविकारी ।।
नकोरेमनालोभहाअंगिकारूं ।। नकोरेमनामत्सरूदंभभारू ।। ४ ।।
मनाश्रेष्ठधारिष्टजीवींधरावें ।। मनाबोलणेंनित्यसोशीतजावें ।।
स्वयेंसर्वदानम्रवाचेवदावें ।। मनासर्वलोकांसरेनीववावें ।। ५ ।।

## वसंतऋतूचें वर्णन.

### श्लोक.

ऋतूंमधेंहापहिलावसंत ।। वाटेजनांलाबहुधापसंत ।।
कींबोलतीहाचसदाअसावा ।। असेंनकोणीम्हणतीनसावा ।। १ ।।
वाराकसाशीतळमंदयेतो ।। वारूनितापाबहुसौख्यदेतो ।।
छायातरूचीबहुतोषदायी ।। आहेतशीहेघनआंबराई ।। २ ।।
तरुसनूतनपल्लवफूटती ।। मधुरपुष्पसुवासहिसूटती ।।
भ्रमरत्यांवरुनीनचऊठती ।। रसफुलांतिलनिर्भयलूटती ।। ३ ।।
नवेंदीसतीचित्रज्यांचेपिसारे ।। तुरामस्तकींशोभतोहाकसारे ।।
कदंबावरीस्वप्रियेच्यासमोर ।। पहानाचतोहोउनीमत्तमोर ।। ४ ।।
वृक्षस्कंधींबांधुनीलांबदोले ।। घेतीनारीबैसुनीतेथझोले ।।
ओंव्यागातींस्वप्रियातेंवहाती ।। क्रीडायातीलोकलीलापहाती ।। ५ ।।
श्रांतास्वकांतानिरखोनियांकरी ।। करीकरानेंजलसेकतीवरी ।।
छत्रापरीपुष्करपत्रहीधरी ।। स्नेहेंप्रियेचाश्रमखेदतोहरी ।। ६ ।।

कुंजांतघोरघुबडेंबसतीतयांचे ।।
घूल्कारऐकुनिमुकेंजवींयसांचे ।।
श्येनंस्वनापरिसतांचिसमस्तसर्प ।।
वृक्षावरीलपतिहोउनिनष्टदर्प ।। ७ ।।

# नकाशा.

नकाशा म्हटला म्हणजे सगळ्या पृथ्वीचें किंवा पृथ्वी वरील एखाद्या देशाचें चित्र आहे. नकाशा पाहण्यासाठीं पुढें धरिला असतां त्याचें जें वरचें आंग ती उत्तर दिशा होय, खालचें आंग ती दक्षिण दिशा, उजवे हाताकडील बाजू ती पूर्व दिशा, आणि डाव्या हाताकडील बाजू ती पश्चिम दिशा समजावी. सगळ्या पृथ्वीचा नकाशा म्हटला म्हणजे गोलाचीं दोन अर्धें किंवा दोन बाजू असतात. एकेक अर्धाला गोलार्ध म्हणतात. पूर्वेकडील जें गोलार्ध त्याचे मोठे तीन भाग आहेत, म्हणजे आशियाखंड, यूरोपखंड, आणि आफ्रिकाखंड. आणि पश्चिमेकडील जें गोलार्ध तें अमेरिकाखंड आहे. चार खंडांमध्यें पुष्कळ देश आहेत.

पृथ्वीच्या नकाशाच्या मध्यभागीं जी पूर्वेकडून पश्चिमेकडे एक सरळ रेघ आहे ती पृथ्वीची मध्यरेषा होय. ती रेषा पृथ्वीच्या बरोबर मध्यावर आहे म्हणून मध्यरेषा हें नांव दिलें आहे. त्यारेषेवर जे देश आहेत त्यांत रात्रीचें मान आणि दिवसाचें मान सर्वदां सारखेंच असतें. पृथ्वीच्या उत्तरेकडील जें टोंक त्यास उत्तरध्रुव म्हणतात, आणि दक्षिणेकडील जें टोंक त्यास दक्षिणध्रुव म्हणतात. मध्यरेषेच्या बरोबरीनें ज्या उत्तरेकडे व दक्षिणेकडे पूर्वपश्चिम रेषा आहेत त्यांस अक्षांशांच्या रेषा म्हणतात. ह्या रेषांवरून कोणत्याही स्थळाचें मध्यरेषेपासून किती अंतर आहे हें समजतें. तसेंच, उत्तरेकडून दक्षिणेकडे गेलेल्या ज्या उभ्या रेषा आहेत त्यांस रेखांशांच्या रेषा म्हणतात. ह्यावरून पहिल्या रेषेपासून, म्हणजे नकाशांतील ज्या

रेषेवर शून्य मांडिलें असतें त्या रेषेपासून पूर्वेकडे किंवा पश्चिमेकडे कोणत्या स्थळाचें किती अंतर आहे हें समजतें.

पृथ्वीच्या नकाशावर पाहिलें तर उत्तरेच्या बाजूस भूमि फार, आणि दक्षिणेच्या बाजूस पाणी फार असें दिसतें.

## तट्टू उधळला असतां त्यास धरण्याची युक्ति.

गणू म्हणून सोळा वर्षांचा एक मुलगा होता; तो एके दिवशीं आपल्या जरद्या तट्टावर बसून बागेंत गेला होता. तो बागेंत पोहोंचल्यावर तट्टास एका झाडाशीं बांधून आपण गुलाबाचे वगैरे तक्ते चांगले सुंदर फुललेले होते ते पहावयास गेला. मग चार घटका चमत्कारिक चमत्कारिक रंगांच्या फुलांची शोभा पाहून, व कांहीं चांगलीं फळें खाऊन, तो घरीं जाण्याच्या बेतानें जेथें तट्टू बांधिला होता त्या झाडाजवळ आला. आणि पाहतो तों झाडाशीं तट्टू नाहीं, तो आपाप सुटून कोणीकडे उधळून गेला होता.

मग कांहीं वेळ इकडे तिकडे शोधून पाहतो तों तट्टू तर गवतांत स्वस्थ चरतांना त्याच्या दृष्टीस पडला. मग तो त्याजकडे धांवत जाऊन त्याच्या लगामास हात घालावयास गेला; परंतु तट्टास आपण आणखी मोकळेपणें खुशाल चरावेंसें वाटत होतें, म्हणून गणू जवळ जातांच तो झपदिशीं वळून, त्याजवर मागल्या दुगाण्या झाडून, झपाट्यानें पळत सुटला.

गणूनें आपण त्याच्या टापांच्या तडाक्यांत सांपडलों नाहीं ही ईश्वराची कृपा मानिली; परंतु आतां पुढें काय करावें, तट्टू हातीं लागतो कसा, हा त्यास मोठा विचार पडला. तो असा

विवंचनेंत पडला असतां त्यास अकस्मात् आठवलें कीं, मागें एकदां घोडा कुरणांत चरत होता, आणि मोतद्दारास त्यास धरावयाचें होतें, तेव्हां त्यानें कांहीं थोडासा दाणा तोबऱ्यांत घालून त्यापुढें धरिला. आणि तो जवळ येऊन दाणा खाऊं लागतांच त्यानें त्याच्या गळ्यास काढणी लाविली.

हें गणूस आठवलें खरें, परंतु त्याजवळ दाणा, तोबरा, आणि काढणी ह्या तिहींपैकीं एकही नव्हतें; मग तो आपल्या मनांत म्हणाला कीं, घोड्यास दाणा आवडतो तसें गवतही आवडतें. आतां आपल्याजवळ तोबरा नाहीं त्याजबद्दल आपल्या धोतरांत गवत घ्यावें, म्हणजे काम झालें; काढणी तर मुळींच नको, कां तर तट्टाच्या तोंडांत लगाम आहेच, तो आपण पकडला म्हणजे झालें. असा त्यानें विचार करून कोंवळें कोंवळें चांगलें गवत दहा पांच मुठी उपटून त्यानें आपल्या धोतराच्या ओंटींत घेतलें.

त्यानें जेथें गवत उपटलें तेथें एक बावा जमीन खणीत होता तो गणूस म्हणाला, मुला, तूं कशासाठीं गवत उपटून धोतरांत भरितोस बरें? गणूनें उत्तर केलें, माझा तट्टू सुटून गेला आहे तो हातीं सांपडत नाहीं. त्यास धरण्यासाठीं मीं हें गवत उपटून धोतरांत घेतलें आहे.

बावा म्हणाला, तुला इतके श्रम करण्याची गरज नाहीं. त्वां जरी रिकामें धोतर त्यापुढें धरिलें, तरीं तो जवळ येई तों पर्यंत त्यास तें रिकामें आहेसें वाटणार नाहीं; मग तो जवळ आला म्हणजे तूं त्याचा लगाम धर. गणू बोलला, पण हें त्यास ठकविणें झालें, आणि मी तर कोणास ठकवीत नाहीं, फार तर काय, मुक्या जनावरास देखील मी ठकवीत नाहीं. बावा

म्हणाला, भले शाबास, मुला, तूं मोठा प्रामाणिक आहेस. मग गणू अणखी म्हणाला, दुसरी गोष्ट आहे, म्यां जर त्यास आज फसविलें तर तो कदाचित् पहिल्यावेळेस फसेल, पण तो दुसऱ्यावेळेस माझा विश्वास धरणार नाहीं.

मग गणू त्या बावाशीं असें भाषण करून, जेथें त्याचा तट्टू चरत होता तेथें गेला. तें गवत त्याच्या पुढें धरितांच तो त्याच्या जवळ येऊन गवत खाऊं लागला; मग गणू त्याचा लगाम चटकन पकडून, त्यावर बसून, त्यास उडवीत उडवीत मोठ्या हर्षानें आपल्या घरीं आला.

ह्या गोष्टीचीं दोन तात्पर्यें आहेत. पहिलें, मुलांस लहानपणापासून प्रामाणिकपणा शिकविला असतां, तो त्यांचे मनांत चांगला ठसून त्यांच्या हातून बहुतकरून दगाबाजीचीं कामें घडणार नाहींत. दुसरें तात्पर्य असें कीं, मनुष्यांनीं सर्वकाळ आपला प्रामाणिकपणा राखण्याविषयीं प्रयत्न करावा. प्रामाणिकपणा हा कांचेच्या भांड्यासारिखा आहे. तें जसें एकदां फुटलें म्हणजे पुन्हा सांधत नाहीं, तसा एकवार मनुष्य लबाड ठरला म्हणजे लोक फिरून त्याजवर विश्वास ठेवीत नाहींत.

---

## भोजनाचा नियम.

ज्यांचीं शरीरें निरोगी आहेत त्यांस असें वाटत असेल कीं, आपणांस भोजनाच्या नियमाची गरज नाहीं. तथापि त्यांनीं पक्कें समजावें कीं नियम सोडिल्यानें शरीरास कधींनाकधीं इजा होईलच. अमुक रोगापासून मरण येतें, आणि

अमुक रोगापासून येत नाहीं, ह्याचा निश्चय करितां येत नाहीं. भोजनाचा नियम असल्यानें खाल्लेल्या अन्नाचें पचन होऊन त्याचा उत्तम परिणाम होतो. मनुष्याचें पुष्कळ दिवस वांचणें हें बहुतकरून त्याच्या खाण्यापिण्याच्या नेमस्तपणावर आहे. ह्यासाठीं ज्याला आपलें शरीर निरोगी राखावें अशी इच्छा असेल, त्यानें खाण्यापिण्याविषयीं नियम अवश्य राखावा.

आपण जें अन्न खातों तें सर्वदा एकाच प्रकारचें असूंनये. मधून मधून कधीं कधीं त्याचा पालट करीत असावें, असें केल्यानें जेवणास रुचि येते, आणि शरीरास आरोग्य होतें.

आपलें अन्न चांगल्या रितीनें शिजविलेलें असावें, म्हणजे त्याचें लवकर पचन होतें. कच्च्या अन्नाचें पचन होत नाहीं, अपक्व अन्न विकार करितें.

आपण जे पदार्थ खातों ते तोंडांत घातल्यावर दांतांनीं चांगले सावकाश चावून खावे; घाईघाईनें अर्धवट चावून गिळूंनयेत. देवानें आपणांस ह्याच कामासाठीं दांत दिले आहेत. जसें कच्चें तसेंच अर्धवट चावलेलें अन्न चांगलें पचत नाहीं.

आपण जें अन्न खातों तें अधाशीपणानें फार खाऊंनये. भुकेपेक्षां दोन घासांनीं कमी खावें. त्यापासून हित आहे; पण अधिक खाल्ल्यानें तोटा फार आहे. आंगास जडपणा येतो, बुद्धीस मांद्य येतें, शरीरास व्याधि जडतो.

जेवण अशा बेतानें जेवावें कीं मनास आल्हाद व हुशारी वाटेल. अहोरात्रांत दोनदां किंवा तीनदां जेवण्याचा नियम ठेवावा. जो पदार्थ आपणास आवडत असेल तोच खावा, आवडत नाहीं तो सहसा खाऊं नये. आणि भोजन झाल्यावर

शतपावली करून, थोडा वेळ विश्रांति घेऊन, मग कोणत्याही कामास लागावें.

भोजनाविषयीं जो असे नियम ठेवितो त्याचें शरीर निरोगी असतें. त्याच्या शरीरांत रोगास बिऱ्हाडही मिळत नाहीं. जो नियम ठेवीत नाहीं त्याच्या शरीरांत रोगास वतनदारी मिळते.

---

## उदारपणाचें उदाहरण.

### राजपुत्र भीमसिंग.

मेवाड देशांत राजसिंग ह्या नांवाचा उदेपुरचा राणा होता, त्यास विक्रम शक १७३७, म्हणजे इ० सन १६८१, ह्या वर्षी दोन पुत्र झाले. ते दोन बायकांपासून एक दोन तासांच्या अंतरानें जन्मले होते. पहिल्यानें जन्मला त्यास भीमसिंग, आणि मागून जन्मला त्यास जयसिंग, अशीं नांवें ठेविलीं होतीं. त्या देशांत अशी चाल आहे कीं मुलगा जन्मला म्हणजे बापानें मुलाच्या भुजांस एके प्रकारच्या गवताची मुळी बांधावी. तें गवत फार पुष्टिकारक आहे, व कितीही उन्हाळा कडक असला तरी सुकत नाहीं. त्या चालीप्रमाणें राणा जेव्हां त्या दोघां मुलांच्या हातांस त्या गवताची मुळी बांधावयास लागला, तेव्हां पहिल्यानें धाकट्याच्या हातास बांधून मग थोरल्याच्या हातास बांधिली. तें पाहून लोकांस वाटलें कीं, ही गोष्ट गडबडीमुळें सहज चुकून झाली असेल; परंतु वास्तविक पाहिलें तर धाकट्याच्या आईवर राण्याची फार प्रीति होती, म्हणून त्यानें बुद्ध्याच तसें केलें. पुढें तरी धाकट्या मुलावर त्याची प्रीति तशीच विशेष

असे. व दोघे मुलगे काहीं मोठे झाले तेव्हां राण्यास धास्ती पडली कीं, नजाणों, आपण धाकट्या मुलावर अधिक प्रीति ठेविली आहे ह्यामुळें वडील मुलगा पुढें त्याशीं द्वेष करूं लागेल, आणि दोघांमध्यें तंटा वाढेल. असें मनांत आल्यावरून एकेदिवशीं राणा ह्यानें आपली तरवार मेणांतून बाहेर काढून, वडील पुत्र जो भीमसिंग ह्याच्या हातीं देऊन, त्यास म्हटलें कीं, पुढें त्वां धाकट्या भावाशीं तंटा करून गादीस धक्का बसवावा यापेक्षां ह्यावेळेसच त्याजवर तरवार चालवावी, हें मला बरें वाटतें. ही तरवार तुझ्या हातीं आहे, आणि हा तुझा भाऊ तुजपुढें उभा आहे. असें बापाच्या तोंडचे शब्द ऐकतांच त्या उदार राजपुत्राचें मन पाण्यांतील ढेंकळाप्रमाणें विरघळलें, आणि त्यास गहिंवर येऊन तो बोलला, महाराज, असें जर आपल्या मनांत वागत असेल, तर मला आपल्याच गादीची आण आहे. आपण धाकट्यास गादीचा अधिकार देण्याची जी योजना केली तीप्रमाणें आपण त्यास खुशाल अधिकार द्यावा, त्यास मी कधींही आडवा येणार नाहीं. आणखी आपल्या मनांतील भय अगदीं जावें म्हणून दुसरी शपथ वाहतों कीं, ह्याउपर ह्या शिवेच्या आंत जर मी पाणी प्यालों, तर तुमच्या पोटचाच नव्हें. असें बोलून तत्क्षणीं आपले पदरचे लोक बरोबर घेऊन जिकडे आपला भाग्योदय होईल तिकडे जावें, ह्या हेतूनें तो उदेपूर शहर सोडून निघाला. त्यादिवशीं ऊन्ह फार कडक पडलें होतें. वारीच्या जवळ आल्यावर त्यानें मनांत आणिलें कीं, अंमळ विसांवा खावा, आणि एकवेळ आपल्या जन्मभूमीचें शेवटचें दर्शन घ्यावें; म्हणून एका वडाच्या झाडाखालीं सावलींत बसला.

उन्हाच्या तापानें व वाटेच्या श्रमानें त्यास तहान फार लागली होती, म्हणून खिदमतगारानें रुप्याचा पेला जवळच्या झऱ्यांतून पाण्यानें भरून आणून राजपुत्राच्या हातीं दिला. त्यानें तो पेला ओंठास लाविला, आतां घोट घ्यावा इतक्यांत त्याला शपथेची आठवण झाली; म्हणाला, अरेरे मीं शपथ वाहिली आहेना, कीं बारीच्या अलीकडे पाणी पिणार नाहीं म्हणून? तर मग येथें पाणी कसें प्यावें? असें म्हणून त्यानें पेल्यांतील पाणी देवाच्या नांवानें खालीं सोडून तो पेला पाण्याच्या झऱ्यांत टाकून दिला. आणि तसाच पुढें चालता झाला. मग बारीच्या पलीकडे जाऊन पुढें बहादुरशहा ह्याजकडे गेला. तेव्हां त्यानें ह्याचा सत्कार करून साडेतीन हजार स्वारांची मनसब दिली. आणि त्यांच्या खर्चाबद्दल बावन्न गांवांचा सरंजाम दिला. पुढें बहादुरशहाशीं त्याचें वांकडें पडल्यामुळें बहादुरशहानें त्यास स्वारांनिशीं सिंधुनदाच्या पलीकडे कामगारीस पाठविलें. तेथें तो शूर व उदार राजपुत्र कांहीं दिवसांनीं मरण पावला.

---

## मासे.

पाण्यांत कोट्यावधि प्राणी राहतात, त्यां पैकीं मुख्य मासे होत. माशांस पाय नसतात. त्यांचे पाठीला कणा असतो; आणि त्यांच्या डोळ्यां जवळ झालरी सारखा कांहीं अवयव असतो, त्यास कल्ला असें म्हणतात; त्याच्या योगानें त्यांस पाण्यामध्यें श्वासोच्छ्वास करितां येतो. तशीच त्यांच्या पोटांत एक पिशवी असते. पाण्यावर जेव्हां त्यांस यावेंसें वाटतें, तेव्हां

शरीर हलकें करण्यासाठीं ते ती पिशवी फुगवितात. जर त्यास पाण्याच्या तळाशीं जावेंसें वाटलें, तर ते शरीर जड व्हावें म्हणून ती दावितात. ह्या पिशवीचा सरसासारखा एक फार उपयोगी चिकट पदार्थ लोक करितात.

माशांच्या संततीची वाढ पराकाष्ठेची आहे. काद ह्या नांवाचा मासा जीं आंडीं घालितो तीं कधीं कधीं सुमारें ४०००००० भरतात. माशांचीं आंडीं पुष्कळ प्रकारचे मासे खातात, व मोठमोठे मासे लहान लहान माशांस खातात, म्हणून ह्यांच्या संततीला कांहीं मर्यादा असते. ह्यांस कोणी खाणारें नसतें तर हे अमर्याद वाढते.

माशांचे डोळे व कान हे तीक्ष्ण आहेत असें दिसतें; परंतु माशांस शब्द नाहीं. कधीं कधीं लाखों माशांचे थवे समुद्रावर येऊन कित्येक कोसपर्यंत समुद्र पांढरा दिसतो, तेव्हां देखील इतक्या माशांपासून कांहीं नाद ऐकूं येत नाहीं. ते समुद्रावर येतात तेवेळेस जोरानें जें पाणी उसळतें त्याचा मात्र शब्द ऐकूं येतो. कांहीं मासे फारच मोठे असतात, आणि कांहीं अगदीं लहान असतात. ह्यांच्या मध्यें लहान मोठया अशा पुष्कळ जाती आहेत.

आपलें व आपल्या आंड्यांचें रक्षण करण्यापुरतें माशाच्या आंगीं ज्ञान असतें. तरी एकदां त्यांनीं आंडीं घालून सुरक्षित स्थळीं ठेविलीं, म्हणजे पुढें आपल्या पिलांचें काय होईल ह्या विषयीं त्यांच्यांतील बहुतेकांस तिळप्राय काळजी नसते.

कांहीं मासे आंडीं घालण्याच्या वेळेस खारें पाणी सोडून देऊन नदीच्या रेंवट पात्रांत जाऊन तेथें आपलीं आंडीं घालितात.

त्यांपैकीं कांहीं जातींचे मासे नदींत फार लांब जातात; आणि वाटेंत मोठे मोठे खडक आडवे आले तर त्यांवरून उडून पुढें जातात.

मासे लांबलांबचा प्रवास करितात. उत्तर समुद्रांत राहणाऱ्या हेरिंग नांवाच्या माशांचे थव्यांचे थवे दरवर्षास तेथून ब्रितन देशाच्या समुद्रांत येतात. त्यांतील मुख्य थवा जून महिन्यांत येतो, आणि पुष्कळ कोसपर्यंत समुद्र भरून टाकितो. दच लोक व इंग्लिश लोक हे मासे धरितात, आणि ते नासूं नयेत म्हणून मीठ मसाला त्यांत घालून यूरोपखंडांतील निरनिराळ्या देशांत पाठवितात.

समुद्रांत राहणारे दुसरे कांहीं प्राणी आहेत, त्यांपैकीं देवमासा फारच मोठा आहे. ह्यास इंग्रजींत व्हेल म्हणतात. हा प्राणी खोल समुद्र सोडून दुसरे कोठें कधींही जात नाहीं. ह्याचें रक्त उष्ण असतें, व ह्याचीं पोरें आईच्या आंगावर पितात. ह्याला पाठीमागल्या दोन पायांबद्दल शेंपूट असतें, आणि पुढचे दोन पाय हातवल्ह्यांसारखे असतात, त्यांच्या योगें त्यास पोंहतां येतें. ह्या माशाच्या जाती पुष्कळ आहेत. त्या सर्वांत जो मोठा असतो त्याची लांबी ९० फूट असते. हा प्राणी आपल्या शेंपटाच्या झपाट्यानें शत्रूपासून आपला बचाव करितो. ह्याच्या शेंपटाचा जोर इतका असतो कीं त्यानें तो मोठी नाव देखील फोडून टाकून खूब वर झोंकून देतो. ह्यामुळें ह्याला धरणें मोठें कठीण पडतें. ह्या प्राण्याच्या चरबीचें तेल काढून त्यावर लोक पुष्कळ पैसा उत्पन्न करितात. एका जातीच्या देवमाशाला तोंडांत एक मोठें हाड असतें, हें यूरोपखंडांतील

लोकांस फार उपयोगीं पडतें. आतां हा देवमासा एवढा मोठा असतो कीं त्यानें आपलें तोंड उघडिलें तर त्यांत कांहीं पुरुष ताठ उभे राहतील; तरी त्याचे घशाचें भोंक इतकें बारीक असतें कीं मोठा मासा त्याच्यानें गिळवत नाहीं. अगदीं लहान मासे मात्र त्याला गिळतां येतात. त्याचा मुख्य आहार म्हटला म्हणजे समुद्राचा आर.

गज्याल म्हणून एक दुसरा प्राणी आहे तो समुद्रांत वास करितो. सील व वालरस ह्या नांवांचे प्राणी आहेत ते कधीं कधीं समुद्रांत येतात, तरी ते तेथें नेहमीं राहत नाहींत. हे मासे खाणारे आहेत.

---

## किडे.

पृथ्वीवर जितके प्राणी आहेत त्या सर्वांमध्यें किड्यांची संख्या फारच मोठी आहे, म्हणजे अगण्य आहे. व त्यांची अशी कांहीं निष्प्रतिबंध गति आहे कीं जेथें त्यांचा प्रवेश नाहीं असें एकही स्थल मिळावयाचें नाहीं. व ज्या प्राण्यापासून त्यांस अन्न व आश्रय मिळत नाहीं असा ह्या पृथ्वीवर एकही प्राणी नाहीं. मग तो प्राणी मोठ्या दुःखानें कां देईना.

ह्यांचें आंगचें ज्ञान मोठें विलक्षण आहे. तसें दुसऱ्या कोणत्याही प्राण्याचें दिसत नाहीं. तशींच ह्यांचीं रूपांतरें जीं होतात तींही फारच विलक्षण असतात. ह्यांचे तऱ्हेतऱ्हेचे आकार व रंग पाहिले असतां इतर प्राण्यां पेक्षां उद्भिज्ज कोटी-शीं ह्यांचें सारखवट आहे असें दिसतें.

हे मोठे खादाड असतात, व ह्यां पैकीं कित्येकांस विष असतें,

त्यामुळें त्यांनीं दंश केला असतां अत्यंत वेदना होतात. मनुष्याच्या व पशूंच्या अंगावर चालून, व कानांत गुणगुण करून, त्यांस हे विलक्षण त्रास देतात. ह्या सर्व गोष्टी मनांत आणिल्या म्हणजे आपणांस कदाचित् वाटेल कीं, ह्या जगांत हे निरर्थक व्याधि आहेत, व ह्यांपासून इतर प्राण्यांस कांहीं उपयोग नाहीं.

आतां ह्यांस निरुपयोगी म्हणणें म्हणजे ईश्वराच्या करणीस दोष देणें आहे. परंतु थोडासा विचार केला तर समजेल कीं, आपलें हें म्हणणें अज्ञानाचें आहे. पहा, जरी वर सांगितलेले दोष किड्यांमध्यें आढळतात, तरी त्यांच्या पासून उपयोगही मोठाव आहे. पृथ्वीवर जे नासके कुसके पदार्थ असतात ते किडे खाऊन टाकून, घाणीच्या योगानें हवा नासून रोग उत्पन्न व्हावयाचे, ते उत्पन्न होऊं देत नाहींत. आतां हे कधीं कधीं आमचें अन्न खातात, व आमचें शरीर तोडतोडून टाकितात, तरी आपण एक गोष्ट मनांत आणिली पाहिजे कीं पक्षी व मासे, ज्यांजवर पुष्कळ मनुष्यांचा निर्वाह चालतो, त्यांचें ह्या किड्यांवर उपजीवन होतें. ह्यांतील तीन जातींच्या किड्यांपासून आपणांस फारच उपयोग होतो. रेशमाच्या किड्यांपासून रेशीम मिळतें; मोहोळाच्या माशांपासून मध व मेण मिळतें, व किरमिजांपासून किरमिजी रंग मिळतो.

किड्यांच्या अशा कांहीं जाती आहेत कीं त्यांचें धड व डोकें ह्यांच्या मध्यें अंतर असतें. अशा किड्यांस आठ पाय असतात. व डोळ्यांवर शिंगांसारख्या दोन मिशा असतात, ज्यांहींकरून ते पदार्थ चांचपून पाहतात. आणि श्वासोच्छ्वास करण्यास त्यांना

नव्या असतात. ह्या जातीचे किडे माशा, मुंग्या, मुंगळे, मुरकुटें, वगैरे आहेत.

किड्यांची एक विशेष गोष्ट आहे ती दुसऱ्या कोणत्या प्राण्यास लागत नाहीं. ती अशी कीं, त्यांचीं रूपें जीं पालटतात त्यांत पहिलें रूप व नवें रूप ह्यांच्या मध्यें कांहींच सारखवट राहत नाहीं. भुईवर चालणारा तो आकाशांत उडणारा होतो; जसें मुंगीचें पांखरूं. डांस हा किडा एके अवस्थेंत सांचलेल्या पाण्यांतच राहण्यास योग्य असतो, आणि रूपांतर झाल्यावर त्यास पंख येऊन तो आकाशांत उडूं लागतो.

कांहीं किड्यांस दोन रूपांतरें होतात, व कांहींस तीन होतात.

आंडें फुटून जो किडा निघतो त्यास घुला किंवा सुरवंट असें म्हणतात. हा घुला ह्या अवस्थेंत कांहीं नियमित दिवस आयुष्य घालवितो, नंतर ह्यास कांहीं आकार विशेष येतो, तेव्हां त्यास कोशवासी असें म्हणतात. ह्या अवस्थेंत हा जमिनींत, किंवा झाडाच्या बुंधापाशीं, किंवा एकीकडे कोठें तरीं कोंपऱ्यास, असतो. ह्याच्यावरील आच्छादन म्हटलें म्हणजे रेशीम वगैरे ह्याचा कोसला असतें. ह्या अवस्थेंत कांहीं दिवस गेल्यावर सर्व अवयवांनीं पूर्ण असा प्राणी होऊन, कवच टाकून, बाहेर निघतो. ह्यास आपण पतंग, फुलपांखरूं, इत्यादि नांवें ठेवितों.

कोशवासी ह्या अवस्थेंत येण्यापूर्वीं घुला आपणास जें घर करितो त्यांत त्याचें विलक्षण चातुर्य दिसून येतें. जेव्हां तो आपणास कोशांत वेष्टून घेतो तेव्हां एका तंतूनें आपला कोसला झाडाच्या फांदीला टांगितो. एक जातीचा किडा, ज्यास रेशमाचा किडा म्हणतात, तो आपणाकरितां जे तंतु पोटांतून काढितो

त्यांपासूनच आम्हां मनुष्यांस रेशीम मिळतें; दुसरे कोठून मिळत नाहीं. एका किड्याच्या कोसल्यापासून सुमारें ३०० यार्ड रेशीम निघतें. हा रेशमाचा किडा तुतीचीं पानें खाऊन राहतो.

माशा, डांस, मोहोळाच्या माशा, गांधीलमाशा, व दुसरे कांहीं किडे ह्यांस दोनच रूपांतरें होतात.

## कोळी.

कोळी हे साधारणपणें किड्यांत मोडतात; तरी त्यांचीं रूपें पालटत नाहींत. कोळी हे माशा वगैरे आपलें भक्ष्य धरण्या करितां जीं जाळीं पसरतात त्यांमध्यें त्यांचें आंगचें विलक्षण चातुर्य दिसून येतें. हा प्राणी आपल्या जाळ्याचे तंतु आपल्या पोटांतून काढितो. जर एखाद्या किड्यानें त्याच्या जाळ्याच्या एकाद्या तंतूस स्पर्श केला, तर त्याच्या हालण्यानें त्यास लागलेंच समजतें; आणि जेथें तो लपून बसला असतो तेथून त्या किड्यास धरण्याकरितां धांवत जातो; आणि आपल्यापेक्षां तो किडा फारच बळकट आहे असें जर त्यास समजलें, तर हळूच तंतूच्या आधारानें खालीं जातो. कांहीं कोळी आपलें भक्ष्य सहज हातीं लागावें म्हणून त्यास तंतूंनीं गुंडाळितात. जो कोळी घराच्या एखाद्या एकीकडच्या कोंपऱ्यांत आपलें जाळें पसरितो तो आपणाकरितां एक लहानसें निराळें घरटेंही तयार करितो. आणि घरटें व जाळें ह्यांच्या मध्यें तंतूंचा एक पूल करितो. नंतर जी बिचारी माशी किंवा डांस जाळ्यांत सांपडेल त्यास त्या पुलाच्या मार्गानें आपल्या घरट्यांत नेतो.

दक्षिण अमेरिकेमध्यें एकाप्रकारचा कोळी आहे तो खबुतराच्या आंड्याएवढा मोठा असतो.

## कोंबडी आणि कोल्हा.

एक कोल्हा एका खोपटींत शिरून कांहीं भक्षायास मिळवावें म्हणून खालीं वर पाहत होता. त्यानें तेथें एक कोंबडी पाहिली; ती माळ्यावर उंच बसली होती, तिजपाशीं त्यास जाववेना; तेव्हां तो तिची प्रशंसा करून म्हणतो, ताई, तुझा कायगे समाचार आहे? तुला फार बरें वाटत नाहीं, घरांतच निजून असतेस, असें मीं ऐकिलें, तेव्हांपासून, ताई, मी तुला खरेंच सांगतों, मला असें दुःख झालें आहे कीं रात्रंदिवस झोंप लागत नाहीं. तर, गडे, खरेंच सांग मला, तूं आतां कशीगे आहेस? अरती तरी ये, मला तुझी नाडी पाहूंदे, असा तो बोलतो आहे, मध्यें मध्यें तिला नावाजतो आहे; असें पाहून कोंबडी त्यास बसल्या जाग्या वरूनच उत्तर करिते, खरेंच रे, भाऊ, त्वां ऐकिलें तें खरेंच; असें दुखणें मला कधींही आलें नव्हतें. मी आतां खालीं तुजकडे आलें असतें, पण वैद्यानें मला सांगितलें आहे कीं, तूं कोणास जवळ येऊं देऊं नको, आणि कोणाजवळ जाऊं नको; म्हणून, रे भाऊ, मला खालीं येववत नाहीं. आतां तूं ह्या वेळेस जा; सध्यां मी इतकी अशक्त आहें कीं तुझ्या जवळ चालून आलें असतां माझा प्राण निघून जाईल.

### तात्पर्य.

खुशामती मात्र जितका, तितका लबाड. तो सर्वांचा शत्रु, असें समजून सर्वांनीं त्याशीं तशीच वर्तणूक करावी. कांतर त्याच्या मायावी भाषणाच्या पार दृष्टि पोहोंचवून त्याच्या पाशांत सांपडणार नाहींत असे चतुर पुरुष ह्या लोकांत थोडेच; फसणारे असे फार.

# उंदरांची सभा.

एके समयीं उंदीर आपली मंडळी मिळवून विचार करूं लागले कीं, मांजरापासून आपले प्राण राखावया विषयीं सबळ अशी युक्ति कोणती? तेथें बहुत कल्पना निघाल्या, आणि पुष्कळ भवति नभवति झाली. त्यासमयीं एका तरण्या उंदरानें पुढें होऊन मोठें पांडित्य करून शेवटीं सिद्ध केलें कीं, ह्यास एकच युक्ति; ती अशी कीं, मांजराच्या गळ्यांत घांट बांधावी, म्हणजे ती अंमळ हालली कीं सावध होऊन आपणांस आपआपल्या बिळांत जातां येईल. तें ऐकून सर्वांनीं, वाहवा चांगली युक्ति! असें म्हणून माना डोलविल्या; आणि त्यांतून कितीक म्हणूं लागले कीं, ह्या उंदरास सर्वांपासून एक मानपत्र असावें. तेथें एक शहाणा म्हतारा उंदीर होता, तो तें सर्व ऐकून घेऊन उभा राहिला, आणि म्हणाला, गड्यांनो, कल्पना तर बहुत सुंदर आहे, आणि तिचा काढणाराही अत्यंत कुशळ आहे खरा, ह्यांत संशय नाहीं; परंतु त्याच्या मुखानें मला अजून इतकें समजलें पाहिजे कीं, मांजराच्या गळ्यांत ती घांट कशी बांधावी, आणि कोणता उंदीर तें काम पतकरितो. हें कळे पर्यंत आपण ह्यास मानपत्र देऊं नये. तें ऐकून सर्वांनीं त्या तरण्या उंदराचा उपहास केला.

## तात्पर्य.

तोंडच्या योजनेंत पुष्कळ गोष्टी सोप्या दिसतात; परंतु करूं लागलें असतां समजतें कीं कठीण आहेत. ह्यासाठीं जो पुरुष एखादी युक्ति सांगावयास पुढें होतो, ती कशी करितां येईल, हें त्यानें प्रत्ययास आणून दिल्यावांचून त्यास नावाजूं नये.

# लक्ष्मण मुलगा.

संताजी नांवाचा एक अतिदरिद्री मोलकरी होता. त्याला लहान लहान सहा मुलें होतीं. ह्यांचें पोषण कसें होईल म्हणून त्यास एकेसमयीं मोठी काळजी पडली; आणि त्यांत दुसरें असें झालें होतें कीं, त्यावर्षी पीक चांगलें आलें नव्हतें म्हणून आदले वर्षापेक्षां दाणा दुप्पट महाग झाला होता. संताजी रात्रंदिवस खपे, तरी मुलांस जाडीभरडीही भाकर घालावयापुरते पैसे त्याला मिळत नसत. असा तो पराकाष्ठेच्या क्लेशांत पडला. एकेदिवशीं त्यानें आपल्या सगळ्या मुलांस जवळ बोलाविलें, आणि डोळ्यांत आसवें आणून म्हटलें, अरे माझ्या जिवलगांनो, यंदा महागाई फार आहे; मी इतका खपतों तरी तुमचें पोट भरावयापुरता दाणा मला मिळत नाहीं, अशी माझी अवस्था आहे. तुम्ही पहा कीं, सगळे दिवसाची माझी मजूरी एवढ्याशा एका भाकरीसाठीं खर्च होते; म्हणून मला जें मिळतें तितक्यांत तुम्हीं निर्वाह केला पाहिजे, दुसरा उपाय नाहीं. इतक्यानें तुमचें पोट भरणार नाहीं खरें, पण प्राण तर वांचतील. इतकें बोलून तो उगा राहिला; त्या बापड्याच्यानें पुढें बोलवलें नाहीं. तो वर देवाकडे डोळे करून रडूं लागला, तें पाहून मुलेंही रडूं लागलीं, आणि आपल्या मनांत म्हणूं लागलीं, हे देवा, हे ईश्वरा, आम्ही गरीब, आम्ही लहान, आम्ही भाग्यहीन आहों, आम्हांवर करुणा कर, आमच्या बापास सहाय हो, आम्हांस उपाशीं मरूं देऊं नको.

संताजीनें मग त्या भाकरीचे सात तुकडे केले, आणि त्यांतला अगदीं लहान आपण घेऊन बाकीचे तुकडे मुलांस वांटून दिले.

त्यांत एक लक्ष्मण म्हणून मुलगा होता, त्यानें आपला वांटा घेतला नाहीं. तो म्हणाला, बाबा, मला नको; आज माझ्यानें खाववत नाहीं; मला बरें वाटत नाहीं; माझा वांटा तूं खा; नाहींतर माझे भावंडांस वांटून दे. संताजीनें लक्ष्मणास पोटाशीं धरून विचारिलें, बाळा, तुला काय होतें? तो म्हणाला, बाबा, मला बरें वाटत नाहीं, फार बरें वाटत नाहीं, मी निजावयास जातों. संताजीनें मुलास नेऊन खाटेवर निजविलें. दुसरे दिवशीं, प्रातःकाळीं, संताजी मोठा कष्टी होऊन तसाच वैद्याचे घरीं गेला, आणि त्याच्या पायां पडून म्हणाला, वैद्यबावा, माझा मूल घरीं दुखणाईत पडला आहे, मजदीनावर दया करून त्याला पहाल आणि औषध द्याल, तर मी तुमचा उपकार जन्मवर विसरणार नाहीं. तो वैद्य मोठा सज्जन होता; आपणास संताजीकडून कांहीं मिळावयाचें नाहीं, हें त्यास पकें ठाऊक होतें, तरी तो त्याचे घरीं गेला; आणि खाटेजवळ जाऊन त्यानें लक्ष्मणाची नाडी पाहिली, तों रोगाचें लक्षण कांहींच दिसलें नाहीं, परंतु अशक्त फार झाला आहे इतकें मात्र दिसून आलें. नंतर कांहीं औषधांची याद लिहीत आहे, इतक्यांत लक्ष्मण म्हणतो, वैद्यबावा, मी तुमच्या पायां पडतों, मजकरितां कांहीं औषध आणवूं नका; मी तें साफ घेणार नाहीं.

**वैद्य.**— कां बरें घेणार नाहींस?

**लक्ष्मण.**— तें मला विचारूं नका; माझ्यानें सांगवत नाहीं.

**वैद्य.**— तें सांगावयास तुला काय अडचण आहे? तूं तरी मला भला हट्टी पोरगा दिसतोस.

**लक्ष्मण.**— वैद्यबावा, मी हट्टामुळें सांगत नाहीं असें नाहीं.

वैद्य.— बरें तर, मी तुला आग्रह करीत नाहीं; तुझ्या बापास विचारितों; मला वाटतें कीं तो इतकें गुप्त ठेवणार नाहीं.

लक्ष्मण.— नका, नका, वैद्यराज; तुम्हांला शपथ आहे, ही गोष्ट बाबाला कळवूं नका.

वैद्य.— मुला, तुला काय म्हणावें! पण जर तूं मला सांगत नाहींस; तर मला ही गोष्ट तुझे बापास कळविणें प्राप्त आहे.

लक्ष्मण.— नका, बाबा, नका! त्यापेक्षां आतां मीच होऊन तुम्हांला सांगावें हें बरें; पण दया करून माझ्या भावांला आणि बहिणींला बाहेर घालवा.

वैद्यानें दुसऱ्या मुलांस बाहेर घालविल्यावर लक्ष्मण त्यास म्हणतो, वैद्यबावा, ह्या दुष्काळांत माझे बाबास मोठे श्रमानें एके भाकरी पुरते पैसे मिळतात. तिचा एकेक तुकडा एकेकाच्या वांट्यास येतो, आणि अगदींच लहान तो बाबा आपण घेतो. माझे भाऊ आणि बहिणी भुकेनें व्याकूळ पाहून मला भारी वाईट वाटतें. सर्वांत मी वडील, सर्वांपेक्षां मला अधिक शक्ति आहे, त्या अर्थीं मला वाटतें कीं माझा वांटा भावांबहिणींनीं खावा; मी खात नाहीं ह्याचें कारण हें आहे. ह्यासाठीं मीं दुखणें घेतलें आहे, आणि माझ्यानें खाववत नाहीं असें सांगतों; परंतु मी फिरून तुमच्या पायां पडतों, ही गोष्ट बाबाला सांगूंनका. हें ऐकतांच वैद्याला गहिंवर येऊन त्याच्या डोळ्यांस पाणी आलें, आणि तो म्हणाला, पण बाळा, तूं भुकेनें व्याकूळ होत नाहींस काय?

**लक्ष्मण**— होत नाहीं असें कसें होईल? मला भुकेपासून व्यथा होते, पण त्यांची भूक पाहून जशी मला व्यथा होते तशी माझ्या भुकेनें होत नाहीं.

**वैद्य**— पण जर तूं कांहीं खाणार नाहींस, तर लवकर मरशील.

**लक्ष्मण**— हें तर मी जाणून आहें, पण मी संतोषानें मरणार. माझ्या बाबाला तितकें एक पोट तरी कमी होईल; मी मरून देवाजवळ जाईन, आणि प्रार्थना करीन कीं, ईश्वरा, माझ्या भावांला आणि बहिणींला अन्नानांचून मारूं नको.

त्या मुलाचे असे शहाणपणाचे बोल ऐकून वैद्यास मोठा चमत्कार वाटला, त्यास अंतःकरणांत करुणा येऊन त्यानें लक्ष्मणास दोहों हातीं उचलून उराशीं धरिलें, आणि म्हटलें, भिऊंनको, माझ्या सख्या, तूं मरणार नाहींस. सर्वांचा बाप जो ईश्वर तो तुझें आणि तुझ्या कुटुंबाचें संरक्षण करील. मला त्या ईश्वरानेंच येथें आणिलें असें समज; तर आतां घरीं जाऊन लवकरच येतों असें बोलून वैद्य आपल्या घरीं धांवत गेला, आणि चाकराचे डोईवर नाना प्रकारचीं अन्नें देऊन लागलाच त्यास घेऊन परत आला. त्यानें संताजीस आणि त्याचे मुलांस पंक्तीनें बसवून पोटभर जेवायास घातलें. त्या गरीब मुलांचा यथेष्ट जेवतांना उत्साह पाहून तो धार्मिक वैद्य फार फार समाधान पावला. जातेवेळीं लक्ष्मणास म्हणाला, मुला, तूं कांहीं काळजी करूं नको; मी तुम्हांस लागेल तें पुरवीत जाईन. ती प्रतिज्ञा त्यानें मोठ्या आवडीनें पाळिली. तो नित्य त्यांस शिजविलेलें अन्न पाठवून देई. त्या गांवीं दुसरे कितीएक त्या वैद्यासारखे धार्मिक पुरुष

होते त्यांस ती गोष्ट समजली, तेव्हां तेही त्या मुलांचा समाचार घेऊं लागले. कोणी अन्न, कोणी पैसा अडका, कोणी वस्त्रें, असें त्यांस देत, ह्याप्रमाणें थोडकेच दिवसांत तें लहान मुलांचें कुटुंब दारिद्रांतून मोकळें झालें.

ह्याप्रमाणें आपल्या बापाकरितां आणि आपले लहान भावंडांकरितां त्या उदार मुलानें जें आचरण केलें, तें त्या देशच्या राजानें ऐकिलें, तेव्हां त्यास मोठा चमत्कार वाटला, आणि संताजीला आपणाजवळ बोलावून म्हणाला, तुझा मूल मोठा साधु आहे; मी त्याला लेंकाप्रमाणें पाळीन. मीं भांडारी ह्यास सांगून ठेविलें आहे, तो तुला दर वर्षीं पांचशें रुपये देईल. लक्ष्मण आणि दुसरे तुझे मुलगे आहेत त्यांनीं इच्छेस येईल तो धंदा शिकावा; त्यांचा शिकविण्याचा खर्च मी देईन; आणि ते जर चांगल्या मार्गानें चालले, तर मी त्यांस भाग्यास चढवीन.

संताजी मोठा हर्षित होऊन घरीं आला, आणि दंडासारखा भुईवर पडून आपणास इतका योग्य पुत्र देवानें दिला म्हणून देवाचा स्तव करूं लागला.

---

## गंवंडी व मजूर.

कोणे एकेदिवशीं द्वारकानाथभट, आपला मुलगा हरी ह्यास घेऊन, बाजारचे रस्त्यानें चालला होता. तेथें एक मोठी हवेली बांधण्याचें काम चाललें होतें, तें कौतुक पहावयास ते उभय तेथें उभे राहिले. तें काम दुसऱ्या मजल्यापर्यंत चढलें होतें. हरीनें पाहिलें कीं त्यास परांच्या केल्या आहेत; त्यांवर शिड्या लाविल्या आहेत; त्या शिड्यांवरून एकावर एक अशीं माणसें

आहेत; तीं अनुक्रमानें खालवर हात नाचवीत आहेत; तें पाहून हरी बापास पुसतो, बाबा, हीं माणसें कसचा खेळ खेळत आहेत? आपण अमळ शिडीजवळ जाऊं, येतां?

मग त्यांनीं अमळ जवळ जाऊन पाहिलें कीं एका मनुष्यानें राशींतून एक दगड उचलून शिडीच्या तळपायरीवरचे मनुष्याचे हातीं दिला; त्यानें तो घेऊन हात वर केले, तों त्याच्या वरच्यानें तो घेतला; त्यानें हात वर करून तिसऱ्याचे हातीं दिला; त्यानें तसेंच करून चौथ्याचे हातीं दिला; असा एकाच्या हातून दुसऱ्याचे हातीं जात जात तो दगड क्षणांत परांचीवर गेला. तेथें गवंडी होते त्यांनीं तो तत्काळ कामीं लाविला.

**द्वारकानाथ**—मुला, हें पाहून तुला असें वाटतें की नाहीं, कीं इतकीं माणसें ह्या घरावर कशास लाविलीं आहेत? ह्याहून असें केलें तर चांगलें, कीं ह्या सर्वांस निरोप देऊन हें घर ज्याचें त्यानें जातीनिशीं बांधावें, आणि असेंच ज्यानें त्यानें करावें?

**हरी**—खरी गोष्ट, बाबा, असें होईल तर आतां आहेत त्यांपेक्षां घरेंही पुष्कळ होतील.

**द्वारका०**—मुला, तूं काय म्हणतोस ह्याचा चांगला विचार केला? असें एक घर बांधावयास किती प्रकारचे कसबी आणि किती प्रकारचे उदमी लागतात, तें तुला ठाऊक आहे? जो एकटा घर बांधूं लागेल, त्यास तीं सर्व कसबें आलीं पाहिजेत; तीं पुरतीं यावयास सगळें आयुष्य पुरणार नाहीं; मग घरास आरंभ कोठला? बरें जरी घर बांधावयापुरत्या सर्व विद्या त्यास थोडक्या दिवसांत आल्या, तरी पहा कीं त्यानें

जातीनिशीं प्रथम उन्हांत खपावें; पायाकरितां भुई खणावी; नंतर दगडांची खाण काढावी; तेथें सुरंग्या, वेलदार व्हावें; चुनखडे मिळवावे; ते भाजावयाकरितां लांकडें तोडून आणावीं; त्यांचा चुना झाला म्हणजे कुटावा; नंतर गंवडी व्हावें; पाया भरावा; लांकुडतोड्या होऊन लांकडें तोडून आणावीं; सुतार होऊन तीं तासावीं; अरकशी होऊन अरकसावीं; तीं उभीं करावीं; आंबाडी पेरून तिचे दोर करावे; दगडांतून लोखंड गाळावें; लोहार होऊन तें घडावें; सुतार, गंवडी, इत्यादिकांचे कामाकरितां हातेरें करावीं! पुढें तांब्याची गरज लागेल तेव्हां त्याची खाण काढण्याकरितां देशांतरीं जावें; रंग, मसाले पाहिजेत त्यांसाठीं द्वीपांतरीं जावयास नाव बांधावी; कोष्टी होऊन कापड विणावें; त्याचीं अवजारें करावीं; दर्यावर्दी होऊन नाव वहावी; घर बांधीत असतां एकट्यानेंच मेज माप घ्यावें; शिड्या लावाव्या, परांच्या बांधाव्या. ह्याप्रमाणें सगळीं कामें एकटाच करूं लागला तर तो किती दिवसांत घर पुरतें करील बरें?

हरी—ओहोहो! बाबा, मला वाटतें कीं अशा प्रकारानें घर कधींही पुरतें होणार नाहीं.

द्वारका०—खरेंना? तर तूं सर्व व्यवहार असाच पहा. जर कोणी म्हणेल कीं, मला कोणाची गरज नाहीं; मला जें पाहिजे तें मी एकटाच करीन; मला कोणी सहाय होऊं नये, आणि मी कोणास होणार नाहीं; तर असें होईल कीं त्याच्या शक्ति लवकर क्षीण होतील, आणि तो जें काम घेईल तें त्याला अपुरतें टाकून द्यावयाचें पडेल. मनुष्यें जर एकमेकांस

सहाय झालीं तर कसेंही कठीण, कसेंही अडचणीचें काम असलें तरी थोडके वेळांत पार पाडितील; तेंच जर एकटा करूं म्हणेल, तर त्यास जन्मवरही होणार नाहीं. अशींच ह्या लोकींचीं सगळीं सुखें कोणी म्हणेल कीं, माझीं मी एकटाच भोगीन, तर त्याला तीं थोडींच प्राप्त होतील. आणि जर एकमेकांनीं एकमेकांस सुख दिलें, तर सर्वांचे सुखांत एकमेकांचें सुख सहज आहे. आपण आपलीं आईबापें, भाऊबंद, स्त्रीपुरुष, इष्टओळखी, चाकर, कुळंबी, गांवकरी, व सर्व लोक ह्यांस आपले शक्तीप्रमाणें सुख दिलें, तर तीं सर्व मिळून आपणास सुख देतील; तितकें आपले एकट्याचे प्रयत्नानें होणार नाहीं. मुला, तुला पुढें लौकिकांत यावयाचा प्रसंग आहे, म्हणून ह्या कामकऱ्यांचा दृष्टांत आपले मनांत पक्का ठसवून ठेव; तेणेंकरून तूं सुखी होशील. तूं पहा, ते एकमेकांचे श्रमाचें ओझें किती हलकें करीत आहेत तें. आपण आणखी कांहींका दिवसांनीं इकडे येऊं, तेव्हां तूं हें घर पुरतें झालेलें पाहशील. ह्यासाठीं जर तूं इच्छितोस कीं, मजकरितां लोकांनीं श्रम घ्यावे, माझें बरें करावें, मला सहाय व्हावें, तर तुलाही लोकांकरितां तसें करणें आवश्यक आहे.

---

## खोंकड आणि बोका.

एक खोंकड आणि एक बोका, आपण सोबतीनें देश फिरायास जाऊं, अशी प्रतिज्ञा करून निघाले. वाटेनें कर्मणूक व्हावी म्हणून शास्त्राच्या गोष्टी बोलत चालले. खोंकड म्हणतें, रे गड्या, तुला कसें वाटतें? माझे विचारास असें येतें कीं, दये

सारिखा दुसरा गुण नाहीं. बोका उत्तर करितो, दादारे, माझेंही मत तसेंच आहे. दयेची शोभा दुसऱ्या कोणत्याही गुणास येणार नाहीं. ह्या प्रमाणें एकमेकांस सांगत, व एकमेकांच्या बोलण्याची वाखाणणी करीत, चालले आहेत, तों जवळच्या रानांतून एक लांडगा निघाला; त्यानें समोरच एक कळप होता त्यांतून एक कोंकरूं उचलून नेलें. त्या कोंकरानें मोठी आरोळी केली, तिची त्यास दया न येतां तत्काळ त्यानें त्यास भक्षून टाकिलें. हें पाहून मोटया आवेशानें बोका म्हणतो, काय हो, हें क्रूर कर्म ह्या दुष्टानें केलें! ह्याला भक्ष्य पाहिजे, तर ह्यानें लहान सान जीवजिवडे खावयाचे होते; हें बिचारें निरपराध कोंकरूं ह्यास मारून खावें काय? खोंकड म्हणतें, खरेंचरे बोकोबा, असला क्रूरपणा फार वाईट! असा निर्दय स्वभाव ज्याला आहे, त्याला सुखाचा अनुभव कसारे होईल? ह्याप्रमाणें ते बोलत चालले असतां एका घरापाशीं पोहोंचले; तेथें वाडग्यांत एक पुष्ट कोंबडा मोट्या डौलानें छाती वर करून चालतांना खोंकडानें पाहिला; तो त्याच्या दृष्टीस पडतांच, त्याची दयेची वृत्ति माव-ळून त्यानें कोंबड्या वर झडप घातली, आणि एके क्षणांत निःशंक-पणें त्यास गट्ट केलें. खोंकड इकडे हें कर्म करीत आहे इत-क्यांत एक लठ्ठ उंदीर त्या घरांतून निघाला, तो पाहतांच बोक्या-च्या मनांतली दया नाहींशी होऊन, त्यानें उशीर न लावितां त्यास भक्षून टाकिलें.

## तात्पर्य.

जीं कर्मे प्रसंग पडल्यास जातीनें निःशंकपणें करावीं, तींच दुस-ऱ्यानें केलीं पाहून आपण त्यास दोष द्यावा, असा मनुष्याचा

स्वभाव आहे. तसेंच सदाचरणाच्या गोष्टी बोलणें हें एक वेगळें, आणि सदाचरण करणें हें एक वेगळें. बोलणें सोपें पण करणें कठीण आहे. जे कधींही सदाचरण करीत नाहींत, ते देखील प्रसंगानुसार सदाचरणाच्या गोष्टी चांगल्या बोलतात.

---

## लांडा कोल्हा.

एक कोल्हा लोखंडाच्या सांपळ्यांत शेपूट अडकून सांपडला असतां, तो तें तोडून पळाला, आणि मनांत हर्ष मानितो कीं, प्राणावर आलें होतें तें शेपटावरच गेलें. मग तो आपल्या मंडळींत जाऊं लागला. त्यासमयीं त्यास लांडेपणाचा मोठा खेद होऊन तो मनांत म्हणतो कीं, मी मेलों असतों तर बरें होतें; परंतु ही अपेष्टा फार वाईट. असो, जें झालें त्यास उपाय नाहीं; तर आतां हेंच साजरें कसें करावें? अशी योजना करीत असतां त्यास ही युक्ति सुचली कीं, आपण सर्व कोल्हे मंडळीस एकत्र करावें, आणि सांगावें कीं, म्यां आपली शेपटी तोडून टाकून ही भूषणाची नवी तऱ्हा काढिली आहे; ही चांगली प्रतिष्ठित आहे, म्हणून तुम्हा सर्वांस घ्यावयास योग्य आहे. असें योजून तो कोल्हे मंडळीस मिळवून तिजपुढें नव्या परी विषयीं मोठें वाक्पांडित्य करूं लागला तो म्हणतो, अहो! ह्या शेपटीपासून कांहींच हित नाहीं; त्यांत ही कोल्ह्याची शेपटी म्हणजे केवळ ओझेंच; ह्यासाठीं शेपटी वांचून असल्यानें एक तर भूषण, दुसरें, पळणें सवरणें झाल्यास उतावळीनें करितां येतें. मीं असें हें पहिल्यानें आपल्या मनांत आणिलें, मग आपल्या आंगीं अनुभवून पाहिलें तों खरेंच. शेपूट तोडून टाकिलें तेव्हांपासून मी

फार सुखी आहें; असें सुख मी आजन्मांत पावलों नव्हतों. असें बोलून तो सर्वांच्या तोंडांकडे पाहूं लागला कीं, माझे चेले ह्यांत किती होतात? इतक्यांत त्यांतील एक म्हातारा कोल्हा चौरकर्मात फार निपुण होता, तो त्याची ती ठकविद्या समजून, मान वांकडी करून, उत्तर करितो, पंडित बावा, आतां पांडित्य पुरे करावें. आपणास शेपटी टाकून हित झालें असेलच, ह्यांत संशय नाहीं; आणि तसा प्रसंग आम्हांवर ज्या दिवशीं पडेल त्या दिवशीं आम्हीही टाकूं.

## तात्पर्य.

सर्व लोक जर कोल्ह्यांसारिखे सावध असते तर उगीच कोणी कोणाची काढलेली तऱ्हा घेतेना. बहुतेक तऱ्हा ज्या वस्त्र प्रावरण अलंकार इत्यादिकांत, अथवा खाण्या पिण्याच्या प्रकारांत, आढळतात, त्यांचीं वास्तविक कारणें पाहूं गेलें असतां, मनुष्यांनीं श्रीपणा मिळवावया करितां, किंवा आपणांत एखादी खोड आहे ती छपवावयाकरितां, त्या काढिल्या असतात.

---

## स्फुट सवय्या.

वैभव शाश्वत नाहिंच यास्तव कांहिंतरी उपकारकरा ॥
धर्मचिहा परलोकिंसखा निजतारकहोइल तोचिखरा ॥
दुर्जनसंगति सोडुनिदुर्मति सज्जनसंगति नित्यधरा ॥
श्रीहरिचेमनिंपायधरा निजतारणिंहाच उपायवरा ॥ १ ॥

---

पाहुनिदीनजनास जळाविणमीनतसा अतिदुःखित होतो ॥
कष्टउनी निजदेहजना बहुतुष्टवि नित्यचि साधुअहो तो ॥

जोउपकारकरी सुजनावरि अंतरिंनिर्मळ भावधरीतो ॥
साधितसे परकीयहिता परि साधन आत्महितींच करीतो ॥२॥

---

अर्थचि या कलिमाजि जनापरमार्थ असादुसरा नदिसे ॥
अर्थमिळल कसामजराहिल तोजवळी मनिं हेंचि वसे ॥
अर्थ सुयोगवियोगहि केवळदुःख अजेखहि देतअसे ॥
अर्थपरासि कळेचि नहा वरिअर्थअसोनि अनर्थ असे ॥३॥

---

मृत्युपरीसहि निर्धनता अतिदारुण तेजजनांतहरी ॥
जो निज कीं परकीयहि पाहुनि निर्धन तो अपमानकरी ॥
स्त्रीसुतही अवमानि निरंतर भाषण कोणि मनीं न धरी ॥
दुःखचि अंतरिं बाहिर त्यास महीवरि दुर्गति हीच खरी ॥४॥

---

जीसें गमे पद अन्यगृहींजर ठेवियलेंजणु सर्पशिरीं ॥
वाक्यजिचें अतिदुर्लभ ज्यापरिदुर्मिळजें धन लोभिकरीं ॥
कांतसमागम तेंचिगमे सुखपर्व नसेजरि वित्तें घरीं ॥
शांतमनेंनिजकांतमतें करिकृत्य सती जनिं तीचखरी ॥५॥

---

## उत्तर अमेरिकेंतील मूळचे राहणारे इन्दियन लोक.

उत्तर अमेरिकेंतील मूळचे राहणारे इन्दियनलोक ह्यांच्या पुष्कळ जाती आहेत. त्या सर्वजातींच्या भाषा निरनिराळ्या आहेत, आणि रीतीभाती, चेहरे, वैगरे ह्यांतही सर्वांचा कमजास्ती

भेद आहे. त्या देशांत हरणें वगैरे रानचीं जनावरें पुष्कळ आहेत, त्यांच्यावर तेथील लोक आपलें उपजीवन चालवितात. त्या लोकांत कांहीं लोक शिकारीस जातेसमयीं घोड्यांवर बसतात. त्या देशांत मूळचीं घोडीं नाहींत, परंतु युरोपियन लोकांनीं त्या देशांत संस्थानें घातलीं आहेत त्यांतून सुटून जीं रानांत पळून गेलीं त्यांची संतति वाढली आहे. तीं हीं जंगली घोडीं इन्दियनलोक एक लांब काठीच्या टोंकास दोरीचा फांस करून त्याच्या योगानें धरितात, आणि त्यांजवरून बसतात. ह्या घोड्यांस ते लोक फार उपयोगी जनावरें मानितात.

त्या लोकांच्या जातीजातींशीं बहुतकरून कलह चाललेच असतात. लढाईच्या वेळीं जातीजातीचे लोक आपआपणावर कोणी मुख्य नेमितात, आणि त्याचा मोठा मान राखून त्याच्या आज्ञेंत सर्व वागत असतात. जेव्हां लढाई नसते आणि सर्वत्र स्वस्थपणा असतो, तेव्हां सर्व लोक सारख्या नात्यानें वागतात. तरी जे मोठे योद्धे असतात त्यांचा मान अधिक असतो. लढाई करणें व शिकारीस जाणें इतकींच पुरुषांचीं कामें असतात, म्हणून संसाराचें उरलें सर्व काम बायकांस करावें लागतें. त्या आपणां करितां व पुरुषांकरितां पांघरुणें करितात, राहण्याकरितां झाडांच्या फांद्या तोडून झोंपड्या बांधितात, वाट चालतात तेव्हां पालें देतात, व ओझीं वाहतात. असें असतांही त्या म्हणजे इतक्या कठीण कामास कंटाळल्या आहेत, असें नाहीं. व वर सांगितलेल्या कामांपैकीं एखादें काम जर कोणी पुरुष करूं लागला, तर त्या बायका त्याला हंसतात. ह्या इन्दियन लोकांच्या जाती इतक्या आहेत, व त्यांजमध्यें परस्परांचा इतका भेद आहे, कीं त्या सर्वांचें

वर्णन करितां यावयाचें नाहीं. कांहीं जातींतील माणसांचा रंग तांबूस असतो, कांहींचा अगदीं पिंगट असतो. त्यांचे केंस काळे असून सरळ असतात, आणि डोळे खोल असतात. कांहीं जातींतले लोक उंच व दिसण्यांत सुरेख असतात, व कांहीं अगदीं ठेंगू व कुरूप असतात. त्यांचीं पांघरुणें म्हटलीं म्हणजे म्हशींचीं किंवा रेड्यांचीं कातडीं होत. हीं कातडीं ते कांठास व मध्यें चांगली नकशी काढून शोभतशीं करितात. हे लोक आपल्या पायांतून हरणाच्या कातड्याचे मोचे करून घालितात, आणि ह्या मोच्यांवर कांहीं नकशी काढितात. जे मोठे मोठे योद्धे व शूर लोक असतात त्यांनीं भरपोषाक केला असतां त्यासमयीं ते मोठे विलक्षण व चमत्कारिक दिसतात. हे लोक आपआपल्या आवडीप्रमाणें आपआपल्या तोंडावर काळे, पांढरे, तांबडे, पिंवळे पट्टे ओढितात. ते आपल्या टाळूवरचे मात्र केंस काढितात, आणि मागले सर्व केंस लांब वाढवून बांधितात, व त्यांत परांचा, किंवा घोड्याच्या अथवा हरणाच्या केंसांचा तुरा तांबडा रंगवून खोंवितात. आपल्या गळ्यांत ते नकशीदार कवड्यांच्या किंवा शिंपांच्या माळा करून घालितात. हातांत रुप्याच्या आंगठ्या व कडीं घालितात. त्या लोकांच्या बायकांचा पोषाक अगदीं साधा असतो, आणि सर्व जातींत एकसारखाच असतो. त्या कधीं आपली वेणी घालीत नाहींत, व डोकींत कांहीं नगही घालीत नाहींत. परंतु आपले केंस स्वच्छ व तुळतुळीत राखून पाठीवर मोकळे सोडितात. त्या आपल्या भांगांत तांबडा रंग घालितात, आणि गालही तांबडे रंगवितात. त्यांचीं मुलें लहान असतात तेव्हां त्यास त्या एका फळीवर निजवून जखडून बांधितात, मग ती फळी

आपल्या पाठीवर लोंबत ठेवितात; येणेंकरून त्यांस काम काज करण्यास फारशी अडचण पडत नाहीं.

लढाई वगैरे काम नसल्यास इंदियन लोक पुष्कळ प्रकारचे खेळ खेळतात, व नाचतात. त्यांच्या मध्यें वाद्यें नाहींत. एक ढोलकें मात्र वाजवितात, व तें वाजवितांना तोंडानें सुरांचा नाद काढितात. त्यांची मुख्य करमणूक म्हटली तर तंबाखू किंवा एक सुमक म्हणून तिकडे वनस्पती आहे ती ओढणें. परस्पर जातींत तह व लढाई करण्याची रीत फार चमत्कारिक आहे. एका जातीचे लोक दुसऱ्या जातीच्या लोकांशीं तह करण्यास इच्छीत असले, तर ते त्यांकडे आपल्या चौघां लोकांबरोबर एक लांकडाची नकशीदार गुडगुडी देऊन पाठवितात. आणि लढाई करावयाची असली म्हणजे तांबड्या रंगविलेल्या दांड्याची कुऱ्हाड पाठवितात. लढाईस जाण्याच्या अगोदर लढाईचा म्हणून एक प्रकारचा नाच आहे तो करवितात.

हे लोक देव आहे असें मानितात. त्यांच्या मध्यें त्याचें नांव परमात्मा ह्या अर्थाचें आहे. त्यांस कांहीं लाभ किंवा आनंद झाला असतां त्याची स्तुति केल्यावांचून ते राहत नाहींत. त्याचें नांव घ्यावयाचें आहे तेव्हां गंभीरपणानें व मर्यादेनें घेतात. त्यांच्या मध्यें मूर्तिपूजा नाहीं, व भक्ति करण्याचा एक मार्ग नाहीं. कित्येक जातींत अशी चाल आहे कीं प्रत्येक मनुष्याची भक्ति करण्याची जागा निरनिराळी असते, तेथें तो गेला असतां त्याचीं बायकोमुलें देखील जवळ जात नाहींत. कित्येक लोकांचें असें मत आहे कीं, हे इन्दियन लोक अगदीं थंडे आहेत, व दया माया ही त्यांस अगदीं थोडी आहे, परंतु असें नाहीं; त्या लोकांत

कित्येक लोक स्नेहाला फार चांगले व जिवास जीव देणारे आढळतात. त्याचप्रमाणें आईबापांची लेंकरावर ममता माया फार असते.

## एका बादशाहाचें शहाणपण.

एक गृहस्थ प्रवासास जावयास निघाला असतां त्यानें आपले हजार रुपये एके थैलींत घालून, तिचें तोंड बंद करून, त्यावर आपली मोहर करून, ती एका काजीच्या स्वाधीन करून ठेविली. पुढें तो परत आल्यावर त्यानें आपली थैली काजी कडून परत आणिली ती पहिल्याप्रमाणेंच मोहरबंद वगैरे यथास्थित होती. मग ती तो उघडून पाहतो तों तींत रुपयांबदल पैसेच निघाले. त्यावरून तो काजीशीं तंटा करूं लागला; परंतु काजी म्हणाला कीं, त्वां मला रुपये कांहीं दाखविले नव्हते, व त्वां मला थैली दिली ती मीं तुला जशीची तशीच परत दिली. एवढें झाल्यावर काजीच्या शिपायांनीं त्यास तेथून घालवून दिलें. तेव्हां त्या गृहस्थानें बादशाहाकडे जाऊन त्यास आपली हकीकत जाहीर केली. बादशाहानें कांहीं वेळ थांबून उत्तर केलें कीं, ह्यावेळेस तूं जा, आणि आपली थैली मजजवळ ठेव; मी तुझा इनसाफ करीन. तें ऐकून तो गृहस्थ आपली थैली बादशाहाजवळ ठेवून घरीं गेला. दुसऱ्या दिवशीं बादशाहानें आपल्या तक्तावरील मसनदीस एक लहानसें भोंक पाडून ठेवून आपण निघून शिकारीस गेला. तो गेल्यानंतर त्याची बैठक संभाळावयाची ज्या फरासाची त्या दिवशीं पाळी होती तो ती मसनद फाटलेली पाहून फारच घाबरून गेला. त्यानें तें दुसऱ्या एका म्हाताऱ्या फरासास दाखविलें, आणि म्हणाला, जर बादशाहानें हें पाहिलें तर तो माझा प्राणच घेईल. दुसऱ्या फरासानें विचा-

रिलें कीं ही गोष्ट दुसऱ्या कोणास समजली आहे काय? किंवा ती मसनद कोणाच्या दृष्टीस पडली आहे काय? तो म्हणाला नाहीं. त्यावरून दुसरा म्हणाला, तर मग तूं कांहीं चिंता करूं नको, तूं स्वस्थ रहा. ह्या शहरांत एक रफूगार आहे, तो आपल्या कसबांत फार निपुण आहे. ही मसनद त्याजकडेस ने म्हणजे तो असला बेमालूम रफू करून देईल कीं तो कोणालाही समजणार नाहीं. तेव्हां तो फरास ती मसनद घेऊन त्या रफूगाराच्या दुकानीं गेला, आणि त्यास म्हणाला कीं, जर हें काम नामी करून देशील तर ह्या बदल तूं जें मागशील तें मी तुला देईन. त्या रफूगारानें अर्धाच होन मागितला. परंतु तें काम त्यानें चांगलें केलें, म्हणून त्यास एक सगळा होन देऊन त्या फरासानें ती मसनद रात्रीच्या रात्रींत नीट करून आणिली, आणि ती दुसऱ्या दिवशीं तक्तावर बिछावली. बादशाहानें, ती मसनद बरोबर झाली असें पाहून, त्या फरासास विचारिलें कीं, हिला रफू कोणीं केला? त्या फरासानें ही गोष्ट आपणास मुळींच माहीत नाहीं असें दर्शविलें; परंतु बादशाहानें त्यास सांगितलें कीं, तूं भिऊं नको, खरें सांग; ही मसनद मींच कांहीं कारणाकरितां फाडिली होती. त्यावरून फरासानें तो रफूगार दाखवून दिला. त्यास बादशाहानें बोलावून आणून विचारिलें कीं, ह्या वर्षामध्यें त्वां एखाद्या थैलीस रफू केला होता काय? तो म्हणाला, होय. बादशाहानें विचारिलें, बरें ती थैली जर तुझ्या दृष्टीस पडली तर ती तूं ओळखशील काय? तो म्हणाला, होय, ओळखीन. नंतर बादशाहानें त्या गृहस्थाची थैली त्यास दाखविली. तेव्हां त्यानें ती ओळखून म्हटलें कीं, ही थैली ह्या शहराच्या काज़ीनें रफू

करावयास मजकडे दिली होती. नंतर बादशाहानें काजीस बोलावून आणिलें, आणि त्यास तो म्हणाला कीं, इतके दिवस तुझ्या प्रामाणिकपणाविषयीं मला फार भरंवसा होता, आणि ह्यासाठींच मीं तुला काजीच्या पदास चढविलें, परंतु तूं चोर आहेस असें मला आतां ठाऊक झालें. त्वां दुसऱ्याचा पैसा कसा चोरिला? त्यानें उत्तर केलें, या अल्ला हा आरोप मजवर कोणीं आणिला असेल तो असो! बादशाहा म्हणाला, असें मीच म्हणतों. नंतर बादशाहानें ती थैली पुढें केली, आणि तिला कोठें रफू केला होता तें ठिकाण त्यास दाखविलें; तेव्हां तो काजी चकित होऊन गेला, आणि त्याच्या आंगास कांप सुटला. नंतर बादशाहानें त्यास तुरंगांत घालून त्या थैलीच्या धन्यास आपले रुपये त्याजपासून घ्यावयास सांगितलें. काजीस दुसरी कांहीं तोंड राहिली नाहीं, सबब त्यानें त्याचे रुपये दिले. दुसऱ्या दिवशीं बादशाहानें काजीस फांशीं देण्याचा हुकूम केला.

---

## मुलगा आणि त्याची आई.

एक मुलगा शाळेंत लिहावयास जात असे; त्यानें एके दिवशीं एका मुलाची वस्त चोरिली, आणि ती आपल्या आईजवळ नेऊन दिली. तिनें मुलास शिक्षा करावी, ती नकरून उलटी तिनें त्यास शाबासकी दिली, आणि त्यास एक पेरू खावयास दिला. त्यावरून मग तो मुलगा जसजसा वाढत गेला तसतसा मोठमोठ्या चोऱ्या करूं लागला. कोणी एकेसमयीं तो चोरींत सांपडला; मग त्यास फांशीं द्यावयास सरकारच्या शिपायांनीं नेलें. तें

कौतुक पहावया करितां लोकांचा थाट मिळाला होता, तेथें त्याची आईही येऊन स्फुंद स्फुंदून रडत होती,. तीस पाहून तो सरकारच्या शिपायांस म्हणतो, दादाहो, एक वेळ ह्यासमयीं त्या माझ्या आईची आणि माझी भेट करा. तें ऐकून त्यांस दया आली; आणि त्यांनीं तीस जवळ बोलाविलें. त्या वेळीं रागानें त्यानें तिच्या कानाचा चावा घेतला. हें पाहून लोक म्हणूं लागले, काय हो द्वाड हा! पहा पहा! हा फांशीं जाण्याच्या वेळेसही हें महापातक करावयास चुकला नाहीं! तें ऐकून त्यानें उत्तर केलें, सज्जनहो, माझी विनंती ऐका. म्यां ह्या आईचा प्राणही ह्यासमयीं जरी घेतला असता, तरी मला दोष लागताना. असें कां म्हणाल, तर मी मुळीं लहान असतां, शाळेंतील एका मुलाची वस्त म्यां चोरून हिच्या जवळ नेऊन दिली होती; तेव्हांच जर हिनें माझें पारिपत्य केलें असतें, आणि पेरू दिला नसता, तर आज ही दशा मला कां प्राप्त होती?

## तात्पर्य.

मुलें मूढ होतात, अथवा द्वाड होतात, ह्यास बहुतकरून आईबापांचे लाड कारण होत. ओल्या मडक्याचा कांठ जसा लवविला तसा लवतो; तशीच बालकाची बुद्धि लहानपणीं ज्या मार्गास लाविली, तो मार्ग ती सोडीत नाहीं. ह्यासाठीं, आई-बाप, अथवा मुलाचे जे वडील असतील, त्यांनीं तो लहान असतांच त्यास चांगल्या मार्गीं लावण्या विषयीं आळस करूंनये; कांकीं मोठा झाल्यावर त्याचा दुर्गुण लक्षावधि रुपये खर्च केल्यानें-हीं जावयाचा नाहीं; मग तो जें जें पातक करील त्याचा झाडा देवापाशीं त्याच्या वडलांस द्यावयाचा पडेल.

# पोट आणि अवयव.

एके समयीं रूम नामक शहरांत असें झालें कीं वारंवार युद्धप्रसंग पडल्यामुळें सरकारास द्रव्याची अडचण झाली, म्हणून प्रजेवर सरकारदेण्याचें ओझें अधिक पडलें. ह्या गोष्टीला कंटाळून, सरकारास पट्टीचा पैसा देऊं नये, असा सर्व प्रजांनीं निश्चय केला. त्यासमयीं सरकारानें मेनेन्यस् अग्रिप्पा नांवें कोणी कारभारी होता त्यास त्या लोकांची समजूत करण्या करितां पाठविलें. त्यानें ही पुढील गोष्ट त्यांस सांगून त्यांचा वेडेपणा त्यांचे पदरीं घातला, आणि त्यांस वाटेवर आणिलें. तो म्हणाला, गड्यांनो, माझी गोष्ट ऐका! कोणी एके काळीं हातपाय इत्यादि अवयव हे पोटानें कांहीं केलेल्या कामावर रुसून विचार करिते झाले कीं, आम्हीं मोठा श्रम करून मिळवावें, आणि ह्या पोटानें रिकामें बसून खावें, हें ठीक नाहीं. जिभेनें मोठे युक्तीनें अवयवांचीं दुःखें, तिखट मीठ लावून बनावून वर्णिलीं. ती म्हणाली, रे, हे हात पाय खपून श्रम कष्ट भोगून, जें मिळवितात तें सारें पोटाकडे जातें. हें पोट कांहींच काम करीत नाहीं; व ह्यापासून आम्हांला कांहींच लाभ नाहीं; असें असतां, आम्हींच सर्वदा ह्याची भर करावी, हा मोठा आम्हांवर जुलूम आहे. हें भाषण ऐकून सर्व अवयवांनीं वाहवा केली. हात लागलेच म्हणाले, इतःपर पोटाकरितां आम्ही कोणत्याही कामास बोट लावणार नाहीं. पाय म्हणाले, ह्या पोटाचें ओझें आजपर्यंत आम्ही वाहत आलों तें आतां वाहणार नाहीं. दांत म्हणाले, त्याच्या करितां पुढें आम्ही एक दाणाही चावणार नाहीं. हें त्यांचें बोलणें ऐकून पोट म्हणालें, बाबांनो, तुम्ही हें वेडेपण करूं नका! जं

करणें तें विचारपूर्वक करा! तुम्ही मला जें काय आणून देतां तें मीच मात्र भोगितों असें नाहीं. तुमच्या सर्वांच्या पोषणासाठीं मी जिकडे तिकडे तें वांटून देतों. अशी त्यानें जी समजूत केली ती फुकट गेली. कां तर कामक्रोधादिकांचे आवेशापुढें बुद्धीचें कांहीं चालत नाहीं. शेवटीं, अवयवांकडून पोटास कांहीं मिळेनासें झाल्यामुळें पोट अगदीं शुष्क होऊन अस्थिपंजर मात्र उरला. मग पोटाकडून अवयवांचें पोषण न घडल्यामुळें तेही अशक्त झाले. अशी जेव्हां त्यांची अवस्था झाली, तेव्हां त्यांस पश्चात्ताप होऊन पूर्ववत् पोटाकरितां आपापलीं कामें करण्यास राजी झाले; परंतु कांहीं उपाय राहिला नाहीं. ह्या अविचारामुळें शेवटीं मरण येऊन सर्व शरीराचा नाश झाला.

## तात्पर्य.

प्रजेनें सरकारास पट्टीचा पैसा देण्याविषयीं अनमान करावा हें मोठें वेडेपण होय. प्रजेनें सरकारास पैसा जर न दिला, तर राजापासून प्रजेचें संरक्षण कसें होईल? पुंडावीं माजतील; चोर दिवसा दरवडे घालतील; कोणी कोणाचें ऐकणार नाहीं; असें होऊन राजा आणि प्रजा ह्यांचा एकदांच नाश होईल.

---

## ममता.

मनुष्यें आपापल्या मुलांवर ममता करितात ह्यांत कांहीं विशेष नाहीं. पशु देखील आपल्या पोरांवर ममता करितात. त्यांला वारंवार हुंगतात, चाटितात, पाजितात; कोणी पोरांला उपद्रव देऊं लागलें तर त्यास मारावयास धांवतात. पोरांचा वियोग त्यांस

सोसत नाहीं. पोरें दिसतनाशीं झालीं तर लागलेच कावरें बावरें होतात. पोरें सर्वकाळ जवळ असावीं असें त्यांस वाटतें. पशुजातींत आईची पोरांवर ममता विशेष असते, बापाची थोडी. पशूंच्या गोष्टीहून पक्ष्यांची गोष्ट चमत्कारिक आहे. पोरांवर पशूंची ममता पोरें उपजल्यावर लागते. पक्ष्यांची ममता तर पोरें उपजण्याच्या अगोदर, म्हणजे तीं गर्भांत आहेत तोंच, त्यांवर उत्पन्न होते. मादीच्या पोटांत गर्भ राहिला म्हणजे मादी आणि तिचा नर उभयतांही, आंडीं घालण्यास व पुढें पोरें राहण्यास सुस्थळ असावें, असा बेत मनांत आणून, निरुपद्रव जागा पाहून तेथें यथायोग्य घरटें करितात. आणि त्या घरट्यांत आंडीं घालून त्यांवर बसून तीं उबवितात. आणखी एक ममतेचा चमत्कार पहा कीं, मादी आंड्यांवर बसली म्हणजे नर बाहेर चरावयास जातो; नर बाहेरून आला म्हणजे मादी उठून बाहेर जाते, आणि नर आंडयांवर बसतो. ह्याप्रमाणें आळीपाळीनें आंड्यांस ऊब देण्याचें काम उभयतां करीत असतात. कांहीं दिवसांनीं आंडीं फुटून पोरें बाहेर निघाल्यावरही तसेंच किती एक दिवस पर्यंत पोरांस आपल्या पंखांखालीं घेऊन बसतात. मग तीं अमळशीं वाढलीं म्हणजे बाहेरून आपल्या चोंचींत चारा आणून पोरांच्या तोंडांत घालितात. कांहीं दिवसांनीं तीं हिंडावया फिरावया जोगीं झालीं म्हणजे त्यांस बरोबर घेऊन जाऊन चरावयास शिकवितात. पहा, अज्ञान जात असून काय पोरांवर ममता ही! असो, पोरांवर ममता करणें ही गोष्ट सर्वसाधारण आहे. मनुष्यांची ममता आणि पशुपक्ष्यादिकांची ममता ह्यांत फेर इतकाच कीं, मनुष्याची ममता फार दिवस राहते, आणि पक्ष्यादिकांची ममता थोडे दिवस राहते. परंतु दोघांकडीलही ममता करण्याच्या

काळाचें मान पाहिलें तर पोरें आपलें पोट आपण भरीत तोंपर्यंतच दिसते. पशुपक्ष्यांचीं पोरें जातीनें आपला चारा मिळवून आपला निर्वाह करण्याचे योग्यतेस आलीं म्हणजे तीं आईबापांशीं लगत ठेवीत नाहींत, व आईबापही त्यांवर ममता ठेवीत नाहींत, व त्यांविषयीं पुढें काळजीही बाळगीत नाहींत. किंबहुना आईबाप व पोरें ह्यांची परस्पर ओळखही राहत नाहीं. आठवण सुद्धां नाहींशी होते. आतां मनुष्यें आपलीं मुलें जाणतीं होत तोंपर्यंत तर त्यांजवर ममता ठेवितातच. पुढें तीं मोठीं होऊन आपला चरितार्थ चालवूं लागलीं म्हणजे ममता कमी करितात. पुढें जी वडिलांची ममता मुलांवर असते ती कांहीं निराळी असते. तरी जन्मपर्यंत ममता अगदीं सुटत नाहीं. ह्यावरून हें सिद्ध होतें कीं, मुलांविषयीं आईबापांच्या मनांत ममता उत्पन्न होते ती सृष्टिकर्त्या परमेश्वरानें मुलांच्या संगोपनासाठीं व निर्वाहासाठीं केली आहे. पहा, प्रसव होण्याबरोबर जसें स्तनांत दूध उत्पन्न होतें, तशीच अंतःकरणांत ममता उत्पन्न होते. मुलांच्या उपजीवनास दूध हें मुख्य कारण आहे खरें, पण दुधापेक्षांही ममता फार उपयोगाची आहे. जर आईच्या पोटांत ममता नसेल, तर मुलास दूध प्राप्त होणार नाहीं. ममता आहे म्हणून पोराचें पाळण पोषण होतें. तर दयाळू परमेश्वरानें ही केवढी चमत्कारिक युक्ति योजिली आहे पहा! सारांश, सर्व प्राणी आपापल्या संततीवर ममता करितात, ही गोष्ट सिद्धच आहे. परंतु मनुष्यांनीं, पश्वादिकांप्रमाणेंच ममता करावी ह्यांत विशेष नाहीं, कांकीं मनुष्यास ईश्वरानें बुद्धि दिली आहे, व सामर्थ्यही दिलें आहे. त्याअर्थीं आपल्या मुलांचें जसें लहानपणीं तसें तरुणपणीं व म्हातारपणीं बरें

व्हावें, आणि जसें इहलोकीं तसें परलोकीं त्यांचें कल्याण व्हावें, अशी जर ममता केली तर तिचें नांव ममता. ती कशी म्हणाल तर मुलें लहान आहेत तेव्हांपासून आईबापांनीं त्यांस चांगल्या गोष्टींचा उपदेश रोज रोज करीत असावें. खाणें, जेवणें, निजणें, बोलणें, खेळणें, लिहिणें, पढणें, हिंडणें, फिरणें, इत्यादि ज्या ज्या क्रिया मुलें करितात, त्या त्या क्रियांत त्यांस नीतीचा व सन्मार्गाचा उपदेश वारंवार करावा. आणि त्यासारखा आपल्या आचरणाचा कित्ता त्यांस लावावा. त्यांस वाईट मार्गाकडे कधींही जाऊं देऊं नये. चांगलें कोणतें, वाईट कोणतें, चांगल्याचा परिणाम कसा, वाइटाचा परिणाम कसा, हें त्यांस वारंवार सांगून अनुभवास आणून देत असावें. ईश्वरास भजणें, लोकांची मर्यादा राखणें, सत्य बोलणें, इत्यादि चांगल्या गोष्टींची त्यांस संवय लावावी. आणि ज्या गोष्टींनीं ह्या लोकीं व परलोकीं त्यांचें कल्याणच होईल, अकल्याण व्हावयाचेंच नाहीं, अशा गोष्टींचें व्यसन त्यांस लागेल अशी मुलांची शिक्षा ठेवावी. अशा करण्याचें नांव ममता.

---

## परहित.

ह्या जगांतील मनुष्यांचे स्वभाव निरनिराळे आहेत; त्या स्वभावांवरून त्यांची योग्यताही निरनिराळी झाली आहे. कोणाचा स्वभाव असा असतो कीं आपल्या स्वार्थाकडे दृष्टि न देतां, म्हणजे स्वार्थ साधो अथवा न साधो, बुडो अथवा राहो, दुसऱ्याचें हित जेणेंकरून होईल अशा कामास मनापासून आपण झटावें. असे जे ते उत्तम पदवीचे मनुष्य होत. त्यांस देवाची उपमा द्यावी हें योग्य आहे. कितीएक असे आहेत कीं आपलें यत्किंचित्

नुकसान न होतां जर दुसऱ्याचें हित आपल्या हातून व्हावयाजोगें असलें तर त्या कामास झटावें, किंवा आपणांस कांहीं लाभ होत असला तर झटावें; नाहीं तर नाहीं. अशा स्वभावाचे ते मध्यम पदवीचे मनुष्य होत. त्यांस मनुष्याचीच उपमा योग्य आहे. कोणी असे आहेत कीं दुसऱ्याचा स्वार्थ बुडत असतांही आपला स्वार्थ साधितात; किंवा बुद्धया दुसऱ्याचा नाश करून आपलें हित करून घेतात. ते कनिष्ठपदवीचे मनुष्य होत. अशा मनुष्यांस उपमा देणें तर राक्षसाची उपमा द्यावी हें योग्य आहे. हे मनुष्यांचे तीन प्रकारचे स्वभाव सांगितले ह्यांहून निराळा चवथ्या प्रकारचा एखादा मनुष्य असतो, त्याला कोणती उपमा द्यावी हें समजत नाहीं. तो कोणता म्हणाल, तर आपला स्वार्थ कांहीं नसतां दुसऱ्याचा अर्थ बुडविणारा, किंवा बुद्धया आपलें नुकसान करून घेऊन दुसऱ्याचा नाश करणारा, दुसऱ्याचा नाश हाच आपला लाभ असें समजणारा असा जो तो. ह्या चार प्रकारच्या स्वभावांतून पहिल्या प्रकारचा स्वभाव सर्वांनीं धरावा. त्यांत आपलें व दुसऱ्यांचें कल्याण आहे. कोणी शंका करितील कीं, जो स्वभाव आंगीं नाहीं तो धरावा कसा; स्वभाव पालटतो कीं काय? तर ह्याचें उत्तर असें आहे, अभ्यासानें स्वभाव पालटतो; आपोआप पालटत नाहीं. अभ्यासानें चांगल्याचा वाईट होतो, व वाइटाचा चांगला होतो. ह्यास दृष्टांत, कोंवळें झाड जसें लववावें तसें लवतें. वेळूचा स्वभाव नीट वर वाढत जावें असा आहे, परंतु सांच्यामध्यें घालून वळविला असतां पाहिजे तितका वळतो. मसाल्याच्या योगानें फुलांचे रंग फिरवितां येतात; फळांची रुचि पालटतां येते. ह्याजकरितां

निरंतर सत्पुरुषाची संगति धरून, व सत्पुरुषाचा उपदेश ऐकून आपला स्वभाव उत्तम प्रकारचा होईल असें करणें मनुष्यमात्रास योग्य आहे.

आणखी कोणी म्हणेल कीं, दुसऱ्याचें हित कां करावें, अहित कां करूं नये? तर असें आहे. ह्या गोष्टीचा अनुभव आपण आपले ठायीं पहावा. एखाद्यानें आपलें हित केलें तर तें आपणास किती बरें वाटतें! संकटसमयीं एखाद्यानें आपणास साह्य केलें तर आपणास किती सुख वाटतें; व आपण त्याचे किती उपकारी होतों! आणि आपण त्याला केवढी थोरवी देतों! असेंच आपण दुसऱ्याचें हित केलें असतां होतें. तसेंच एखाद्यानें आपलें नुकसान केलें, तर आपणास किती वाईट वाटतें, व किती दुःख होतें, आणि आपण त्यास किती दोष ठेवितों! हें सर्वांस ठाऊकच आहे. म्हणून आपण दुसऱ्याचें अहित केल्यानें तसेंच होतें. म्हण आहे कीं, आपल्यावरून जग ओळखावें. जसें आपणास वाटतें तसेंच दुसऱ्यास वाटतें. लोकांनीं ज्या रीतीनें आपणाशीं वर्तावें म्हणून आपण इच्छितों, त्या रीतीनें आपण लोकांशीं वर्तलें पाहिजे. अनेक भावंडें जर सलुखानें वागलीं, व एकमेकांचें साह्य करीत असलीं, तर तीं बापास फार आवडतात. आणि तीं जर भांडूं लागलीं, तर बाप त्यांचा कंटाळा करितो. तसें, मनुष्यें हीं ईश्वराचीं लेंकरें आहेत; म्हणून त्या सर्वांचें परस्पर भावंडांचें नातें आहे. ह्यासाठीं मनुष्यांनीं एकमेकांस सहाय होऊन सलुखानें वर्तावें. कोणी कोणाशीं भांडूं नये, द्वेष धरूं नये, व नुकसान करूं नये. आपल्या हातून जितकें हित करवेल तितकें हितच करावें. असें वागल्यानें देवाचा

संतोष होईल. तसें न वागलों तर देवाचा कोप होईल, हें सांगावयास नको. परोपकारीं पुण्य घडे, आणि परपीडनीं पाप जडे, असें जें विद्वानाचें म्हणणें आहे त्याचेंही तात्पर्य हेंच आहे.

---

## धातूंविषयीं संवाद.

### गुरु आणि त्याचे दोघे शिष्य, रामा व गोविंदा.

गु०—मुलांनो, धातूंविषयीं कांहीं तुम्हांस सांगावें असें माझ्या मनांत आहे. तुमची ऐकावयाची इच्छा आहे काय?

रा०—होय, सांगावें, गुरुजी. सांगितल्यास आम्हांवर मोठी मेहरबानी होईल.

गो०—मला वाटतें कीं, ह्यांत तर फारच मौज होईल.

गु०—बरें तर, धोंडे व धातु तुम्हांपुढें आणून ठेविले, तर धोंडा अमुक व धातु अमुक, म्हणून तुम्हांस ओळखितां येईल काय?

रा०—लोखंडाचा किंवा शिशाचा तुकडा अमुक, व दगड अमुक, हें ओळखण्यास मला कांहीं भ्रांति पडावयाची नाहीं.

गु० तूं ते कशावरून ओळखिशील?

रा०—धातु तेजस्वी असून लकलकतो.

गु०—धातु लकलकीत असतात खरे, तरी कांच व स्फटिक हीं ही तशींच लकलकतात.

गो०—परंतु कांचेंतून पाहिलें असतां पार दिसतें, तसें धातूंतून दिसत नाहीं.

गु०—धातूंमधून पार दिसत नाहीं, हा एक त्यांच्या आंगीं विशेष गुण आहे, असें सर्व लोक मानितात; तरी सोन्याच्या पर्खा-

तून पार दिसतें, परंतु पदार्थ हिरवे दिसतात. पार न दिसण्याचा गुण ह्यास अपारदर्शकता म्हणतात.

गु०—आणखी त्यांच्या आंगीं कोणता भेदक गुण आहे?

रा०—धातूंच्या आंगीं वजन पुष्कळ असतें.

गु०—कांहीं थोड्या दिवसांमागें लोक असें समजत असत कीं, जडपणा हा धातूंच्या आंगीं एक विशेष धर्म आहे; तथापि आतां कांहीं धातु हलके आहेत असें आढळलें आहे; त्यावरून जडपणा धातूंच्या आंगीं एक विशेष धर्म आहे, असें आतां कोणी मानीत नाहीं. असो, धातूंच्या आंगीं आणखी कांहीं गुण आहेत काय?

रा०—घणाचे घाव धातूंवर मारिले असतां धातु फुटत नाहींत, तसे धोंड्यावर जर मारिले तर धोंडा लागलाच फुटतो.

गु०—धातूंवर घणाचे घाव जसजसे मारावे तसतसे ते धातु पातळ होत जातात; ह्या त्यांच्या गुणास घनवर्धनीयता म्हणतात. तशीच त्यांची पाहिजे तेवढी लांब व बारीक तार काढितां येते; ह्या त्यांच्या गुणास प्रसरणयोग्यता म्हणतात; व ह्या दोन गुणांमुळेंच धातूंचा फार उपयोग आहे.

रा०—धातूंचा रसही करितां येतो, नाहीं बरें?

गो०—काय लोखंडाचा रस होतो?

गु०—होय, सर्व धातूंचा रस होतो, पण इतकेंच कीं कांहीं धातूंचा रस करण्यास उष्णता जास्त लागते, व कांहींस कमी लागते. रस होण्याचा जो हा त्यांचा धर्म त्यास द्राव्यता म्हणतात. धातूंविषयीं आणखी तुम्हांस कांहीं माहिती आहे काय?

रा०—त्यांस जमिनींतून काढितात असें मला वाटतें; ह्याखेरीज त्यांविषयीं मला कांहीं जास्त माहिती नाहीं.

गु०—होय, ते सर्व जमिनींत सांपडतात, ह्यामुळेंच त्यांची खनिजकोटीमध्यें गणना होते. ह्यावरून एकंदर पाहिलें असतां, तेजस्वीपणा, अपारदर्शकता, घनवर्धनीयता, प्रसरण-योग्यता, आणि द्राव्यता, इतके गुण त्यांच्या आंगीं आढळ-तात.

रा०—ह्या सर्व गोष्टी माझ्या ध्यानांत राहण्याचें मला कठीण दिसतें.

गु०—ह्या वर सांगितलेल्या गुणांच्या नांवांचा कदाचित् तुला विसर पडला तर पडेल; तरी धातु म्हणजे काय हें समज-ण्यास आतां तुला कांहीं भ्रांति पडावयाची नाहीं.

रा०—मीं एकदां लोखंडाच्या दगडांचा ढीग पाहिला होता, त्यांतील दगड कांहींजण घणांनीं फोडीत होते, व ते एरव्हीं-च्या दगडांप्रमाणें दिसत होते; त्यांविषयीं मला कांहीं सम-जून सांगावें.

गु०—त्वां जे लोखंडाचे दगड पाहिले त्यांस अशोधित लोखंड म्हणतात. जमिनींत धोंडे, माती, इत्यादि द्रव्यांशीं धातु इतके मिळून गेले असतात कीं त्यांचे विशेष गुण आपणांस कळून येत नाहींत. अशा स्थितींत ते असले म्हणजे त्यांस अशोधित धातु असें म्हणतात.

गो०—ह्या स्थितींत धातु असतात तेव्हां ते लोकांस कसे ओळ-खितां येतात?

गु०—ह्यास अनुभव कारण होय. प्रथमतः अशी गोष्ट घडली असावी कीं सहजगत्या कांहीं खनिज पदार्थास उष्णता लाविल्यानें त्यांतून कांहीं धातूंचा रस निघाला असावा. ही गोष्ट लोकांस समजल्यावर त्यांनीं दुसऱ्या तऱ्हेच्या खनिज पदार्थास उष्णता लावून हे निरनिराळे धातु काढिले असावे, असें वाटतें.

रा०—धातु हे फार उपयोगाचे असून मोठे किंमतीचे आहेतना?

गु०—कांहीं देशांत सोनें, रुपें, इत्यादि धातूंचा इतका संचय आहे कीं त्यांच्या किंमतीची आणि त्या देशांतील दुसऱ्या उत्पन्नाच्या किंमतीची तुलना केली असतां त्यांचें मोल्य फारच ज्यास्त दिसून येईल. आणि कित्येक राजांस खाणींपासून जो वसूल येतो तो दुसऱ्या उत्पन्नांच्या वसुला पेक्षां अधिक आहे. मुलांनो, धातूंविषयीं मीं बरेंच सांगितलें, आणि तें सर्व तुमच्या ध्यानांत रहावयाजोगेंही आहे. आतां पुरे; पुढें कधीं मुख्य धातूंविषयीं बोलणें करूं.

---

## वाफेची शक्ति आणि वाफेपासून लाभ.

पुस्तकें छापण्याची युक्ति यूरोपखंडांत निघाल्यापासून ज्ञानाचा प्रसार करण्याविषयीं मनुष्यांची शक्ति फार वाढत चालली. अलीकडे वाफेचें यंत्र छापण्याच्या कामांत घेऊं लागल्यापासून तर ह्या शक्तीचा मोठाच उत्कर्ष झाला आहे. वाफेची शक्ति काय विलक्षण आहे पहा, टैम्स ह्या नांवाचें लंदन शहरांतील वर्तमानपत्र हल्लीं वाफेच्या यंत्रानें छापितात, तर त्या यंत्राच्या योगानें एका तासांत त्या पत्राचे चार हजार ताव पाठ पोट छापून तयार

होतात. म्हणजे एका तावास अडीच विपळेंही पुरतीं लागत नाहींत.

ह्याचा हिशोब करूं लागल्यास तैम्स वर्त्तमानपत्राच्या प्रती वाफेच्या योगानें एक दिवसांत जितक्या छापून तयार होतात, तितक्या प्रती तितक्या वेळांत हातानें लिहूं म्हटलें असतां पंधरा लक्ष लेखक लागतील असें स्पष्ट दिसून येईल. तरी इतक्या प्रती चोवीस माणसें सहज छापून तयार करितात. तेव्हां ही शक्ति आणि हा लाभ लहान म्हणतां येईल काय!

वाफेच्या यंत्रानें टांकसाळेंत नाणीं पाडितात, तेथेंही मनुष्याची मेहनत व काळाचा व्यय फारच वांचतो. वाफेच्या यंत्रानें गाड्या चालवितात, त्या गाड्यांपासून जो लोकांस लाभ होतो तो तर सांगतां पुरवत नाहीं. वाफेची गाडी दररोज शंभर कोश चालते, आणि शंभर गाड्यांचें ओझें वाहून नेते. ह्यावरून लाभ किती आहे ह्याचें अनुमान सहज करितां येईल.

वाफेच्या योगानें जमिनीवर मोठमोठे चमत्कार होतात, तसे समुद्रावरही होतात. वाफेचीं गलबतें चालू झाल्यापासून द्वीपांतरास त्वरेनें आणि बिनधोक जाण्याची सोय चांगली झाल्यामुळें जाण्यायेण्याची वहिवाट फारच वाढली आहे. ही वहिवाट केवळ ब्रिटिश बेटांतील प्रांतांस मात्र परस्पर ठिकाणीं जाण्यायेण्याविषयीं झाली असें नाहीं. तर अमेरिका खंडांतील देश आणि यूरोपखंडांतील देश ह्यांसही परस्परांकडे जाण्यायेण्याविषयीं झाली आहे. वाफेच्या गलबतांच्या योगानें इंग्लंदांतील लिवरपूल शहरापासून ऐर्लंदांतील दब्लिन शहरास सुमारें सत्तर कोस लांब दहा बारा तासांत अनायासानें नेमलेल्या वेळेस माणसें जाऊन

6

पोहोंचतात. इंग्लंद आणि ऐर्लंद ह्यांच्या मध्यें वाफेचीं गलबतें इतकीं चालतात कीं, दोहों बेटांच्या मध्यें समुद्रावर जणू पूलच केला आहे. वाफेचीं गलबतें नव्हतीं तेव्हां इंग्लंदापासून ऐर्लंदास जाण्यास जो श्रम पडत असे त्या पेक्षां अधिक श्रम न पडतां इंग्लंदाहून हिंदुस्थानांत वाफेचीं गलबतें सहज येतात. पुणें शहरापासून नागपुरास किंवा उज्जनीस दोनशें किंवा अडीचशें कोसांचे टप्यावर घोड्यावरून जाण्यास जो श्रम व जो काळ लागतो, त्याहून अधिक श्रम व अधिक काळ विलायतेपासून हिंदुस्थानापर्यंत चार हजार कोसांचे टप्यावर येण्यास लागत नाहीं.

वारा जरी पडला तरी लाटांमध्यें वाफेच्या गलबताची शक्ति कमी होत नाहीं. पाण्याचा प्रवाह आणि वायूचें वाहणें हीं जर एकदम प्रतिकूळ झालीं, तर ह्या गलबताच्या गतीस कांहींसा अडथळा होतो खरा, तरी त्यांच्यानें सर्वथा त्याची गति कुंठित करवत नाहीं. स्वशक्तिप्रेरित वाफेचीं गलबतें पाण्यावर प्राण्यांसारखीं चालत असतात.

---

## पशु, पक्षी, आणि वाघूळ.

एके समयीं पशु आणि पक्षी ह्यांच्या मध्यें मोठें दारुण युद्ध होऊं लागलें; तेव्हां वाघुळानें विचार केला कीं, आपल्या शरीराच्या घडणीवरून आपण पक्षी कीं पशु ह्याचा लोकांत संदेह आहे, तो आज आपल्या पथ्यावर पडेल. तर आपण वेगळें राहून काय होतें तें आधीं पाहूं या; मग पाहिजे तो पक्ष धरितां येईल. इतक्यांत दोन्ही दळें समरांगणीं एकवटून मोठीच

हाणामार चालली. ती पाहून पहिल्यानें वाघुळास असें वाटलें कीं, पक्ष्यांची जीत होईल; म्हणून तो त्यांच्या मंडळीकडे आला; आणि दुरून टेंकारून लक्षांत होता कीं अधिक उणें झालें तर तशीच वर्तणूक करावी. मग कांहींका वेळानें पशूंचें सैन्य जय पावलेंसें त्यास दिसलें; तेव्हां तो त्यांजकडे जाऊन त्यांस भासवूं लागला कीं, उंदिराच्या तोंडास आणि माझ्या तोंडास कांहीं मिळतें म्हणून मी पक्षी नव्हें, पशु आहें; मला आपल्या मंडळींत घ्या, मी सदा तुमचें कल्याण हृदयांत वागवीन, आणि तुम्हांशीं कधींही विपरीत होणार नाहीं. पशूंनीं तें मान्य केलें. शेवटीं गरुडानें मोठा पराक्रम करून पशूंचा सर्वथा मोड केला. त्या समयीं तें वाघूळ आपला प्राण वांचावा, आणि ज्ञातीच्या हातीं लागून आपली अप्रतिष्ठा होऊंनये, म्हणून तेथून पळालें; तें तेव्हांपासून झाडाच्या ढोलींत व गिरिकंदरांत शिरकून राहिलें आहे. तें अद्यापि रात्र पडते आणि सर्व पक्षी आपआपल्या स्थळीं निजायास जातात, तेव्हां मात्र बाहेर पडत असतें.

## तात्पर्य.

कोणता तरी एक पक्ष दृढ न धरितां दोहीं कडचा पक्षपात दाखवून धरसोड करणें हें नीचकर्म होय. केवळ स्वहितावर दृष्टि देऊन जे दोहों डगरींवर हात ठेवितात ते शेवटीं फसतात. जे दोहों पक्षांशीं प्रतारणा करितात त्यांची ती उघाडीस आली असतां ते जिवास मुकतात; कदाचित् वांचले तर त्यांस सृष्टींत तोंड दाखवावयास जागा नाहीं असें होतें. ते दुष्ट जिकडे जातात तिकडे लोक त्यांचा कंटाळा करितात.

# धनगर जो व्यापारी झाला होता.

एक धनगर एके दिवशीं समुद्राच्या कांठीं मेंढ्या चारणीस लावून, आपण एका धोंडीवर शीतळ आणि मंद वारा खात बसला होता. त्या समयीं निवात होतें; त्यामुळें समुद्राचें पाणी शांत होतें. तें पाहून त्यास संतोष होऊन इच्छा उत्पन्न झाली कीं, आपण व्यापारी व्हावें. तो म्हणाला, अहो, जो मी मेंढ्या चारीत एथें रिकामा बसतों, तो एक लहानशी नाव विकत घेऊन ‘ार समुद्रांत फिरावयास गेलों तर किती सुखी होईन! दूरदेशीं माल नेला असतां मला किती लाभ होईल! धन आणि थोरवी मिळवावयास ही वाट किती सुलभ आहे! अशा कल्पना करून, जाऊन, त्यानें आपल्या सर्व मेंढ्या बाजारांत विकल्या, दुसरेंही होतें नव्हतें तें सर्व विकून त्याचीं एक नाव विकत घेतली, तींत माल व नावाडी मनुष्यें घेऊन हाकारून अंमळ दूर गेला, तों वादळास आरंभ झाला; मोठमोठ्या लाटा उचलूं लागल्या; दिशा खावयास येऊं लागल्या; तारूं बुडूं लागलें. मग भार हलका करावा म्हणून त्यानें आंतील माल सगळा पाण्यांत टाकिला. तें करितांच, तारूं वाऱ्यानें हांटलें तें एका खडकावर आपटून त्याचे तुकडे तुकडे झाले; नावाडी सर्व बुडाले; तो मात्र बुडतां बुडतां मोठ्या संकटानें तडीस लागला. नंतर पूर्वीं ज्यास मेंढ्या विकल्या होत्या त्याजवळ तो चाकरीस रहावयास गेला; त्यानें त्यास त्याच मेंढ्या राखावयास ठेविलें. तेव्हां पुन्हा एके दिवशीं तो समुद्रकांठीं धोंडीवर बसला आहे. तो समुद्रास निश्चळ पाहून म्हणतो, अरे ठका, आतां तूं मला दुसऱ्यानें लालचा-वयास पाहतोस, पण तो तुझा प्रयत्न व्यर्थ आहे. रे, म्यां तुला

पाहून पुन्हा भुलावें, तर मी सध्यां फार दरिद्री आहें, आणि एकवेळ अनुभव घेतला, त्यानें मला शहाणें केलें, म्हणून मी आतां तुझा विश्वास धरणार नाहीं.

## तात्पर्य.

विकतें शहाणपण चांगलें, अशी म्हण आहे. ह्यासाठीं जो पुरुष एकदां स्वयें दुःख कष्ट सोसून वस्तूचा अनुभव घेऊन थंड झाला, तो मग आपल्या अवस्थेंत संतुष्ट राहतो, तीहून अन्य इच्छीत नाहीं.

---

# पद्यात्मक लघुहितोपदेश

## ह्यांतील कविता.

## देवाविषयीं

अभंग.

देवें केला उपकार ॥ स्मरा मनीं निरंतर ॥ १ ॥
देव दयाळू जगाचा ॥ दाता सर्व पदार्थांचा ॥ २ ॥
धरोनियां भाव देवीं ॥ वचन सत्य ऐसें ठेवीं ॥ ३॥
आज्ञा देवाची मानावी ॥ स्तुती देवाची करावी ॥४॥

## प्रामाणिकपणा विषयीं

ओंव्या.

प्रामाणिका लोक मानिती ॥ त्याची होतसे जगीं ख्याती ॥
अंतीं त्यास उत्तम गती ॥ त्रैलोक्यपती देतसे ॥ १ ॥
प्रामाणिक मनुष्याची कीर्ति ॥ इह परलोकीं सर्व गाती ॥
सज्जन त्याची पाहोनि मूर्ती ॥ संतोषती मनांत ॥ २ ॥

## वडिलांचा मान.

आर्या.

जो तुज विद्या सांगे, जो रक्षी प्राण अन्न देऊन ॥
जो भय संकट वारी, हे बापासम तिघे नव्हत ऊन[३८] ॥ १ ॥
जर आपण वडिलांची, मर्यादा ठेविली तरिच बाळ ॥
ठेवितिल पुढें तैशी, आपुलि ते नकरितील आबाळ[३९] ॥ २ ॥

## सदाचरणाविषयीं

आर्या.

परधन कलहें द्यूतें[४०], चोरीनें त्वां कधीं न मिळवावें ॥
मन परकांतेवरती, जातां आधीं तयासि वळवावें ॥ १ ॥
त्वां मदतीस नजावें, नशिरावें मसलतींत बंडाच्या ॥
खोटें कर्म करुनि तूं, देउंनको द्रव्यराशि दंडाच्या ॥ २ ॥
सत्य सदा बोलावें, सांगे गुरु आणि आपुला बाप ॥
खोटें भाषण करणें, सज्जन म्हणतात हें महापाप ॥ ३ ॥
अन्योपकार[४१] करणें, सद्गुण पुरुषास हाच म्हणतात ॥
पीडा परास देणें, ज्ञाते हें फार पाप गणतात ॥ ४ ॥
दिधलें दुःख परानें, उसनें फेडूं नयेचि सोसावें ॥
शिक्षा देव तयाला, करिल म्हणोनी उगेंच बैसावें ॥ ५ ॥

## दुष्टव्यसनें.

गांजा ओढुं नको सुरा[४२] पिउं नको तूं भांग घोटूं नको ॥
गोळी[४३] खाउं नको अफू शिवुं नको माजूम सेवूं नको ॥
कांहीं चोरुं नको उगा फिरुं नको वेश्येसि पाहूं नको ॥
विद्याज्ञानधना सदा मिळविल्या वांचून राहूं नको ॥ ६ ॥

## पन्ना नांवाची दाई, जिनें स्वामिभक्तीकरितां आपला मुलगा बळी दिला, तिची गोष्ट.

राजस्तानांत मेवाड देशाची जी चितूरनामक राजधानी होती, तेथें विक्रमाजित ह्या नांवाचा राणा राज्य करीत असतां तो वाईट छंदास लागून लोकांस आवडनासा झाला, म्हणून त्याच्या सरदारांनीं त्यास ठार मारून नामांकित शूर जो पृथुराजा ह्याचा दासीपुत्र, बनबीर, तो गादीवर बसविला. जो राणा प्राणास मुकला त्याला एक लहान मुलगा उदेसिंग नांवाचा होता. तो सहा वर्षांचा झाला तरी नेहमीं आपल्या दाईजवळ असे. त्या दाईचें नांव पन्ना असें होतें. राणा प्राणास मुकला त्या दिवशीं मुलगा दूधभात जेवून पलंगावर निजला आहे, त्याच्या जवळ दाई बसली आहे, इतक्यांत राणिवशांत एकाएकीं मोठी ओरडाओरड झालेली दाईस ऐकूं आली. मग मुलाचें उष्टें काढावयासाठीं जो न्हावी आंत गेला होता त्याला तिनें विचारिलें कीं, ही ओरडाओरड कशाची झाली आहे? त्यानें तिला सांगितलें कीं, आपला राणा ह्यास दुष्टांनीं ठार मारिलें आहे, म्हणून त्याच्या बायका ओरडत आहेत. तें ऐकतांच त्या दाईच्या मनाला भयाचा धक्का बसला. ती मनांत म्हणाली, ज्यापक्षीं राण्याचा जीव त्या दुष्टांनीं घेतला त्यापक्षीं ह्या मुलाचा जीव ते राखितील असें वाटत नाहीं. ह्याचा बचाव कसा होईल, ह्याविषयीं कांहीं उपाय योजिला पाहिजे. असें म्हणून तिनें एका पांटींत तो मुलगा निजवून वर कांहीं फळझाडाचीं पानें व कांहीं फळें पसरून घालून ती पांटी त्या न्हाव्याच्या डोकीवर दिली, आणि त्याला सांगितलें कीं, तूं ही पांटी घेऊन राजवाड्यांतून निघून, शहराबाहेर पडून, नदीच्या

कांठीं जाऊन बैस. मी लवकरच तुझ्या मागून येतें. वाटेंत तुला कोणीं विचारिलें तर फळफळावळ घेऊन जातों असें सांग. त्याप्रमाणें तो न्हावी मुलाची पांटी घेऊन निघून गेल्यावर त्या पन्ना दाईनें आपला मुलगा त्या राजपुत्राच्या अंथरुणावर निजविला आणि आपण जवळ बसली. इतक्यांत ज्यानें राण्याची गादी बळकाविली तोच बनबीर हातांत नागवी तरवार घेऊन आला, आणि राजपुत्र कोठें आहे म्हणून दाईस विचारूं लागला. तेव्हां तिनें काय सांगावें बरें? तिच्या तोंडाबाहेर शब्द निघेना. प्रत्यक्ष पोटच्या पोराचा घात होतो हें तिला समजल्यावर तिच्यानें बोलवेल कसें? तथापि स्वामिभक्तीकडे लक्ष देऊन त्या प्रामाणिक दाईनें पलंगाकडे बोट केलें, तों लागलीच बनबीराची तरवार त्या मुलाच्या पोटांत गेलेली तिच्या दृष्टीस पडली. मग तें दुःख काय विचारावयाचें आहे! असें क्रूर कर्म करून बनबीर निघून गेल्यावर, त्या मुलाचें प्रेत जाळण्यासाठीं लोकांनीं नेलें. राजपुत्र मारिला हें वर्त्तमान ऐकिलें तेव्हां तर राण्याच्या बायकांनीं रडून फारच आकांत केला. त्यांस वाटलें कीं, आपला पूर्वज जो नामांकित संग राजा, त्याच्या वंशांतील शेवटला पुरुष जाऊन वंश खुटला. इकडे पन्ना दाई तर आपल्या मुलाची राख आपल्या आंसवांनीं भिजवून ज्या राजपुत्राचा प्राण तिनें वांचविला होता त्याचे शोधाकरितां मागून गेली; आणि ज्या प्रामाणिक न्हाव्याचे स्वाधीन ती मूल घातलेली पांटी केली होती तो न्हावी चितूरच्या पश्चिमेस कांहीं कोसांवर नदीच्या वाळवंटांत दाईची वाट पाहत बसला होता तेथें जाऊन ती पोहोंचली. सुदैवेंकरून तो न्हावी गांवाच्या बाहेर पडेपर्यंत मुलगा रडला

नाहीं. मग न्हाच्यास बरोबर घेऊन ती दाई देवला येथें जाऊन तेथील अधिकारी, सिंगराव, ह्यापाशीं आश्रय मागूं लागली; परंतु त्या रावास भय पडलें कीं, मुलगा आम्हीं संभाळिला हें वर्तमान बनबीरास समजलें तर तो आमचा नाश करील; ह्यामुळें त्यानें आश्रय दिला नाहीं. तेव्हां ती तशीच तेथून डोंगरपूर येथें गेली, आणि तेथील अधिकारी, राऊळ एसकर्ण, ह्याजपाशीं मुलाच्या रक्षणाकरितां तिनें आश्रय मागितला. तेव्हां मुलास ठेवून घेऊन त्याचें संरक्षण करावें असें पहिल्यानें त्याच्या मनांत आलें, तरी पुढें विचार करून तो म्हणाला, माझी शक्ति थोडी व जागा मजबूद नाहीं, ह्यामुळें माझ्यानें आश्रय देववत नाहीं. तोही आश्रय देईना तेव्हां ती तेथून निराश होऊन निघाली, आणि आरवली डोंगरांच्या खोऱ्यांतून तेथील भिल्ल लोकांच्या कुमकेनें कुमळमेर शहरास जाऊन पोहोंचली. तेथील अधिकारी व्यापारी वाण्यांत देपरा म्हणून एक जात आहे त्या जातीचा श्रावकधर्माचा आसासा ह्या नांवाचा होता. त्याची भेट घेऊन दाईनें तो मुलगा त्याच्या मांडीवर ठेविला, आणि, हा तुझा धनी, ह्याचें तूं संरक्षण कर, असें तिनें त्यास बजाविलें. त्यासमयीं त्या अधिकाऱ्यास मोठें संकट प्राप्त झालें. हा आपला धनी खरा, ह्याचें रक्षण करायास लागलों तर ज्यानें ह्याची गादी बळकाविली आहे तो आमचे प्राण घेईल, किंवा काय करील नकळे. रक्षण न केलें तर स्वामिभक्तीला बाध येतो. आतां कसें करावें? असा त्याला मोठा विचार पडला. त्यासमयीं त्याची आई जवळ होती, ती रागें भरून म्हणाली, अरे! तूं विचार कसचा करितोस! कांकूं करण्याचा हा समय नव्हे. ह्या वेळेस स्वामिभक्ति संभाळिली पाहिजे. तूं ह्या मुलाचा स्वीकार कर, भिऊं नको; ईश्वरकृपेनें परि-

णाम चांगला होईल. असें त्या वृद्ध मातोश्रीनें धैर्य दिल्या वरून आसासा ह्यानें त्या राजपुत्रास ठेवून घेऊन त्याचें संरक्षण यथास्थितपणें केलें. आणि हा आपला भाचा असें म्हणण्याचें त्यानें ठरविलें. मग ती स्वामिभक्तिपरायण पन्ना दाई, हिनें, आपण जें काम हातीं धरिलें तें ईश्वरकृपेनें शेवटास गेलें, असें समजून परत जाण्याचें मनांत आणिलें. कारण कीं जर आपण ह्या मुलासाठीं येथें रहावें, तर लोकांच्या मनांत शंका येईल कीं, श्रावकाच्या मुलापाशीं रजपुताची वायको कशाकरितां राहिली, असा विचार तिनें मनांत आणिला म्हणून ती मायाळू दाई, त्या मुलाचा लोभ सोडून मोठया दुःखानें आपल्या गांवास निघून गेली.

---

## नाणीं.

सोनें, रुपें, किंवा तांबें ह्याचे लहान लहान तुकडे लोक कशाला बाळगितात? असा कोणा मनुष्यास प्रश्न केला तर तो सांगेल कीं, धातूचे छाप मारलेले लहान तुकडे, ज्यांस नाणीं म्हणतात, हे आपणाजवळ असले म्हणजे पाहिजेत ते पदार्थ आपणास मिळतात. बाजारांत पैसे, रुपये घेऊन गेलें म्हणजे ते देऊन लागेल तो तो पदार्थ आपणास मिळतो, हें सर्वांस माहीतच आहे. आतां कोणी असें म्हणेल कीं, उदमी वगैरे आपला माल देऊन नाणीं कां घेतात? तर ह्याचें कारण असें आहे कीं तेही दुसऱ्या लोकांस तीं नाणीं देऊन धान्य, वस्त्र, वगैरे ज्या जिनसा त्यांस हव्या असतील त्या विकत घेतात.

ह्यावरून असें वाटेल कीं, सोनें, रुपें, वगैरे धातूंच्या तुकड्यांचा उपयोग केवळ एवढाच आहे कीं त्यांच्या योगें क्रयविक्रय

सोपा पडतो; नाहीं तर त्यांचा कांहीं स्वतः मनुष्याच्या सुखास उपयोग आहे असें नाहीं. असें जर आहे तर पहिल्यानें नाण्यांची प्रवृत्ति कशी झाली असावी? नाणीं दिलीं असतां सर्वांनीं तीं घेऊन आपआपला माल त्यांबद्दल द्यावा असा प्रथमतः लोकांत संकेत कसा झाला? व ह्यांसारखे लांकडाचे तुकडे, किंवा गुळगुळीत लहान वाटोळे दगड, कां चालूं नयेत? कांहीं लोकांची अशी समजूत असते कीं, सोन्यारुप्याच्या तुकड्यांस किंमत येते ती त्यांवर राजाचे वगैरे मुखवटे किंवा दुसरीं कांहीं चिन्हें आहेत म्हणून येते. परंतु ही त्यांची गैर समजूत आहे; कारण, जर असें असतें तर तांब्याच्या तुकड्यावर छाप मारून त्यास रुपया अशी संज्ञा दिली, तर तोही रुप्याच्या रुपयाबरोबर चालावा; तो चालत नाहीं. म्हणजे रुपयाच्या किमतीचा माल त्याबद्दल मिळत नाहीं. आतां कधीं कधीं असें होईल कीं, एखादा राजा कायदा करील कीं, तांब्याच्या कांहीं विशेष तुकड्यास रुपया म्हणावें, तर त्यास रुपया म्हणणें भाग पडेल. तरी केवळ ह्या नांवानें त्याची किंमत वाढेल असें नाहीं. ह्यावरून ध्यानांत येईल कीं, छाप वगैरे दिले म्हणजे किंमत येते असें नाहीं. छाप दिल्यावर जी एखाद्या धातूची किंमत असते तीच छाप देण्याच्या आधीं असते.

जर कांहीं रुपये, किंवा मोहरा, किंवा पुतळ्या आटवून त्यांचा गोळा केला, तर त्याची किंमत रुपये किंवा मोहरा किंवा पुतळ्या ह्यांच्याहून कमी होणार नाहीं. तांब्यालाही तीच गोष्ट लागू आहे. मग तांब्याचे पैसे असोत किंवा भांडीं असोत त्यांची किंमत त्यावेळीं जी तांब्याची किंमत बाजारांत असेल तीप्रमाणें होईल.

कांहीं देशांत पैसे, रुपये, ह्यांच्या बद्दल दुसऱ्या कांहीं वस्तूंचा उपयोग करितात. नीग्रो नांवाच्या लोकांत नाण्याच्या ऐवजीं लहान लहान शिंपांचा उपयोग करितात. आणि त्यांच्या बायका ह्या शिंपांचीं गळ्यांत घालावयास भूषणें करितात. ह्या शिंपा साठ दिल्या तर एका मनुष्याची एक दिवसापुरती सामग्री मिळते. आफ्रिका खंडाच्या दुसऱ्या कांहीं भागांत एक जातीचे सुती कापडाचे सारखे तुकडे नाण्यांप्रमाणें चालवितात. तेथील लोक हे तुकडे आंगावर न वापरितां ते नीट राखून ठेवून त्यांस जेव्हां कांहीं पदार्थांची गरज लागते तेव्हां ते हे तुकडे देऊन त्यांबद्दल आपणाकरितां हवे ते पदार्थ विकत घेतात. दुसऱ्या कित्येक देशांत मिठाचे खडे नाण्यांच्या ऐवजीं चालवितात. आतां वर सांगितलेल्या शिंपा, कापडाचे तुकडे, वगैरे ह्यांनीं क्रयविक्रय म्हणजे कांहीं सोपा पडत नाहीं असें नाहीं. तरी सोनें, रुपें, इत्यादि धातूंशीं लावून पाहिलें तर ह्यांचा फारच थोडा उपयोग पडतो. शिंपांचें फुटायाचें भय असतें, व कापडाचें फाटायाचें भय असतें, व मिठाचें विरघळायाचें भय असतें; तसें सोन्या रुप्याच्यास भय नसतें. सोन्याच्या व रुप्याच्या नाण्यांची किंमत मोठी असून त्यांस जागा थोडीच पुरते. आतां तांब्याच्या नाण्यांची तितकी योग्यता नसते. लहानसान जिनसा पानसांचा क्रयविक्रय करण्यास तांब्याच्या नाण्यांचा उपयोग पडतो खरा; परंतु जेथें हजारों रुपयांची खरेदी करावयाची असते तेथें जर त्या नाण्यांचा उपयोग करूं लागले, तर मोजण्यास फारच वेळ लागेल, व तीं दूर नेण्यासही फार प्रयास पडतील. ह्याशिवाय दुसरे जे तोटे आहेत ते तर सांगायालाच नकोत.

पहा कीं आपण एक घोडा विकला, आणि त्याची तांब्याच्या नाण्यांत किंमत घेतली, तर त्या नाण्यांची रास इतकी होईल कीं तीं उचलण्यास अतिशयित जड जाईल. आतां तोच घोडा देऊन जर सोन्याचीं नाणीं घेतलीं, तर तीं नेण्यास फारच सोपें पडेल. एका घोड्याची तर काय, पण वीस पंचवीस घोड्यांची किंमत एकट्या मनुष्यास नेतां येईल, आणि ती खिशामध्यें देखील घालून नेतां येईल. आतां ह्याविषयीं ब्यांकनोत तर फारच उत्कृष्ट. नोती ह्या पैसा देण्याबद्दल वचना दाखल असतात. त्या नोती देऊन सावकारापासून पाहिजे तेव्हां पैसा मिळतो. परंतु ह्या चालू होण्यास नोती लिहिणाराची पत फार पाहिजे. त्याची पत कमी असली, तर त्याच्या नोती घेण्याविषयीं लोक अनमान करितील.

---

## मैना.

मैना घ्याहो मैना! कोणाला मैना पाहिजेत! आहा! काय चांगल्या मैना आहेत! असें बोलत एक मनुष्य त्र्यंबकशेटीच्या दारावरून चालला होता. त्याची मुलगी यमनी तें ऐकून दारीं गेली, आणि पाहते तंव एक पांखरेंविक्या डोईवर मैनांचा पिंजरा घेऊन चालला आहे. त्या आंत उड्या मारीत आहेत, ह्या काठीवरून त्या काठीवर जात आहेत, आणि मधुर मधुर शब्द करीत आहेत; तेणेंकरून यमनी मोहित होऊन, केव्हां त्याजवळ जाईन अशा उत्कंठेनें धांवली. थोडक्यांत चुकलें, नाहींतर ती जोत्यावरून पडलीच असती. मुली, तुला मैना पाहिजेत? असें पांखरेंविक्यानें तिला पुशिलें. ती म्हणाली, पाहिजेत, पण थांब अंमळ, मी आंतून बाबाला पुसून येतें. त्यानें बरें म्हणून, पिंजरा ओसरी

वर ठेविला. यमनी धांवत बापाकडे जाऊन म्हणाली, बावा! बाबा! लवकर ये!

**त्र्यंबकशेटी**—येवढी घाई कशाची आहे यमने?

**यमनी**—बाबा, ओटीवर एक पांखरेंविक्या आला आहे, त्याजवळ मैना पुष्कळ आहेत, आणि त्या फार चांगल्या आहेत.

**त्र्यंबक०**—मग ह्याचा तुला इतका हर्ष कस्चा झाला?

**यमनी.**—बाबा, तूं जर सांगशील तर मी त्यांतली एक मैना विकत घेईन.

**त्र्यंबक०**—विकत घ्यावयास तुझ्याजवळ पैसे आहेत काय?

**यमनी.**—हो, आहेत हे माझ्या पिशवींत.

**त्र्यंबक०**—पण त्या पांखराला चारा कोण घालील?

**यमनी.**—मी, बाबा, मी; मी आपल्या हातीं चारीन, आणि तूं पाहशील कीं ती माझी म्हणवायास फार खुशी होईल.

**त्र्यंबक०**—होय, पण मला तुझें भय वाटतें.

**यमनी.**—कस्चें, बाबा?

**त्र्यंबक०**—कीं तूं तिला भुकेनें किंवा तहानेनें एखादे दिवशीं मारशील.

**यमनी.**—मी तिला भुकेनें किंवा तहानेनें मारीन! तें कधीं होणार नाहीं. पहिल्यानें तिला खाऊं घातल्याशिवाय मी अन्नाला शिवणार नाहीं.

**त्र्यंबक०**—मुली, तूं गयाळ आहेस; एखादे दिवशीं तरी तुला विसर पडेल.

यमनीनें बापापाशीं मैनेस पाळावयाचा असा करार केला, आणि त्याचा पदर धरून अशी कांहीं आळ घेतली कीं शेवटीं

त्यानें, मैना घेऊन देतें, असें म्हटलें. मग तिला घेऊन ओटीवर आला, आणि चांगले रंगाची एक सुंदर मैना निवडून काढिली. मग यमनीचा हर्ष त्रैलोक्यांत माईना! तिनें पांखरेंविक्यास पैसे द्यावयाकरितां आपली पिशवी झटकन बापाकडे केली; तींतील पैसे पांखरेंविक्यास देऊन त्र्यंबकशेटीनें आपल्या जवळच्या पैशांचा एक चांगला तारांचा पिंजरा आणविला, ज्याला खालीं खण होते, आणि ज्यांत पाणी घालायाचें बिलोरी भांडें होतें. मग यमनी मैनेस पिंजऱ्यांत घालून घरभर फिरून आईस, बहिणीस, आणि चाकरांस हाका मारमारून दाखवूं लागली. कोणी इष्ट मित्र मुलें तिला भेटावयास येत त्यांजकडेही तिची पहिली गोष्ट मैनेची, आणि ती सांगे कीं, माझे मैनेसारिखी मैना त्रैलोक्यांत नाहीं. तिचे पांखांचा रंग काय! पिसें किती मऊ! बोल काय गोड! चल, मी तुला ती दाखवितें. तिचें नांव मीं छबेली ठेविलें आहे. ती मैना यमनीपाशीं फार सुख पावली. यमनी पहांटेस उठली म्हणजे तिचें पहिलें काम हें कीं मैनेस ताजे दाणे आणि निर्मळ पाणी द्यावें; मग तिनें तोंड धुवावें. पोळी तुकडा घरांत झाला असेल तो पहिल्यानें मैनेकडे यावा. कांहीं गोड गोड पदार्थ तिनें मैनेसाठीं करून बरणींत घालून ठेविलेच असत. तिचे पिंजऱ्यावर ती नित्य हिरवा पाला लावी, कीं तिला उन्हाचा उपद्रव होऊं नपावे. छबेलीही तिचे उपकार जाणे. ती लवकरच यमनीस ओळखूं लागली. यमनीचे पाय वाजले म्हणजे तिनें पांख उडवावे व शब्द करावे. यमनी मुके घेऊन घेऊन तिचा अर्धा जीव करी. आठ दिवस झाले नाहींत तंव ती मैना गावयास शिकली, आणि मधुर स्वर काढूं लागली. एखादे वेळेस तिनें टिपेचा सूर फार लांब-

वावा, तेव्हां असें वाटावें कीं, हिचा श्वास जाऊन ही मरेल. तिनें मोठे सुरानें गावें ते वेळीं सगळ्या घरचे मनुष्यांचा आत्मा प्रसन्न व्हावा. यमनी तिचे शब्द ऐकत चार चार घटिका तिच्या पिंजऱ्याजवळ बसे. कोणे वेळेस तिला पाहत असतां यमनीनें हातांतलें काम विसरावें. यमनी तिला नित्य प्रहर प्रहर गावयास शिकवी. असें तिला त्या पांखराचें वेड लागलें. असें चाललें असतां एके दिवशीं बापानें तिला चित्रांची वही दिली. तीं चित्रें फार सुंदर होतीं, त्यांकडे तिचें चित्त वेधलें. मग ती त्यांस नित्य पाहत बसे. तेव्हांपासून तिला मैनेविषयीं अंमळ विसर पडत चालला. मग तीस मैना साद घाली, तो तिनें ऐकूं नये. शेवटीं असें झालें कीं मैनेस हिरव्या शेंगा किंवा भाकर जी नित्य मिळत असे ती आठ दिवसांत मिळाली नाहीं. ती यमनीनें शिकविलेलीं गोड गोड रागिणीवर गाणीं म्हणे, परंतु व्यर्थ. यमनीचा वाढदिवस आला तेव्हां बापानें तीस एक बाहुली दिली, ती मिळाल्यापासून तर यमनी मैनेस अगदींच विसरली. त्या बाहुलीचें नांव तिनें आवडी ठेविलें. तिला नेसविण्याखालीं, शृंगारण्याखालीं, तिच्या संगतीं बोलण्याखालीं, आणि तिला हातीं घेऊन इकडे तिकडे नाचविण्याखालीं, सकाळपासून संध्याकाळपर्यंत यमनीचा सगळा वेळ जाई. मग कोठें संध्याकाळीं इवलेंसें खाणें मैनेस मिळे. एखादे दिवशीं तिला अगदींच उपास पडे. एके दिवशीं त्र्यंबकशेटीची दृष्टि पिंजऱ्याकडे गेली, आणि पाहतो तों मैना आंत उपडी पडली आहे, तिचीं पिसें विखरलीं आहेत, मान पाय आंखडून गोळा झाली आहे. किंचित् धुगधुगी मात्र राहिली होती, श्वास घ्यावयासही तिला

शक्ति नव्हती. तें पाहून तो म्हणतो, यमने, अगे तुझ्या ह्या मैनेस काय झालें? तें ऐकून तिचें तोंड खरकन उतरलें; ती म्हणाली, नाहीं बाबा, कसें झालें तें कोण जाणे, मला हिचा अगदींच विसर पडला. असें म्हणून ती घाबरून कांपत कांपत दाण्याचा करंडा आणावयाकरितां घरांत धांवत गेली. त्र्यंबकशेटीनें पिंजरा खालीं काढिला, आणि पाहतो तों दाण्याच्या खणांत व पाण्याच्या पेल्यांत कांहीं नाहीं. मग म्हणतो, अरेरे, ह्यांत धान्याचा एक दाणाही नाहीं! पेल्यांत पाण्याचा एक थेंबही नाहीं! हायरे, बिच्याऱ्या पक्ष्या! अरे तूं निर्दयाचे हातीं कसारे सांपडलास! मला हें असें जर पुढचें समजतें, तर मीं तुला विकत घेतलें नसतें. घरांतील माणसें त्या पिंजऱ्याजवळ येऊन म्हणूं लागलीं, आहा! गरीब बिचारी मैना, गरीबरे गरीब! मग त्र्यंबकशेटीनें कांहीं दाणे घातले, आणि निर्मळ पाणी पेल्यांत ओतिलें. त्याला त्या मैनेस सावध करावयास मोठा प्रयास पडला, यमनी तोंड लपवून तेथून निघाली, ती आपल्या खोलींत जाऊन रडत बसली. तिनें रडून रडून आसवांनीं ओंचे सगळे ओले केले. दुसरे दिवशीं त्र्यंबकशेटीनें विचार केला कीं, ही मैना आपल्या शेजाऱ्याचा मुलगा मोरू आहे त्यास बक्षीस द्यावी. तो यमनीपेक्षां शंभरवांट्यांनीं हिचें पाळण पोषण चांगलें करील असा आहे. तें ऐकून यमनीनें मोठा अनर्थ मांडिला. मोठमोठ्यानें हेल काढून रडूं लागली, आणि दुःखाचे उद्गार टाकून म्हणाली, अरे माझ्या पांखरा! माझे छबेले मैने! बाबा, मी तुझ्या पायां पडतें! एकवेळ मला क्षमा कर, आणि ही मैना मजपाशीं असूंदे. आजपासून मी जिवंत आहें तों पर्यंत कधीं हिला विस-

रणार नाहीं. त्र्यंबकशेटीस तिची दया आली, आणि त्यानें पुन्हा ती मैना तीस दिली; आणि तीस बजावून सांगितलें कीं, पुढें असें झाल्यास क्षमा होणार नाहीं! तूं विचार कर कीं ह्या बिचारे पांखरास आपण बंदिशाळेंत टाकल्यावर, ह्यानें आपल्या पोटास दाणा कसा मिळवावा? तुला भूक लागते तेव्हां खावयास मागतां येतें, पण छबेलीस भूक लागली असतां तें आपल्या भाषेनें तिनें लोकांस कसें समजवावें? जर आतां कधीं तूं हीस उपाशीं किंवा तहानेली ठेवशील तर मी—बापाचे हे शब्द ऐकून यमनीचे डोळ्यांत पाण्याचें भरतें आलें. तिनें बापास वेंग मारिली, पण खेदानें तिला एक शब्दही बोलवला नाहीं. मग यमनी पुन्हा छबेलीशीं खेळूं लागली. पुढें एक महिना गेल्यावर त्र्यंबकशेटी बायकोस घेऊन कांहीं कामाकरितां दुसरे गांवीं जाऊं लागला, तेव्हेळीं यमनीस म्हणाला, यमने, छबेलीस संभाळहो. तीं उभयतां गाडींत बसून निघालीं नाहींत तंव यमनी धांवत पिंजऱ्याजवळ गेली, आणि तिनें मैनेस दाणापाण्याची बेगमी केली. कांहींका घटकांनीं तिला करमेनासें झालें. तेव्हां ती सोबतिणींस बोलावून त्यांबरोबर बाहेर फिरावयास गेली; संध्याकाळीं आपालिपा खेळली, नंतर तिनें फुगडी घातली; असें करितां करितां मोठी रात्र झाली, तेव्हां तिचा खेळ संपला. नंतर ती थकली आणि निजावयास गेली; दुसरे दिवशीं ती उजेडतां उठली, तिचें ध्यान मन सगळें खेळाकडे, म्हणून ती तशीच शेजारघरीं वाराणशी आणि बजी ह्यांजकडे गेली. इकडे छबेलीस उपास पडला. असा दुसरा दिवसही तिचा खेळतांना गेला. छबेलीची आठवणही तीस झाली नाहीं. तिसरे दिवशींही तसेंच झालें. चौथ्या दिवशीं त्र्यंबकशेटी गांवाहून परत

आला. तो त्या दिवशीं येणार हें यमनीच्या लक्षांत राहिलें नव्हतें. त्र्यंबकशेटीनें येतांच यमनीचा मुका घेऊन आधीं छबेलीचें वर्तमान पुशिलें. यमनी अंमळ घाबरून म्हणाली, ती बरी आहे बाबा, आणि तेव्हांच पाणी घेऊन ती पिंजऱ्याकडे धांवली. पाहते तों आंत मैना चोंच वासून, पांख पसरून उलथी पडली आहे. तिचें प्रेत पाहून यमनीनें मोठ्यानें किंकाळी फोडिली, ती ऐकून घरांतील सर्व मनुष्यें धांवलीं. तेव्हां पक्ष्याची ती दशा पाहून त्र्यंबकशेटी म्हणाला, आहारे पक्ष्या! काय दुःखाचें हें मरण तुला आलें! जाते वेळेस मीच तुझी मान मुरगाळून गेलों असतों तर ह्यापेक्षां ती व्यथा तुला सुसह होती. हाय हाय! भुकेनें आणि तान्हेनें व्याकुळ होऊन किती दुःखानें तुझा प्राण गेला असेल! असो, तूं दैवाचा, कीं असले निर्दय पोरीचे हातून तरी सुटलास. तेसमयीं यमनीस असें झालें कीं दे माय धरणी ठाय. जर त्यावेळेस धरणी फाटती, तर यमनी आंत उडी टाकिती. त्र्यंबकशेटीनें त्या मैनेचे पोटांत पेंढा भरून तीस कडीपाटास टांगून ठेविलें. तिजकडे यमनीच्यानें पाहवेना. जेव्हां जेव्हां तिजवर तिची दृष्टि जाई, तेव्हां तेव्हां तिचे डोळे आंसवांनीं भरून येत. ती बापास नित्य विनवी कीं, बाबा, ती मैना माझे दृष्टी वेगळी काढ. तो म्हणे, नाहीं. नंतर कित्येक दिवस तिची प्रार्थना ऐकून त्यानें तो पक्षी तेथून काढिला. मग जेव्हां जेव्हां यमनी कांहीं सांगितलेलें काम जपून करीत नसे, तेव्हां त्र्यंबकशेटीनें ती मैना पुन्हा तेथें टांगावी; आणि सर्वांनीं म्हणावें, आहागे बिचारे छबेले! ह्या यमनीनें तुला कसेंगे हाल करून मारिलें! म्हणजे यमनीस पश्चात्ताप होऊन तिनें आईबापांचे आज्ञेंत चालावें.

# पाणी.

## भाग पहिला.

पृथ्वीचे विभाग जमीन आणि पाणी असे दोन केले आहेत. त्यां पैकीं पाण्याविषयीं येथें लिहितों.

समुद्र, नद्या, तळीं ह्यांचें जें पाणी मनुष्यें आज हजारों वर्षें पाहत आलीं आहेत तें पाणी अद्यापि संपलें नाहीं, जमिनींत जिरून गेलें नाहीं, व नासलें नाहीं, ही गोष्ट मोठ्या आश्चर्याची आहे, नाहीं बरें?

एखाद्या भांड्यांत पाणी भरून ठेविलें असतां, तें पाणी जर पुष्कळ दिवस भांड्यांत तसेंच राहिलें, तर तें कमी होतें, आणि खचीत नासून जातें. तसें समुद्र, नद्या, तळीं ह्यांचेंही पाणी कमी व्हावें व नासून जावें, असें आपल्या दृष्टीनें दिसतें खरें; परंतु तसें न व्हावें म्हणून ईश्वरानें कांहीं तजवीज करून ठेविली आहे, तिच्या योगानें जेवढें पाणी खर्च होतें तेवढें पुन्हा परत येतें, आणि तें नेहमीं चांगलें राहतें. ती तजवीज येथें सांगतों.

अमुक पाणी जमिनींत जिरून गेलें किंवा सुकून गेलें, असें आपण बोलतों, ह्याचा अर्थ काय? आपणास जें पाणी दिसेनासें होतें त्याचें होतें तरी काय, व तें जातें कोठें? कोणी म्हणेल कीं, तें भुईंत जातें; पण असें म्हणतां येत नाहीं. कारण, जेथें पाण्याच्या तळीं नुसता दगड असतो तेथें पाण्याचें काय होतें, हा प्रश्न येतोच. ह्याखेरीज, भांड्यांत पाणी भरून ठेवून त्यांतलें अगदीं खर्चिलें नाहीं, तरी कांहीं दिवसांनीं तें कमी होतें, त्याचें काय होतें, हा विचार आहेच. ह्यावरून पाणी दिसेनासें होतें तें भुईंतच जातें, असें म्हणतां येत नाहीं हें खरें आहे.

ह्या कमी होण्याचें वास्तविक कारण असें आहे कीं पाण्याचें रूपांतर होतें; म्हणजे तें ज्या रूपानें आपल्या दृष्टीस पडत असतें तें रूप जाऊन, त्यास वाफेचें रूप प्राप्त होऊन, तें आकाशांत जातें.

पाण्याचे परमाणु पाण्यापासून आकर्षून घेण्याची शक्ति उष्णतेच्या अंगीं आहे. तसें सूर्याच्या उष्णतेनें पाण्याचे परमाणु नेहमीं आकर्षिले जातात. ते फारच सूक्ष्म असतात त्यामुळें दृष्टीस पडत नाहींत. ते हवेच्या परमाणूंपेक्षां हलके असतात म्हणून अर्थातच ते वर जाऊन हवेंत मिसळतात. पाण्याच्या ह्या रूपास वाफ म्हणतात. ह्या परमाणूंचा आणि थंड हवेचा संयोग झाला म्हणजे हे एकमेकांशीं मिळून मेघ अथवा धुकें ह्या रूपानें दिसूं लागतात. नंतर कांहीं काळानें हवेचा कांहीं फेरफार झाला असतां ते मेघ जमिनीवर कोसळतात; त्यांस आपण पाऊस म्हणतों. अशा रीतीनें पुन्हा पाण्यास पाणी मिळतें.

उष्णतेच्या योगानें वाफ होते ती केवळ पाण्याची मात्र होते, आणि ती वर जाते. पाण्यांत कचरा, मळ, व दुसरे कांहीं पदार्थ असतात ते तसेच खालीं राहतात. मीठ हा पाण्यांतील एक मळच आहे. पाणथळी वगैरे असतात त्यांतील पाण्याची वाफ होऊन गेली म्हणजे खळमळ असतो तो खालीं राहतो.

वर सांगितल्याप्रमाणें नेहमीं रहाटगाडगें चालतें. म्हणजे पाण्याची वाफ होऊन ती हवेंत जाते; पुन्हा तिचें पाणी होऊन तें खालीं पडतें; पुन्हा वाफ होऊन ती वर जाते. हें रहाटगाडगें चालल्यापासून मोठा नफा होतो. तो असा कीं, पाण्याची वाफ होऊन वर हवेंत गेली म्हणजे झाडाझुडांस ओलावा पाहिजे असतो तो त्या हवेपासून मिळतो. आणि पृथ्वीवर पाऊस

पडला म्हणजे शेतें पिकतात; नद्या ओढे वाहूं लागतात, तेणें करून सर्व प्राण्यांस अन्न पाणी मिळतें.

वाफ होऊन गेलेलें पाणी पावसाखेरीज दुसऱ्या एका रूपानें पृथ्वीवर पडतें, त्या रूपास दंव असें म्हणतात. दिवसास ऊन पडून पृथ्वी फार तापते, आणि संध्याकाळ झाली म्हणजे लवकर थंड होते; मग तिच्या जवळच्या हवेंत जी वाफ असते तिला थंडी लागून त्या वाफेचें पाणी होतें, आणि त्या पाण्याचे थेंब जमिनीवर पडतात; त्यांस दंव म्हणतात.

सकाळच्या प्रहरीं बागेंतील वगैरे झाडांच्या पानांवर व गवतावर दंवाचे थेंब पडलेले असतात, ते कसे मोत्यांसारखे सुंदर दिसतात, हें सर्वांस ठाऊक आहे. सूर्योदय होऊन ऊन पडलें म्हणजे त्या दंवाची पुन्हा वाफ होते, आणि ती हवेंत जाते, ह्याप्रमाणें होत असतें.

ह्यावरून लक्षांत येतें कीं नाश न होण्याविषयीं पृथ्वीचें आणि जलाचें सारखेंच आहे, म्हणजे पृथ्वीचे अवयव अथवा जलाचे अवयव नष्ट म्हणून अगदीं होत नाहींत. असें मात्र होतें कीं त्या अवयवांचें रूपांतर होऊन हिकडचे तिकडे आणि तिकडचे हिकडे असे जातात, ह्याचमुळें कदाचित् ते आपल्या दृष्टीस पडत नाहींतसे होतात.

जें पाणी वाफेच्या रूपानें जातें तें शुद्ध होऊन पुन्हा पाण्यास येऊन मिळतें; पाण्याची हानि होत नाहीं. आणि जमिनीपासून जें पाणी जातें तें पुन्हा तिला प्राप्त होऊन त्यापासून शेतेंभातें वगैरे बहुत कार्यें होतात. अशा रीतीनें सर्वदां चालल्यामुळें समुद्र, नद्या, तळीं ह्यांचें पाणी कमी होत नाहीं, व नासतही नाहीं

# पाणी.

## भाग दुसरा.

पाणी ज्या रूपानें आपल्या दृष्टीस नेहमीं पडतें त्याच रूपानें सर्वदां असतें असें नाहीं. उष्णतेच्या योगानें पाण्याची वाफ होते, हें पहिल्या भागांत सांगितलेंच आहे, आतां फार थंडी पडली असतां तिच्या योगानें पाण्याचें बर्फ होतें. ह्या देशांत बर्फ फारसें कोठें आपल्या दृष्टीस पडत नाहीं; परंतु थंड देशांत मुलांबाळांस देखील बर्फ माहीत असतें. जसें थंडीचा योग झाला असतां वाफेचें फिरून पाणी होतें, तसें उष्णतेचा योग झाला असतां बर्फाचें फिरून पाणी होतें. पाण्याला उष्णता लागली म्हणजे त्याची वाफ होते, आणि पाण्याला थंडी लागली म्हणजे त्याचें बर्फ होतें; ह्यावरून पाणी ही मध्यम अवस्था आहे.

वाफेपेक्षां बर्फ दिसण्यांत फार शानदार आहे. तें पांढरें पांढरें शुभ्र दिसतें. संस्कृत भाषेंत बर्फाला हिम म्हणतात, आणि त्याच भाषेंत आलय ह्या शब्दाचा अर्थ जागा आहे. हिंदुस्थानाच्या उत्तरेस जो उंच पर्वत आहे त्याचें नांव हिमालय. हें नांव हिम आणि आलय हे दोन शब्द मिळून झालें आहे. हें नांव पडण्याचें कारण असें आहे कीं त्या पर्वतावर नेहमीं बर्फ असतें.

यूरोपखंडांत जिकडे तिकडे बर्फ पुष्कळ असतें, पण त्यांतही उत्तरेकडच्या देशांत विशेष असतें. विलायतेंत मुलें पायांत लोखंडी जोडे घालून बर्फावरून घसरत घसरत जातात, आणि यांत मुलांस मोठी मौज वाटते.

वाफेची मौज अशीच आहे. भात शिजत असतो, अथवा पाण्याला आधण येऊन तें कढत असतें, तेव्हां त्यांतून वाफ बाहेर जात असते, ती पाहून मोठी मौज वाटते. पाण्याला आधण आलें म्हणजे भांड्याच्या आंत पहावें, तों उकळी फुटली म्हणजे खालून वर बुडबुडे येत असतात, ती एक मौजच आहे. एखादे वेळेस भात, भाजी, वगैरे पदार्थ शिजत असतां त्याजवर झांकण ठेविलें म्हणजे हळूच एका आंगानें वाफ बाहेर जात असते, तेव्हां "सूं" असा एकसारखा शब्द होत असतो, तो तर कानाला फारच मंजूळ लागतो.

कढत पदार्थ पानावर वाढला म्हणजे त्यांतून वाफ जाऊं लागते, ती वाफ पदार्थ शिजण्यासाठीं जें पाणी घातलें असतें त्याचेच बारीक अंश, म्हणजे परमाणु, आहेत. पदार्थ भांड्यांत असतो तोंपर्यंत वाफेला मोकळेपणें बाहेर पडतां येत नाहीं, म्हणून ती पदार्थाच्या पोटांत राहते; आणि पदार्थ पानावर वाढला म्हणजे ती मोकळे-पणें वर जाऊं लागते, तेव्हां ती आपल्या नजरेस पडते.

मुलें वाफेला धूरच म्हणतात; पण वाफ कांहीं धूर नव्हे. धूर म्हणजे लांकूड, गोंवऱ्या, इत्यादि अप्रवाही पदार्थांचे परमाणु होत, आणि वाफ म्हणजे पाण्याचे परमाणु होत. त्यांस उष्णता लागली असतां ते हलके होऊन वर जातात; आणि थंड हवेचा संयोग झाला म्हणजे तेच परमाणु मेघरूपानें दृष्टीस पडूं लाग-तात. हें मागें स्पष्ट लिहिलेंच आहे.

एका भांड्यांत पाणी घालून तें जर चुलीवर ठेविलें, आणि खालीं मोठा जाळ लाविला, तर दोनचार घटिकांनीं त्यांतलें सर्व पाणी नाहींसें होऊन भांडें अगदीं कोरडें ठणठणीत होतें.

त्यांतलें पाणी नाहींसें होतें तें जातें कोठें? तें वाफेच्या रूपानें त्या सैंपाकघरांतच असतें. पण तें हवेंत अगदीं मिळून जातें ह्यामुळें आपणांस दिसत नाहीं. अष्टमांश काढा करितात तेव्हां भांड्यांत आठ वाट्या पाणी घालितात, आणि तें कढवून त्यांतलें एक वाटीभर शिलक उरवितात. तेव्हां सात वाट्या पाणी भांड्यांतून नाहींसें होतें, त्याची अशीच वाफ होऊन निघून जाते.

ह्यावरून लक्षांत आलेंच असेल कीं सूर्याच्या उष्णतेनें समुद्र, नद्या, तळीं, ह्यांतील पाण्याची जशी वाफ होते, तशी विस्तवाच्या उष्णतेनें त्यावरच्या भांड्यांतल्या पाण्याची वाफ होते. इतकेंच कीं भांड्यांतल्या पाण्याची वाफ वर हवेंत गेली असतां तिला आपण वाफच म्हणतों, आणि समुद्रादिकांच्या पाण्याची वाफ वर जाऊन जमते तिला आपण मेघ म्हणतों.

पाणी, बर्फ, आणि वाफ ह्या तिहींपैकीं पाणी मात्र नेहमीं आपल्या कामीं पडतें. बर्फ आणि वाफ हीं फारशीं कोठें कामीं पडतातसें दिसत नाहीं. ह्यावरून एखाद्यास असें वाटेल कीं त्यांचा कांहीं आपणांस उपयोग नाहीं. पण वास्तविक पाहतां असें नाहीं. वाफेपासून मोठमोठालीं कामें होतात, म्हणजे गाड्या चालतात, गलबतें चालतात, टांकसाळीचीं यंत्रें चालतात. विलायतेंत छापखाने, कापडाचे माग, गिरण्या, वगैरे बहुतक मोठालीं यंत्रें वाफेच्याच योगानें चालतात. इंग्लिश लोक ह्या देशांत येण्यापूर्वीं वाफेपासून असलीं मोठमोठालीं कामें होतील हें इकडे कोणाच्या स्वप्नांत देखील नव्हतें. यूरोपखंडांतील सर्व देशांतले लोक वाफेपासून अशीं मोठमोठीं कामें करून घेतात. ज्या देशांत बर्फ पुष्कळ असतें त्या देशांत बर्फाचा बहुत उपयोग

पडतो. इंग्लिश लोक विलायतेहून ह्या देशांत पुष्कळ बर्फ आणितात, आणि तें पुष्कळ त्यांच्या कामीं पडतें.

ह्यावरून उपयोग पाहिला असतां बर्फाचा आहे, व वाफेचाही आहे. पण वाफेचा जितका उपयोग आहे तितका बर्फाचा नाहीं.

---

## गोठ्यांतील सांबर.

कोणी एक सांबर पारध्यांच्या कुतऱ्यांनीं झाडींतून हुसकून दिलें, तें पळत पळत एका खेड्यांतील गुरांच्या गोठ्यांत शिरून गवताच्या राशींत लपून राहिलें. तें पाहून तेथील एक बैल त्यास म्हणतो, रे, त्वां एथें येऊन काय योजिलें आहे? मला असें वाटतें कीं, ज्यास भिऊन तूं लपलें आहेस, तें मरण तुला एथें लागलेंच प्राप्त होईल. सांबर त्यास म्हणतें, मित्रहो, जर तुम्ही सर्व कृपा करून उगे रहाल, तर माझा निभाव होईल; सवड साधून मी एथून लवकरच जाईन. मग तें सांबर संध्याकाळपर्यंत तेथें होतें. संध्याकाळ होतांच प्रथम गवताच्या पेंढ्या घेऊन गुराखी गोठ्यांत आला, तेव्हां त्याच्या दृष्टीस तें पडलें नाहीं; त्यानंतर वाड्याचा कारभारी आला, त्यानेंही त्यास पाहिलें नाहीं; त्यासमयीं सांबराच्या ठायीं हर्ष मावेना; तें बैलांस म्हणूं लागलें, गड्यांनो, तुम्ही धन्य आहां! आज मी वांचलों तो तुमच्या धर्मानें; तुम्हां सारिखे परोपकारी कोठेंही नसतील. तें ऐकून त्यांतील एक बैल त्यास म्हणतो, रे, त्वां एथून बरेपणीं निभावून आपल्या ठिकाणीं जावें, हें आमच्या मनापासून आहे, तर ईश्वर करो, आणि ह्या वाड्याचा धनी एथें न येवो! त्यास शंभर डोळे आहेत; तो आला असतां त्याच्या दृष्टीपुढें तुला ह्या

गवतांत लपून राहवणार नाहीं. असें बोलत आहेत, तों वाड्याचा धनी बाहेर गेला होता तो घरीं आला; येतांच प्रथम गोठ्यांत गेला, आणि चाकरांवर चरफडून म्हणतो, रे राम्या, ह्या बैलापुढें वैरण कां रे नाहीं? रे, मी नित्य हाका मारितों, तरी तुम्हांस लाज कशी नाहीं? रे सोन्या, त्या बैलापुढें दुसऱ्या चार पेंढ्या आणून घाल; काय हो, कशीं द्वाड माणसें हीं! असा चरफडत चरफडत इकडून तिकडे फिरतो आहे, आणि सर्वत्र निरखून पाहतो आहे, तों गवतांत सांबराचीं शिंगें त्याच्या दृष्टीस पडलीं; तीं पाहतांच तो चाकरांस म्हणतो, हें, रे. काय ह्या गवतांत? रे, सांबर, रे, धांवा रे, धांवा! तें ऐकतांच चाकर बडगे घेऊन धांवले, त्यांनीं तत्काळ त्या सांबराचा प्राण घेतला.

## तात्पर्य.

आपल्या घरच्या कामाची काळजी आपण जितकी बाळगितों, तितकी चाकर बाळगीत नसतात; होईल तसें होवो, असें म्हणून ते निश्चिंत असतात. ज्याचें अन्न खावें त्याचें हित होईल तें करावें, हा जो सेवकांचा धर्म, तो त्यांच्या स्वप्नींही नसतो; त्यांचें चित्त सर्व काळ आपल्या स्वार्थावर असतें; तो ज्यांत साधेल तें ते करीत असतात; त्यापुढें धन्याचें हित त्यांस दिसत नाहीं. पाहिलें असतां, आंगच्या उधळेपणा मुळें मोडलेले असे श्रीमंत थोडकेच निघतील; परंतु चाकरांनीं नाडिल्यामुळें धुळीस मिळालेले असे पुष्कळ. ह्यासाठीं धन्यानें आपल्या कामास आपण स्वतः सावध असावें; केवळ चाकरांच्या विश्वासावर त्यानें राहूं नये.

## वाफेची गाडी.

ह्या हिंदुस्थानांत वाफेच्या गाडीविषयीं आजपर्यंत लोकांच्या मनांत कांहींच कल्पना आली नव्हती. अलीकडे अमुक देशांत वाफेच्या गाड्या चालतात, अशी वार्ता कानीं पडूं लागली होती; परंतु वाफेची गाडी म्हणजे काय, ती चालते कशी, तिचा वेग कोणत्या प्रकारचा असतो, ती गाडी चालण्यास मार्ग कोणत्या प्रकारचा करितात, आणि अशा गाडी पासून लोकांस फायदे कोणते होतात, हें कांहींच माहीत नव्हतें. परंतु ईश्वरकृपेनें सांप्रतकाळीं तो चमत्कार ह्या देशांत सहज लोकांच्या दृष्टीस पडूं लागला.

वाफेच्या गाड्या चालविण्यासाठीं लोखंडी रस्ते बांधणारी मंडळी जमून तिनें लक्षावधि रुपयांचें भांडवल जमवून जिकडे तिकडे लोखंडी रस्ते बांधण्याचें काम चालविलें आहे. व कित्येक ठिकाणीं तयार झालेल्या रस्त्यांवरून गाड्याही चालू केल्या आहेत.

लोखंडी रस्ता तयार करण्याचें काम म्हटलें म्हणजे मोठ्या खर्चाचें व मोठ्या प्रयासाचें आहे, तरी तें काम सांप्रत मोठ्या आवेशानें व झपाट्यानें चालविलें आहे. ह्यावरून थोड्या दिवसांनीं हे लोखंडी रस्ते व त्यांचे फांटे सर्व हिंदुस्थानभर पसरतील, असें वाटतें. हें कृत्य हिंदुस्थान देशाची स्थिति उत्तम दशेस लवकर पोहोंचण्याचें सूचक चिन्ह आहे.

लोखंडी रस्त्यावरून वाफेच्या गाडीची धांव इतकी त्वरित आहे कीं एका तासांत १५ किंवा २० मैल चालते. ती एकच गाडी धांवत जाते असें नाहीं. तिला जोडलेल्या ओझ्याच्या

गाड्या दहा, वीस, तीस असल्या तरी त्यांसहवर्त्तमान त्याच वेगानें धांवते. ह्यावरून लोकांस ह्या गाडीपासून लाभ बहुत व्हावे हें उघड आहे.

ह्या गाडीपासून लाभ म्हटले असतां अनेक प्रकारचे आहेत. एक्या स्थळापासून दुसऱ्या स्थळास जाणें म्हटलें म्हणजे वेळ आणि खर्च जितका थोडा लागेल तितका करावा, असा मनुष्यांचा साहजिक मनोधर्म असतो, तो ह्या गाडीच्या योगानें थोड्याहून थोड्या मानानें सिद्धीस जाईल, ह्यांत संशय नाहीं.

पहिला लाभ.—एका देशांत धान्याची समृद्धि आणि दुसऱ्या दूरच्या देशांत महागाई झाली असतां इकडून तिकडे त्वरेनें धान्य नेतां येईल. बैलाच्या पाठीवरून माल नेण्यास जो काळ लागावयाचा त्याच्या सुमारें पंचवीस हिशानें तरी कमी काळ पुरेल. इतक्या त्वरेनें जर धान्य तशा ठिकाणीं जाऊन पोहोंचलें, तर तेथील लोकांस किती सुख होईल बरें! तसेंच, पर्जन्याच्या कमताईमुळें कोणे ठिकाणीं पाणी दुर्मीळ झालें, तर दूर देशापासून त्वरित पाणी आणितां येईल. सारांश, प्राण्याच्या जीवनाचे मुख्य पदार्थ, अन्न आणि पाणी, ह्यांच्या तोट्यानें प्राण्यांस दुःख झालें असें कधीं होणार नाहीं. हा सर्वांहून मोठा लाभ होय.

दुसरा लाभ.—भाजीपाला, फळफळावळ, दूधदुभतें, ह्यांचा खप प्रायः शहरगांवीं फार असतो. म्हणून शहराच्या आसपास दोनचार कोसांत जीं खेडीं असतात तेथें मात्र ते पदार्थ उत्पन्न करून शहरांत विकावयास नेतात. तरी शहरच्या लोकांस पुरवठा पडत नाहीं. म्हणून ते पदार्थ जास्ती मोल

देऊन घ्यावे लागतात; आणि तो नफा जवळच्या खेड्यापाड्यांच्या लोकांस मात्र मिळतो. जे गांव शहरापासून दहा वीस कोसांवर असतात तेथील लोकांनीं असले पदार्थ शहरास नेऊं म्हटलें असतां मोठी अडचण पडते, कारण कीं त्या गांवाहून शहरापर्यंत जाण्यास काळ फार लागल्यानें माल नासून जाणार. ह्या अडचणीमुळें तेथील लोक तसला माल उत्पन्नच करीत नाहींत; केला तरी त्यांच्यानें शहरास विकावयास नेववत नाहीं. म्हणून शहराजवळच्या खेडेवाल्यांस जो नफा होतो तो ह्या दूर गांवच्या लोकांस प्राप्त होत नाहीं. आतां ह्या गाडीची सोय झाली म्हणजे किती दुरूनही माल न्यावयाचा असला तरी इतक्या त्वरेनें नेतां येईल कीं जसा आपल्या घरून आपल्या गांवच्या बाजारांत न्यावा. असें झाल्यानें शहरापासून दूरदूरच्या खेड्यापाड्यांत राहणारे लोक भाजीपाला, फळफळावळ, वगैरे जिन्नस उत्पन्न करून शहरांत विकावयास आणितील, तेणेंकरून त्या लोकांला व शहरच्या लोकांलाही नफा होईल.

तिसरा लाभ.—कांहीं कामाकरितां कोणाला कोणेक गांवास जाणें, किंवा दूरचा प्रवास अथवा दूरच्या यात्रा करणें झालें, तर ह्या गाडीच्या योगानें थोड्या दिवसांत व थोड्या खर्चांत त्यांचा प्रवास सिद्धीस जाईल.

चवथा लाभ.—व्यापारी लोकांस दूर देशाहून तेल, तूप, साखर, गूळ, कापड, वगैरे हर तऱ्हेचा माल आणावयास दिवसगत लागून जकात, भाडें, विमा, वगैरे खर्च, व वाटेचें जोखीम वगैरे अडचणी असतात, त्या सर्व ह्या गाडीच्या योगानें दूर होऊन, थोड्या खर्चांत व थोड्या काळांत सुरक्षितपणें माल पाहिजे त्या ठिकाणीं नेतां येईल.

पांचवा लाभ.—कोणे ठिकाणीं बंड उत्पन्न झालें, किंवा परशत्रूनें चाल केली, असें झालें असतां जर त्या ठिकाणीं सरकारच्या फौजेचा भरणा नाहीं, तर दूरची फौज त्या ठिकाणाकडे अतित्वरेनें सरकारास पाठवितां येईल.

असे अनेक प्रकारचे लाभ ह्या गाडीपासून होण्याजोगे आहेत, ते किती सांगावे? सारांश, ह्या वाफेच्या गाडीच्या योगानें व्यापार वाढेल, व लोकांस बहुत प्रकारच्या सुखाचा लाभ होईल, असें जें म्हणणें तें खरें आहे, असें वाटतें.

ही वाफेची गाडी रस्त्यावरून धांवत जाते तेव्हां जे लोक हिजकडे पाहतात त्यांस पराकाष्ठेचें आश्चर्य वाटतें. ते म्हणतात कीं, हें मानवी कृत्य नव्हे, हें कांहीं दैवी कृत्य आहे, ह्यांत संदेह नाहीं. विचारपूर्वक पाहिलें असतां हें दैवी कृत्य खरेंच आहे. कारण कीं, वाफेच्या आंगीं जी एवढी अद्भुत शक्ति आली ही देवानेंच दिलेली आहे. आतां त्या शक्तीची योजना योग्य कार्याकडे करण्याविषयींचें चातुर्य दाखविणें मनुष्यांकडे आहे. तर ईश्वरकृपेनें असें चातुर्य ज्यांच्या आंगीं आलें ते पुरुष धन्य होत.

---

## मृत्यूचा दरबार.

मृत्यु, जो सर्व मनुष्यांवर आपला अंमल चालविणारा, त्यास आपणाला एक प्रधान नेमावयाचा होता, म्हणून त्यानें जाहीरनामा लाविला कीं, हें काम ज्याला पाहिजे, त्यानें येऊन अर्ज करावा. ह्यावरून नाना प्रकारचे मोठे मोठे रोग जागा मागावयास आले. पहिल्यानें ताप पुढें होऊन अर्ज करितो कीं, महाराज, तुम्हां करितां

मेहनत घेऊन कोट्यावधी माणसें मी मारितों; ह्यास्तव मला अधिकार असावा. वायु कांपत कांपत पुढें सरून म्हणतो, मी स्वामींसाठीं किती श्रम करितों, हें स्वामींचे लक्षांत आहेच. दमा श्वास टाकीत बोलतो, स्वामींची कृपा व्हावी म्हणून म्यां आजपर्यंत श्रम करून फार माणसें मारिलीं आहेत. क्षयरोग म्हणतो, महाराज, मी बहुत मनुष्यें स्वामींचे स्वाधीन करितों, ह्यावरून माझें काम कसें हें स्वामींस ठाऊकच आहे. महामारी म्हणाली, महाराज, ह्यांचें काय ऐकतां? मजसारखा स्वामिकार्य करणारा दुसरा कोण आहे? ह्याप्रमाणेंच मूतखडा, मूळव्याध, शूळ, खोकला, आदिकरून नाना प्रकारचे रोग आपापली बढाई सांगूं लागले. असा प्रकार चालला तों पुढें वाद्यें वाजताहेत, बरोबर दाहापांच बायका आहेत, मागें कांहीं तमासगीर मंडळी आहे, अशा समारंभानें तिकडून कैफ आला. तो सर्वांस धमकावून म्हणतो, हः व्हारे सर्व एकीकडे! तुमचें एथें कांहीं काम नाहीं. प्रधानकीचा अधिकार मलाच योग्य. महाराज, माझ्याप्रमाणें सरकारची कामगिरी हे मिळाले आहेत ह्यांतून कोणास व्हावयाची नाहीं. माझ्या बळावर हे सारे काम करणारे, आणि ह्या सर्वांचीं कामें मी एकटा करणारा, माझ्या सारखा पराक्रमी प्रधान सरकारास दुर्मीळ आहे; तर ही जागा मलाच द्यावी, असें कैफाचें बोलणें ऐकून मृत्यूनें मान डोलविली. तो म्हणाला, गोष्ट खरी आहे; तूं तसाच आहेस; माझी प्रधानकी तुलाच योग्य; असें म्हणून त्याचा हात धरून मृत्यूनें त्याला आपल्या उजव्या हाताकडे बसविलें, आणि प्रधानकीच्या अधिकाराचीं वस्त्रें त्यास दिलीं.

## तात्पर्य.

नाना प्रकारचे रोग उत्पन्न करणारें, व शेवटीं मनुष्याचा जीव घेणारें कैफासारखें द्वाड व्यसन दुसरें नाहीं.

---

## लावी पक्षीण आणि तिचीं पिलें.

एक लावी पक्षीण शेतांत घरटें करून राहत होती. तें शेत पिकलें तेव्हां तीस काळजी पडली. ती मनांत म्हणाली, माझीं पिलें पांख फुटून चांगलीं उडायास लागायाच्या अगोदर जर शेतकरी शेत कापावयास आला, तर कसें होईल? मग ती नित्य बाहेर चारा आणायास जाई, त्यावेळीं पिलांस सांगे कीं, माझे मागें कोणी काय बोलेल तितकें सर्व मी घरीं आलें म्हणजे मला सांगा. एके दिवशीं शेताचा धनी शेतावर येऊन आपल्या मुलास म्हणतो, मुला, मला वाटतें कीं हें शेत आतां कापायास आलें; त्यास तूं उद्यां सकाळीं जा, आणि आपले इष्टमित्र व शेजारी ह्यांची शेतकापणीस हात लावावया विषयीं प्रार्थना कर. असें तो शेतकरी मुलास बोलला, तें पिलांनीं आई घरीं येतांच तीस सांगितलें? आणि तिच्या भोंवतीं किलकिल करून म्हणूं लागलीं, आई आतां तूं आम्हांस लवकर एथून दुसऱ्या ठिकाणीं ने. आई म्हणाली, मुलांनो, स्वस्थ असा; कांतर शेताच्या धन्यानें शेत कापण्या विषयींचा भरंवसा शेजारी आणि इष्टमित्र ह्यांवर धरिला आहे; ह्या वरून मी पक्कें जाणितें कीं उद्यां कापणी होणार नाहीं. दुसऱ्या दिवशीं लावी बाहेर जाऊं लागली त्यासमयीं तिनें पिलांस पूर्ववत् सांगून ठेविलें; त्यावरून तीं शेताचा धनी काय बोलतो तें ऐकावयास टपत बसलीं होतीं.

चंचूपुटेंचि[५३] बहु टोंचिलिं पांखरानीं ॥
नेणो दिला प्रतिफळास नखांक[५४] रानीं ॥ ४ ॥

चंचूक्षतें हीं नव्हतीं दयाळा ॥
मी कां तशीं आणिन हा कृपाळा ॥
म्यां आपुल्या चावुनि शुद्ध दांतें ॥
चाखोनि घे मी शिवतें[५५] पदातें ॥ ५ ॥

मधुरतर फळांची पूर्ण घेऊनि गोडी ॥
मग मज रघुनाथा ठेविता होय खोडी ॥
निरखुनि[५६] रघुरायें भाव त्या भिल्लिणीचा ॥
परम मनिं सुखावे नाथ तो जानकीचा ॥ ६ ॥

भिल्ली बोलुनि बोल सुंदर असे रामाकरीं तीं फळें ॥
घाली नेणुनि शास्त्रषिद्ध[५७] पुरुषां उच्छिष्ट देतां बळें ॥
प्रेमें प्रेमभरें प्रसन्न हृदयें भक्ताजनाचा पिता ॥
आत्माराम रमापती निजमुखीं झाला फळें अर्पित्ता ॥ ७ ॥

भिल्लिच्या वनफळें मन धालें[५८] ॥
लोक नायक म्हणे सुख झालें ॥
प्रेम रामहृदयीं बहु आलें ॥
बाष्प[५९] तोय नयनांत निघालें ॥ ८ ॥

रामचंद्र विभुच्या चरणासी ॥
लक्षुनी विनटली[६०] शरणासी[६१] ॥
वंदितां बहु सुखेंचि वधू ते ॥
अश्रुनें चरणपल्लव धूते ॥ ९ ॥

माझें मनोगत वियोग तुझा नसावा ॥
रूपीं तुझ्या दृढ असेन महानुभावा ॥

स्वामी म्हणे तुज वियोग कधीं नवाटे[६२] ॥
जा शवरीं मिळसि चिन्मयराजवाटे[६३] ॥ १० ॥

# स्फुट कविता.

श्लोक.

असा वर्ततो लोककल्याणकारी[६४] ॥
जगीं वर्तती लोकही त्या प्रकारीं ॥
वदे तो सदाचार शास्त्रार्थ जैसे ॥
जगीं वर्तती लोकही सर्व तैसे ॥ १ ॥

सिंहाचा जो बाल तोही चपेटा[६५] ॥
मारी त्याला जो करी[६६] मत्त मोटा ॥
तेजस्वी जे वृत्ति[६७] ऐशी तयांची ॥
तेथें कांहीं चाड नाहीं वयाची ॥ २ ॥

न तेजस्वी साहे प्रकट परतेजोबलमदा[६८] ॥
जयाचा जो आहे प्रकृतिगुण लोपे नच कदा ॥
मयूखांनीं[६९] जेव्हां प्रखरतर चंडांशु[७०] तपतो ॥
रविग्रावा[७१] तेव्हां अनलसम[७२] तेजास वमतो ॥ ३ ॥

आधींच मर्कट तशांतहि मद्य प्याला ॥
झाला तशांत जरि वृश्चिकदंश त्याला ॥
झाली तयास तदनंतर भूतबाधा ॥
चेष्टा वदूं मग किती कपिच्या अगाधा ॥ ४ ॥

आर्या.

उत्तम पुरुष म्हणावा, जो करितो शत्रुवरहि उपकार ॥
बहु पीडितां परांहीं, स्मरत नसे जो मनांत अपकार ॥ ५ ॥

हें कार्य करीन तुझें, ऐसें बोलोनि कार्य तत्काल ॥
करणें योग्य असे बा, सुजनाची हीच कीं बरी चाल ॥ ६ ॥


बाळपणीं बाळांची, कोमल तरुतुल्य बुद्धि वांकेल ॥
घेईल ज्या गुणाला, तो गुण मतिवेष्टुनीहि फांकेल ॥ ७ ॥

विद्यालयीं मुलानें, जाण्याचा नित्य वेळ साधावा ॥
मनिं नित्य वागवावें, कीं गुरुचा बोल मज न लागावा ॥ ८ ॥

अभ्यासाची वेळा, खेळांत स्वल्पही न दवडावी ॥
गेली वेळा येइल, पुन्हा अशी गोष्ट कधिंहि न वदावी ॥ ९ ॥

शाळेंत सोबत्यांनीं, खेळायाचा विचार जरि केला ॥
खेळुं नये आपण कीं, व्यर्थचि खेळांत काळ जो गेला ॥ १० ॥

## हत्ती.



हत्तीच्या दोन जाती आहेत. एक जात आफ्रिका खंडांत राहते व एक जात आशिया खंडांत राहते. ह्या दोहों जातींच्या मध्यें मुख्य भेद हाच आहे कीं आफ्रिका खंडांतील हत्तीचे सुळे आशिया खंडांतील हत्तीच्या सुळ्यांपेक्षां मोठे व लांब असतात.

मूलस्थान.

सर्व जनावरांमध्यें हत्ती शरीरानें व बळानें मोठा आहे. ह्याचें शरीर दिसण्यांत ओबडधोबड व बोजड आहे. ह्याचें डोकें मोठें असून डोळे फार

स्वरूप.

लहान आहेत, तरी ते चपळ व पाणीदार असतात. ह्याचे कान फार रुंद व लांब असून लोंबत असतात, तरी तो त्यांस सहज उभारितो व पंख्याप्रमाणें हालवून त्यांकडून आपणास वारा घेतो. त्याची पाठ कमानदार असते. त्याच्या आंगाचें कातडें खरबरीत असून त्यावर चिरम्या असतात. त्याचे पाय बेढब दिसतात तरी फार बळकट असतात, जणू इमारतीचे भक्कम खांबच. एकेका पायाचा घेर तीनचार फूट असतो, व उंची पांच सहा फूट असते. त्याचीं पावलें वाटोळीं असून प्रत्येकास आंखूड बोटें असतात; व बोटाबोटाच्या शेवटास खुरासारखी नखी असते. त्याच्या वरल्या जाभाडांतून दोन सुळे निघतात. हत्ती लहान असतां ते सुळे दिसत नाहींत; तो वयांत आला म्हणजे पुढें येतात. कधीं कधीं ते सुळे चार पांच फूट देखील लांब येतात. खालच्या जाभाडांत समोरचे दांत नसतात. हत्तीचें शरीर वाटोळें असून लठ्ठ असतें, व त्यावर केंस थोडे असतात. त्याचा रंग काळसर असून त्यांत पिंगट रंगाची झांक मारते. ह्या प्राण्याचें विशेष लक्षण म्हटलें तर सोंड होय. ही सोंड स्नायुमय मांसाची एक लांब नळी त्याच्या तोंडावर असते. ती सोंड त्याला वांकवितां, लांबवितां, आंखडितां, व चोहोंकडे फिरवितां येते. सोंडेच्या शेवटास एक बोंड असतें; त्या बोंडाच्या वरच्या आंगास आंगठ्यासारखा एक अवयव असतो, त्याच्या योगानें भुईवरील अगदीं लहान पदार्थही त्याला उचलितां येतो, गांठ सोडितां येते, व वस्तू बळकट धरितां येते. सोंडेच्या शेवटास दोन नाकपुड्या असतात, त्यांतून हत्ती श्वासोच्छ्वास करितो, आणि त्यांहीं करून तो पिण्याकरितां व आंग

धुण्याकरितां पाणी ओढून घेतो; मग तें तोंडांत सोडितो किंवा अंगावर फेंकितो. हत्तीची उंची नऊ दहा फूट असते; कधीं कधीं बारा चवदा फूटही भरते. त्याची लांबी सुमारें बारा फूट असते. आशिया खंडाच्या आग्नेयीकडील द्वीपकल्पांत कोठें कोठें पांढरे हत्ती सांपडतात. तेथील लोक पांढऱ्या हत्तीला देवाप्रमाणें मानितात.

गुण व चाली. हत्ती ओबड धोबड दिसतो तरी शहाणपणाविषयीं तो मनुष्याच्या खालोखाल आहे. आणि एवढा मोठा व बळकट आहे तरी गरीब आहे, क्रूर नाहीं. तो माणसाच्या स्वाधीन झाल्यावर त्याचा हुकूमबंदा होतो; तो मनुष्यास आपल्या पाठीवर चढूं देतो, ओझें घालूं देतो, व साज घालूं देतो. हत्तीला दाट सावलीची जागा आवडते. त्याला फार थंडी किंवा फार उन्हाळा सोसत नाहीं. त्याला पोहतां चांगलें येतें, व वारंवार पाण्यांत जाऊन आंग धुणें त्याला आवडतें. हत्तीला जसें शिकवावें तसें तो शिकतो. तो एरवीं गरीब आहे, परंतु त्याची कोणीं खोडी काढिली तर सूड घेण्याविषयीं तत्पर असतो. तो दररोज पन्नास साठ मैलांची मजल करितो; कारण पडल्यास शंभर मैलांची देखील मजल करील. हत्ती कधीं मस्त झाला तर त्याच्या गंडस्थळांतून मद गळूं लागतो.

हत्ती रानांत कळप करून राहतात. त्याचें कर्णेंद्रिय व घ्राणेंद्रिय हीं फार तीक्ष्ण असतात.

भक्ष्य. ह्या पशूचें भक्ष्य झाडांच्या कोंवळ्या कोंवळ्या फांद्या, आणि मळ्यांतील, बागेंतील, व शेतांतील हरतऱ्हेचीं धान्यें, व फळ फळावळ हें आहे. शिवाय वाळगलेले

हत्ती तांदूळ व कणकेचे रोट खातात. रानांतील हत्ती भक्ष्याचा शोध करीत असतां शेतांची व मळ्यांची फार नासधूस करितात. हत्तीला पाणी प्यावयास फार पाहिजे.

उपयोग.

बंदुका व तोफा ह्यांची युक्ति निघाली नव्हती तेव्हां हत्ती युद्धाचे कामास लोक लावीत असत. हल्लीं डेरे राहुट्या वगैरे सामान वाहण्याच्या व तोफा वगैरे ओढण्याच्या कामास हत्ती फार उपयोगीं पडतात. हिंदुस्थानांतील राजे रजवाडे लोक शोभेसाठीं हत्ती बाळगितात. हत्तीवर अंबारी बांधून तींत बसतात, किंवा स्वारीमध्यें त्यास पुढें चालवितात. पूर्वीं सरकारच्या गुन्हेगारांस हत्तीच्या पायाखालीं तुडवून मारण्याची चाल होती. हस्तिदंत म्हणजे हत्तीचा दांत ह्याचा फार उपयोग पडतो.

हत्तीला चालविण्याकारितां जो मनुष्य हत्तीवर बसतो त्याला महात म्हणतात. तो महात हातीं अंकुश घेऊन तो हत्तीच्या गंडस्थळास टोंचून पाहिजे तिकडे त्याला वळवितो.

---

## सिंह.



मूलस्थान.

सिंहाचें मुख्य स्थान आफ्रिका खंड आहे. आशियाखंडांतील हिंदुस्थान देशांत कोठें कोठें सिंह आढळतात. ह्या पशूचे अनेक भेद आहेत.

**स्वरूप.**

सिंहाचें डोकें मोठें असतें; त्याचे कान वाटोळे असतात; व त्याच्या तोंडावर आंखूड केंस असतात. माथा, मान, व खांदे ह्यांवर लांब व रांठ केंस असतात. शरीरावरील केंस आंखूड असून मऊ असतात. त्याची शेपटी लांब असून तिच्या शेवटास काळ्या केंसांचा झुपका असतो; त्यांत एक कांट्यासारखा अवयव असतो. शेपटीचा झुपका व मानेवरचे केंस पुरते वाढण्यास सहा सात वर्षें लागतात. मोठ्या सिंहाची लांबी नाकापासून शेपटापर्यंत सात आठ फूट असते; व शेपटीची लांबी सुमारें चार फूट असते. सिंहापेक्षां सिंहीण लहान असते, व तिच्या मानेवर लांब केंस नसतात. काठेवाड व गुजराथ ह्या प्रांतांतील सिंहांचे मानेवर लांब केंस नसतात. सिंहाचा रंग साधारणपणें पिंगट आहे, पण निरनिराळ्या भेदाच्या रंगांत फरक असतो.

**गुण.**

हा पशु सर्व श्वापदांमध्यें भयंकर असून उमदा व शूर आहे. सिंहाचें बळ इतकें भारी आहे कीं तो आपल्या पंज्याच्या एका झपाट्यानें घोड्याची कमर मोडून टाकितो. मांजरास जसें उंदराचें ओझें वाटत नाहीं तसें त्याला घोडें, बैल, हरण, वगैरे कोणत्याही पशूचें ओझें वाटत नाहीं. त्याला तोंडांत धरून झपाट्यानें पळत जातो. ह्याच्या डोळ्यांस दिवसाचा उजेड सोसत नाहीं, म्हणून हा दिवसभर गुहेंत किंवा झाडींत बसून राहतो; आणि दिवस मावळला म्हणजे आपलें भक्ष्य मिळवायास बाहेर निघतो. सिंह आपलें भक्ष्य धरण्या-


साठीं बहुतकरून लपून बसतो, आणि एखादा पशु आटोक्यांत आला म्हणजे पटकन झेंप घालून त्यास धरितो, किंवा भुईसरपट दबत दबत जाऊन उडी मारून धरितो. कधीं कधीं त्याच्या पाठीसही लागतो. सिंह पारधीच्या पाठीस लागला म्हणजे मेघासारखी गर्जना करितो. त्याची गर्जना ऐकून आसपासचीं जनावरें थरथरां कांपून पळूं लागतात. सिंहाचें घ्राणेंद्रिय तीक्ष्ण नाहीं, म्हणून पारध त्याच्या दृष्टीच्या पलीकडे गेली तर तो माघारा फिरतो, असें म्हणतात. तीन चार दिवस पुरायाजोगें तो भक्ष्य एकदांच खातो; मग पुन्हा भूक लागेपर्यंत गुहेंत किंवा झाडींत पडून राहतो. सिंहाचे दांत इतके बळकट असतात कीं तो मोठीं मोठीं हाडें कडकडां फोडितो. हल्लीं सिंह आहेत ह्यांहून प्राचीन काळीं फार असत. ते कितीएक देशांतून अगदीं नाहीं-तसे झाले, व आहेत तेथें तरी आतां थोडे आहेत.

भक्ष्य. तृण, धान्य खाणारे जितके पशु तितके सारे सिंहाचें भक्ष्य आहेत.

सिंहीण फळल्यावर पांच महिन्यांनीं विते. तिला दरखेपेस

पोरें. दोनपासून चारपर्यंत पोरें होतात; व वर्षास एकच खेप होते. सिंह तीस चाळीस वर्षें वांचतात.

# वाघ.



वाघाचें मूळचें उत्पत्तिस्थान म्हटलें तर आशियाखंडांतील उष्ण प्रदेश होय. वाघ मुख्यत्वेंकरून हिंदुस्थानांत व हिंदुस्थानाच्या जवळच्या बेटांत आहेत आणि चीन व चिनई तार्तरी ह्या देशांतही आहेत. हिंदुस्थानामध्यें तर बंगाल प्रांतांत, मलबार प्रांतांत, व म्हैसूरप्रांतांत वाघ पुष्कळ आहेत.

मूलस्थान.

सर्व श्वापदांमध्यें वाघ देखणा आहे. वाघाचा व मांजराचा वर्ग एकच आहे. त्याच्या शरीराचा आकार कांहींसा सिंहाच्या आकारासारखा असतो. वाघाची उंची सुमारें तीन फूट असते. शेंपूट खेरीज करून त्याची लांबी सुमारें सहा फूट असते. सर्व वाघांची लांबी उंची सारखी नसते; कितीएक वाघ सिंहापेक्षां देखील मोठे असतात. वाघाचें डोकें मोठें व वाटोळें असतें; त्याचे कान आंखूड असून दूरदूर असतात; त्याच्या ओंठावर मिशा असतात. त्याचे दांत भयंकर दिसतात. त्याच्या केंसांचा रंग पिंवळा असतो; आणि मध्यें

स्वरूप.

मध्यें काळे पट्टे असतात. तोंडावर, गळ्यावर, आणि पोटाखालीं रंग पांढरा असतो. आंगावरचे केंस आंखूड असतात. डोक्याच्या दोहों बाजूंचे केंस अमळ लांब असतात. शेंपटाच्या शेवटास काळा रंग असतो. प्रत्येक पायाच्या पंज्यास पांच पांच नखें असतात. वाघाच्या पटाईत आणि बिब्या अशा दोन जाती आहेत.

*गुण.* सिंहाप्रमाणें वाघाला प्राण्यांचा जीव घेण्याकरितां ईश्वरानें उत्पन्न केलें आहे. वाघाच्या आंगीं इतकें बळ असतें कीं त्यानें हरण, बैल, घोडा, किंवा रेडा, वगैरे प्राणी मारिला तर तो त्या मेलेल्या प्राण्याला तोंडांत धरून सहज जलदीनें पळतो. तो पंज्याच्या एका सपाट्यानें मोठाल्या प्राण्याचें पोट फाडितो. वाघाचा शब्द मोठा असतो, परंतु सिंहाच्या इतका भयंकर नसतो. वाघाला राग आला म्हणजे तो गुरकावतो. वाघ लांब लांब उड्या टाकितो, आणि इतक्या जलदीनें पळतो कीं कोणताही जलद पळणारा प्राणी त्याच्या पुढें पळून जाऊं शकत नाहीं. वाघ सिंहापेक्षां दुष्ट व हिंसक आहे. त्याचें पोट कितीही भरलें तरी त्याची प्राणिवधाची इच्छा कमी होत नाहीं. त्याला रक्त पिण्याची इच्छा सदोदित सारखी असते. ह्यामुळें प्राणी दृष्टीस पडला कीं तो धरावयाविषयीं त्याला मोठा आवेश येतो. वाघाला धरून कितीही मारिलें किंवा जखडून बांधून ठेविलें, अथवा गोंजारिलें, तरी त्याच्या आंगची क्रूरता जात नाहीं. त्याला मारता हात व पाळता हात दोन्ही सारखेच.

वाघ रानांत व डोंगरांत राहतो. वाघ फार हिंसक आहे.

चाली. कपटानें किंवा पराक्रमानें तो मेंढरांचा, बकऱ्यांचा, गुरांढोरांचा सप्पा उडवितो. तो हत्तीवर व गेंड्यावर हल्ला करितो. कधीं कधीं तो सिंहाबरोबर देखील लढण्यास मागें पुढें पाहत नाहीं. तो मनुष्याला भीत नाहीं व जुमानीत नाहीं. तो लपून श्वापदाची वाट पाहत बसतो. एखादें श्वापद त्याच्या दृष्टीस पडलें म्हणजे तो मोठ्यानें ओरडून त्याजवर उडी घालतो, आणि त्याला घेऊन नाचत उडत आपल्या गुहेंत जातो. वाघ स्वभावानें आळशी आहे. त्याला चांगली भूक लागे तोंपर्यंत तो आपल्या गुहेंत निजलेला असतो. भूक लागली म्हणजे प्राणी धरण्याकरितां बाहेर हिंडावयास निघतो.

भक्ष्य. वाघ मास खाऊन आपली उपजीविका करितो. त्याला रानांतलीं जनावरें सांपडलीं नाहींत तर तो मनुष्याचे वस्तीजवळ येऊन मनुष्याला मारून खातो. जनावरांच्या मासापेक्षां मनुष्याचें मास त्याला फार आवडतें असें म्हणतात. त्याची भूक कडक असते त्यामुळें तो जें सांपडेल तें भराभर खाऊन टाकितो. तो मांजरासारखें जिभेनें पाणी पितो.

पोरें. वाघिणीला दरखेपेस चार पांच पोरें होतात. मांजरी प्रमाणें वाघिणीला दहा थानें असतात. म्हणून सर्व पोरांस बरोबर दूध प्यावयास अडचण पडत नाहीं. तिचीं पोरें तिच्या जवळून कोणी न्यावयास आलें तर तिला पराकाष्ठेचा


राग येऊन ती त्याचा पाठलाग करिते. त्या प्रसंगीं तिजपासून आपला बचाव करणें कठीण आहे. वाघाच्या पोरास पेटा असें म्हणतात.

उपयोग. वाघाची पारध करण्याचा आशिया खंडांतील राजेलोकांस फार शौक आहे. ते बरोबर पारधी, शिपाई, स्वार घेऊन मोठ्या समारंभानें वाघाची पारध करण्याकरितां जातात. वाघाच्या कातड्याची योग्यता मोठी आहे. वाघाचें मास, चरबी, व दूध हीं औषधाच्या उपयोगीं आहेत, असें कोणी समजतात.

वाघ लहानपणापासून बाळगिला तर तो मनुष्याच्या सवंईचा कांहीं होतो, व मनुष्याच्या कह्यांत कांहीं राहतो असें कधीं कधीं घडतें. दरवेशी लोक वाघावर आपली उपजीविका चालवितात.

---

## गेंडा.



गेंडे आशिया खंडांत आणि आफ्रिका खंडांत असतात.

मूलस्थान. आशिया खंडांत ह्यांची राहण्याची जागा म्हटली म्हणजे हिंदुस्थान, सयाम, कोचीनचीन, जावा आणि सुमात्रा हीं बेटें, आणि चीन देशाचा कांहीं भाग, हे देश आहेत. आणि आफ्रिका खंडांत तर हबस देश व केप् आफ् गुड होपाजवळचे किती एक प्रांत आहेत.

गेंडा आंगानें मोठा असून बेढब दिसतो. त्याची लांबी

स्वरूप. सुमारें बारा फूट आणि उंची सुमारें सहा सात फूट असते; आणि पोटाचा घेर सुमारें त्याच्या लांबी इतकाच असतो. त्याच्या पाठीच्या कण्याला लवण असतें; डोकें सुमाराचें मोठें असतें, व वरला ओंठ लांब असतो; कान लहान व अणीदार असून नेहमीं उभे असतात; डोळे लहान असून अर्धे झांकलेले असतात, आणि ते नाकाच्या अगदीं जवळ असतात; पाय आखूड असून लठ्ठ व बळकट असतात, आणि त्यांला खालीं तीन तीन गेळें असतात.

सर्व गेंड्यांचें सामान्य रूपलक्षण सांगितलें, आतां कांहीं विशेष आहे तो असा. आशिया खंडांतले गेंड्याचे नाकावर एक शिंग असतें, तें भरींव असतें, आणि थोडेंसें वांकडें असून शेवटास बारीक असतें. त्याची लांबी सुमारें दोन फूट असते, आणि बुडाचा घेर अठरा इंच असतो. आंगाची कातडी जाड असून रांठ असते. सर्व आंगभर टेंगळें असतात; आणि माने-वरच्या व पायांवरच्या कातडीला मोठमोठ्या वळ्या असतात. आफ्रिका खंडांतल्या गेंड्याला ह्या वळ्या नसतात. त्याला दोहों खांद्यांवरून एक लहानशी सुरकुती असते; तशीच मागचे बाजूस

पाठीवर एक आणि दोहों कुशींला कांहीं अशा लहान लहान सुरकुत्या असतात. ह्यामुळें त्याचें आंग नितळ दिसतें. दुसरा एक भेद आहे तो असा, आफ्रिका खंडांतल्या गेंड्याचे नाकास दोन शिंगें असतात, त्यांत एक लहान असतें तें वरल्या आंगास असतें. गेंड्याला राग येतो तेव्हां तीं शिंगें ताठ उभीं राहतात; नाहीं तर लुल्यासारखीं पडलेलीं असतात. ह्या दोन्हीं जातींच्या गेंड्यांचा रंग काळा असतो, आणि कानांवर मात्र केंस असतात; बाकीच्या आंगावर कोठें नसतात. ह्यांचा चेहरा नेहमीं धुंद असतो.

गुण. गेंडा स्वभावानें गरीब आहे. पण त्याचे वाटेस कोणी गेलें तर तो काय करील ह्याचा विश्वास नाहीं. हा आंगानें स्थूळ असून जलद चालतो. ह्याची दृष्टि मंद, परंतु कान तिखट असतात. ह्याचें घ्राणेंद्रियही तीक्ष्ण असतें. हा क्रूर नाहीं खरा, तरी माणसाळत नाहीं. ह्याला राग येतो तेव्हां हा मोठ्यानें ओरडतो. हिंदुस्थानांतील गेंड्याचें कातडें इतकें चिवट असतें कीं त्याला तरवार किंवा गोळी लागत नाहीं; म्हणून शिपाई लोक त्याच्या कातड्याच्या ढाला करितात. आफ्रिकेंतल्या गेंड्याचें कातडें इतकें चिवट नसतें. गेंडा बळकट असुन त्याच्या नाकावर पुढेंच शिंग असतें ह्यामुळें त्याजपुढें कोणाचा उपाय चालत नाहीं.

चाली. झाडी, नदीच्या थडी, किंवा पाणथळ जागा अशा ठिकाणीं राहणें गेंड्यास आवडतें. चिखलांत लोळणें व पाण्यांत बसणें ह्याची त्याला मोठी मौज वाटते.


हत्तीप्रमाणें ह्यांच्या टोळ्या नसतात. हे मनुष्याच्या वाऱ्यास उभे राहत नाहींत.

भक्ष्य. गेंड्यांचें भक्ष्य म्हटलें म्हणजे रांठ वनस्पति आणि कांटेरी झाडें हें आहे. शेतांतील ऊंस व धान्य हेंही त्यांस आवडतें. हे मास कधीं खात नाहींत. हे रानांत हिंडतां हिंडतां आपल्या वरच्या लांब ओंठानें व जिभेनें झाडांचीं पानें व कोंवळे कोंवळे फोक तोडून खातात. ह्यांला प्यावयाला पाणी पुष्कळ लागतें.

पोरें. गेंड्याच्या मादीला दर खेपेस एकच पोर होतें. तें पहिल्या महिन्यांत मोठ्या कुत्र्यापेक्षां मोठें नसतें. त्याची पूर्ण वाढ होण्यास सुमारें पांच वर्षें लागतात. गेंड्याला आयुष्य सत्तर ऐंशीं वर्षें असतें असें म्हणतात.

उपयोग. कांहीं देशचे लोक गेंड्याचें मास आवडीनें खातात. तरी मासापेक्षां त्याच्या कातड्याची योग्यता मोठी आहे. शिंगें, दांत, खूर, वगैरे त्याचे अवयव औषधाच्या उपयोगीं पडतात. मोठमोठ्या शिकारखान्यांत लोकांस दाखविण्याकरितां गेंडे बाळगलेले असतात.

# लांडगा.



मूलस्थान. पृथ्वीवरील बहुतकरून सर्व समशीतोष्ण व शीत अशा प्रदेशांत लांडगे असतात.

स्वरूप. लांडग्याचा व कुत्र्याचा एकच वर्ग आहे; पण लांडगा कुत्र्यापेक्षां अमळ मोठा असतो. लांडग्याची मान आंखूड, डोकें लांबट, व नाक अणीदार असतें; कान उभे असून शेवटीं बारीक असतात. पाय लांब असून केंसांनीं भरलेले असतात; आणि त्याच्या शेंपटावर लांब व दाट केंस असतात. त्याच्या डोळ्यांचे तारे हिरवे असून चकाकतात; डोळे तिर्कस असतात; त्याची मुद्रा उग्र कावरीबावरी दिसते. लांडग्याची उंची सुमारें अडीच फूट, व लांबी सुमारें साडे तीन फूट असते. त्याच्या आंगावरील केंस रांठ असतात. त्याचा रंग कांहीं पिंगट व कांहीं पिंवळट असतो. अगदीं उत्तरेकडील प्रांतांत कांहीं लांडगे केवळ पांढरे व कांहीं अगदीं काळे असतात. काळा लांडगा सर्वांत मोठा असतो. लांडग्याचा चेहरा विलक्षण असतो. तो क्रूर असून भयचकितही दिसतो.

हा प्राणी हिंसक, क्रूर, व धूर्त असून भित्रा आहे. हा अडचणींत सांपडला म्हणजे अगदीं घाबरून जातो, त्या प्रसंगीं तो कोणास कांहीं उपद्रव करीत नाहीं.

गुण.

लांडगा फार बळकट व पळणारा असतो. तो जिवंत मेंढरूं तोंडांत धरून पळूं लागला तर कुत्र्यावांचून कोणाच्यानें पाठलाग करून मेंढरास सोडवत नाहीं. लांडग्याचें घ्राणेंद्रिय फार तीक्ष्ण असतें. जिवंत प्राणी किंवा प्राण्याचें प्रेत लांब असलें तरी त्याचा त्याला वास येतो. लांडग्याचा शब्द केंकावण्या-सारखा कर्कश असतो. लांडगा व कुत्रा एकाच वर्गांतले असून त्यांचें एकमेकांशीं अत्यंत वैर असतें.

चाली.

लांडगे रानांत व ओसाड ठिकाणीं राहतात, आणि भूक लागल्याशिवाय ते बहुत करून ठिकाण सोडून जात नाहींत. भूक लागली म्हणजे ते मनुष्य, गुरें ढोरें, मेंढरें, बकरीं, वगैरे ह्यांजवर हल्ला करितात. लांडगा बहुत करून एकटा फिरतो; तरी कधीं कधीं लांडग्यांच्या टोळ्याही फिरतात. लांडगे भक्ष्य मिळवावयास फिरत असतात तेव्हां जें सांपडेल तें धरून खावें असा त्यांचा स्वभाव आहे.. तरी ते संशयी व भित्रे असतात. ते भक्ष्याच्या शोधास निघाले म्हणजे जिकडून वारा येतो त्या दिशेकडे जातात, कांकीं दूरच्या भक्ष्याचा शोध वासावरून लवकर लागावा. लांडग्यांला ताजें मास आवडतें, तरी ते कुजलेलीं प्रेतें उकरून खातात. ते भक्ष्या-करितां कधीं कधीं फौजेच्या मागून चालतात. लांडगे रात्रीपेक्षां दिवसास अधिक झोंप घेतात; पण त्यांची झोंप कुत्र्याचेप्रमाणें हलकी असते.

लांडगा हा मास खाणाऱ्या प्राण्यांपैकीं आहे. कसलेंही मास असलें तरी तो मोठ्या आधाशीपणानें खातो. त्याला मनुष्याचें मास फार आवडतें. तो आहे ह्याहून फार बळकट व धीट असता, तर मनुष्याचे मासाखेरीज दुसरें कांहींच न खाता. लांडग्यास भूक फार लागली म्हणजे तो लांडग्यांस देखील मारून खातो. केंस, हाडें, कातडें, वगैरे पडलेलें जें सांपडेल तें तोंडांत टाकितो. दुसरें भक्ष्य मिळालें नसून फारच भूक लागली तर शेवाळ, चिखल देखील खातो. इतका खादाड आहे तरी चार चार पांच पांच दिवसपर्यंत उपासही काढितो. वरचेवर पाणी मात्र त्याला प्यावयास मिळालें पाहिजे.

भक्ष्य.

लांडगी फळल्यापासून सुमारें साडेतीन महिन्यांनीं विते. तिची विण्याची वेळ आली म्हणजे ती रानांत अगदीं एकीकडे जागा पाहते. तेथील कांटे वगैरे काढून वर शेवाळ किंवा गवत घालून मऊ जागा पोरांकरितां तयार करिते. तिला दर खेपेस पांच सहा पोरें होतात. निदान तिहींहून कमी होत नाहींत. तिचीं पोरें उपजतात तेव्हां आंधळीं असतात. लांडगी त्यांस महिना दोन महिने पाजिते. मग थोडथोडें मास आणून तें त्यांस खावयास शिकविते. लांडग्याची पूर्ण वाढ तीन वर्षांनीं होते. लांडगे पंधरा वीस वर्षे वांचतात.

पोर.

कातड्या खेरीज लांडग्याचें कांहीं उपयोगीं पडत नाहीं. त्याच्या कातड्याचें मऊ व ऊबदार असें पांघरूण होतें. लांडग्याशिवाय लांडग्याचें मास कोणी

उपयोग.

खात नाहीं. लांडग्याचीं पोरें धरून आणून त्यांस नाचावयास, कुस्ती करावयास, वगैरे लोक शिकवितात. लांडग्याची शिकार लोक करितात.

## तरस.



मूळस्थान.

हा पशु बहुत करून सर्वत्र आहे. तरसाच्या तीन जाती आहेत; पट्ट्यांचा, ठिपक्यांचा, आणि भिसाळ केंसाचा. पहिल्या जातीचे तरस आफ्रिका खंडांतील बार्बरी, मिसर, आणि अबिसिनिया ह्या देशांत, आणि आशिया खंडांतील सिरिया, इराण, व हिंदुस्थान ह्या देशांत पुष्कळ आहेत. दुसऱ्या व तिसऱ्या जातीचे तरस आफ्रिका खंडाच्या दक्षिण भागीं केप आफ् गुद होप ह्याच्या जवळच्या रानांत पुष्कळ आहेत.

स्वरूप.

ह्या पशूचा व कुत्र्याचा वर्ग एकच आहे. पहिल्या जातीच्या तरसाची उंची खांद्यापर्यंत १९ इंचांपासून २५ इंचांपर्यंत असते. आणि तोंडापासून शेपटापर्यंत लांबी सुमारें सवातीन फूट असते. त्याचा रंग पांढुरका असून त्यावर उदी रंगाचे आडवे पट्टे असतात, पाठीच्या पुढल्या भागावर रांठ, बळकट, व लांब केंस असतात. त्याच्या शरीराचे

पुढले भाग बळकट असतात, परंतु मागले भाग खालपट असून अशक्त असतात. तरस नेहमीं आपलें डोकें खालीं करून चालतो. दुसऱ्या जातीचा तरस पहिल्या जातीच्या तरसा सारखाच पण कांहीं लहान असतो, व आंगाचा रंग पिंवळट असून त्यावर काळसर ठिपके असतात. तिसऱ्या जातीच्या तरसाचे आंगावर लांब, रांठ, व भिसाळ केंस पुष्कळ असतात. तरसाची मुद्रा दुष्ट व क्रूर दिसते. हा पशु बळकट असतो.

गुण. तरस हा पशु खादाड, क्रूर, व भयंकर असतो. त्याला प्रतिबंधांत राहणें सोसत नाहीं. त्याचा शब्द विलक्षण आहे. तो आरडूं लागला म्हणजे कोणी रडत आहे व ओकाऱ्या काढीत आहे असें वाटतें. हा पशु लुटारू आहे. ह्याच्या आंगीं इतकें धैर्य आहे कीं, हा आपल्यापेक्षां बळकट पशूशीं देखील लढावयास भीत नाहीं. ह्याला रात्रीं अधिक दिसतें. हा पळूं लागला असतां लंगडतोसा दिसतो.

पहिल्या व दुसऱ्या जातीचे तरस गुहांमध्यें किंवा बिळांत किंवा खडकाच्या खबदडींत राहतात. आणि तिसऱ्या जातीचे तरस समुद्रकिनाऱ्यास राहून कुजलेलें वगैरे मास खातात.

भक्ष्य. तरस भक्ष्य शोधण्याकरितां रात्रीं फिरतात, व गुरें मेंढरें ह्यांस मारून खातात. पुरलेलीं मनुष्यांचीं मेतें उकरून खातात, व मेलेल्या जनावरांचेंही मास खातात.


पोरें. तरसाची वीण बहुतकरून कुत्र्याच्या विणीप्रमाणें असते.

तरस कुजलेलीं प्रेतें खातात ह्यामुळें त्यांचा फार उपयोग आहे असें म्हटलें पाहिजे; कारण तीं प्रेतें तशींच कुजत पडतीं तर हवा नासून मोठाले रोग उत्पन्न होते.

उपयोग.

---

## अस्वल.



यूरोप, आशिया, आणि अमेरिका ह्या तीन खंडांत अस्वलें पुष्कळ आहेत; परंतु आफ्रिकाखंडांत क्वचित् दृष्टीस पडतात. अस्वलाच्या अनेक जाती आहेत, त्यांचा वर्ण निरनिराळा असतो. यूरोप व आशिया ह्या खंडांतील उत्तरेकडच्या बहुतेक देशांत व सिंहलद्वीप वगैरे हिंदुस्थानाच्या जवळच्या कांहीं बेटांत उदी रंगाचीं अस्वलें आहेत. अमेरिका-खंडांत काळ्याढुस्स रंगाचीं व करड्या रंगाचीं अस्वलें आहेत. हिंदुस्थानांतील अस्वलें केवळ काळ्या रंगाचीं असतात. उत्तर-ध्रुवाकडील थंड देशांत तर पांढऱ्या रंगाचीं अस्वलें असतात.

मूलस्थान.

अस्वल आंगानें धष्टपुष्ट असून त्याचें शरीर फार बोजड असतें; त्याचें डोकें लांबोळें असून नाकही लांबट असतें; कान आंखूड असून शेंड्याकडेस वाटोळे असतात. त्याचे सर्व अवयव बोजड असून बळकट असतात.

स्वरूप.

त्याच्या सर्वांगावर केंस दाट असून लांब असतात. त्याचें शेपूट अगदीं लहान असतें. त्याचीं पावलें मोठीं असून तळवे घट्ट असतात. दर पावलास पांच पांच बोटें असून त्यांस लांब लांब नखें असतात. त्याचे डोळे लहान असतात. उदी रंगाच्या अस्वलाची लांबी सुमारें पांच विती असून उंची तीन विती असते. करड्या रंगाच्या अस्वलाची लांबी नाकापासून शेपटापर्यंत बारा विती असते. पांढऱ्या रंगाचीं अस्वलें उदीरंगाच्या अस्वलांहून तिप्पट मोठीं असतात. त्यांचें नाक व नखें काळीं असतात. अस्वलाची मुद्रा उदास, कुरटी, आणि ओंगळ दिसते.

गुण.

अस्वलें बहुतकरून द्वाड व क्रूर असतात. अस्वलें लहान असतांना धरून आणून त्यांस नाचायास वगैरे कांहीं शिकविलें असतां तीं शिकतात. निर्दयपणानें त्यांस वागविल्यानें तीं मनुष्याच्या कह्यांत वागतात; पण त्यांच्यावर विश्वास ठेवितां येत नाहीं; त्यांच्या जवळ सावध राहिलें पाहिजे. अस्वलाच्या नाकावर मारिलें तर तें चवताळून आवरनासें होतें. त्याचीं इंद्रियें तीक्ष्ण असतात; त्यांत घ्राणेंद्रिय तर फारच तीक्ष्ण असतें. अस्वलें फार बळकट असतात. बहुतेक जातींच्या अस्वलांस झाडावर चढतां येतें. पांढरें अस्वल चपळाईनें पाण्यांत बुडी मारितें, आणि दहा दहा कोस पोहत जातें. अस्वलाचा शब्द गुरगुरण्यासारखा असतो.

चाली.

अस्वलास एकटें राहणें आवडतें; व जेथें कोणाची वस्ती नाहीं तेथें तें राहतें. डोंगराच्या गुहेंत किंवा झाडाच्या ढोलींत, अथवा जमिनीला खांच करून तींत, अगर झाडाच्या फांद्यांची कोप करून तींत, राहतें.

अस्वलें कधीं कधीं गुरें, बकरीं, मेंढरें, वांसरें, वगैरे ह्यांस मारितात; त्यापेक्षां तीं पिकलेल्या शेतांची फार खराबी करितात. त्यांस कोणीं जखमी केलें असतां तीं चवताळून जाऊन आपल्या पुढल्या पायांनीं त्याला मिठी घालतात, आणि त्याचा श्वास कोंडून किंवा गळा दाबून त्याचा जीव घेतात. हिंवाळ्यामध्यें अस्वलें आपल्या गुहांत चाळीस पन्नास दिवसपर्यंत उगीच पडून राहतात. त्यावेळांत तीं अन्नही खात नाहींत. अस्वल उगीच उभें राहिलें तर तें बहुतकरून झुलत असतें.

भक्ष्य.

उदीरंगाचीं अस्वलें कधीं कधीं मास खातात, पण बहुतकरून आपली उपजीविका मुळ्या, वनस्पति, धान्य, फळें ह्यांवर करितात. त्यांस मध फार आवडतो, व त्याकरितां तीं मोहोळ शोधावयास झाडावर चढतात. काळ्या रंगाचीं व करड्या रंगाचीं अस्वलें ह्यांस तर मास फार आवडतें, तरी काळीं अस्वलें फळें मुळ्या ह्यांवर उपजीविका करितात. मनुष्यांचीं मेतें व मासे वगैरे जलचरप्राणी ह्यांवर पांढरीं अस्वलें उपजीविका करितात.

पोरें.

अस्वलीला हिंवाळ्यांत पोरें होतात; दर खेपेस बहुतकरून दोन दोन होतात. तिची पोरांवर फार प्रीति असते. जिवंतजीव आहे तोंपर्यंत ती त्यांस उपद्रवापासून राखावयास झटते. उदीरंगाचीं अस्वलें आपलीं पोरें खातात म्हणून माद्या त्यांस लपवून ठेवितात.

उपयोग.

अनेक देशांतील लोक अस्वलांचें मास खातात, कारण कीं तें रुचिकर असतें. अस्वलाची चर्बी पांढरी असते व गोड असते. त्या चर्बीतून तेल निघतें तें आंगास

लाविलें असतां उसण जातें; व डोईस लाविलें तर केंस वाढतात. तें तेल कोठें दिव्याच्याही उपयोगीं पडतें. अस्वलाच्या कातड्याचे जोडे, हातमोजे, टोप्या, वगैरे पुष्कळ जिन्नस करितात. रूसदेशांतील बडेलोक अस्वलांचीं कातडीं हिंवाळ्यांत पांघरतात. बळकट कातडें जेथें लावण्याची गरज असते तेथें अस्वलाचें कातडें लावितात. उत्तरेकडील लोक अस्वलापासून कांहीं वैद्यकीही शिकतात. अस्वलास जखम लागली असतां त्याठिकाणीं तें कोणतें औषध लावितें, व कांहीं रोग झाला तर तें कोणत्या झाडाचा पाला खातें हें पाहून ते लोक त्याप्रमाणें करितात. त्यांनीं नाचावयाची चालही अस्वलांपासून घेतली आहे.

---

## कोल्हा.



मूलस्थान.

कोल्हा हिंदुस्थानांत व आशियाखंडांतील सर्व उष्ण व समशीतोष्ण प्रदेशांत असतो. तो आफ्रिका खंडांतील बहुतक देशांतही असतो.

स्वरूप.

कोल्ह्याचा व कुत्र्याचा वर्ग एकच आहे, म्हणून कोल्ह्याचें कुत्र्याशीं पुष्कळ सादृश्य असतें. कोल्ह्याच्या शरीराची लांबी सुमारें अडीच फूट व उंची सुमारें दीड फूट असते. त्याचा रंग पिंवळसर असून पाठीवर कांहीं

काळसर असतो. ह्याचे कान बाहेर झुकलेले असतात; त्याचा रंग तांबडा असतो. शेपटी लांब असते; व तोंड पुढें चिंचोळें असतें. त्याची साधारण मुद्रा कावरीबावरी दिसते.

गुण. कोल्ह्याचा स्वभाव कुत्र्याच्या स्वभावाशीं पुष्कळ जमतो. कोल्हा लहानपणापासून बाळगिला तर कुत्र्यासारखा माणसाच्या संवईचा होतो, व कुत्र्याला न भितां त्याच्याशीं खेळतो. कोल्ह्यास वास फार लांबून येतो, म्हणून दूरचें भक्ष्य त्याला समजतें. त्याचा शब्द रडल्यासारखा असून कानाला वाईट लागतो.

चाली. कोल्हे रानामध्यें खडकाच्या खबदडींत किंवा बिळांत राहतात. दिवसभर लपून राहून रात्रीं भक्ष्य शोधावयास बाहेर निघतात. कोल्हे शेंपन्नासांची टोळीकरून पारध करितात, आणि कोंबडीं, कोंकरें, वगैरे प्राण्यांस मारून खातात. पुरलेलीं प्रेतें उकरून खातात. कोल्हे दिवसां ओरडत नाहींत, त्यांची हूक रात्रीं होते. एक ओरडूं लागला म्हणजे सारेच ओरडतात, आणि पोरांच्या आरडाओरडीप्रमाणें गलबला करितात.

भक्ष्य. कोल्हे मांसभक्षक आहेत. त्यांस ताजें मांस न मिळालें तर कुजलेल्या मांसावर ते निर्वाह करितात. त्यांना वरचेवर इतकी भूक लागते कीं वाळलेलें कातडें देखील त्यांस गोड लागतें. जर मांस नाहीं सांपडलें तर ते बागांत, मळ्यांत शिरून फळें मुळें ह्यांचा फन्ना पाडितात.

पाळींव कोल्हे आवडीनें भाकर खातात. कोल्हे कुत्र्याप्रमाण जिभेनें पाणी घेऊन पितात.

पोरें. कोल्ही वर्षांतून एकदां विते. दर खेपेस तिला चार पांच पोरें होतात.

---

## कापूस.

कापूस म्हणून बारीक लोंकरी सारखा मऊ असा एक पदार्थ आहे, त्याचें कापड बनतें. हा पदार्थ कापशी म्हणून एक झाड आहे तिच्या बोंडांत सांपडतो. कापशीच्या जाती पुष्कळ आहेत; त्या सर्व उष्ण देशांत उत्पन्न होतात. थंड देशांत कापूस पिकत नाहीं. अमेरिका खंडांत कापूस फार पिकतो. तेथील कापूस उत्तम प्रतीचा असतो. ह्या आपल्या हिंदुस्थानांत पुष्कळ कापूस होतो, व चीन देशांतही होतो, पण तो अमेरिकेंतील कापसापेक्षां निरस असतो. कापसाचीं झाडें फार उंच नसतात.

मृग लागला म्हणजे कापसाच्या सरक्या शेतांत पेरितात. मग सुमारें पांच महिन्यांत त्यांचीं झाडें वाढून त्यांस फुलें येतात. नंतर बोंडें धरून एक दोन महिन्यांनीं कापूस तयार होतो. कापशीचीं बोंडें उकललीं म्हणजे त्यांतील कापूस काढून घेतात. आणि मग कापसांतील सरक्या काढून त्या कापसाचे गठ्ठे बांधितात. ते बहुतक दूरदेशास पाठवितात.

कापसाचें कापड करण्याची चाल हिंदुस्थानांत फार प्राचीन काळापासून चालत आली आहे. बंगाल्यांतील ढाका शहरच्या मलमलीची प्रसिद्धि सर्वत्र आहे. तेथील कापड फार बारीक

सुताचें व हलके वजनाचें असतें. तसेंच जगन्नाथ, मद्रास, महेश्वर, चंदेर, इत्यादि किती एक ठिकाणीं कापड फार नामांकित होत असतें. हें कापड हातानें वापरण्याच्या यंत्रांनीं करीत असतात.

इंग्लंदांत कापसाचें कापड करण्याची चाल अलीकडे सुरू झाली. लोंकरीचें कापड करण्याची चाल इंग्लंदांत फार वर्षांपासून आहे. पाउणशें वर्षां मागें कापसाचें कापड इंग्लंदांत थोडेंच होत होतें. तेव्हांपासून हा कापड करण्याचा व्यापार वाढत वाढत इतका वाढला आहे कीं पृथ्वीवरील सर्व लोकांकरितां इंग्लंदांत कापड बनतें असें म्हटलें तरी चालेल.

हा व्यापार इतका वाढण्यास मुख्य कारण म्हटलें म्हणजे इंग्लंदांतील कुशळ कारागिरांनीं जीं यंत्रें केलीं आहेत तीं होत. तीं यंत्रें वाफेच्या बळानें चालवितात म्हणून मनुष्यास मेहनत न पडतां कापड इतकें पुष्कळ होऊं लागलें कीं हिंदुस्थानांतून कापूस नेऊन त्याचें इंग्लंदांत कापड करून फिरून तें हिंदुस्थानांत विकावयास नेऊन हिंदुस्थानांतील कापडापेक्षां सस्तें विकावयास सांपडतें. हा मोठा चमत्कार आहे.

इंग्लंदांत कापड तयार होऊन हिंदुस्थानांत पुष्कळ येऊं लागल्यामुळें हिंदुस्थानांतील कापड करण्याचा धंदा फार कमी होत चालला. पण कापूस उत्पन्न करण्याचा व्यापार फार वाढला आहे. तो इतका वाढला आहे कीं कापूस हाच हिंदुस्थानांतील व्यापाराचा बाहेर पाठवावयाचा मुख्य माल म्हटला तरी चालेल. इंग्लंदांतील मोठ्या वैभवास हिंदुस्थानांतील कापूस हें एक मूळ कारण आहे असें म्हटलें तरी चिंता नाहीं.

## अभंग तुकारामाचे.

हेंचि दान देगा देवा ॥ तुझा विसर न व्हावा ॥ १ ॥
गुण गाईन आवडी ॥ हेंचि माझी सर्व जोडी ॥ २ ॥
नलगे मुक्ति धन संपदा ॥ संतसंग देईं सदा ॥ ३ ॥
तुका म्हणे गर्भवासीं ॥ सुखें घालावें आम्हांसी ॥ ४ ॥

---

जेणें होय अपकीर्ती ॥ तें सर्वार्थी त्यजावें ॥ १ ॥
सत्य रुचे भलेपण ॥ तें वचन जगासी ॥ २ ॥
परद्रव्य परजाया ॥ पाहुन वायां न भुलावें ॥ ३ ॥
तुका म्हणे खोटें वर्म ॥ निंद्य कर्म काळिमा ॥ ४ ॥

---

जे का रंजले गांजले ॥ त्यांसि म्हणे जो आपुले ॥ १ ॥
तोचि साधु ओळखावा ॥ देव तेथेंची जाणावा ॥ २ ॥
ज्यासी आपंगितां नाहीं ॥ त्यासी धरी जो हृदयीं ॥ ३ ॥
दया करीजे पुत्रासी ॥ तेच दासा आणि दासी ॥ ४ ॥
तुका म्हणे सांगों किती ॥ तोचि भगवंताची मूर्ती ॥ ५ ॥

---

परद्रव्य परनारी ॥ अभिलाषूनी नाकें धरी ॥ १ ॥
जळो तयाचा आचार ॥ व्यर्थ भार वाहे खरें ॥ २ ॥
सोंवळ्याची करी स्फीती ॥ क्रोधें विटाळला चित्तीं ॥ ३ ॥
तुका म्हणे सारीं सोंगें ॥ दावी बाहेरील आंगें ॥ ४ ॥

---

नीचपण बरवें देवा ॥ नचले कोणाचाही हेवा ॥ १ ॥
महापुरें झाडें जाती ॥ तेथें लोहाळे वांचती ॥ २ ॥
येती सिंधूच्या लहरी ॥ नम्र होतां जाती दुरी ॥ ३ ॥
तुका म्हणे हेंचि फळ ॥ पाय धरल्या न चले बळ ॥ ४ ॥

लहानपण देगा देवा ॥ मुंगी साखरेचा रवा ॥ १ ॥
ऐरावती रत्न थोर ॥ त्यासि अंकुशाचा मार ॥ २ ॥
ज्याचे अंगीं मोठेपण ॥ तया यातना कठीण ॥ ३ ॥
तुका म्हणे बरवें जाण ॥ व्हावें लहानाहुन लहान ॥ ४ ॥

---

## कोलंबसाची गोष्ट.

### भाग १.

सुमारें चारशें वर्षांपूर्वीं आशिया, यूरोप, आणि आफ्रिका ह्या तीन खंडांतल्या लोकांस परस्परांची माहिती होती; व त्यांस वाटत असे कीं, पृथ्वी म्हणून काय ती तीनच खंडें; दुसरें कांहीं नाहीं. ह्याचें कारण हेंच कीं लोक गलबतांत बसून समुद्रांत फारसे दूर कधीं जात नसत.

यूरोपखंडांतल्या लोकांस आपल्या पश्चिमेकडील मादिरा बेटें, कानेरी बेटें, आणि अझोर बेटें हीं माहीत होतीं, परतु त्यांच्या पश्चिमेकडची माहिती अगदीं नव्हती. तीं बेटें तरी यूरोपखंडापासून पाहिलीं असतां, बरींच दूर आहेत. तेव्हां आरंभीं समुद्रांत इतका लांब कोण मनुष्य कसा गेला असेल तें कोण जाणे; आपणांला त्याचें मोठें आश्चर्य वाटतें. अलीकडे लोकांनीं समुद्राचे नकाशे काढले आहेत त्यांवर पाहिलें म्हणजे अमुक ठिकाणीं बेट आहे, अमुक ठिकाणीं खडक आहे, असें सर्व समजतें, म्हणून आतां समुद्रांत जाण्याचें फारसें भय नाहीं. ह्यामुळें आतां लोक समुद्रांत पाहिजे तिकडे जातात, पण ज्यावेळेस नकाशे वगैरे कांहींच साधन नव्हतें त्या वेळेस लोक गेले हें मोठें आश्चर्य आहे.

यूरोपखंडामध्यें इताली म्हणून एक देश आहे, त्यांत जिनोवा नामें शहर आहे, तेथें एक गृहस्थ राहत होता त्याला एक मुलगा झाला, त्याचें नांव क्रिस्तोफर कोलंबस. तो गृहस्थ गरीब होता तरी त्यानें आपला मुलगा अमळसा मोठा होतांच त्याला लिहायाला, वाचायाला, आणि हिशोब करायाला शिकविण्याची तजवीज केली;

कोलंबसाला नकाशे पहावे व दुसऱ्या देशांच्या गोष्टी वाचाव्या, हा नाद फार लागला, त्यामुळें त्यानें भूगोलविद्येचा अभ्यास पुष्कळ केला; तितका दुसऱ्या कोणत्याही विद्येचा अभ्यास केला नाहीं. तो मोठा झाल्यावर त्याला असें वाटूं लागलें कीं, आपण दुसरे देश पहावे. तो चवदा वर्षांचा झाला तशी त्यानें गलबतावरची चाकरी धरिली, आणि भूमध्यसमुद्रांत पुष्कळ खेपा केल्या. त्या प्रवासांत त्याचे पुष्कळ हाल झाले; पण त्याला फायदा हा झाला कीं खलाशाच्या कामांत त्याचा चांगला समज होऊन थोड्या दिवसांत आंगावर घेऊन गलबत वहिवाटण्याचें काम करण्याचें शहाणपण त्याला आलें.

नंतर भूमध्यसमुद्राच्या पलीकडे जावें, हें जें साहस कर्म तें करावेंसें कोलंबसास वाटूं लागलें. मग त्या समुद्राच्या पश्चिमेस जिब्रालतर नांवाची सामुद्रधुनी आहे तींतून बाहेर पडून तो अतलांतिक महासागरांत गेला, आणि त्यानें आफ्रिकाखंडाच्या पश्चिमेकडच्या किनाऱ्यापर्यंत सफर केली. ह्या खेपेस त्याला जें कांहीं नवें आढळलें तें व दुसऱ्या खलाशांपासून जें समजलें तें सर्व त्यानें ध्यानांत धरून ठेविलें होतें, त्यावरून त्याला असें वाटलें कीं, अझोर नांवाच्या बेटांच्या पश्चिमेस समुद्रांत आणखी

जमीन असावी. अझोर बेटें पहिल्यानें कोणास माहीत नसतील, आणि कोणी एखादा धैर्यवान् पुरुष जाऊन तीं पाहून आला असेल, मग त्यानें तीं सर्वांस माहीत केलीं असतील. तसा आतांही एखादा पुरुष छाती करून निघाला असतां त्याला अझोर बेटांच्या पलीकडे जमीन लागणार नाहीं म्हणून कशावरून? कदाचित् लागेल, असा त्यानें तर्क बांधिला.

कोलंबसाच्या समजण्यांत कांहीं गोष्टी आल्या होत्या त्यांवरून, अझोर बेटांच्या पश्चिमेस जमीन लागेल, हा जो त्याचा तर्क होता तो दृढ झाला. त्या गोष्टी अशा कीं, मादिरा बेटांत आणि अझोर बेटांत देवदारांचीं वगैरे मोठालीं खोडें वगैरे लांकडें समुद्रांतून वाहून येत; आणि तसलीं झाडें त्या बेटांत तर मुळींच होत नसत; चमत्कारिक रीतीनें कोरलेलीं लांकडेंही आलेलीं कधीं सांपडत असत. ह्यापेक्षांही चमत्कारिक एक गोष्ट झाली, ती अशी कीं, एका बेटाच्या किनाऱ्यावर एकदां मागें दोन प्रेतें वाहून आलीं होतीं, आणि त्यांचें स्वरूप आशिया, यूरोप, आणि आफ्रिका, ह्या तीन खंडांतल्या लोकांच्या स्वरूपापेक्षां अगदीं निराळें होतें. ह्या प्रेतांचें लोकांस मोठें आश्चर्य वाटलें.

अशा प्रकारच्या गोष्टी अनेक वेळां घडल्या. पण लोक त्यांविषयीं तादृश विचार करीत नसत. शेवटीं कोलंबसाला त्या समजल्या तेव्हां त्यानें असें अनुमान केलें कीं, झाडें जमिनीशिवाय उगवावयाचींच नाहींत, कोरींव लांकडें माणसांखेरीज तयार व्हावयाचींच नाहींत, आणि ज्या अर्थी हे सर्व पदार्थ पश्चिमेकडून वाहत आले त्या अर्थी युरोपियन लोकांस माहीत नाहीं अशी जमीन पश्चिम दिशेस असलीच पाहिजे. एरवीं ह्या गोष्टी घडणारच नाहींत.

ह्या सर्व गोष्टींवरून कोलंबसास तिकडे जाण्याची हौस आली, पण त्याच्याजवळ पैसा नव्हता, व कोणी इष्टमित्रही मदत करण्यासारखे नव्हते. असें करितां एखादें गलबत त्याला मिळालें असतें तरी असल्या गरीब मनुष्याबरोबर जाऊन आपला प्राण धोक्यांत घालण्याला खलाशी कोण मिळतो?

नंतर कोणी एखादा संस्थानी ह्या कामाला मदत करितो काय हें पहावें, आणि करितोसें झाल्यास जावें, असा बेत त्यानें केला.

कोणी झाला तरी त्याला स्वदेशाचा अभिमान असतोच, तसा कोलंबसासही होता; म्हणून त्यानें प्रथम जिनोवा शहरांतल्या मोठ्या लोकांला आपला बेत सांगितला. पण त्याचा तो बेत ऐकून त्याला मदत करणें तें तर एकीकडेसच राहिलें; उलटा त्यांनीं त्याचा उपहास केला. मग तेथून तो पोर्तुगाल देशच्या राजाकडे गेला. कारण कीं पोर्तुगाल देशचे लोक त्या वेळेस समुद्रांत फिरणें वगैरे करण्याच्या कामांत मोठे हुशार होते, व ते समुद्रांत पुष्कळ दूर पावेतों जात असत. त्या राज्यांत कोलंबसाचा उपहास नाहीं झाला खरा, तरी त्या राजानें कोलंबसापासून सगळें काढून घेऊन मग सांगितलें कीं, आम्ही मदत करीत नाहीं. असें त्याला फसवून राजानें आपल्या पदरच्या एका सरदारास सांगितलें कीं, कांहीं गलबतें घेऊन जा, आणि कोलंबस म्हणत आहे त्या जमिनीचा शोध लाव. ह्याप्रमाणें तो सरदार गेला, पण त्याला कांहीं शोध लागला नाहीं. वाटेंत तुफान झालें त्यामुळें तो भ्याला, आणि पोर्तुगाल देशास परत आला.

तो गृहस्थ येतांच कोलंबस स्पेन देशास निघून गेला. कोलंबसाची गारबी इतकी होती कीं वाटेनें निर्वाहाकरितां त्याला भीक मागावी लागली.

स्पेन देशामध्यें अंदालुशिया म्हणून एक प्रांत आहे, त्यांतील एका खेड्यांत एके दिवशीं रात्रीं गार वारा सुटला आहे अशा वेळेस कोलंबस येऊन पोहोंचला. त्याच्या बरोबर त्याचें एक मूल होतें, तें त्यानें पाठीशीं बांधिलें होतें. तो लोकांस म्हणाला, माझें लेंकरूं व मी अगदीं थकून गेलों आहों, आणि आमचे प्राण भुकेनें अगदीं व्याकुळ झाले आहेत, तर कृपा करून कोणी तरी आम्हांला अन्न पाणी द्या. एका गृहस्थानें तें ऐकून त्यांला आपल्या घरीं नेऊन त्यांची चांगली बरदास्त केली.

त्या गृहस्थाच्या कुटुंबांतलीं माणसें फार चांगलीं होतीं, त्यांनीं त्याला वाटखर्ची दिली, व त्यांतीलच कोणी त्याजबरोबर कोर्दोवा शहरास जाऊन तेथें त्यांनीं कोलंबसास राणीला भेटविलें, आणि त्यास मदत करण्याविषयींचें तिचें वचन मिन्नतवारीनें घेतलें.

राणीनें वचन दिलें तरी पुष्कळ वर्षे तें काम तसेंच पडलें होतें. तिला वचन पुरविण्यास धैर्य येईना; व तिचे दरबारचे लोक अज्ञान होते, त्यांस कोलंबसाचें तें म्हणणें खरें वाटेना. कोलंबसाच्या गरिबीमुळें ते त्यास हंसत आणि वेडा म्हणत.

शेवटीं कोलंबसाला तीन गलबतें देऊन, त्याच्या खर्चाची तयारी करून द्यावी, असा राणीचा कारभाऱ्यास हुकूम झाला. त्याप्रमाणें सगळी तयारी झाली, पण नावाडी लोक जाण्यास पाय धरीनात. ते म्हणाले, आम्ही नाहीं असल्या कामांत पडावयाचे; आमचे जीव का वर आले आहेत? तें वर्तमान राणीच्या कानावर आलें, तेव्हां तिनें दुसरा हुकूम फरमाविल्यावरून १२० माणसें सक्तीनें कोलंबसास मिळालीं. नंतर ते सर्व लोक त्याचे बरोबर जावयास निघाले, तदिवशीं त्यांच्या इष्टमित्रांनीं अशा रीतीनें

त्यांस निरोप दिला. कीं जशी त्यांची भेट पुन्हा कधींच व्हावयाची नाहीं. कोलंबसानें आपणाबरोबर येणाऱ्या खलाशांची पुष्कळ खातरी केली, पण त्यांस उल्हास येईना. कोलंबसाच्या मित्रांपैकीं दोन त्याजबरोबर जावयास निघाले. त्यानें त्या दोघांस दोन गलबतांवर मुख्य नेमिलें.

---

## कोलंबसाची गोष्ट.

### भाग २.

एवढी जिवावरची सफर करण्याकरितां जीं गलबतें मिळालीं तीं चांगलीं, बळकट असावीं, पण तशीं नव्हतीं. त्यांतील दोन तर मचव्यांसारखीं होतीं म्हटलें तरी चालेल. इ०स० १४९२त आगस्त महिन्याच्या तिसऱ्या तारखेस कोलंबसानें गलबतें हाकारिलीं. प्रथम कानेरी बेटांस जाऊन तेथून नीट पश्चिमेकडे जावें, अशा बेतानें तीं गलबतें थेट कानेरी बेटांकडे चालविलीं.

कानेरी बेटांस जाऊन पोहोंचल्यावर गलबतांच्या डागडुजींत कोलंबसाचे कांहीं दिवस गेले. नंतर सप्तेंबर महिन्याच्या ६ व्या तारखेस तो तेथून निघाला; आणि त्या दिवसापासून म्हटलें तर त्याच्या संकटाला प्रारंभ झाला. त्याचें धैर्य कमी असतें तर तो त्या संकटाखालीं खचला असता. खलाशांच्या मनांत जाण्याचें नव्हतें, त्यामुळें पहिल्यापासून ते त्यास त्रास देतच होते. व पुढें कानेरी बेटांतील फेरो म्हणून जें पश्चिमेकडील शेवटचें बेट आहे तें मागें राहून दिसेनासें झालें, आणि चोहींकडे अफाट समुद्रच दिसूं लागला, तेव्हां ते लोक पोरांप्रमाणें रडूं लागले.

ते म्हणाले, आतां आमचीं बायकापोरें, घरेंदारें, सोयरे धायरे कांहीं पुन्हा दृष्टीस पडावयाचे नाहींत; आम्ही कोठें तरी समुद्रांत बुडून मरूं. कायहो आमचा हा वेडेपणा! असल्या ह्या वेडया पिराबरोबर आम्ही कशाला आलों?

कोलंबस म्हणाला, आजपर्यंत आपणांला वाटेंत कोठें तुफान किंवा दुसरें कांहीं संकट आलें नाहीं. मग उगीच कां पिरपिर करितां बरें? पण त्यांशीं असें बोलून उपयोग काय? त्यांचें जें चाललें होतें तें होतेंच.

कानेरी बेटांतून निघाल्यानंतर थोड्या दिवसांनीं चांगला वारा लागून गलबतें झपाट्यानें चाललीं, अशीं कीं त्या खलाशांस देखील कांहीं उमेद आली. थोडेसे पुढें गेले तों पश्चिमेकडून वाहत आलेलीं समुद्रांतील व जमिनीवरील कांहीं झाडें झुडपें दृष्टीस पडलीं. एका खलाशानें त्यांच्या एका खांदीवर बसलेला एक जिवंत खेंकडा पाहिला. खेंकडे हे पाण्यांत राहतात, तरी जवळ जमिनीचा आश्रय असल्याखेरीज राहत नाहींत. ह्यावरून जमीन कोठें तरी लगत असावी, असें होतें. ह्या सर्व लक्षणांवरून कोलंबसास वाटलें कीं, जमीन आतां लवकरच नजरेस पडेल.

ह्या लक्षणांवरून खलाशांसही मोठी हुशारी आली कीं, आतां आपण लवकरच जमिनीवर जाऊन पोहोंचूं. दूर एखादा ढग नजरेस पडला म्हणजे जमीनशी वाटून त्यांनीं जमीन! जमीन! असें मोठ्यानें म्हणावें. त्यांचा आनंदाचा शब्द ऐकून कोलंबसाला जरी संशय होता तरी *बुडीद टाकून ठाव पहाव-

*पाण्याचा ठाव पहावयासाठीं लांब दोरीला एक शिशाचा गोळा बांधिला असतो तें.

यास त्यानें सांगितलें. कारण कीं जमीन जवळ आली म्हणजे बहुतकरून समुद्राच्या पाण्याची खोली कमी होत जाते, असें आहे. कोलंबसाचा संशय खरा झाला. बुडीद टाकून ठाव कांहीं लागला नाहीं. मग ते खलाशी फिरून निराश होऊन पुन्हा त्रास देऊं लागले.

ह्या खलाशांस भय वाटत होतें तें कांहीं अंशीं खरेंच होतें. म्हणजे गलबतें होतीं तीं जुनीं, तुफान वगैरे झालें असतां लागलींच फुटून बुडून पार व्हावयाचीं. दुसरें असें होतें कीं कदाचित् जवळची बेगमी मध्येंच सरून जाऊन सर्वांस उपाशीं मरावयाची पाळी यावयाची होती.

अशा रीतीनें जातां जातां पश्चिमेच्या आंगानें चांगला वारा येऊं लागला. मग पुष्कळ लहान लहान पांखरें गलबतांच्या आजू बाजूस येऊं लागलीं. तीं नेमानें सकाळीं येत आणि संध्याकाळीं परत जात. तीं पाहून त्या खलाशांच्या डोळ्यांस मोठा आनंद झाला, आणि त्यांचे शब्द कानास फार गोड लागले. कारण, कानेरी बेटें सोडल्यापासून जमिनीवरचा शब्द त्यांच्या कानीं पडला असा हाच. कोलंबस म्हणाला, गड्यांनो, हीं पांखरें कशीं ताजे दमाचीं हुशार दिसत आहेत! कांहींच थकलेलीं दिसत नाहींत. ह्यावरून त्यांचीं घरटीं कोठेंतरी जवळच जमिनीवर असतील, आणि त्यावरून आपणांला जमीन लवकरच लागेलसें दिसतें, नाहीं बरें!

हा जो आनंद झाला तो फार वेळ टिकला नाहीं. वारा अगदीं पडला, आणि गलबतें खुंटल्यासारखीं झालीं. कारण कीं समुद्रांत नुसत्या पाण्यांत उगवणारीं कांहीं झाडें आहेत तीं

त्या ठिकाणीं मनस्वी उगवून त्यांच्या मोठमोठाल्या जाळ्या झाल्या होत्या, आणि त्या जाळ्यांमध्यें हीं गलबतें अडकलीं. पुष्कळ मेहनत करूनही गलबतें हालत नाहींत असें पाहून खलाशी अगदीं भिऊन गेले. ते ज्या समुद्रांत पूर्वी जात येत असत त्यांतही त्यांस असले प्रसंग गुदरून गेले, पण ह्या वेळेस त्यांची आठवण कांहींच राहिली नाहीं. आतां पुढें कांहीं समुद्र नाहीं, असें त्यांस वाटून त्यांनीं कोलंबसास दहशत घातली कीं, पुढें जाण्याचा इरादा सोडून देऊन स्पेन देशाकडे गलबतें फिरविलीं नाहींत, तर आम्ही तुम्हांस समुद्रांत ढकलून देऊं.

कोलंबस म्हणाला, वाहवा! इरादा सोडून देऊन, हें काय म्हणतां! आपण अगदीं जमिनीच्या जवळ येऊन पोहोंचलों आहों, आतां कां उगाच भित्र्यांसारखें करितां? आणखी दोन चार दिवस मजबरोबर चला, म्हणजे जमीन तुमच्या दृष्टीस पडेल. खलाशी लोकांचेंही कांहीं ऐकिलेंसें करावें म्हणून कोलंबसानें शुद्ध पश्चिम सोडून नैर्ऋत्य दिशेस, म्हणजे थोडीशीं डाव्या हातास, गलबतें चालविलीं.

त्यानंतर जमिनीचीं चिन्हें विशेष दृष्टीस पडूं लागलीं. दुरून वाहून आलेलीं झाडांचीं ताजीं पानें गलबताजवळून जातांना दृष्टीस पडलीं. फळांसुद्धां वाहत आलेली एक खांदी एका खलाशानें गलबतावर ओढून घेतली. तसें एका प्रकारचें कोरींव लांकूड वाहत जात होतें तेंही वर घेतलें.

जमीन खचीत जवळ आली आहे, असें ह्या सर्व चिन्हांवरून कोलंबसास वाटलें. मग गलबतें खूब जलदीनें चाललीं होतीं, व रात्रीची वेळ आणि गैरमाहितीची जागा आहे, असें पाहून नजाणा

खडकाचा वगैरे धक्का लागून एखादा घात होईल, ह्यासाठं आपण जागत बसावें, असा त्यानें निश्चय केला. गलबतांतील सव लोकांसही तशीच धास्ती पडली होती; कोणा एकास देखील चैन पडलें नाहीं; ज्याचें त्याचें लक्ष जमिनी कडे होतें. कोलंबस तशा अंधारांत गलबतावरून समोर न्याहाळून पाहत होता तों त्यास दूर दिवा दृष्टीस पडतोसें वाटलें. मग त्यानें एका खलाशास हाक मारून आणून, तुला कांहीं समोर दिसतें? असें त्याला विचारिलें. तो म्हणाला, हो, मला एक दिवा दिसतो. नंतर कोलंबस गळा दाटून येऊन आवेशानें म्हणाला, आहे आहे, दिवाच आहे!

मग कोलंबसाची पक्की खात्री झाली कीं आपणाला जमीन सांपडली, आणि दिवा आहे त्यावरून ती वस्तीची आहे, हेंहीं सिद्ध झालें. मग पुढें गलबतें तशींच चाललीं. एक गलबत अमळसें अघाडीस गेलें होतें त्याजवरच्या लोकांनीं रात्रीचे दोन तास वाजतां जमीन दृष्टीस पडली अशी सूचना देण्यासाठीं तोफ सोडिली. तो आवाज कानीं पडतांच मागील दोन गलबतां-तल्या सर्व लोकांस मोठा आनंद होऊन जिकडे तिकडे जमीन! जमीन! असा एकच गजर होऊन गेला. मग राहिलेली रात्र, उजाडल्यावर आपणांस कायकाय दृष्टीस पडेल त्याची कल्पना करण्यांत खलाशांनीं घालविली. कोणी म्हणतो, ह्या नवीन देशांत आपल्या नजरेस लोक पडतील काय? कोणी म्हणतो, स्पेन देशां-तल्या प्रमाणें येथें शहरें, घरें, दारें असतील काय? कोणी पुसतो, आपणांप्रमाणें आपणांला लोक येथें आढळतील, कीं राक्षसांसारखे भयंकर, क्रूर असतील बरें!

असें बोलतां चालतां रात्र तेव्हांच निघून जाऊन पहांट झाली, तेव्हां त्यांच्या दृष्टीस एक बेट पडलें. कानेरी बेटें सोडि-त्यापासून जमीन कशी ती त्यांच्या नजरेस पडली नव्हती. वरतीं आकाश, आणि खालीं पाणी, हेंच काय तें त्यांच्या दृष्टीपुढें होतें. त्यामुळें त्यांस असें वाटलें कीं, असें सुंदर बेट आमच्या पाह-ण्यांत कधींच आलें नाहीं. झाडी तर एकसारखी अशी दाट लागून लांबवर गेली होती कीं पलीकडे झाडांशिवाय दुसरें कांहीं दिसतच नव्हतें. किनाऱ्याजवळ समुद्राचें पाणी अगदीं निवळ-शंख होतें. दिवस वर आला तसे बेटांतले लोक झाडींतून समुद्रकिनाऱ्यास येऊं लागले; पण गलबतें पाहून चकित होऊन ते फिरून झाडींत शिरूं लागले.

नंतर होड्या तयार करवून कोलंबस पांच चार असामी बरोबर घेऊन एकींत जाऊन बसला. हें बेट इतक्या प्रयासानें शोधून काढिलें आहे, तेव्हां ह्यावर मी पाय केव्हां ठेवीन, अशी त्यास मोठी उतावळी झाली होती. होडी कांठाशीं जातांच प्रथम तोच उडी मारून जमिनीवर उतरला. बाकीचे लोक उतरल्या-वर कोलंबसानें स्पेन देशाच्या राजाच्या नांवानें तेथें बावटा रोंविला; म्हणजे हा देश आजपासून त्या राज्याच्या ताब्यांतला असें समजावें. ही गोष्ट त्यानें राजाचे हुकुमाप्रमाणें केली खरी, तरी हा हुकूम रास्त नव्हे, कां तर तेथें मुळींच दुसरे लोक राहत होते. तेव्हां तेथें अमल करण्याला त्याला काय मुखत्यारी होती!

# कोलंबसाची गोष्ट.

## भाग ३.

कोलंबसानें ह्या बेटाला सानसाल्वादोर असें नांव दिलें. अझून त्या बेटाला हेंच नांव चालत आहे. नकाशांत पाहिलें असतां बाहामा नांवाचीं बेटें आहेत त्यांत हें सांपडेल. त्या बेटांतले लोक अगदीं साळ भोळे, अज्ञान, असे होते. कोलंबस व त्याचे लोक जेव्हां किनाऱ्याकडे येऊं लागले तेव्हां बेटावरील लोक भ्याले, आणि दाट झाडींत जाऊन लपून राहिले. कांहीं वेळ गेल्यानंतर मग त्यांची भीति कमी होऊन, हा काय चमत्कार आहे तो पहावा म्हणून, ते हळूच झाडींतून पुढें येऊं लागले.

त्यांस असें वाटलें कीं, हीं गलबतें आणि मनुष्यें रात्रीच्या रात्रीस पाण्यांतूनच वर आलीं असावीं; किंवा ढगांतून तरी खालीं उतरलीं असावीं. गलबतांचीं अवजारें होतीं तीं त्या लोकांस गलबतांचे पंख आहेत असें वाटलें. तोफेला बत्ती दिल्यावर जी चमक उडाली व आवाज झाला त्यांविषयीं त्यांस असें वाटलें कीं वीज चमकून हा मेघांचा गडगडाट झाला. खलाशांच्या आंगावर चिरगुटें पांघुरणें होतीं, कोणांच्या आंगावर तर चिलखतेंही होतीं, त्यामुळें बेटांतल्या लोकांस वाटलें कीं, हीं माणसें कांहीं आपणांप्रमाणें नाहींत. सारांश, त्या लोकांस गलबतें नवीं, तोफा नव्या, पोशाख नवे, सगळेंच नवें, त्यापक्षीं त्यांस आश्चर्य वाटावेंच; वाटलें ह्यांत विशेष काय? त्यांस स्वतः म्हटलें म्हणजे वस्त्रें नव्हतीं. ते नानाप्रकारच्या रंगांनीं आपलीं आंगें चित्रविचित्र करीत. त्यांच्या शरीरांचा स्वभाविक रंग म्हटला

म्हणजे तांबूस होता; केश काळे असून सडक होते; आलेल्या नव्या लोकांप्रमाणें त्यांस दाढ्या लांब नव्हत्या. त्यांजपाशीं हत्यारें म्हटलीं म्हणजे हातांत भाल्या सारख्या काठ्या होत्या, आणि त्यांच्या शेवटांस माशांचीं हाडें बसविलीं होतीं; दुसरें कांहीं नव्हतें.

कोलंबस त्या लोकांस कांहीं कांचेचे रंगीत मणी, कांहीं पितळेच्या घांटा, वगैरे देऊं लागला तेव्हां ते पोटांतली धास्ती सोडून त्याच्या जवळ आले. संध्याकाळ झाली तसा कोलंबस आपल्या लोकांसहवर्तमान तेथून गलबतांवर निघून गेला.

नवीन बेट सांपडल्याचा कोलंबसाला मोठा आनंद झाला म्हणून कांहीं दिवस तेथेंच त्यानें मुक्काम केला. त्याच्या मनांत बेटांतल्या लोकांशीं मैत्री करावयाची होती. ते लोक स्वभावानें गरीब होते, त्यामुळें स्नेह होण्याला कांहीं अडचण नव्हती. त्यांनीं कोलंबसाला कांहीं कंदमुळें, फळें, कापूस, वगैरे पुष्कळ जिनसा आणून दिल्या. आणि कानेरी बेटांपासून ह्या बेटापर्यंत टप्पा फारच लांब पडल्यामुळें गलबतांतलें गोडें पाणी अगदीं सरत आलें होतें; तर ह्या लोकांनीं गोड्या पाण्याचे उत्तम झरे कोलंबसाच्या लोकांस दाखविले; आपणही त्यांचीं भांडीं भरावयास व गलबतांवर चढवावयास लागले. अशा रीतीनें ते फार कोलंबसाच्या उपयोगीं पडले.

कांहीं दिवस तेथें राहिल्यानंतर कोलंबसाचे लोक हुशार झाले, व गलबतांतही पाण्याची बेगमी चांगली झाली होती, सबब कोलंबस तेथून पुढें जाण्यास निघाला. नंतर त्यानें दक्षिणेकडे गलबतें चालविलीं, कारण कीं, त्या बेटांतल्या लोकांच्या

खुणांवरून असें वाटलें कीं त्या दिशेस एक मोठें बेट लागेल. त्या प्रमाणें अक्तोबर महिन्याच्या अठ्ठाविसावे तारखेस त्या दिशेस क्यूबा नांवाचें एक बेट लागलें. हें बेट मोठें विस्तीर्ण आहे. कोलंबसाला ह्या खेपेस अमेरिकाखंड लागलें नाहीं. त्याला जीं बेटें लागलीं तीं हिंदुस्थानाजवळचीं आहेत अशी भ्रांति त्यास होऊन त्या बेटांस तो वेस्त इंदीज, म्हणजे हिंदुस्थानचीं पश्चिमे कडील बेटें, असें म्हणूं लागला. पण वास्तविक पाहतां हिंदुस्थानाला आणि त्या बेटांला हजारों कोसांचें अंतर आहे. तथापि कोलंबसानें हिंदुस्थानचीं बेटें म्हणून जें नांव एकदां दिलें तेंच अझूनही त्यांस चालू आहे.

वर सांगितल्याप्रमाणें सान्साल्वादोर आणि क्यूबा हीं दोन बेटें पाहिल्यानंतर कोलंबसानें बेत केला कीं, स्पेन देशास परत जाऊन हीं बेटें लागलीं हा मजकूर राणी साहेबांस विदित करावा. स्पेन देश सोडल्यापासून कोलंबसास वाटेंत तुफान अगदीं झालें नव्हतें, गलबतें सुरळीत चाललीं होतीं; पण परत येते वेळेस तसें झालें नाहीं. तो अझोर बेटांजवळ येऊन पोहोंचला तेव्हां तेथें मोठें भयंकर तुफान झालें, असें कीं प्रतिक्षणीं त्याला वाटे कीं, हीं आपलीं गलबतें अगदीं जुनीं होऊन मोडकळीस आलीं आहेत, त्यापक्षीं वाऱ्याच्या सपाट्यानें, किंवा लाटांच्या धक्यानें, तीं फुटून त्यांचे तुकडे तुकडे होतील कीं काय कोण जाणे.

परंतु तीं गलबतें दैवयोगानें त्या तुफानांतून पार पडून स्पेन देशास सुरक्षितपणें येऊन पोहोंचलीं. कोलंबस कांहीं नवीन बेटें पाहून आला, ही वातमी लोकांस समजतांच जिकडे तिकडे आनंद लोटला. त्याला परत येण्यास बहुत दिवस लागल्या-

मुळें स्पेन देशचे लोक मनांत असें समजत असत कीं, तो व त्याजबरोबर गेलेले लोक आतां परत कसचे येतात? ते नष्ट झाले असतील. अशा रीतीनें लोक अगदीं निराश होऊन राहिले होते तों, कोलंबस बरोबरच्या मंडळीसुद्धां खुशाल परत आला, हें पाहून लोकांस विशेष आनंद झाला. कोलंबस बंदरावर उतरणार ते दिवशीं सर्व सरकारी नौकर लोकांस सुटी मिळाली. व्यापाऱ्यांनीं आपआपलीं दुकानें बंद केलीं, आणि सर्व लोक मोठ्या समारंभानें कोलंबसाला सामोरे गेले. मग त्यावेळेस तेथें
२ जी मौज झाली ती सांगतां येत नाहीं. सर्व लोक उतरल्यावर कोलंबस पुढें चालला, त्याच्या मागून त्याजबरोबरची कांहीं मंडळी चालली, त्यांतून कोणाच्या हातांत नव्या बेटांतून आणिलेले शानदार राघू होते, कोणाच्या हातीं कांहीं जनावरें होतीं, आणि कोणाच्या हातीं कापूस, कोणाच्या हातीं झाडांचे रोपटें, असे तिकडचे कांहीं कांहीं जिन्नस होते. क्यूबा बेटांतून सहा माणसें आणिलीं होतीं तीं सर्वांच्या मागून आलीं. त्यांनीं आपल्या देशाच्या चालीप्रमाणें आपलीं आंगें रंगविलीं होतीं. रस्त्यांत गर्दी इतकी झाली होती कीं कोलंबसाच्या नावाड्यांस चालण्याची मोठी पंचाईत पडली. जयघोष असा चालला होता कीं कोणाचा शब्द कोणाच्या कानीं पडेना. कोलंबसाचें ध्यान पूर्वीच्या गोष्टीकडे गेल्यामुळें तो कोणाशीं कांहीं न बोलतां उगीच पुढें चालला होता. त्याला आठवण झाली कीं, ह्याच शहरांत पूर्वीं मी पाठीवर मूल बांधून आलों होतों, आणि मला येथें भिक मागून भाकर मिळविण्याचा प्रसंग पडला होता.

राजा व राणी ह्या उभयतांनीं कोलंबसाचा मोठा आदर

सत्कार केला. त्याला पुष्कळ बक्षीस दिलें, आणि कांहीं दिवसांनीं त्यालाच आणखी गलबतें देऊन दुसऱ्यानें बेटें वगैरे पाहण्यास पाठविलें. ह्यानंतर पुष्कळ दिवसपर्यंत स्पेन देशांत कोलंबस आणि नवीं बेटें ह्यांवांचून दुसरी गोष्टच लोकांच्या बोलण्यांत येईनाशी झाली. ह्या दुसऱ्या खेपेसही कोलंबसास कांहीं नवीं बेटें लागलीं; तरी तिसरी खेप करी पर्यंत अमेरिका खंड हें त्यास सांपडलें नाहीं.

---

## गडबड्या स्वभाव आणि शांत स्वभाव.

कांहीं मुलांचा स्वभाव मोठा गडबड्या असतो, म्हणजे तीं कोणतेंही काम करूं लागलीं असतां मोठी गडबड करितात, त्यामुळें, आपण दुसऱ्याला थोडेंसें काम करूं लागून त्याची मेहनत वांचवावी, असें जरी त्यांच्या मनांत आलें तरी त्यांच्या हातून तें होत नाहीं.

धारवाडांत गोविंद शास्त्री म्हणून एक गृहस्थ होता, त्याला एक मुलगा आणि एक मुलगी अशीं दोन मुलें होतीं. मुलाचें नांव हरी, आणि मुलीचें नांव मनी. हरीचा स्वभाव गडबड्या होता. तो बापाचा फार लाडका होता, तरी सर्वदां बापाच्या अर्ध्या वचनांत असे. तो कांहीं एवढेंसें काम करूं लागला म्हणजे त्यानें भारी गडबड करावी, आणि तेणेंकरून जवळ जो कोणी मनुष्य बसला असेल त्याला कंटाळा आणावा. हरीला जो कोणी काम सांगे त्याला मागून असें वाटावें कीं, दहा वेळ स्वतः काम करण्याचें पुरवेल, पण हा हरी काम करीत असेल तेथें उगीच बसणें देखील नको.

आश्विनाच्या महिन्यांत एके दिवशीं गोविंदशास्त्री पुस्तक

पाहत बसला होता, तो, बाबा बाबा, म्हणून हरीनें त्यास हाक मारिली. गोविंदशास्त्री वर मान करून पाहणार तों हरीनें दहा-पांच हाका मारिल्या. गोविंदशास्त्री पुस्तक पाहण्यांत गुंतला होता, सबब हरीनें त्यास इतका त्रास द्यावयाचा नव्हता. तसें एखादें मोठेंच काम जर असतें तर चिंता नव्हती; पण तसें कांहीं काम नव्हतें.

**हरी**— बाबा, माजघरांतली सगळी अडगळ मोडून लक्क करूं?

**गोविंद**— जा, कर जा. ( असें म्हणून पुस्तक पाहूं लागतो )

**हरी**— बरें बाबा.

**गोविंद**— आतां काय म्हणतोस, हरी!

**हरी**— फळ्यां वरच्या सगळ्या पोथ्या खालीं काढून पुन्हा वर नीट लावून ठेवूं? मला पोथ्या वर ठेवितां येतील. बाबा, ठेवूं जाऊं?

**गोविंद**— जा, ठेव जा; पण पुन्हा मला कटकट करायाला येऊं नको; मी पोथी पाहण्यांत गुंतलों आहें.

नंतर हरी गेला, आणि त्या पोथ्या खालीं काढण्याचा आणि वर ठेवण्याचा कारखाना त्यानें सुरू केला. आतां सोईनें पाहिलें असतां एका फळीवरच्या पोथ्या काढून तेवढीच फळी झाडून तिजवरच्या पोथ्या अगोदर ठेवाव्या, आणि मग दुसरे फळीवरच्या काढाव्या, अशा रीतीनें सर्व फळ्यांवरच्या पोथ्या काढून वर ठेवावयाच्या होत्या, पण हरीनें तसें केलें नाहीं. त्यानें सगळ्या पोथ्या अगोदर एकदम खालीं काढून टाकिल्या, आणि फळ्या झाडून पोथ्या वर ठेवावयाच्या वेळेस भुईवरची एक पोथी घ्यावी, घडवंचीवर चढावें, पोथी फळीवर ठेवावी, आणि पुन्हा

दुसरी पोथी घेण्यासाठीं घडवंची वरून खालीं उडी मारावी, असें दर एक पोथीच्या वेळेस त्यानें करावें. असें सतत चाललें होतें, तितक्यांत किती एक पोथ्या फळ्यांवर नीट न ठेविल्यामुळें वरून धडाधड खालीं पडल्या. तें ऐकून गोविंदशास्त्री म्हणाला, हरी, पोथ्या जपून फळीवर ठेव, आणि धडाधड खालीं पडतात तशा पडूं देऊं नको, आंतल्या फळ्या फुटतील. तूं काय गोंधळ मांडिला आहे हा?

परंतु हरीला कोणतेंही काम म्हटलें म्हणजे मोठी गडबड केल्याशिवाय, किंवा जवळ कोणी असेल त्यास त्रास दिल्याशिवाय, येतच नव्हतें. एक फळी पोथ्यांनीं भरली म्हणजे हरीनें बापाकडे जावें, आणि म्हणावें, बाबा, हिकडे येऊन पहा बरें, आतां कसें शानदार दिसत आहे तें! असें दरवेळेस चाललें होतें. बाप जर तितक्यांत लागलाच गेला नाहीं तर त्यानें, बाबा, बाबा, म्हणून एकसारख्या हाका मारीत रहावें. शेवटीं पोथी पाहणें सोडून वारंवार उठण्याचा गोविंदशास्त्र्यास कंटाळा येऊन तो म्हणाला, हरी, जा तूं येथून आतां, आणि आपले श्लोक पाठ करीत बैस. त्या पोथ्या तूं ठेवूं नको, आणि मला कटकटही करूं नको. हें अमळसें रागाचें भाषण ऐकतांच हरीचा अगदीं पाणउतारा होऊन त्याचें मन फार खटू झालें. आणि तोंड वाईट करून बापाच्या सांगण्याप्रमाणें जावयास निघाला, पण त्याचें रडें त्याला आटोपेनासें झालें. मुलाचें तोंड असें रडवें पाहतांच हातचें पत्र ठेवून गोविंदशास्त्री म्हणाला, हरी, तोंड वाईट करण्यास काय झालें बाबा? बापानें असें विचारतांच हरीचे डोळे पाण्यानें भरून आले. मग तो म्हणाला, मी पोथ्या

चांगल्या व्यवस्थेनें फळ्यांवर लावून ठेवीत होतों, आणि इतक्यांत तुम्ही मला रागें भरून बोललां, म्हणून मी आपले श्लोक पाठ करावयाला जातों.

**गोविंद**—बरें, पोथ्या नीट ठेविल्या ही चांगली गोष्ट झाली: आणि तेवढें काम त्वां संपविलें असतें तर बरेंच झालें असतें; पण त्याविषयीं मोठा गोंधळ करून त्वां मला अगदीं त्रासवून सोडिलें, त्यामुळें मला वाचावयाचें देखील सुचेनासें झालें. तूं कोणतेंही काम करूं लागलास म्हणजे गोंधळ करितोस. ही तुला मोठी वाईट खोड लागली आहे, आणि तिजविषयींच म्हणून आजपर्यंत मी तुला कधीं बोललों नव्हतों: आतांच बोललों. तुला हेंही सांगतों कीं तुझ्या मनांत ही खोड सोडून द्यावी असें एकदां आलें मात्र पाहिजे, म्हणजे ती तूं तेव्हांच सोडून देशील. तूं चांगला शहाणा मुलगा आहेस, आणि कांहीं तरी उद्योग करावा असा तुझा देहस्वभावच आहे, हें फार चांगलें आहे. जर तुला कांहीं समजतेंना, आणि जर तूं आळशी असतास, तर मला फार दुःख वाटतें. पण तुला आतां सांगून ठेवितों कीं, आजपासून तूं कोणतेंही काम करूं लागलास म्हणजे उगीच मोठी गडबड करितोस तशी करीत जाऊं नको. कोणतेंही काम हळूच कोणीकडे केलें आणि कोणीकडे न केलें हें दुसऱ्याच्या कानास कळूं देखील देऊं नये. मोठी गडबड करून काम करण्याचा प्रकार, आणि संतपणानें काम करण्याचा प्रकार हे कसे आहेत तें मी तुला आतां दाखवितों. हिकडे पहा, आतां हीं पेटीवरचीं अंथरुणें खालीं काढून टाकून कोणीं पेटी उघ-

डून टाकिली आहे. तिजविषयीं व्यवस्था करणें आहे, तर असें करावें. हलकेंच जाऊन पेटीचें झांकण लावावें, नंतर एकेक वळकटी उचलून हलकीच पेटीवर ठेवावी, म्हणजे झालें, कोठें गडबड नाहीं, कांहीं नाहीं. हा संतपणानें काम करण्याचा प्रकार होय. आतां दुसरा प्रकार पहा. असें म्हणून पाय आपटीत आपटीत गोविंदशास्त्री पेटीपाशीं गेला, पेटीजवळ वळकट्या पडल्या होत्या त्या आधीं दूर फेंकून दिल्या; त्यानंतर सुपें, टोपलीं, वगैरे कांहीं पेटीजवळ होतीं तीं काढून एकदां आपटलीं; मग धाडकण पेटीचें झांकण लाविलें. तें धाडकण आपटल्यामुळें थोडेंसें खिळखिळें झालें. मग एक चिरगूट हिकडे फेंकावें, एक तिकडे फेंकावें, असें करितां करितां शेवटीं सगळ्या वळकट्या एकदां पेटीवर उचलून ठेविल्या. मग म्हणाला, गडबड करून काम करण्याचा प्रकार तो हा बरें. आतां दुसरें माणूस कामांत गुंतलें असतां वारंवार हाका मारून त्यास त्रास देण्याचा प्रकार कसा तो मी तुला दाखवितों. पहा, तुझा चाकू सांडल्यास चार दिवस झाले, तो आतां मी शोधितों; असें म्हणून गोविंदशास्त्री उठला, आणि चाकू शोधण्याची बतावणी करूं लागला. पहिल्यानें हरीचा रुमाल सोडून आंतल्या जिनसा अस्ताव्यस्त करून टाकिल्या, म्हणजे कित्ता व खरडे एकीकडे टाकिले, नळकांड्यांतल्या लेखण्या काढून एकीकडे टाकिल्या, आणि लिखितें एकीकडे फेंकून दिलीं. इतक्या गोष्टी हातानें करितां करितां हरीला हाका मारून चारपांचदां विचारिलें, हरी तूं चाकू टाकिला तरी कोठें? तुला कांहीं आठवण आहे काय?

मनीनें आटी झाली तेव्हां तिनें उचलून कोठें तरी भलतेंच ठिकाणीं ठेविला असेल! मनी मोठी गेंदी पोर आहे. काय करावें, उपाय नाहीं. हरी, माजघरांत टाकिला आहे काय! आतां तेथें तरी पाहतों. मग माजघरांत जाऊन तेथली बैठक काढून तिजखालीं चाकू पाहिला. तोंडानें हरीला हाका मारण्याचा सपाटा चाललाच होता. हरी तूं चाकू माडीवर टाकिलासें वाटतें. टाकिला खरें काय? कां, बोलेनास कां काय तें? माडीवर नाहीं काय टाकिला? वर जाऊन पाहूं कां नको? सांग काय तें.

हरी हें सर्व कृत्य पाहत स्वस्थ उभा राहिला होता, आणि मध्यें मध्यें हंसत होता.

मग गोविंदशास्त्री म्हणाला, मी एवढा मोठा असून असा गोंधळ करीत आहें म्हणून तुला मोठें आश्चर्य वाटतें. पण वास्तविक पाहतां तुझ्या एवढ्या मुलाला देखील अशा प्रकारचा गोंधळ करणें म्हणजे फार वाईटच आहे. मीं तुला पहिल्यानें जो संतपणानें काम करण्याचा प्रकार दाखविला तो ध्यानांत ठेवून त्याप्रमाणें, कोणतेंही काम करणें झालें म्हणजे, करीत जा. असें केल्यानें माझ्या कामाला खरोखर तूं हात लाविलासें होईल. मी तुला खरेंच सांगतों, हल्लीं किती एक कामें तुझ्या हातून होण्यासारखीं असतां मी तीं तुला करूं देत नाहीं, कारण तुला काम सांगितलें म्हणजे तेंच काम स्वतः करण्यापासून जितकी मेहनत होणार तिजपेक्षां दसपट मेहनत मला होणार. तूं एक एवढेंसें काम करूं लागलास म्हणजे पंचवीस वेळां हाका मारितोस. असो, तूं आजपासून कोणतीही गोष्ट करावयाची ती संतपणानें

करीत जा, म्हणजे माझी मेहनत खरोखर त्वां वांचविलीशी होईल.

त्याच दिवशीं हरीला पुष्कळ कामें करण्याचा प्रसंग आला; त्यावेळेस बापाच्या सांगण्याप्रमाणें त्यानें सर्व कामें संतपणें केलीं. तें पाहून गोविंदशास्त्र्यास फार समाधान वाटलें, आणि हरीवर त्याची मर्जी प्रसन्न झाली. बापाची मर्जी प्रसन्न झालेली पाहून हरीलाही मोठा आनंद झाला. आणि त्या दिवसापासून त्यानें नियम केला कीं, इतःपर कोणतेंही काम करणें तें संतपणानें करावयाचें.

---

## एका चित्रशाळेंतील निवे मुलगे.

ह्या जगांत आपणांस मोठें म्हणविणारे असे लोक पुष्कळ आहेत. थोडीशी संपत्ति किंवा थोडासा अधिकार मिळाला म्हणजे लागलेच आपणांस मोठें म्हणवूं लागतात. पण मोठी संपत्ति किंवा मोठा अधिकार कोणा मनुष्यास असला म्हणजे तो मोठा होतो, असें नाहीं. ज्याचें मन मोठें असेल तोच मोठा. परंतु सर्वच मोठ्या मनाचे कोठें असतात? कितीएकांचें मन हलकें असतें, आणि कितीएकांचें मोठें असतें. हे पुरुष ओळखण्याला उशीर लागत नाहीं. त्यांचे चालीवरून ते तेव्हांच ओळखितां येतात.

ज्यांचीं मनें हलकीं असतात ते दुसऱ्याचे क्षुल्लक देखील दोष बाहेर काढितात. ह्यांचें बरें करितांना दुसऱ्याचे हातून जर कदाचित् ह्यांचें थोडेंसें वाईट झालें, तरीदेखील जितकें ह्यांचें वाईट झालें असेल त्यापेक्षां त्याचें अधिक वाईट करितात. आणि स्वतां तर कोणाला कांहीं देत नाहींत, पण उलटा दुसरा देत असला तर मोडा घालितात.

ज्यांचीं मनें मोठीं आहेत त्यांची चाल अशी नसते. ते दुसऱ्याचे मोठे दोष असले तरी ते कधीं बाहेर काढीत नाहींत. जर कदाचित् दुसऱ्याचे हातून नकळत त्यांचें वाईट झालें, तर त्याला वाईट झालें असें देखील म्हणत नाहींत. आणि सामर्थ्य असेल तर जें देण्यासारिखें असेल तें दुसऱ्यांस दिल्याशिवाय कधीं राहत नाहींत.

ह्याप्रमाणें ह्या दोहों प्रकारच्या मनुष्यांची चाल अगदीं निरनिराळी असते. मनाचा मोठेपणा हा गुण साधारण लोकांत फार विरळ आहे. हा गुण असा आहे कीं तो दृष्टीस पडल्यावर आपणास आनंद आणि आश्चर्य हीं झाल्याशिवाय राहत नाहींत. मनाच्या मोठेपणाची परीक्षा अल्पवयांतही होते.

पूर्वीं एका शहरांत मुलांस चित्रें काढावयास शिकविण्याची एक शाळा होती. तींत कृष्णा म्हणून एक मुलगा होता. त्याचें वय फार झालें तर १३ किंवा १४ वर्षांचें असेल, पण तितक्य वयांत त्यानें एक चित्र काढून, तें रंगवून असें तयार केलें क चित्रविद्येंतले जे मार्मिक होते त्यांनीं तें पाहून त्याची वाहवाच केली; आणि ते म्हणाले कीं, जर ह्यानें असाच अभ्यास पुढे चालविला, तर ह्या विद्येंत ह्याचा हात कोणाच्यानें धरवणार नाहीं, असा हा तयार होईल. ह्याप्रमाणें कृष्णाची प्रतिष्ठा झाली. हें पाहून त्याचे बरोबरीचेच त्याचे दोन सोबती होते त्यांतून एकाला फार वाईट वाटलें आणि एकाला फार आनंद झाला. गोविंदा म्हणून जो त्याचा सोबती होता त्याची चित्रविद्येंत थोडीशी प्रतिष्ठा पूर्वीं झालीच होती, म्हणून त्याला अगदीं मरणप्राय दुःख झालें. आणि कृष्णाची जितकी प्रतिष्ठा अधिक

होईल तितकी आपली कमी होईल, असें समजून त्यानें त्याशीं मनांत द्वेष धरिला; आणि कधीं एकदां त्याची अप्रतिष्ठा होईल, असें त्यास झालें. जें चित्र कृष्णानें काढिलें होतें तें सुद्धां त्याचे मनांत वाईट म्हणावयाचें होतें, परंतु तें मोठमोठ्यांनीं पसंत केलें होतें, ह्यामुळें तें त्याला उघडपणें वाईट म्हणतां येईना, म्हणून तें कोणातरी एखाद्या मोठ्याचे साहाय्यानें काढिलें आहे, त्याला असें कधीं काढितां येणार नाहीं, असें तो आपले बोलण्यांत लोकांस दर्शवूं लागला.

पण रामा म्हणून जो कृष्णाचा दुसरा सोबती होता त्याला त्याची प्रतिष्ठा झाली ह्याविषयीं कांहीं एक वाईट वाटलें नाहीं. तो उलटा लोकांपाशीं त्याची स्तुति करी, आणि तीही मनापासून करी. लोक कृष्णाची स्तुति करूं लागले म्हणजे ह्याला मोठा हर्ष होई, आणि आपणही असेंच एखादे दिवशीं चित्र काढून अशीच कीर्त्ति मिळवूं, असें मनांत म्हणे. कृष्णापेक्षां चांगलें तर चित्र आपणास काढितां येणार नाहीं, पण त्याचे सारिखें तरी काढितां यावें म्हणून कृष्णानें काढिलेलें चित्र कित्त्याप्रमाणें आपले पुढें ठेवून, तें पाहून तो चित्र काढी. आणि गोविंदा त्याची निंदा करी ती ऐकत देखील नसे. घरीं इतर मुलें जो वेळ खेळण्यांत घालवीत तो वेळ हा चित्र काढण्यांत घालवी. असें करून त्यानें पुष्कळ चित्रें तयार केलीं. पण कृष्णाचे चित्रापेक्षां आपल्या चित्रांत पुष्कळ उणेपणा आहे, असें त्यास वाटून त्यांतलें एकही त्याचे पसंतीस येईना. पुढें पुष्कळ दिवसांनीं त्याचीं चित्रें अंमळ बरीं निघूं लागलीं, तेव्हां त्याला कांहींसें बरें वाटलें. मग लोकांत त्याचीही बरीच प्रशंसा झाली. तेव्हां मींही दुसरा

कृष्णा कां होऊं नये, असें तो आपले मनांत म्हणूं लागला.

कृष्णा तर उत्तरोत्तर फारच चांगलीं चित्रें काढूं लागला. तेव्हां गोविंदा त्याची बरोबरी करण्यास पुष्कळ झटला, पण बरोबरी झाली नाहीं. तेव्हांपासून त्यानें तो नाद अगदीं सोडून देऊन कृष्णाची निंदा मात्र पूर्ववत् चालविली. पण रामानें आपला अभ्यास सोडिला नाहीं. त्यानें पूर्ववत् आपला अभ्यास पुढें चालविला, आणि ज्या दिवशीं कृष्णाचें चित्र लोकांचे दृष्टीस पडेल त्या दिवशीं आपलेंही चित्र लोकांचे दृष्टीस पाडावें, अशी इच्छा मनांत धरिली.

ह्या शाळेंत प्रतिवर्षीं, नेमलेल्या दिवशीं, विद्यार्थ्यांनीं आपापलीं चांगलीं काढलेलीं चित्रें एका प्रसिद्ध ठिकाणीं नेऊन ठेवावी अशी चाल होती. आणि तीं पाहण्याकरितां पंच नेमिले होते, ते येऊन तीं पाहून त्यांत सर्वांहून चांगलें कोणतें ह्याचा निवाड करीत; मग तें चित्र काढणाऱ्यास बक्षीस मिळे. ह्यावर्षीं कृष्णानें सर्वोत्कृष्ट असें एक चित्र परीक्षेचे वेळीं दाखविण्याकरितां तयार केलें होतें. जिल्हई देऊन रंग मात्र खुलवावयाचा राहिला होता. मग उद्यां परीक्षा होणार तर आज रंग खुलवून त्यानें तें चित्र नेमलेल्या ठिकाणीं नेऊन टांगून ठेविलें. पण तें गोविंदास न सोसतां त्यानें हळूच तेथें जाऊन त्या चित्रावर शाई फेंकून दिली. त्यामुळें तें धड दिसेनासें होऊन त्याची सर्व शोभा गेली.

रामानेंही त्या दिवशीं दाखविण्या करितां पुष्कळ दिवस श्रम करून एक चित्र तयार केलें होतें. हें कृष्णाचे चित्राच्या बरोबरीचें नसलें तरी अगदींच वाईट नसेल, असें त्यास वाटल्यावरून त्यानें तें त्या प्रसिद्ध ठिकाणीं नेऊन ठेविलें.

मग नेमलेल्या दिवशीं तेथें पंच येऊन कृष्णाचें चित्र पाहण्यासाठीं मोठ्या उत्कंठेनें पडदा वरती करून पाहतात, तों त्या चित्रावर शाई सांडलेली आहे. तेव्हां ते विस्मयाचा उद्गार करून म्हणाले कीं, हें कृष्णाचें काम नव्हे. इतक्यांत तो बिचाराही तेथें येऊन म्हणाला कीं, कोणींतरी दुष्टानें आज माझा घात केला, ह्यांत संशय नाहीं. असें म्हणून तो मोठ्यानें रडूं लागला. तें पाहून गोविंदा तेथें कोंपऱ्यांत होताच त्याला मनांत मोठा संतोष वाटला. परंतु रामाला आपलें चित्र नासल्याप्रमाणें दुःख झालें. आणि तो म्हणूं लागला कीं, हें काम कृष्णाचें नव्हे, हें तर मला पक्कें ठाऊक आहे. कारण, ह्याचें अर्धें चित्र तयार झालें होतें तेव्हां तें मीं स्वतः पाहिलें होतें. तें तर फारच चांगलें होतें. आतां जो त्याचा कांहीं भाग दृष्टीस पडत आहे त्यावरूनच मी बोलतों हें खरें किंवा खोटें ह्याविषयीं सर्वांची खातरी होईल. कृष्णाला बुडवावें ह्या हेतूनें कोणींतरी पाजी मनुष्यानें हें कृत्य केलें आहे, ह्यांत संशय नाहीं.

ह्याप्रमाणें कृष्णाची हीरमोड झाली, हें पाहून पंचांसही फार वाईट वाटलें, पण जसें चित्र पाहिलें तसें धरून, हें सर्वांहून चांगलें, असें त्यांच्यानें म्हणवेना, म्हणून दुसरीं आणखी पुष्कळ चित्रें ठेविलीं होतीं तीं त्यांनीं पाहिलीं. त्यांत रामाचें चित्र सर्वांचे मतें उत्कृष्ट असें ठरल्यावरून त्यास बक्षीस देण्याचें ठरविलें. तें बक्षीस त्याला मिळाल्यावर तें घेऊन तो कृष्णाकडे जाऊन म्हणाला कीं, जर तुझ्या दुष्टानें तुझें चित्र नासिलें नसतें, तर हें बक्षीस तुला खचीत मिळालें असतें, तर हें तूंच आतां घे. तुझ्या खालचे प्रतीचा असा मी ठरलों, इतकेंच मला पुरे,

मला तुझी बरोबरी करणें झालें तर अभ्यास करून मी करीन, अशी लबाडी करून करणार नाहीं. असा रामाचे मनाचा मोठेपणा पाहून त्याच गुणावरून त्यास बक्षीस द्यावें असें पंचांनीं ठरवून त्यास निराळें बक्षीस दिलें.

## मोर.

मोर तर बहुतकरून सर्वांनीं पाहिलाच आहे, हा बहुतकरून सर्व देशांत असतो; परंतु ह्याचें मूळचें मुख्य ठिकाण म्हटलें म्हणजे आशिया खंड आहे; व विशेषेंकरून हिंदुस्थानांत भागीरथीचे जवळचा प्रदेश, हिंदुस्थानांतील मोठमोठीं मैदानें, सयाम देश, वगैरे आहेत. हे आशिया आणि आफ्रिका ह्या खंडांमध्यें पुष्कळ ठिकाणीं रानांत आहेत; परंतु हिंदुस्थानांत जे सुपीक प्रदेश आहेत तेथें जितके आहेत तितके नाहींत. येथले मोर मोठे असतात, आणि त्यांचे पिसाऱ्याचा रंग हिरे व माणकें ह्यांच्या रंगासारखा असतो.

मोराच्या जाती दोन आहेत, त्यांतून एक पुष्कळ देशांत आढळते, आणि एक जावा बेटांत मात्र आढळते. जे पुष्कळ देशांत मोर आढळतात त्यांची लांबी चोंचीचे टोंकापासून मागल्या पिसाऱ्याचे शेवटापर्यंत मोजिली तर सुमारें ४ फूट भरते. त्यांचे डोक्यावर एक तुरा असतो, त्यामुळें त्यांचें डोकें फार शोभिवंत दिसतें. तुऱ्याचीं पिसें २४ असतात, आणि त्यांला शेवटीं मात्र लहान लहान पर असतात, आणि ते एकमेकांस लागलेले असतात. ह्यांचा रंग मध्यें अगदीं हिरवा चार असून कडेस पिंवळा असतो. मोराचें डोकें, गळा, आणि मान ह्यांचा रंग अगदीं निळा असतो; पण मध्यें कोठें कोठें हिरव्या व पिंवळ्या

रंगाची झाक मारिते. ह्याचें पोट आणि मलद्वार हीं कांहीं काळसर आणि कांहीं हिरवीं अशीं असतात. शेंपूट कांहीं करड्या रंगाचें आणि कांहीं पिंगट रंगाचें असें असतें; पण तें पिसाऱ्याखालीं झांकून जातें ह्यामुळें तें दिसत नाहीं. मोरानें आपला पिसारा उभा केला म्हणजे मोठा पंखा पसरला आहे असें दिसतें. ह्याचे पिसांचे मधले दांडे पांढरे असतात, आणि प्रत्येक पिसाला मुळापासून शेवटपर्यंत बारिक बारीक पर असतात. ते शेवटाला एकांत एक असे बसून सर्व पिसारा नितळ दिसतो; आणि प्रत्येक पिसावर चमत्कारिक रंगाची वाटोळी आकृति असते. तींत पिंवळा, हिरवा, निळा, वगैरे पुष्कळ रंगांची झाक मारिते. ही आकृति डोळ्याचे आकृतीसारखी असते, म्हणून हिला डोळा असें म्हणतात. ह्या डोळ्यांमुळें मोराचे पिसाऱ्याला फारच शोभा येते.

जेव्हां मोराला आनंद होतो, किंवा तो लांडोरीला पाहतो, तेव्हां तो आपला सर्व पिसारा उभारून आपली शोभा दाखवितो. ह्याचें डोकें आणि मान ह्यांचा झोंक मागें असतो. मोर पाऊल टाकितो तें हळू आणि मोठ्या डौलानें टाकितो, आणि मोठ्या डौलानें वरचेवर गिरके मारितो. ह्यावरून सूर्याचे किरण आपल्या परांवर चोंहींकडून घेतले तर त्यांचा रंग अधिक खुलेल असें त्याच्या मनांत असतें असें वाटतें. ह्याचा पिसारा वर्षास गळून पडतो, आणि वसंतऋतूंत फिरून येतो; पण तो तोंपर्यंत लाजून कोणीकडे तरी एकीकडे जाऊन लपून बसतो. मोर मोठ्यानें ओरडतो, आणि एकदां ओरडतो तसें लागलेंच पुनः ओरडतो. उन्हाळ्यांत संध्याकाळीं आणि रात्रीं तर नेहमीं असेंच ओरडत

असतो. हा मोठ्यानें किंकाळ्या मारूं लागला म्हणजे पाऊस पडणार असें कोणी समजतात. ह्यानें मेघगर्जना ऐकिली म्हणजे ह्याला फार आनंद होतो, आणि हा नाचूं लागतो. नराचे पायांला मागल्या बाजूस नखी असते; तशी मादीला नसते. ह्याचे पाय फारच ओबड धोबड असतात.

लांडोर मोरापेक्षां लहान असते. आणि तिचा पिसारा आंखूड असतो. आणि मोराचे पिसाऱ्यावर जसे चमत्कारिक रंग असतात तसे हिच्यावर नसतात. हिचे पिसाऱ्याचा रंग कांहींसा पिंगट असतो. ही दरखेपेस ४ किंवा ५ आंडीं घालिते. ह्यांहून अधिक बहुतकरून घालीत नाहीं, मोर आंडीं फोडितो म्हणून ही कोणीकडे तरी एकीकडे आंडीं घालिते. तीं आंब्या एवढीं असतात, आणि रंग पांढरा असून वरतीं ठिपके ठिपके असतात. हवा उष्ण किंवा थंड असेल त्याप्रमाणें लांडोर आपल्या आंड्यांवर २९ पासून ३० दिवसपर्यंत बसते. मोराचीं पिलें तीन वर्षांचीं होतपर्यंत त्यांच्या पिसाऱ्याला चांगली चकाकी येत नाहीं. कधीं कधीं मोराचा सर्व पिसारा पांढराच असतो. त्यावरचे डोळे देखील पांढरेच असतात; पण त्यांचे रंगाची छाया कांहीं निराळी असते म्हणून ते ओळखितां येतात. कधीं कधीं लांडोरीलाही मोरासारखा मोठा पिसारा येतो. पण तो आला तर तिनें आंडीं घातलीं म्हणजे मग येतो, अगोदर येत नाहीं. पण असें फारसें होत नाहीं.

जावा बेटांत जो मोर आढळतो त्याची लांबी रुंदी वरतीं सांगितल्याप्रमाणेंच असते. विशेष इतकाच कीं त्याचे डोक्यावरचा तुरा अमळ लांब असतो; आणि तो वयांत आला म्हणजे

त्या तुऱ्याला मुळापासून शेवटपर्यंत एकसारिखे बारीक बारीक पर येतात. ह्याचे डोक्याचा रंग निळा असला तर त्यावरचे तुऱ्याचा रंग हिरवा असतो, आणि तुऱ्याचा निळा असला तर डोक्याचा हिरवा असतो. असे हे दोन रंग ह्या दोहों ठिकाणीं असतात. ह्याचे गालावर मध्यें केंस नसतात, आणि त्याठिकाणचा रंग मागें पिंवळट असतो, आणि पुढें, म्हणजे तोंडाचे जवळजवळ, कांहीं निळा व कांहीं हिरवा असा असतो. ह्याचे मानेवरचे आणि छातीवरचे पर रुंद, आंखूड, आणि वाटोळे असे असून घरांवरच्या कौलांप्रमाणें एकावर एक असे असतात. आणि त्यांचे मुळांपाशीं डोक्याचे रंगाप्रमाणें चकचकीत रंग असतो. शेवटाला चकचकी विशेष असते. पाठीवरचे पर तर फारच चकचकीत असतात. पंखांवर बराच निळा रंग असतो. ह्याचे पिसाऱ्याचा रंग पिंगट असून त्यावर हिरव्या रंगाची झाक मारिते. पंखांला बारीक बारीक जे पर असतात, ते लांब, सुटे, आणि मऊ असतात, आणि त्यांचे शेवटीं लहान डोळ्याची आकृति असते. चोंच पांढुरकी असते. पाय बळकट आणि काळसर असतात. त्यांवर पर नसतात; आणि त्यांवरच्या शिरा दृष्टीस पडतात.

प्राचीन ग्रंथांत मोराचें वर्णन पुष्कळ आहे. तें सर्व त्याचे पिसाऱ्यामुळें आहे. मोर इतका शोभिवंत दिसतो तो पिसाऱ्यामुळें दिसतो. पण त्याचा त्याला काय उपयोग आहे ह्याविषयीं अद्यापि संशयच आहे. पहिल्यानें पाहतांक्षणींच असें दिसतें कीं ह्याचें त्याला उगीच ओझें होत असेल, आणि नफा तर कांहींच नसेल. पण आपणांस असें म्हणतां कामा नये. कारण

आपणास सर्व पदार्थांचे उपयोग कोठें ठाऊक आहे? जर मोराचे स्वभावाचा आणि त्याच्या रीतिस्थितीचा चांगला विचार केला, तर त्याचा कांहीं उपयोग आहे हें कळेल.

लोकांत असें म्हणणें आहे कीं मोर आणि लांडोर हीं खुषींत आलीं म्हणजे दोघेंही आनंदानें नाचूं लागतात, आणि त्यावेळीं जे मोराचे डोळ्यांतून आनंदाश्रु पडतात तें लांडोर वरचेवर झेलून घेऊन पिते, आणि त्यापासून तिचे पोटांत गर्भ राहतो. परंतु हें खरें नाहीं. मोराचा लांडोरीशीं संग इतर पक्ष्यांप्रमाणेंच होतो. ही गोष्ट कितीएकांनीं प्रत्यक्ष पाहिली आहे, तेव्हां आतां त्याविषयीं संशय नाहीं.

---

## चहाचें झाड.

ह्या झाडाच्या पानांची फार प्रसिद्धि आहे. ह्यांचा काढा करून पिणें लोकांस फार आवडतें. ह्या झाडाचें मुख्य स्थान म्हटलें म्हणजे चीन देश आहे. कांहीं काळामागें लोकांस वाटत असे कीं हीं झाडें चीन देशांत मात्र होतात; परंतु असें नाहीं. अलीकडे हीं झाडें आसाम देशांत व हिमालयपर्वताच्या उतरणीवर कांहीं स्थळीं उगवतात, असें समजलें आहे. व ह्या ठिकाणीं ह्या झाडांची लागवड इंग्लिश लोक करूं लागले आहेत, तरी चहाच्या झाडाविषयीं चीन देशाची कीर्ति इतर देशांपेक्षां मोठी आहे. प्राचीन काळापासून चीन देशांत चहा पिण्याचा परिपाठ चालत आला आहे चीन देशांत तरी चहाच्या झाडांची लागवड सर्वत्र होत नाहीं. त्या देशाचा पूर्वेकडील जो भाग उत्तर अक्षांस ३० आणि ३३ ह्यांच्या मध्यें आहे तेथें मात्र लागवड करितात. त्या भागास चिनी लोक चहाचा देश असें म्हणतात. चीन देशाच्या

उत्तर भागीं थंडी फार आणि दक्षिण भागीं उष्णता फार, म्हणून त्या दोन ठिकाणीं चहाच्या झाडांची लागवड होत नाहीं. तरी दक्षिण भागीं कान्तोन बंदराजवळ चहाच्या झाडांचे मळे आढळतात.

ह्या झाडाच्या मुख्य दोन जाती आहेत; हिरव्या चहाचें झाड आणि काळ्या चहाचें झाड. हीं झाडें चिनई लोक बीं पेरून उत्पन्न करितात. त्यांची पेरणी करितांना चार पांच फुटांच्या अंतरानें एकसारख्या रांगांनीं बीं पेरितात. तें झाड त्या देशांतलेंच आहे तरी बीं उगवण्याविषयीं इतका संशय असतो कीं एका भोकांत सात आठ दाणे टाकावे लागतात. पेरणी झाल्यावर त्या रांगांच्या मधील जाग्यांत कांहीं गवत वगैरे उगवलें तर लागलेंच काढून टाकितात. आणि झाडें फार उंच झालीं तर त्यांचीं पानें तोडण्यास अडचण पडेल म्हणून तीं फार वाढूं देत नाहींत; त्यांची वाढ आपल्या हाताच्या आटोक्यांत ठेवितात. पेरल्यापासून तीन वर्षें भरत पर्यंत त्यांचीं पानें तोडीत नाहींत, मग तोडूं लागतात. तीं झाडें सहा सात वर्षांचीं जुनाट झालीं म्हणजे उपयोगांतून जातात; मग तीं उपटून टाकून त्यांचे ठिकाणीं दुसरीं झाडें करितात. चहाच्या झाडांचीं फुलें पांढरीं असतात. तीं फुलें झडलीं म्हणजे त्यांस हिरव्या मऊ शेंगा येतात. प्रत्येक शेंगेंत एक, दोन, किंवा तीन बिया असतात.

झाडांच्या वयाच्या प्रमाणानें एकापासून चार वेळां पावेतों पानें तोडण्याची चाल आहे. तरी बहुत करून वर्षास तीन वेळां पानें तोडितात. पहिली तोड एप्रिल महिन्यांत, दुसरी तोड जून महिन्यांत, तिसरी तोड आगस्त किंवा सप्तेंबर ह्या

महिन्यांत करितात. पहिल्या तोडीचीं पानें चांगलीं, रंगदार, तेजस्वी असून त्यांस सुवास व रुचि चांगली असते; आणि त्या पानांत शिरा व कडकपणा कमी असतो. दुसऱ्या तोडीचीं पानें हिरव्या रंगाचीं असतात. पण त्यांस तजेला नसतो, आणि त्यांची योग्यता पहिल्या तोडीच्या पानांप्रमाणें नसते. आणि शेवटल्या तोडीचीं पानें काळसर रंगाचीं असून योग्यतेविषयीं फारच कमी असतात.

पानें तोडिलीं म्हणजे लागलींच रुंदशा टोपल्यांत घालून वाऱ्यांत किंवा उन्हांत प्रहर दीडप्रहरपर्यंत ठेवितात. तीं सुकलीं म्हणजे दर खेपेस पावशेर दीडपावशेर घेऊन, खालीं कोळशांचा विस्तव करून, वर लोखंडी पत्रा ठेवून त्यावर घालतात, आणि कुंच्यानें परतून परतून करपूं न देतां टोपलींत काढून घेतात. असें झाल्यावर मग तीं पानें हातांनीं फार जपून चोळून चोळून त्यांच्या वळकट्या करितात, आणि त्या वळकट्या मंदाग्नीवर लोखंडाचा पत्रा ठेवून, त्यावर घालून, करपूं न देतां वाळवितात. नंतर गिऱ्हाइकास माल चांगला दिसण्यासाठीं त्या वळकट्या तक्त्यावर पसरून त्यांतून नासलेलीं किंवा करपलेलीं पानें, किंवा चांगलीं वाळलीं नसतील तीं पानें, निवडून काढितात.

चहाच्या निरनिराळ्या जातींला चिनी लोक निरनिराळीं नावें देतात, तीं, कांहीं चहाच्या झाडांच्या उत्पत्तीच्या स्थळावरून, कांहीं तयार करण्याच्या कृतीवरून, व कांहीं आणखीं दुसऱ्या कारणांवरून देतात.

बहुतेक लोकांची समजूत अशी आहे कीं हिरवा चहा म्हणून जो असतो तो तांब्याच्या पत्र्यावर सुकविल्यानें हिरवा होतो.

पण अशी गोष्ट नव्हे. चहा तयार करण्याच्या कामांत तांब्याच्या पत्र्यांची कांहींच वहिवाट नाहीं. हिरव्या चहाच्या पानांत तांब्याचा कांहीं अंश आहे कीं नाहीं हें पाहण्याकरितां रसायन-शास्त्र जाणणाऱ्यांनीं बहुतवेळां परीक्षा करून पाहिलें, परंतु तांब्याचा अंश त्यांत आढळला नाहीं.

चिनी लोक चहा तोडल्यापासून एक वर्षाचा जुना होईपर्यंत पिण्याच्या कामांत घेत नाहींत, कारण कीं तोंपर्यंत तो फार माजरा असतो. चिनी लोक इंग्लिश लोकांप्रमाणें चहाचा काढा करितात, पण त्यांत दूध साखर घालून पीत नाहींत, तसाच पितात.

चहाचीं पानें प्रथम आशियाखंडांतून यूरोपखंडांत दच लोकांनीं इसवी सनाच्या सतराव्या शतकाच्या आरंभाच्या सुमारास, म्हणजे इसवी सन १६१० ह्यांत, नेलीं. तरी इसवी सन १६६६ पर्यंत ग्रेत ब्रितनामध्यें त्यांची माहिती नव्हती. त्याच वर्षीं दच लोकांच्या हालंद देशांतून इंग्लिशांच्या दोन सरदारांनीं थोडासा चहा तिकडे नेला. पुढें सन १६६९ त इंग्लंदच्या ईस्त इंदिया कंपनीनें चहाचा व्यापार सुरू केला, तेव्हांपासून तो व्यापार वाढत वाढत फारच वाढला. ग्रेत ब्रितनांतील लोकांस चहाची गोडी इतकी लागली आहे कीं ग्रेत ब्रितन खेरीज करून साऱ्या यूरोपखंडांत जितका चहा खर्च होतो त्याच्या दिढीनें ग्रेत ब्रितनांत खर्च होतो. सन १८५० त ५३४६०७५१ इतके रतल चहा व्यापाऱ्यांनीं चिनाहून ग्रेत ब्रितनांत आणिला, आणि तितक्याची जकात सरकारास मिळाली. चहाच्या व्यापाराचा जो परिणाम झाला तसा इतर कोणत्याही व्यापाराचा झाला नसेल, असें वाटतें.

खुशकीवरून नेलेल्या चहाचा स्वाद समुद्रावरून नेलेल्या चहाच्या स्वादापेक्षां अधिक असतो, म्हणून चिनाहून रूस देशाकडून जो चहा यूरोपांत जातो तो परभारा जळमार्गानें नेलेल्यापेक्षां चांगला असतो.

हिंदुस्थानांत चहा पिण्याचा संप्रदाय नव्हता, परंतु इंग्लिश लोकांचीं पैरवी झाल्यापासून त्यांचें पाहून मुंबई, मद्रास, कलकत्ता इत्यादि कितीएक ठिकाणीं लोक चहा पिऊं लागले आहेत. अझून सर्व ठिकाणचे लोक चहा पीत नाहींत.

---

## वेळ लवकर जाण्याचा उपाय.

एके शहरांत धोंडोपंत म्हणून श्रीमंत गृहस्थ राहत असे. त्यास दोन मुली व एक मुलगा अशीं तीन मुलें होतीं. त्यांतील धाकट्या मुलीचें नांव सखी, व थोरल्या मुलीचें नांव गोदावरी, व मुलग्याचें नांव विश्वनाथ, अशीं होतीं. एके दिवशीं दहा वाजतां जेवणें खाणें आटपल्यावर धोंडोपंताची स्त्री यमुनाबाई, आपल्या मुलींस घेऊन एका खोलींत बसली होती; त्या खोलींत एका जाळीदार फडताळांत एक मोठें घड्याळ होतें; त्या घड्याळाजवळ, यमुनाबाई शिवीत बसली होती, व गोदावरी तिच्या शेजारीं आपल्या चोळीवर कशीदा काढीत होती; व तेथें सखी हातीं एक वाळूचें घड्याळ घेऊन त्यांतील वाळू पडत होती तिजकडे पाहत बसली होती. तेव्हां सखी आपल्या आईस म्हणते, आई, तूं शिवण्याच्या कामांत फार गुंतली आहेस, नाहीं बरें, बये? पण बये, मजकरितां आणखी एक वेळ मागें पाहून जाळींतल्या त्या घड्याळांत किती वाजले तें मला सांग बरें.

**आई**—सखू, ह्या एका तासांत तुजकरितां चारदां घड्याळाकडे पाहिलें, आतां बराबर बारा वाजले आहेत.

**सखी**—बये, बाराच सारे! मला वाटलें होतें कीं हें वाळूचें घड्याळ चुकलें आहे. मघांशीं जेव्हां मीं हें वाळूचें घड्याळ उलटलें, व जेव्हां त्वां मला सांगितलें कीं, आतां अकरा वाजले, तेव्हांपासून आतांपर्यंत म्हटलें म्हणजे एका तासापेक्षां फार अधिक वेळ खचीत झाला असावा. अबब! केवढा मोठा तरी हा तास. गे बये! कायगे गोदूताई, तुला मी म्हणतें असें वाटत नाहीं काय?

**गोदावरी**—(खालीं पाहून कशीदा काढीत होती ती वर पाहून म्हणते) सखू, मला तर वाटतें कीं हा तास फारच लहान गेला. आई आतां म्हणाली कीं, बारा वाजले, हें ऐकून मला मोठें नवल वाटलें. इतक्यांत एक सगळा तास झाला काय!

**सखी**—ताई, तूं कशीदा काढण्याच्या कामांत अगदीं गढून गेली होतीस, म्हणून तुला असें वाटतें. मी मघांपासून एकसारखी ह्या घड्याळांतल्या वाळूकडे टक लावून बसलें आहें, त्यापक्षीं तास मोठा किंवा लहान हें तुजपेक्षां मला चांगलें ठाऊक आहे. एवढा मोठा तास माझ्या जन्मांत गेलेला मला आठवत नाहीं.

**आई**—सखू, तास म्हटला तर तुझा आणि गोदूचा एकच, पण हें कसें, कीं एकीस तो तास मोठा वाटतो, व एकीस तोच लहान वाटतो?

**सखी**—मी केव्हांची आतां एक वाजेल, मग एक वाजेल, असें

म्हणत एकसारखी वाळूकडे दृष्ट लावून बसलें आहें. कां कीं, एक वाजल्यावर तुला चित्रें दाखवीन, असें दादानें मला वचन दिलें आहे, व मला बाबाचेंही सांगणें असें आहे कीं, मी एक वाजे तोंपर्यंत विसूस लिहिणें शिकवितों तोंपर्यंत तूं इकडे येऊं नको, व्हावें तर मग ये; म्हणून मी एक वाजण्याची वाट पाहत बसलें आहें. आतां आणखी एक दुसरा सगळा मोठा तास मला वाट पाहत बसलें पाहिजे. ( असें म्हणून ती आळसानें हातपाय ताणून जांभया देऊं लागते. )

**आई**— सखे, तास मोठा कां म्हणतेस? तो मोठा करणें किंवा लहान करणें हें तुझ्या हातीं आहे. तूं करशील तसा होईल.

**सखी**— बये, मीं काय करावें म्हणजे तास लहान होईल? होय, गडे, मी आपली आतां हें वाळूचें घड्याळ हालवीत बसतें, म्हणजे वाळू अमळ जलद पडून तास लवकर जाईल, नाहीं बरें बये? ( असें म्हणून ती तें घड्याल हालवूं लागते.)

**आई**— तास लवकर जाण्यास तुला ह्याखेरीज दुसरें कांहीं करितां येत नाहीं, का सखे? तुजपेक्षां गोदूस हा तास लहान वाटण्याचें कारण त्वां मला आतां नुकतेंच सांगितलें.

**सखी**— होय बये, मीं सांगितलें कीं ती काम करीत होती म्हणून तिला तसें वाटलें, 'पण बये, गोदूताई जसा कशीदा काढीत आहे तसा मला कोठें काढितां येतो?

**आई**— काय सखे, कशीदा काढण्यावांचून माणसांस दुसरा कांहीं उद्योगच नाहीं काय? मी काम करीत आहें. मी कोठें कशीदा काढितें?

**सखी**— बरें तर, बये, त्वां मला काल रेशिमाच्या लडीची गुतागूत काढायास सांगितलें होतें; त्या कामानें हा तास कदाचित् लहानसा वाटला तर वाटेल, नाहीं बरें बये?

**आई**— सखे, आतां उगीच बोलूं नको; हातानें तें काम करून पहा, म्हणजे तुला समजेल.

मग सखी आपल्या सांगशींतून तें रेशीम घेऊन त्याची गुतागूत काढूं लागली. त्या रेशिमाची फारच गुतागूत झाली होती, म्हणून ती काढण्यांत सखीचें मन अगदीं गर्क होऊन गेलें. मग तिनें त्या रेशिमाची सर्व गुतागूत काढून त्याची चांगली गुंडी करून, ही घे बये, असें म्हणून ती आपल्या आईपुढें ठेविली. मग ती आईस म्हणाली, बये, इतकी गुतागूत काढण्यांत मीं सारी पांचदां तोडातोड केली, अधिक केली नाहीं; आणि मला वाटतें कीं मी गुतागूत काढूं लागल्यापासून फारसा वेळ झाला नाहीं, झाला काय बये?

**आई**— अर्ध्या तासावर झाला नाहीं. अर्धा तासमात्र झाला.

**सखी**— काय बये, अर्धा तास! ही गुतागूत काढूं लागण्याच्या आधीं मी तुझ्याशीं शेवटीं बोललें तेव्हांपासून इतक्याशा वेळेंत अर्धा तास लोटला काय? बये, हें मला खरें वाटत नाहीं. असें बोलून ती वळून आपल्या वाळूच्या घड्याळाकडे पाहूं लागली, आणि त्याच्या खालच्या कुपींत अर्ध्या वाळूचा ढीग पाहून तिला मोठें नवल वाटलें; आणि ती आईस म्हणाली, बये, हा अर्धा तास फारच लवकर गेला. कांहीं उद्योग करीत असलें म्हणजे वेळ लवकर जातो म्हणून जें त्वां सांगितलें तें खरें, बये. मला तर रेशिमाची गुतागूत काढ-

ण्याचें काम फारसें आवडत नाहीं, तरी तें करीत असतां वेळ किती लवकर गेला! मला जें काम आवडतें तें जर मी करीत बसलें, तर हा उरलेला अर्धा तास ह्यापेक्षांही लवकर जाईल असें मला खचीत वाटतें.

---

## जनावरांस पदार्थ आयते मिळतात, आणि मनुष्यांस श्रमानें मिळवावे लागतात.

मनुष्यांचा चरितार्थ चालण्याकरितां त्यांस अनेक पदार्थ लागतात, तसा जनावरांचा चरितार्थ चालण्याकरितां त्यांसही अनेक पदार्थ लागतात. परंतु जनावरांस ते पदार्थ आयते मिळतात. पहा बरें, जनावरांस खाण्याला गवत लागतें तें जमिनींतून आपाप उवगतें, आणि आयतें त्यांस मिळतें. तें कधीं पेरावें लागत नाहीं, व भांगलावें लागत नाहीं. ह्या गवतापासून जनावरांचा निर्वाह चालून त्यांस समाधान होतें. व पाणीहीं त्यांस आयतें मिळतें. ह्याप्रमाणें त्यांच्या खाण्यापिण्याचा बंदोबस्त होतो. आतां रहावयास निवाऱ्याची जागा पाहिजे तीही कोठेंतरी डोंगराच्या आश्रयास किंवा एखाद्या झाडी मध्यें सांपडते, तेणेंकरून त्यांचा राहण्याचाही बंदोबस्त होतो.

मनुष्यांचें म्हटलें म्हणजे अगदीं ह्याच्या उलट आहे. त्यांला आयत्या उपयोगी पडण्यासारख्या वस्तू ह्या सृष्टींत ईश्वरानें थोड्याच उत्पन्न केल्या आहेत. दृष्टीनें पाहून त्यांला संतोष वाटावा असे पदार्थ पुष्कळ आहेत. सकाळीं व संध्याकाळीं आभाळाचे रंग पाहून त्यांचा चमत्कार त्यांस वाटतो; चंद्र,

ग्रह, तारे, हे दृष्टीस पडले म्हणजे त्यांला मोठा आल्हाद होतो; तसाच कितीएक झाडें, फुलें, पाषाण, ह्यांचे आकार व रंग पाहून त्यांला फार संतोष होतो; परंतु ह्या सर्व पदार्थांत निर्वाहाचे म्हणून फारच थोडे पदार्थ आहेत.

ईश्वराचा संकेत असा दिसतो कीं त्यानें ह्या सृष्टींत माती, झाडें, दगड, वगैरे जीं द्रव्यें करून ठेविलीं आहेत, तीं पाहून मनुष्यानें विचार करावा, आणि त्यास जी बुद्धि दिली आहे ती खर्चून त्या द्रव्यांपासून आपणास जे जे पदार्थ पाहिजेत ते ते त्यानें श्रम करून घ्यावे. असें करितां करितां आपली ज्ञानशक्ति व कल्पनाशक्ति वाढवावी.

पहा बरें, घरदार, वस्त्रपात्र, भांडेंकुंडें, ह्यांतून कांहीं तरी जमिनींतून आयतें उगवलें आणि मनुष्यांस प्राप्त झालें असें कधीं होत आहे काय? उगीच साधारण घर म्हटलें म्हणजे तें बांधण्यासाठीं केवढा खटाटोप करावा लागतो. विटा मातीच्याच असतात, पण माती चांगली गाळून, तिचा गारा करून विटाळ्यानें त्या घातल्या पाहिजेत, व भाजल्या पाहिजेत; ह्यांतील एकही काम मेहनतीवांचून होत नाहीं. दगड म्हटले म्हणजे ते खणून आणून घडून नीट सारखे केले पाहिजेत. लोखंडाचीं हत्यारें, भांडीं, म्हटलीं म्हणजे लोखंड अगोदर खाणींतून काढिलें पाहिजे, पुढें भट्टींत घालून गाळिलें पाहिजे, पुढें त्याचे पत्रे करून मग भांडीं घडिलीं पाहिजेत. ह्याविषयीं किती, मेहनत लागते पहा बरें. कापसाचीं वस्त्रेंही मिळण्यासाठीं कापूस लावल्यापासून मागावर वस्त्र तयार होईपर्यंत आपणांस किती श्रम करावे लागतात. मुकटे, पितांबर, हे रेशिमाचे असतात, आणि तें

रेशीम एका जातीच्या किड्यापासून उत्पन्न होतें; तें तयार करण्याला अशीच मनस्वी मेहनत लागते. घोंगड्या, धाबळ्या ह्या लोंकरीच्या असतात, त्यांविषयींही पुष्कळ श्रम पडतात. आणि ह्याप्रमाणेंच कोणतीही वस्तू म्हटली तरी श्रमावांचून प्राप्त होत नाहीं.

बरें, नुसते श्रम केले म्हणजे झालें, असें नाहीं. तर त्याविषयीं ज्ञान व चातुर्य हींही असलीं पाहिजेत. हीं तीन साधनें आपणांपाशीं असलीं म्हणजे आपणांला पाहिजे तें करितां येईल. आतां, ज्ञान, चातुर्य, व श्रम हीं इतकीं एकाच ठिकाणीं असलीं पाहिजेत, असें नाहीं. कोणापाशीं कांहीं, कोणापाशीं कांहीं, असें असलें तरी चालतें. इतकेंच कीं ज्ञान झालें, चातुर्य झालें, हें ज्याजवळ असेल त्यानें कोणत्याही रीतीनें तें श्रम करणाराला मिळेल असें केलें पाहिजे. मग तीन एकत्र झालीं म्हणजे त्यांपासून कार्य होतें. जसें धान्य, पाणी, व विस्तव हे तीन पदार्थ तीन असामींपाशीं पुष्कळ आहेत, आणि ते तीन असामी एकमेकांस अनुकूळ होत नाहींत, तर त्यांपैकीं कोणासच अन्न मिळणार नाहीं. पण तेच तिघेजण एकत्र होऊन, धान्य, पाणी, व विस्तव हीं तीन एके ठिकाणीं जमलीं, म्हणजे अन्न तयार होऊन सर्वांचेंच काम होईल. ह्यासाठींच आपणास ज्या वस्तू पाहिजेत त्या मिळाव्या म्हणून कोणी आपल्या ज्ञानाचा व्यय करितात, कोणी चातुर्याचा करितात, व कोणी श्रमाचा करितात. मातबर असतात ते द्रव्य देऊन दुसऱ्यांनीं उत्पन्न केलेल्या वस्तू खरेदी करितात.

मनुष्यांच्या उपजीविकेला आयतीं उपयोगीं पडणारीं अशीं कांहीं फळें आहेत, तेवढीं सोडून देऊन बाकी जितके खाण्याचे

पदार्थ आहेत तितके तयार करण्याला ज्ञान, चातुर्य, आणि श्रम हीं लागतातच. ज्वारी, बाजरी, गहूं हीं धान्यें तयार झाल्यावर तीं दळून मळून त्यांची भाकर केली पाहिजे. तांदूळ असल्यास कांडून पाखडून शिजविले पाहिजेत. भाजीपाला म्हटला तरी निसून चिरून शिजविला पाहिजे. ह्याप्रमाणें कोणताही पदार्थ म्हटला तरी अगोदर श्रम करून तयार करावा आणि मग खावा, असें आहे. एरवीं कांहीं नाहीं.

ज्ञान, चातुर्य, व श्रम ह्या तिहीं खेरीज आणखी एक पदार्थ आहे तो ह्या सृष्टींत जर ईश्वरानें उत्पन्न केला नसता, तर ज्ञान, चातुर्य, व श्रम हीं सर्व व्यर्थच गेलीं असतीं. तो पदार्थ कोणता म्हणाल, तर विस्तव होय. पहा बरें, मनुष्याच्या आंगीं ज्ञान, चातुर्य, व मेहनत हीं तिन्ही आहेत, पण ह्या सृष्टींत विस्तव मुळींच नाहीं, असें जर असतें तर नुसत्या ज्ञानानें आणि चातुर्यानें का भाजी शिजती, का भात शिजता, का काय शिजतें? कांहीं एक शिजलें नसतें. ह्याकरितां विस्तव अवश्य पाहिजे.

ह्या गोष्टीविषयीं ज्यांनीं फार विचार केला आहे त्यांस असें वाटतें कीं, विस्तवापासून आपलें अमुक कार्य होईल, वायूपासून आपलें अमुक कार्य होईल, इत्यादि गोष्टींचें ज्ञान, ईश्वरानेंच जर मनुष्यास दिलें नसतें, तर अग्नि, वायु, इत्यादि पदार्थ अमुक रीतीनें आपल्या उपयोगीं पडतील, हें त्यास कधीं समजलें नसतें. आपण असा एक माणूस कल्पूं कीं त्यास विस्तवाविषयीं कांहीं माहीत नाहीं. असल्या मनुष्यानें दैवयोगेंकरून एके दिवशीं एखादी ज्वालामुखी पाहिली, किंवा रानांत वणवा पाहिला, तर त्याला भय वाटेल, व मोठें आश्चर्यही वाटेल. परंतु ह्या विस्-

वापासून आपलीं अनेक कामें होतील, हें त्याच्या मनांत कधीं येणार नाहीं. कारण, त्याच्या दृष्टीस जो हा विस्तव पडला तो असा कीं त्याच्या योगानें मारे जिकडे तिकडे जळून खाक होत आहे. आतां गारगोटींतून विस्तव पडतो, किंवा लांकडावर लांकूड रगडून घांसिलें असतां विस्तव पडतो, हें तर फारच लांब आहे, हें त्याच्या ध्यानांत कधींच आलें नसतें.

ज्या ठिकाणीं वस्त्रपात्र वगैरे तयार करण्याचे कारखाने नाहींत त्या ठिकाणच्या लोकांच्या नजरेस चिरगूटपांघरूण, भांडेंकुंडें हीं अगदीं तयार होऊन बाजारांत आलीं म्हणजे पडतात. पण त्यांचें पूर्वरूप दृष्टींस पडत नाहीं. ह्यामुळें पूर्वीं ते तयार करण्यास कोणत्या प्रकाराची केवढी मेहनत लागली आहे हें त्यांस समजत नाहीं.

सर्वांनीं आपआपल्या अंतःकरणांत असा विचार करावा कीं माती, लांकूड, धातु हे सर्व पदार्थ, ज्यांचे आपण केवळ जिन्नस करितों, ते कोणीं बरें उत्पन्न केले असतील? अनेक वस्तु एकत्र करून त्यांजपासून नवीन वस्तु उत्पन्न करण्याचें ज्ञान मनुष्यास कोणीं दिलें असेल? म्हणजे सर्वांची खातरी होईल कीं ईश्वरानें सृष्टीकडे विचारदृष्टीनें पाहिलें असतां परमेश्वराच्या शक्तीचा आणि बुद्धीचा प्रत्यय येण्याला काडीमात्र उशीर लागणार नाहीं.

---

## शहरामध्यें पाण्याचा पुरावा आणि त्याची वांटणी.

मोठ्या शहरामध्यें पाण्याचा पुरावा कसा होतो, आणि त्याची वांटणी कशी होते, ह्या गोष्टी मनुष्यानें लक्षांत आणावया जोग्या

आहेत. प्रथम मुळापाशीं एक मोठा खजीना असतो; त्याज-पासून शहरांतील महल्यामहल्यास कांहींसे मोठे नळ जातात; मग ह्या नळांपासून बिदीबिदीस पाणी जाया जोगे फांटे फुटतात; फिरून बिदींच्या फांट्यांपासून आळोआळीस आणि गल्लोगल्लीस लहान फांटे जातात, शेवटीं घरोघरीं शिशाची एकेक लहान नळी जाते; आणि पाहिजे असल्यास ती नळी आपलें सुंदर भरवण, म्हणजे पाणी, दरखोलींत नेते.

पाणी आणण्याकरितां जशी नळ, नळफांटे, आणि नळ्या ह्यांची व्यवस्था केलेली असते, तशीच राबाचें पाणी जाण्याकरितां मोऱ्या, पन्हळ, नाले ह्यांची व्यवस्था केलेली असते, त्यांच्या योगानें तें पाणी समुद्राचा जो मोठा पाण्याचा कारखाना त्यांत शुद्ध होण्या-करितां जातें.

शहरामध्यें पाणी नेण्याकरितां प्राचीन काळचे लोक आक्वेदक्त ह्या नांवाचे मोठमोठे पूल लवणामध्यें बांधीत असत. पृथ्वी-वरील कितीएक ठिकाणीं अशा इमारती अझून आहेत. विशेषें करून ह्या इमारती चीन देशांत सांपडतात. परंतु पाणी नळानें नेलें असतां, मध्यें खोल लवण जरी आडवें आलें तरी तें उग-माचे उंची इतकें चढतें, असा पाण्याचा स्वभाव लोकांस कळून आल्यापासून उगमापासून शहरांतील मुख्य खजिन्यापर्यंत पाणी नेण्यासाठीं मोठा नळ केला म्हणजे पुरे, असें झालें आहे.

ज्या शहरांत पाण्याचा असा बंदोबस्त झाला आहे त्या शह-रांतले लोकांस चांगल्या स्वच्छ पाण्याच्या पुराव्याचें सुख इतकें परिपाठांत पडलें आहे कीं, नित्यनेमानें दिवस उगवतो व मावळतो ह्या गोष्टीचें जसें त्यांस आश्चर्य वाटत नाहीं, तसें ह्याचेंही

आश्चर्य वाटत नाहीं. परंतु मागल्या काळाचा विचार केला असतां, वाढत वाढत आली जी कलाकौशल्याची विद्या हिचे आपण किती उपकारी आहों ह्याचा त्यांस बोध होतो.

पाण्याचे कमताईमुळें, आणि हेंदर सांचल्यामुळें, रोगांच्या सांती कितीवेळ आल्या आहेत. आणि पाण्याचा पुरावा वक्तशीर झाला असता तर जीं वांचलीं असतीं, अशीं किती शहरें आगीनें जळून खाक झालीं आहेत.

सांप्रतकाळीं ज्या पाण्याचा पुरपुराटाच्या सुखाचा उपभोग आपण मनांत किंमत आणिल्यावांचून घेतों, त्या सुखाची योग्यता केवढी हें, जो मारवाड देशाप्रमाणें आशियाखंडांतील अथवा आफ्रिकाखंडांतील वाळवंट, जेथें सोन्याच्या खाणीपेक्षां विहिरीची योग्यता अधिक आहे, तेथें फिरला आहे; अथवा गलबतावर, जेथें जें फारच मोलाचें मद्य त्याहून अधिक योग्यतेचें समजून गोडें पाणी जपून खर्च करितात, तेथें जो कांहीं महिने राहिला आहे, तोच मात्र जाणतो.

---

## टांचण्या व सुया करण्याचें काम.

टांचण्यांसारखे स्वस्त पदार्थ पाहूं गेलें असतां फारच थोडे आढळतील, असें असतांही त्या तयार होऊन बाजारांत विकत तोंपर्यंत त्या करण्याच्या कामांत जितकीं मनुष्यें लागतात तितकीं इतर कोणताही जिन्नस तयार करण्याच्या कामांत लागत नाहींत, असें म्हटलें तरी चालेल. टांचणी करण्यास पहिल्यानें पितळेची तार काढावी लागते, तेथपासून ती अगदीं तयार होईपर्यंत क्रमानें पंचवीस कारागिरांच्या हातीं जाते.

टांचण्यांचा कारागीर तार करणाऱ्यापासून टांचण्यांसाठीं

जी तार आणितो, ती बहुधा इतकी जाड असते कीं तिच्या लाग-ल्याच टांचण्या करितां येत नाहींत; म्हणून ती तार बेताची बारीक करण्याकरितां, एकजण ती एका रहाटाला गुंडाळून, त्यापुढेंच कांहीं अंतरावर एक लेखंडी पट्टी बारीक भोंकाची लाविलेली असते तिच्या भोंकांतून ती तार नेऊन, त्या पट्टीच्या पलीकडे दुसरा रहाट असतो त्यावर ती अडकवितो. तो रहाट खूब जोरानें फिरविला म्हणजे पहिल्या रहाटावरची तार निघून मध्यें जी लेखंडाची पट्टी असते तिच्या भोंकांतून जाऊन दुसऱ्या रहाटाला गुंडाळते. अशा रीतीनें तार बेताची करितां येते. ती तयार झाल्यावर कोणी तार सरळ करितो; मग तिचे तीन किंवा चार वार लांबीचे तुकडे दुसरा कोणी पाडितो. आणि त्या तुक-ड्यांचे पुन्हा असे लहान लहान तुकडे कोणी पाडितो कीं प्रत्ये-काच्या सहा टांचण्या पडतील. मग एका रहाटाच्या योगानें दोन लहान सहाणा फिरत असतात त्यांजवळ एक मुलगा बसलेला असतो, तो त्या प्रत्येक तुकड्याचें टोंक त्यांवर घांसून बारीक करितो. तें असें.— त्या सहाणां पैकीं एक फार खरबरीत असते. तिजवर तो मुलगा त्या तुकड्यांपैकीं एकेक मूठ घेऊन त्यांचीं टोंकें चापट न्व्हावीं म्हणून सहाणेच्या झोंकाप्रमाणें तो ते तुकडे आपल्या बोटांमध्यें फिरवितो. मग ते तुकडे दुसऱ्या सहाणेवर धरितो. अशा रीतीनें बारा किंवा चवदा वर्षांचा मुलगा एका तासांत सुमारें सोळा हजार टांचण्यांचीं टोंकें करितो. प्रत्येक तुकड्याला दोन्हीं बाजूंस टोंकें झालीं म्हणजे तो मुलगा दोन्हीकडच्या टांचण्या तोडितो, आणि बाकीचे तुकडे पुन्हा पहिल्याप्रमणें सहाणेवर धरितो. अशा रीतीनें पुन्हा पुन्हा करून सहा टांचण्या पडत तोंपर्यंत चालवितो.

15

सर्व टांचण्यांस टोंकें केल्यानंतर, तेथें एक रहाट फिरत असतो त्याच्या योगानें त्या टांचण्यांस कोणी बोंडें करितो. तीं अशीं. त्या रहाटाच्या योगानें एके सरळ तारे भोंवताली दुसरी एक तार गुंडाळितो, आणि मग आंतील तार ओढून घेतो, म्हणजे वरच्या तारेला नळीसारखी आकृति येते. त्या तारेचे दोन दोन वेढे कातरीनें कातरून त्यांचा दुव्वा करितो, व त्या प्रत्येक दुव्याचें एकेक बोंड करितो. ते दुव्वे नरम करण्याकरितां ते लोखंडी भांड्यांत घालून लाल होत तों पर्यंत भट्टीवर ठेवितो. आणि तें भांडें भूईवर उतरून निवालें म्हणजे ते थंड झालेले दुव्वे तेथें पुष्कळ मुलें असतात, त्यांस कोणी तत्क्षणीं वांटून देतो.

तीं मुलें एक एक टांचणी घेऊन तिचें बोथें तोंड एका दुव्यामध्यें घालून ती ऐरणीवर धरितात; आणि तेथें एक चरक असतो तो पायांनीं दोन तीन वेळां दाबिला म्हणजे त्यावर एक घण असतो त्याला धक्का बसून तो ऐरणीवर आपटतो. अशा रीतीनें घणाचे घाव टांचणीवर बसून दुव्वा व टांचणीचें बोथें तोंड मिळून जाऊन बोंड तयार होतें. हें सर्व काम इतक्या झटपटीनें होतें कीं सांगायाला वेळ अधिक लागतो. जे लोक हा कारखाना पहावयास जातात त्यांस असा चमत्कार वाटतो कीं, तीं मुलें जेव्हां टांचणीला बोंड करण्यास ती ऐरणीवर धरितात तेव्हां घणाखालीं त्यांचीं बोटें सांपडून कशीं चेंगरत नाहींत! तथापि त्या मुलांस ह्या कामाचा इतका राबता पडला असतो कीं तीं निःशंकपणें काम चालवीत असतात.

टांचण्या तयार झाल्यावर, त्या रंगविण्याकरितां एके तांब्याच्या भांड्यांत कथिलाचा रस व दारूचा गाळ घालून त्यांत कोणी

या टाकितो. आणि कांहीं वेळपर्यंत त्यांत त्या राहिल्यावर कोणी त्या बाहेर काढितो, म्हणजे त्यांस पांढरा रंग येतो, परंतु त्यांस जिल्हई नसते. नंतर त्यांस जिल्हई देण्याकरितां एका भांड्यांत कोंडा घालून त्यांत त्या कोणी टाकितो; आणि त्यांस रवीनें कोणी घुसळितो, म्हणजे त्या घांसल्या जाऊन त्यांस जिल्हई येते. धान्याची मळणी झाल्यानंतर तें वारवून जसा त्याचा कोंडा कोणी काढून टाकितो, त्याप्रमाणेंच टांचण्यांचाही कोंडा कोणी काढून टाकितो. अशा रीतीनें टांचण्या तयार झाल्या म्हणजे कागदावर लावून विकावयाला नेतात.

सुया करतेवेळेस पहिल्यानें दगडी कोळसे पेटवून त्यांत पोलादाचा तुकडा तापत घालितात, आणि तो हातवड्यानें ठोकून ठोकून त्याची वाटोळी कांडी करितात. मग तिची तार करण्याकरितां एका लोखंडी पट्टीला लहान मोठीं भोंकें पाडलेलीं असतात, त्यांपैकीं पहिल्यानें ती कांडी मोठ्या भोंकांतून ओढितात. मग ती पुन्हा तापवून पहिल्यापेक्षां लहान भोंकांतून ओढितात. ह्याप्रमाणें जितकी तार बारीक हवी असेल तितकी होईपर्यंत चालवितात. तार केल्यानंतर सुई जेवढ्या लांबीची पाहिजे असेल तेवढे तिचे तुकडे पाडितात, आणि त्यांस नेडीं करण्याकरितां त्यांचें एक टोंक हातवड्यानें चपटें करितात, मग विस्तवांत घालून नरम करितात, आणि नीं टोकें ऐरणीवर धरून एका पोलादी बारीक टोंकाच्या टोंचणीनें त्यांस भोंकें पाडितात. मग आरपार भोंक होण्याला त्यांमध्यें पोलादाचे अंश राहिले असतात ते काढून टाकण्याकरितां तीं टोंकें शिशाच्या पाट्यावर ठेवून दुसऱ्या एका बारीक हत्यारानें ते अंश काढून टाकितात; मग

कानशीनें टोंकें बारीक करून सर्व सुया घांसून साफ करितात ह्याप्रमाणें सुया तयार झाल्या म्हणजे त्या एक लांब, चिंचोळें व एका टोंकास वांकडें असें एक लोखंडी पात्र असतें त्यांत घालून कोळशांच्या आगींत ठेवितात. आणि लाल झाल्यावर त्या एका गार पाण्याच्या हांड्यांत ओतितात, म्हणजे त्या कठीण होतात.

पुढें त्या सुया काढून एका तव्यावर ठेवितात; आणि तो तवा विस्तवावर ठेवितात. सुया बारीक असल्या तर आंच थोडीच देतात, परंतु जाड असल्या तर अधिक देतात. त्या विस्तवावर असतां त्यांस मधून मधून हालवितात, म्हणजे त्यांस पाणी चढतें व त्यांचा ढिसूळपणा जातो. मग त्या हातवड्यानें ठोकून ठोकून अगदीं सरळ करितात. त्या सुयांस जिल्हई देण्याकरितां पंधरापंधरा हजार सुयांचे लहान लहान ढीग करून किंतानाच्या कापडावर कुरुंदाचा कीस पसरून त्यावर त्या सुयांचे ढीग रचितात, आणि त्या ढिगांवर कुरुंदाचा कीस टाकून तेल शिंपडितात. नंतर त्याची वळकटी करून तिचीं दोन्हीं तोंडें गच्च बांधून टाकितात. मग ती वळकटी घडवंचीवर ठेवून तिजवर एक जाड तक्ता ठेवून त्यावर भार पडण्यास मोठाले दगड ठेवितात आणि तो तक्ता दोन दिवसपर्यंत मागें पुढें हालवितात, म्हणजे त्या सुयांस जिल्हई येते. मग सुया बाहेर काढल्यावर ऊन्ह पाणी व साबण ह्यांनीं धुतल्या म्हणजे त्यांचा मळ जाऊन त्या स्वच्छ होतात. नंतर तापलेल्या दमट कोंड्यांत त्या घालून एका वाटोळ्या पेटींत घालितात; आणि त्या पेटीला एक दोरी बांधून ती पेटी वाऱ्यावर टांगून ठेवून ती वरचेवर हालवितात, म्हणजे कांहीं वेळानें कोंडा व सुया सुकून कोरड्या होतात.

मग त्यांच्या मती लावितात, आणि त्या सर्वांचीं टोंकें एकीकडे करून रहाटाच्या योगानें एक कुरुंदाची सहाण फिरत असते तेजवर तीं घांसून साफ करितात. नंतर दोनशें पन्नास दोनशें पन्नास सुयांचें एकेक पुडकें बांधितात.

---

## पृथ्वीचा आकार.

पृथ्वीचा आकार गोल आहे, परंतु केवळ गोल नाहीं; तर दक्षिण भागीं व उत्तर भागीं किंचित् चपटा आहे. पृथ्वीला उपमा नारिंगाची आहे. जसें नारिंग दोनशेवटांकडे किंचित् चपटें असतें, तशी पृथ्वी आहे. पृथ्वी गोलाकार आहे ह्यास चार प्रमाणें आहेत. तीं अशीं.

पहिलें प्रमाण. इसवी सन १५२० ह्या वर्षी स्पेनदेशांतून मागेलन नामें एक पुरुष जाहाजांत बसून पूर्वेकडे गेला, आणि पुढें तसाच जातां जातां ११२४ दिवसांनीं तो पृथ्वीची प्रदक्षिणा करून पुन्हा स्वदेशीं आला. त्यानंतर इंग्लंदांतले आणि दुसरे देशांतले लोक, कितीएक पूर्वेकडून आणि कितीएक पश्चिमेकडून, प्रदक्षिणा करिते झाले. सुमारें सत्तर वर्षांपूर्वी कपतान कूक म्हणून कोणी मोठा विख्यात साहेब होऊन गेला त्यानें दोन तीन वेळ पृथ्वीची प्रदक्षिणा केली. आतां पृथ्वीची प्रदक्षिणा करणें इतकें सुगम झालें आहे कीं व्यापारी लोकांचीं गलबतें नऊ महिन्यांत पृथ्वीची प्रदक्षिणा करून परत येतात. ह्यावरून दिसतें कीं जर पृथ्वी गोल नसती तर गलबत मागें फिरविल्यावांचून लोकांस स्वदेशीं कोणत्याही प्रकारें येववलें नसतें.

दुसरें प्रमाण. समुद्रांत फार लांबून जेव्हां गलबत आपणा

कडे जवळ येऊं लागतें, तेव्हां त्याचे सर्व अवयव आपणांस दिसत नाहींत, शिडाचा शेंडा मात्र दिसतो; मग जसें जसें तें जवळ येतें तसे तसे त्याचे खालचे अवयव दिसूं लागतात. तसेंच गलबत कांठा जवळ जाऊं लागलें म्हणजे आंतील लोकांस प्रथम तीरची उंच भूमि मात्र दिसते, मग दिसत दिसत झाडें, घरें, इत्यादि दिसूं लागतात. ह्यावर जर कोणी म्हणेल कीं, जसा समुद्रांतून पृथ्वीचा गोलरूप आकार दिसतो तसा भूमीवरून कां दिसत नाहीं? तर ह्याचें कारण असें कीं, डोंगर, झाडें, वगैरे ह्यांनीं पृथ्वी व्यापिलेली आहे, तेणेंकरून दृष्टीस प्रतिबंध होतो. जर असा प्रतिबंध नसता, तर पृथ्वीची गोलरूप आकृति उघड दृष्टीस पडती. ह्यास प्रत्यक्ष प्रमाण, तार्तरी म्हणून हिमालयाच्या उत्तरेस झाडांवांचून एक सपाट देश आहे, तेथें दोन मनुष्य दुरून समोरासमोर येत असले तर त्यांस प्रथम एकमेकांचीं डोकीं मात्र दिसतात; मग ते दोघे जसे जसे जवळ येऊं लागतात, तसे तसे त्यांस परस्परांचे बाहु दिसूं लागतात, आणि शेवटीं पाय दिसतात. ह्यावरून निश्चय होतो कीं पृथ्वीचा आकार गोल आहे.

तिसरें प्रमाण. पृथ्वी ज्यावेळीं चंद्र व सूर्य ह्यांच्या मध्यें येते, त्यावेळेस तिची छाया चंद्रावर पडून चंद्रास ग्रहण लागतें. ती पृथ्वीची छाया नेहमीं वर्तुळाच्या खंडाच्या आकाराची दृष्टीस पडते. ह्यावरून स्पष्ट होतें कीं जर पृथ्वी गोल नसती तर तिची छाया नेहमीं वर्तुळखंडाच्या आकाराची कोठून पडती? जर कोणी म्हणेल कीं; पृथ्वीवर कोठें कोठें उंच उंच पर्वत आहेत, आणि कोठें कोठें खोल खोल डोह आहेत, तेव्हां पृथ्वी गोल

कशी म्हणतां? तर त्याचें उत्तर असें कीं, नारिंगाचा पृष्ठभाग केवळ सपाट नसतो तरी त्यास वर्तुळ म्हणतात, त्या रीतीनें पृथ्वी गोल जाणावी. पृथ्वीवर हिमालया इतका उंच पर्वत दुसरा नाहीं, त्याची उंची पांच मैल आहे, आणि पृथ्वीचा व्यास सुमारें ८००० मैल आहे, म्हणून हिमालयाची उंची त्या व्यासाच्या सोळाशांव्या वांट्या इतकी आहे, तेव्हां असे लहान उंचवट्यांनीं पृथ्वीच्या गोलपणास कांहींच उणेपणा येणार नाहीं.

चवथें प्रमाण. ब्रह्मसिद्धांत, सूर्यसिद्धांत, सिद्धांतशिरोमणि, इत्यादि पुरातन ग्रंथ आहेत, त्यांत लिहिलें आहे कीं, पृथ्वी कदंबाच्या फुलाच्या आकाराची आहे. ही गोष्ट यूरोपखंडांतील ज्योतिषी लोकांसही संमत आहे, आणि ही गोष्ट प्रत्यक्ष प्रमाणावरूनही सिद्ध होते, ती अशी, ह्या ग्रंथावरून ग्रहणादिकांचें गणित वर्तवून पंचांगांत लिहितात तें त्याप्रमाणें प्रतीतीस येतें. ह्या वरून निश्चय होतो कीं पृथ्वीची आकृति गोलच असावी; दुसरी आकृति संभवत नाहीं.

पृथ्वी गोल आहे ही कल्पना प्राचीनकाळच्या विद्वानांच्या मनांत आली होती. त्यांनीं असा तर्क काढिला कीं, पृथ्वी पाहिली असतां सपाट दिसते खरी, आणि सपाटच आहे असें बहुतेकांस वाटतें खरें, परंतु सपाट म्हणतां येत नाहीं, कांकीं जर पृथ्वी सपाट असती, तर सूर्य, चंद्र, किंवा इतर तारे उगवले असतां पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत पृथ्वीच्या पाठीवर जे जे लोक आहेत त्या सर्वांस ते एका क्षणींच दिसते; पण तसें होत नाहीं. पूर्वेकडे जे लोक आहेत त्यांस सूर्यादिकांचे उदय अगोदर होतात, आणि पश्चिमेकडे जे लोक आहेत त्यांस मागून होतात. पूर्वेकडील लोकांस सूर्याचा अस्त झाला तरी पश्चिमेकडील लोकांस सूर्य दिसतो,

आणि जसें जसें पश्चिमेस जावें तसा तसा सूर्याचा उजेड अधिक वेळ राहतो. ह्या गोष्टीला कारण पाहिलें असतां पृथ्वीच्या पाठीला वांक आहे ह्यावांचून दुसरें कारण संभवत नाहीं. ह्यावरून त्या विद्वान् लोकांनीं असा सिद्धांत केला कीं, पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत पृथ्वी गोलाकार असावी. तसेंच उत्तरे पासून दक्षिणेपर्यंत पृथ्वीचा आकार कसा असावा ह्याविषयीं विचार करितां त्यांनीं तर्क केला कीं, कोणत्याही स्थलापासून जसें जसें उत्तरेकडे जावें, तसा तसा उत्तर ध्रुवाचा तारा आपल्या मस्तकावरच्या भागाकडे येऊं लागतो, आणि जसें जसें दक्षिणेस जावें, तसा तसा तो खालीं जातो आणि जसें जसें उत्तरेकडे किंवा दक्षिणेकडे जावें तसे तसे ओळखीचे तारे दिसतनासे होऊन अनोळखीचे तारे दृष्टीस पडूं लागतात. ह्यावरून असा सिद्धांत केला कीं, उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत देखील पृथ्वी गोलाकारच आहे. सर्व ठिकाणीं असेंच अनुभवास येतें, म्हणून पृथ्वीचा आकार गोलच आहे असें सिद्ध होतें.

---

## अभंग तुकारामाचे.

मुख्य ते पाहिजे गळालीअहंता ॥ उपदेश घेतां सुखवाटे ॥१॥
व्यर्थ भराभर केलें पाठांतर ॥ जोंवरी अंतर शुद्ध नाहीं ॥ २ ॥
घोडें काय थोडें वागवीतें ओझें ॥ भावावीण वांझें पाठांतर ॥ ३ ॥
तुका म्हणे धरा निष्ठावंत भाव ॥ जरी तुम्हां देव पाहिजे तो ॥४॥

---

आपुलिया बळें नाहीं बोलवत ॥ सखा भगवंत वाचा त्याची ॥१।
साळुंकी मंजूळ बोलतसे वाणी ॥ शिकविता धणी वेगळाची ॥२।
काय म्यां पामरें बोलावीं उत्तरें ॥ परी विश्वंभरें बोलवीलें ॥ ३ ।

तुका म्हणे त्याची कोण जाणे कळा ॥ वागवी पांगुळा पायावीण ॥ ४ ॥

---

नाहीं निर्मळ जीवन ॥ काय करील साबण ॥ १ ॥
वंध्ये न होती लेंकुरें ॥ काय कीजे त्या भ्रतारें ॥ २ ॥
वृक्ष नेदी फळ ॥ काय करी वसंतकाळ ॥ ३ ॥
तुका म्हणे भक्तीवीण ॥ फळ कांहीं नाहीं जाण ॥ ४ ॥

---

भावें गावें गीत ॥ शुद्ध करोनियां चित्त ॥ १ ॥
जरी व्हावा तुज देव ॥ तरि हा सुलभ उपाव ॥ २ ॥
करीं मस्तक ठेंगणा ॥ लागे संताच्या चरणा ॥ ३ ॥
अणीकाचे कानीं ॥ गुणदोष मना नाणीं ॥ ४ ॥
तुका म्हणे फार ॥ थोडा करीं उपकार ॥ ५ ॥

---

देव वसे ज्याचे चित्तीं ॥ त्याची धरावी संगती ॥ १ ॥
ऐसें आवडतें मना ॥ देवा पुरवावी वासना ॥ २ ॥
होवो संतजना भेटी ॥ नहो अंगसंगतुटी ॥ ३ ॥
तुका म्हणे जिणें ॥ बरवें संतसंघट्टणें ॥ ४ ॥

---

हेंचि देवाचें दर्शन ॥ सदा राहे समाधान ॥ १ ॥
माना अपमानाचे गोवें ॥ अवघे गुंडाळुनि ठेवावे ॥ २ ॥
सदा शांती राहे वस्ती ॥ तेथें खुंटे काळगती ॥ ३ ॥
तुका म्हणे थोडें आहे ॥ आली ऊर्मी साहुन राहें ॥ ४ ॥

---

## त्रागाविषयीं गोष्ट.

राजपुतान्यांत फार वर्षे राहिलेला, व तेथें फार प्रसिद्ध झालेला, आणि सर्व लोकांचा लोभ ज्यानें संपादिला होता असा जो कर्नल

ताद साहेब ह्यानें रजपूत लोकांविषयीं व आपल्या चरित्रा विषयीं मोठा ग्रंथ केला आहे, त्यांत त्राग्याविषयीं एक गोष्ट त्यानें लिहिली आहे, ती अशी. त्या देशांत व्यापारासाठीं धान्य व मीठ ह्यांच्या इकडून तिकडे खेपा करणारे भाट, म्हणजे चारण, असतात, ह्या लोकांची त्या देशांत मान्यता फार आहे. ह्यांनीं एखादा शाप दिला तर तो खचीत बाधावयाचा, अशी सर्वांची समजूत असते; ह्यामुळें रजपूत लोक, ठाकूर, भिल्ल, कोळी, वगैरे सर्व त्यांस भितात, त्यांस उपद्रव करीत नाहींत; म्हणून त्यांच्या व्यापाराच्या खेपा निर्भयपणें पार पडतात. त्यांच्या संगतीनें दुसरा कोणी ग्रामांतरास गेला तर त्यालाही उपद्रव होत नाहीं. ह्या चारण लोकांमध्यें त्रागा करण्याची चाल फार आहे; म्हणजे त्यांनीं कोणापाशीं कांहीं मागितलें असतां जर तें मिळालें नाहीं, तर ज्यानें नाहीं म्हटलें त्यावर आपले हत्येचें पाप घालण्याकरितां ते आपला जीव देतात. हा ताद साहेब त्या देशांत होता त्यावेळेस एक पायमा म्हणून चारणलोकांचा नाईक होता त्याजपाशीं चाळीस हजार बैलांचा तांडा होता. त्या पायमा नाइकाचा आणि मेवाडच्या राण्याचा जकातीबद्दल तंटा पडला. पायमा नाइकाचें म्हणणें कीं, आम्हांला जकातीची अगदींच माफी असावी. राण्याच्या मनांत कीं, जितके व्यापारी माझ्या देशांतून माल घेऊन जातात तितक्या साऱ्यांनीं कांहींतरी जकात द्यावी. ह्या कामांत पायमा नाइकानें राण्यास फार त्रास दिला. राणा कधीं स्वारीस बाहेर निघाला, तर त्या नाइकानें त्याला गांठून, पाठीस लागून, जकातीची माफी मागत असावें. असे पुष्कळ दिवस गेले तरी राण्यानें माफी दिली नाहीं. शेवटीं नाइकानें राजवाड्यासमोर

धरणें देऊन बऱ्या गोष्टीनें जकातीची माफी द्या, नाहीं दिली तर मी त्रागा करीन, अशी राण्यास धमकी दिली. राणा अशा गोष्टी-विषयीं फार भित्रा होता, म्हणून त्याला मोठी पंचाईत पडली. तेव्हां त्यानें रेसिडेंत साहेबाकडे, म्हणजे ह्या ताद साहेबाकडे, सांगून पाठविलें कीं, ह्यावेळेस आपण मध्यस्थ होऊन पायमा नाइ-काची तोड पाडावी. मग साहेबानें ह्या गोष्टीची तोडजोड करण्या-करितां त्या नाइकाकडे व त्याच्या लोकांकडे बोलावणें पाठविलें. तेव्हां भले धिप्पाड, दांडगे, धष्टपुष्ट, असे ते लोक साहेबाकडे आल्यावर त्यांशीं साहेबाचें पुष्कळ बोलणें झालें. शेवटीं साहे-बानें एकच सांगितलें कीं, मेवाडच्या घाटानें जाण्यायेण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांनीं जकात द्यावी, हें वाजवी आहे; ह्यांत जुल-माची गोष्ट नाहीं. माफी मिळविण्याची जी तुम्हीं वाट योजिली आहे ती अगदीं वेडेपणाची आहे. त्या वाटेनें तुमचें कार्य सिद्धीस जाणार नाहीं. आतां तुमच्या हिताची मी एक गोष्ट तुम्हांस सांगतों. राणेसाहेबांनीं जो जकातीचा कायदा ठरविला आहे त्याप्रमाणें जकात देण्यास कबूल होऊन लिहून द्याल तर तुमच्या तांड्यांत चाळीस हजार बैल आहेत त्यांपैकीं पांचशें बैलांची सूट तुम्हांस मिळेल, आणि तुमचा वडिलोपार्जित जो भामनी गांव तुमच्या वडिलांपासून फार वर्षें सरकारांत जप्त आहे तो तुम्हांस परत मिळेल. ह्या गोष्टीस तुम्ही राजी असाल, तर राणेसाहेब त्याप्रमाणें करतील. राजी नसाल, तर हीं मेजावर हत्यारें पडलीं आहेत हीं घेऊन खुशाल त्रागा करा, उशीर करूं नका. साहे-बानें आणखी सांगितलें कीं, मागें राणा अमरसिंग ह्यानें तुमच्या वडिलांस देशपार केलें होतें, त्याप्रमाणें तुम्हांस शिक्षा मिळून

शिवाय तुमचा तांड्यांचा तांडा जप्त व्हावा, असें मी राणेसाहेबांस सांगून करवीन. पायमा नाईक शहाणा व समजूतदार होता, त्यानें पांचशें बैलांची माफी व भामनी गांव परत मिळावा ही गोष्ट पतकरली. तेव्हां राण्यास संतोष वाटून त्याच दिवशीं त्यानें पायमा नाइकास सोन्याचें कडें व भामनी गांवची सोडचिठ्ठी दिली.

भामनी गांव जप्त झाला असें वर लिहिलें त्याची गोष्ट अशी आहे. पहिला अमरसिंग राणा ह्याच्या कारकिर्दीस त्या गावांतील ह्या पायमा नाइकाच्या पूर्वजानें राण्यापाशीं दुराग्रहानें कांहीं मागितलें. तें राण्यानें दिलें नाहीं म्हणून त्यानें फारच दांडगाई केली. शेवटीं आपल्या लोकांपैकीं कांहीं म्हातारे व तरणे पुरुष, व कांहीं बायका, व कांहीं मुली, मुलगे ह्यांचा मोठा समाज जमवून राजवाड्यांत जाऊन मोठी गर्दी केली, आणि राण्याच्या माथीं हत्येचें पाप घालण्यासाठीं त्यांतून एशीं मनुष्यांनीं त्रागा करून जीव दिले. त्यावेळीं राणा साधारण धैर्याचा मनुष्य असता, तर हें घोर कृत्य पाहून घाबरेपणानें त्याच्या बुद्धीस भ्रम झाला असता. कांकीं, महाराष्ट्र देशांतील लोक ब्राह्मणांच्या हत्येला जसे भितात ह्याप्रमाणें, किंबहुना जास्त, रजपूतलोक भाटाच्या हत्येला भितात. परंतु अमरसिंग हा मोठ्या धैर्याचा होता, त्याला ह्या गोष्टीची कांहींच धास्ती पडली नाहीं. त्यानें भामनी गांवचे जितके भाट होते तितके हद्दपार केले, आणि त्यांचा तो भामनी गांव सरकारांत जप्त केला. तो गांव पायमा नाइकाच्या वेळेपर्यंत तसाच जप्त होता.

---

## फिरून यत्न करून पहा.

गोविंदा ह्या नांवाचा एक लहान मुलगा होता तो पतंग

उडविण्याकरितां त्याला भुईवर फरफटत ओढओढून दमला, आणि त्याचा सारा श्रम व्यर्थ गेला; तेव्हां तो आपला भाऊ रामा ह्यास म्हणाला, अरे रामा! माझ्या पतंगाला एक वेळ झोंका देशील कायरे? रामा भला होता, त्यानें तो पतंग उचलून घेऊन आकाशीं झोंकून दिला; परंतु त्या झोंकण्यासरशी धांवण्याची हयगय गोविंदानें केल्यामुळें पतंग फिरून भुईवर पडला. हां, हां, पहारे कसा तूं अडाणी आहेस, असें गोविंदा बोलला. रामानें उत्तर केलें कीं, ही केवळ तुझीच चूक आहे.

त्यांचा चुलता जवळ होता तो म्हणाला, मुलांनो, फिरून यत्न करून पहा. मग रामानें आणखी एकवेळ पतंग उचलून घेतला. ह्यावेळेस गोविंदा फार उतावळा होता; तो एकाएकीं पळत सुटला, म्हणून रामाच्या हातांतून पतंग निसटून जाऊन भुईवर पालथा पडला.

रामा म्हणाला, आतां कोणाकडे दोष आहे बरें? चुलता म्हणाला, फिरून यत्न करून पहा. मग त्यांनीं फिरून पहिल्यापेक्षां जपून पतंग उडविण्याचा यत्न केला.

रामानें पतंग वर झोंकिला, इतक्यांत आडवा वारा येऊन त्याबरोबर जाऊन तो एका झुडपाशीं लागला, तों त्याचें शेंपूट झुडपास गुंतून, त्याचा माथा खालीं होऊन तो लोंबत राहिला.

गोविंदा मोठ्यानें म्हणाला, पहा, आतां त्वां एके बाजूस झोंका दिला, त्यानें असें झालें. ह्याचें उत्तर रामानें दिलें कीं, वारा सारखा वहावा हीं माझ्या स्वाधीनची गोष्ट आहेना?

इतक्यांत चुलता पतंगास हात द्यावयास गेला, आणि शेंपटाचा गुंता काढून, तें गुंडाळून घेऊन म्हणाला, चला मुलांनो, येथें झाडें

पुष्कळ आहेत; मैदानांत आपण जाऊं, मग तुम्ही फिरून यत्न करून पहा.

तेंव्हां ते तिघे लागलेच चांगल्या हिरव्याचार मैदानांत गेले. मग सगळ्या गोष्टींची तयारी झाल्यावर गोविंदा दोरी धरून धांवत सुटला, तों चुलत्यानें पतंगास वर झोंका दिल्यावर तो विमानाचे डौलानें वर चालला.

तो फार वर जावा असें त्यांच्या मनांत होतें, परंतु पतंग दोरीला फार ओढूं लागला म्हणून गोविंदा वरची मौज पाहण्याकरितां थबकून राहिला, तों दोरी ढिली पडून पतंग गोते खाऊं लागला, आणि वारा फार अनुकूळ नव्हता, म्हणून पतंग फिरून खालीं मैदानावर पडला.

चुलता बोलला, अरे गोविंदा, तुला थांबून रहावयाचें काम नव्हतें; असो, फिरून यत्न करून पहा.

गोविंदा अमळ फुरगुटून म्हणाला, मी फिरून नाहीं यत्न करून पाहणार. फिरून यत्न करण्याचा उपयोग नाहीं, असें तुम्हांस दिसतेंच आहे. पतंग उडत नाहीं; आणखी नको मला त्याची पीडा.

चुलता म्हणाला, छी, छी, माझ्या लहानग्या. आपण पतंग उडविण्याचे इतके श्रम घेतले, आणि आतां तूं खेळ सोडून देतोस काय? दोनचार वेळ उद्योग फसला, म्हणून आपलें धैर्य खचूं नये. चल, तुझी दोरी मीं गुंडाळली आहे; आतां फिरून यत्न करून पहा.

त्यानें फिरून यत्न करून पाहिला, आणि त्याचा उद्योग सिद्धीस गेला; कां तर वाऱ्यास कांहीं ओझें नहोतां जसें पांख-

राचें पीस वर जातें, तसा पतंग वाऱ्याबरोबर वर गेला. सगळी दोरी संपल्यावर गोविंदा काठी बळकट धरून आभाळांत लहानशा पांढऱ्या ठिपक्याप्रमाणें पतंग दिसत होता तो पाहून मोठा आनंद पावला.

' काका, काका, हा किती उंच गेला आहे पहा! गाडीच्या घोड्याप्रमाणें पतंग ओढ घेत आहे, ह्याची दोरी धरून ठेवण्यास मला फार कठीण पडतें. अर्ध कोस लांबीची दोरी असती तर बरें होतें; मला खचीत वाटतें कीं ती सगळी संपली असती.

डोळे भरून ती मौज पाहिल्यानंतर गोविंदा हळूहळू पतंगाची दोरी गुंडाळूं लागला; आणि पतंग पडल्यावर मोठ्या उत्साहानें तो उचलून म्हणाला, ह्याला कांहीं धक्का लागला नाहीं, हा फार चांगला उडाला. तो चुलत्यास म्हणाला, काका, उद्यां आमचा धडा झाल्यावर आपण बाहेर येऊंना? आणि पतंग उडविण्याचा फिरून यत्न करून पाहूंना?

चुलता म्हणाला, माझ्या लाडक्या, पाऊस नसला तर मी खुशीनें येईन. आतां आजच्या खेळापासून तूं काय शिकलास तें आपण घराकडे जातां जातां मला सांग.

गोविंदा म्हणाला, मी आपला पतंग चांगल्या रीतीनें उडवावयास शिकलों. रामा म्हणाला, दादा, ह्या गोष्टीविषयीं तूं काकाचा आभारी आहेस, कांतर फिरून यत्न करून पाहण्याविषयीं जर त्यानें तुला समजाविलें नसतें, तर त्वां खेळ केव्हांच टाकून दिला असता.

चुलता म्हणाला, होय माझ्या लाडक्यांनो, केवळ पतंग उडवणें ह्यासारखें लहान जरी काम असलें तरी धैर्य धरण्याचा

मोठा उपयोग आहे, हें तुम्हांस शिकविण्याची माझी इच्छा आहे. चांगलें काम करण्याविषयीं जर तुमचे उद्योग कधीं फसले, तर फिरून यत्न करून पहा, हें माझें वाक्य तुमच्या ध्यानांत असावें.

---

## खरें धैर्य.

दोन लहान मुलगे भाऊ भाऊ होते, त्यांच्या एका खेळगड्याचा वाढदिवस आला होता, म्हणून त्याचे घरीं मुलांची चार मंडळी बोलाविली होती; ह्यास्तव ह्यांस बोलावणें आल्यावरून हे दोघे मुलगे त्या आपल्या खेळगड्याच्या घरीं गेले. त्यांच्या आईबापांनीं, आठ वाजतां घरीं परत यावें, म्हणून त्यांस ताकीद केली होती. मुलांचा मोठा जमाव त्यांच्या खेळगड्याच्या घरीं मिळाला होता.

मुलें जमल्यावर पहिल्यानें त्यांनीं घराबाहेर खेळून कांहीं वेळ घालविला; त्यांस जसा हा सुखाचा वेळ गेला तसा त्यांस कधीं गेला नव्हता. त्यांनीं झाडांला वळघा मारिल्या; झोल्यांत बसून झोंके घेतले; व नाचतां बागडतां आणि नानाप्रकारचे खेळ खेळतां आनंदाच्या आरोळ्यांनीं तें सर्व ठिकाण त्यांनीं दणाणविलें. पुढें घराबाहेर त्यांस खेळतां येईना इतका काळोख पड़ल्यावर ते घराच्या आंत गेले, आणि दिवाणखान्यांत चांगली रोषनाई केली होती तेथें त्यांनीं नवेनवे खेळ मांडिले.

मोठ्या आवडीचा जो आंधळ्याकोशिंबिरीचा खेळ त्या खेळाच्या भरांत ते असतां, कोणी आंत येऊन म्हणाला, मेवामिठाई आतां यावयाची आहे, ह्यासाठीं तुम्हीं सर्वांनीं अमळ

बसावें. चाकर दार उघडून मेवामिठाईनें भरलेलें तबक घेऊन आंत येत आहे इतक्यांत आठ वाजले.

आठ वाजतां घरीं यावें, म्हणून ज्या दोन मुलांस आईबापांची ताकीद झाली होती, तीं फार खिन्न झालीं. राहण्याविषयीं जो त्यांस मोह झाला त्याचें निवारण करण्यास त्यांस मोठें संकट पडलें. तरीं वडील भावानें धैर्य धरून आपल्या शेजारच्या मुलाच्या कानांत सांगितलें कीं, मला गेलें पाहिजे. इतकें तो बोलतांच, दिवाणखान्याभर लागलाच गलबला होऊन जो तो मोठ्यानें त्याचा निषेध करूं लागला.

एकजण बोलला, मला माझी आई म्हणाली, तुला नऊवाजत तोंपर्यंत बाहेर राहण्याची परवानगी आहे. दुसरा बोलला, माझी आई मला घरीं येण्याविषयीं कांहींच बोलली नाहीं; पाहिजे तितका वेळ मी बाहेर राहिलों तरी ती कांहीं मला बोलणार नाहीं. एक दांडगा मुलगा दूर बसला होता तो म्हणाला, आईनें मला आपल्या कमरेशीं बांधिलें तरी मी घरीं रहावयाचा नाहीं. एक भित्रा मुलगा होता तो त्या उभयतांच्या घराशेजारीं राहत असे, तो त्यांजवळ येऊन तोंड वेंगाडून म्हणाला, अहो, अमळसे थांबाना बरें, मी साडेआठवाजतां घरीं जाणार आहें; मग आपण बरोबरच घरीं जाऊं; एकट्यानें अंधारांतून घरीं जाणें मला चांगलें वाटत नाहीं. घरची बाई देखील येऊन म्हणाली, मुलांनो, तुम्ही अमळसे थांबून थोडीशी मेवामिठाई खाऊन गेलां असतां तुमची आई तुम्हांला रागें भरेल, असें मला वाटत नाहीं.

असें झाल्यावर त्या बापड्या मुलांनीं काय करावें बरें? सर्वांची इतकी विनवणी त्यांनीं कशी लोटावी बरें? क्षणभर त्यांनीं राहूं न

राहूं केलें, आणि त्या मोहाला कांहींसे ते वश झाले. तरी त्यांची सद्गुणाकडची बुद्धि क्षणमात्र ढळते, तों लागलेंच त्यांनीं आपलें संपूर्ण धैर्य धरून म्हटलें, आम्हांला गेलेंच पाहिजे. मग लगबगीनें जातों हो जातों म्हणून सर्वांस सांगून जितकी त्वरा करवली तितकी करून निघाले. त्यांस हें भय पडलें कीं, जर आपण गमलों तर मोहाच्या पाशांत पडूंच. निघाल्यावर लखलखीत खिडक्यांकडे व आंतील आनंदी मुलांच्या मंडळीकडे पहावयास क्षणभर देखील ते उभे राहिले नाहींत. एकामेकांचा हात धरून जितकें त्यांच्यानें लवकर धांववलें तितके आपल्या घराकडे धांवत गेले.

ते घरीं पोहोंचले तेव्हां त्यांच्या आईबापांनीं हास्यवदन करून, आलां, बरें झालें, असें त्यांस म्हटलें. आपला हुकूम मोडण्याविषयीं त्यांस जो मोहाचा प्रसंग पडला होता तो जेव्हां आईबापांनीं ऐकिला, तेव्हां त्यांनीं मुलांकडे इतके आनंदानें डोळे भरून पाहिलें कीं, त्या पाहण्यानें मुलांच्या मनांतील तें दुःख दूर झालें. मग रात्रीं ते मुलगे निजावयास गेले तेव्हां, आम्हीं आपला पुत्रधर्म पाळिला, व आम्हीं आपल्या आईबापांस सुख दिलें, असें त्यांच्या मनांत आलें, आणि आईबापांनीं ज्या वेळेची परवानगी त्यांस दिली होती, त्यावेळेच्या पलीकडे आपल्या खेळगड्याबरोबर राहून जो आनंद त्यांस व्हावयाचा होता, त्याहून अधिक आनंद ह्या मनांत आलेल्या गोष्टीनें झाला.

वाचणाऱ्या मुलांनो, ह्या लहान मुलांच्या धैर्याचा आणि आपला पुत्रधर्म पाळण्याच्या निश्चयाचा जो हा उत्कृष्ट दाखला ह्याचा तुम्हांला आनंद व्हावा; आणि तुम्हांस तसा प्रसंग पडला असतां तुम्हीं तसेंच वागावें, म्हणजे तुम्हांस तसेंच फळ मिळेल.

# झोंप.

झोंप ही ईश्वराची मोठ्या कृपेची देणगी आहे. बहुत वेळां झोंप घेऊन तुम्हांस विश्रांति झाली आहे, तरी ह्या अवस्थे विषयीं विचार करण्यास तुम्हांला कदाचित् ही पहिलीच वेळ असेल. कोण जाणे, ह्यांत कांहीं विशेष नाहीं, असें तुम्हांस वाटत असेल; परंतु ईश्वराच्या कृपेच्या ज्या करामती आहेत त्यांतील झोंप ही एक करामत आहे, आणि तिचें मनन करण्यांत हांशील आहे.

आपणांस नकळतां आपणांस झोंप लागते, हें ईश्वराच्या शहाणपणाचें प्रमाण होय. झोंप लागण्याच्या प्रकाराचा विचार जर आपण करावयास लागलों, तर त्यानेंच झोंपेचें निवारण होतें. आपण विचार करण्याचें काम सारें बंद केल्यावांचून आपणांस झोंप लागावयाची नाहीं. झोंप नबोलावितां येते, ह्या अवस्थेंत विचाराचा कांहीं संबंध नसतो. झोंप आणण्याविषयीं आपला जितका जितका प्रयत्न अधिक, तितकी तितकी झोंप आपणांपासून दूर होते. झोंप मनुष्यास आवश्यक असून सुखकारक अशी ईश्वरानें करून ठेविली आहे, आणि ही झोंप मनुष्याच्या ज्ञान-शक्तीच्या व इच्छेच्या पलीकडेस आहे.

हा विचार अमळ पुढें चालवून, झोंप लागल्यावर आपली किती चमत्कारिक अवस्था होते ती पाहूं. जागृत असतां जे जे पदार्थ आपण पाहतों ते ते पदार्थ आपणांस नाहींतसे होतात, आणि आपण जिवंत असून जिवंत आहों हें आपणांस समजत नाहीं. हृदयाचें उडणें, रक्ताचें वाहणें, भक्षिल्याचें पचणें, निरनि-

राळ्या रसांचें उत्पन्न होणें, अशीं शरीरांतील सर्व कामें खळ नपडतां व अव्यवस्था नहोतां, यथास्थित चालतात. आपला जीवात्मा झोंपेंत अगदीं स्तब्ध, म्हणजे व्यापारशून्य, होतो; आणि जागृतअवस्थेमध्यें जे विषय मनांत भिन्न भिन्न रूपांनीं भासत असतात, ते विषय जशी जशी झोंप लागत जाते तसे तसे एकमेकांत मिसळत जातात. इंद्रियें मंद होत होत आपला व्यापार सोडितात. स्नायूंची गति मंद होतां होतां शेवटीं शरीराचा सर्व ऐच्छिक व्यापार बंद राहतो. एकून झोंपीं गेलेल्या मनुष्याची अवस्था सर्वप्रकारें चमत्कारिक आहे. तितकी चमत्कारिक दुसरी अवस्था मनुष्यास मिळावयाजोगी बहुतकरून एकच राहिली आहे. जो कोणी ह्या झोंपेचा विचार करील त्याला त्या दुसऱ्या अवस्थेची आठवण होईलच होईल. ती दुसरी अवस्था कोणती म्हणाल तर महानिद्रा, म्हणजे मृत्यु, होय. तुम्हांला नकळतां आतां जशी झोंप येते, तसें तुम्हांला पुढें नकळतां मरण येईल. त्याच्या येण्याच्या पूर्वीं तुम्ही तयार असा; राहिलेल्या वेळाचें सार्थक्य करा, आणि तुमचीं चित्तें ज्ञानमार्गाकडे वळतील असा तुम्ही आपल्या आयुष्याच्या दिवसांचा सुमार पहा.

---

## बंधुप्रीति.

इंग्लंद देशांत ग्लान्विल साहेब ह्या नांवाचा एक प्रख्यात वकील होता, त्याची गोष्ट अशी आहे कीं, त्याच्या बापापाशीं मालमत्ता पुष्कळ होती, ती वडील मुलास द्यावी असा त्याचा बेत होता; परंतु तो मुलगा दुर्गुणी निघाला, व फिरून तो वाटेवर येईल अशी आशाही राहिली नव्हती, म्हणून म्हाताऱ्यानें मरतेसमयीं ती

सर्व मालमत्ता धाकटा मुलगा जो हा ग्लन्विल साहेब ह्याला दिली. बाप जिवंत असतां तो वडील मुलास त्याच्या वर्तनावरून म्हणत असे कीं, मी तुला दौलत देणार नाहीं, धाकट्यास देईन; परंतु तें त्यास खरें वाटत नसे. त्याला वाटे कीं, म्हातारा रागावून जें बोलतो तें उगीच धाक दाखविण्याकरितां आहे; परंतु बाप मेल्यावर तें सारें खरेंच, असें त्याच्या अनुभवास आलें; म्हणून तो फार खिन्न झाला, आणि पश्चात्ताप पावून, दुर्व्यसन सोडून, चांगल्या रीतीनें वागूं लागला.

हें धाकटा भाऊ जो ग्लान्विल साहेब ह्यानें पाहून एकेदिवशीं आपल्या मित्रांस मेजवानीस बोलाविलें; त्यांजबरोबर आपल्या वडील बंधूसही भोजनास बोलाविलें. मग पक्वान्नांनीं वाढलेलीं ताटें सर्वांपुढें ठेविल्यानंतर एक झांकलेलें ताट होतें तें वडील भावापुढें ठेवून, हें ताट आपण उघडावें, असें भावास सांगितलें. त्यानें ताट उघडून पाहिलें तों तें कागदपत्रांनीं भरलेलें असें त्याच्या दृष्टीस पडलें. तेव्हां त्या वडील भावास किती आश्चर्य वाटलें असेल!

ग्लान्विल साहेब आपल्या भावास म्हणाला, बापानें जी दौलत ठेविली तिचे हे कागदपत्र आहेत. प्रस्तुत तुझी वर्तणूक चांगली झाली आहे हें आम्ही सारे पाहत आहों. अशीच तुझी वर्तणूक बाप जिवंत असतां जर त्याच्या दृष्टीस पडती, तर जी काय व्यवस्था तो करता म्हणून मला ठाऊक आहे ती व्यवस्था आज मी करणार, ह्यास्तव बापानें दिलेली सर्व मालमत्ता मी आपल्या खुशीनें तुझ्या स्वाधीन करितों. असें म्हणून सर्वांदेखत सारी मालमत्ता त्यानें वडील भावास दिली.

**दुसरी गोष्ट.** गोंवें हें हिंदुस्थानांत पोर्तुगीज लोकांच्या मोठ्या भरभरीचें स्थान होतें. त्या गोंव्यास जाण्याकरितां सन १५८५ ह्यावर्षीं पोर्तुगीज लोकांनीं लिसबोन नांवाच्या शहरापासून गलबतें हांकारिलीं; त्यांपैकीं एका गलबतावर खलाशी व नोर देऊन जाणारे लोक मिळून बाराशें मनुष्यांत कमी नव्हतीं. गलबत निघून चालतें झाल्यावर तें प्रथम सुरळीत चाललें होतें, परंतु फार दिवस गेल्यावर त्या गलबतावरच्या सुकाण्याच्या हेंकडपणामुळें तें गलबत खडकावर लागलें, तेव्हां तत्क्षणींच त्या लोकांवर मृत्यूनें डोळे वटारिले, म्हणजे एका क्षणांत आपणांस मरण येतें असें त्यांस वाटलें. असें होतें तों इतक्यांत जहाजावरील कपतानानें, समुद्रांत होडी टाका म्हणून हुकूम देऊन, होडी टाकविली, आणि तींत कांहीं अन्न टाकवून एकोणीस मनुष्यांनिशीं आपण होडींत उडी घातली. नजाणो होडी बुडेल, ह्या भयानें त्या मनुष्यांनीं हातांत तरवारी घेऊन होडींत दुसऱ्या मनुष्यांस येऊं दिलें नाहीं.

ह्याप्रमाणें त्यांचा सरंजाम थोडा, मार्ग शोधून काढायास साधन होकायंत्र जवळ नाहीं, दैववशात् जो पाऊस पडणार त्याखेरीज गोडें पाणी होडींत नाहीं, असें असतांही त्यांनीं हिंदीमहासागरांत ती होडी हांकारिली. चार पांच दिवस झाले तों कपतान आजारी पडून मृत्यु पावला; तेव्हां अव्यवस्था न व्हावी, आणि कोणीएक नियंता असावा, म्हणून त्या मनुष्यांस आपणांपैकीं कोणाएकास मुख्य नेमणें जरूर पडलें. मग नव्या नेमिलेल्या कपतानानें पाहिलें तों बहुतेक अन्न खर्चिलें, आतां फार तर तीन दिवस निभावतील इतकें उरलें आहे; असें पाहून त्यानें ही युक्ति काढिली कीं, चिठ्या टाकून दर चवथ्या चिठीस

त्याचें नांव निघेल त्याला होडीवरून खालीं पाण्यांत लोटावें. हें त्याचें म्हणणें सर्वांनीं मान्य केलें. तेव्हां नवा कपतान, एक उपाध्या, आणि एक सुतार, ह्या तिघांस सर्वांच्या अनुमतानें माफी मिळाली होती, म्हणून राहिलेले सोळाजणांतून चारजणांस मरणें भाग पडलें.

चिठ्ठ्या निघाल्यावर तीन मनुष्यांनीं दुर्दैवानें जें काय प्राप्त झालें तें भोगिलें, म्हणजे पाण्यांत उड्या टाकून मृत्यु पावले. चवथी पाळी पोर्तुगाल देशाचा एक गृहस्थ त्यांत होता त्याजवर आली, तेव्हां त्याला होडींतून ढकलणार इतक्यांत त्याचा धाकटा भाऊ त्याच होडींत होता त्यानें मोठ्या कळवळ्यानें आपल्या भावाच्या गळ्यास मिठी घातली, आणि डोळ्यांत आंसवें आणून त्याला विनंती केली कीं, तुझ्याबद्दल मला मरण्याची आज्ञा दे.

त्याविषयीं त्यानें बहुत कारणें दाखविलीं कीं, तुझ्या मागें कुटुंब आहे, आणि गोंव्यास तुझीं बायकोमुलें वाट पाहत असतील; ह्याखेरीज आपल्या तीन बहिणी आहेत त्यांचा सर्व भार तुजवर आहे, त्यांचा संभाळ तुलाच केला पाहिजे. मी काय एकटा फटिंग आहें, बायकोनापोर. मी मेलों तरी कांहीं चिंता नाहीं; आणखी तुझ्या वांचून म्यां जगावें त्यापेक्षां मरावें हें बरें. असें बोलून तुझ्याबद्दल मला मरणाची परवानगी दे, म्हणून भावाला त्यानें शपत घातली.

असें त्याचें औदार्य व धैर्य पाहून वडील भाऊ थक झाला, आणि गहिंवर येऊन म्हणाला, ईश्वरेच्छेनें हें मरण माझ्या वांट्यास आलें आहे, तर माझ्या मरणाबद्दल दुसऱ्यानें मरावें हें अनुचित आहे; तशांत तूं माझा भाऊ, तुझे मजवर फार उपकार

आहेत, तेव्हां माझ्याबद्दल तुला मरण्यास मी कसा अनुमोदन देईन? इतकें सांगितलें तरी तो धाकटा भाऊ ऐकेना. त्यानें वडीलभावाच्या पायांस इतकी बळकट मिठी मारिली कीं त्या सर्व मंडळीच्यानें ती सोडवेना.

ह्याप्रमाणें कांहीं वेळ संभाषण झाल्यावर वडील भावानें धाकट्यास समजावून सांगितलें कीं, आतां माझ्या मुलांचा तूंच बाप हो, आणि माझी बायको व बहिणी ह्यांचा संभाळ तूंच कर; असें त्यानें सांगितलें तरी तो धाकटा भाऊ आग्रह सोडीना. शेवटीं वडीलभावानें आपल्या धाकट्या भावाचा बंधुधर्म पाहून आपला आग्रह सोडिला, आणि आपल्याबद्दल शूर व तरुण अशा आपल्या धाकट्या भावास मरावयास आज्ञा दिली. तदनंतर धाकट्या भावास होडीवरून खालीं पाण्यांत लोकांनीं लोटून दिलें. आतां ही गोष्ट सांगणें योग्य आहे कीं, हा बंधुधर्मतत्पर मनुष्य पाण्यांत लोटिला असतां मरण पावला नाहीं; ह्यास कारण असें झालें कीं, ह्यास पाण्यांत लोटिल्यावर लागलीच जमीन दुरून दृष्टीस पडली. इतक्यांत मंडळीनें त्याला होडीवर घेण्याविषयीं यत्न करून वर घेतलें; नंतर थोड्याच वेळानें मोजांबीक सामुद्रधुनीच्या तीरास ते सारे सुरक्षित येऊन पोहोंचले.

---

आर्या.

## दुःशासन वध.

धांवति अन्योन्यावरि ते दोघे आठवूनि अपकारें ॥
जाणों ते मदमत्त क्रोधोद्धत दंपतीर्चे अपकार ॥ १ ॥
दुःशासन शर मर्मीं लागे नागेशसा असुखें रचिता ॥

मूर्छित करि भीमातें इतरांचे तो पळें असुं खरचिंता ॥ २ ॥
सावधहोउनि भीम क्षिप्र महाशक्ति शत्रुवरि सोडी ॥
तीसहि तो दुःशासन दशबाणांहीं पराक्रमें तोडी ॥ ३ ॥
तेव्हां गदाप्रहारें भीम ललाटीं स्वशत्रुला ताडी ॥
क्षितिवरि हरिवज्राहत गिरिशिखर जसें तसें तया पाडी ॥४॥
पत्नीचा केशग्रहसमय स्मरला निजप्रतिज्ञा ते ॥
आठवि म्हणे म्हणोत न मिथ्यावादी मजप्रति ज्ञाते ॥ ५ ॥
वृषनृपकृपकृतवर्मद्रोणसुतांतें म्हणे अहो परिसा ॥
दुःशासनास वधितों मी भीम गजासि धोपलो हरिसों ॥ ६ ॥
शक्ति असेल तरि तुम्ही रक्षा, मी आपुली प्रतिज्ञा ती ॥
संरक्षितों कराया स्वर्गीं संतृप्त संप्रति ज्ञाती ॥ ७ ॥
ऐसें गर्जोनि उडी टाकी स्वरथा वरूनि कलितांसी ॥
तो भीम भीमकर्मा गांठी त्या रिपुसि भूमिगलितांसी ॥ ८ ॥
गरुड जसा गगनांतुनि वेगें उतरोनि पन्नगा झडपी ॥
तैसा भीम बळानें दुःशासनकंठ अंघ्रिनें दडपी ॥ ९ ॥
भीमविदारी खड्गें सहजपरमकठिण शत्रुचें उर तें ॥
वाटे पविपातींहीं त्यासांध्मीला न गांजिता उरतें ॥ १० ॥
अशनिहत शिळातळ जळ रक्त तसें खड्गभग्न तें उर वी ॥
तृषित घटोत्कचतात प्राशी शोणित न लेशही उरवी ॥ ११ ॥
मग कंठनाळ चरचर तो सत्य करावया बिरुद कापी ॥
देउनि मिटक्या मटमट घटघट त्या स्वाहितासृगुदका पी ॥ १२ ॥
जे जे लोकीं असती रस त्यांचीं तो न माधुरी थोडी ॥
परि अरिच्या रक्तरसीं मज बहु त्यांहूनि लागली गोडी ॥ १३ ॥
ऐसें वदोनि ओष्ठप्रांत जिभेनें पुनःपुन्हा चाटी ॥

अवलंबी अत्युग्रा भीम अतृप्त द्विपारिची घाटी ॥ १४ ॥
रिपु शूर दूर तेथुनि तें दारुणकर्म पाहतां पळती ॥
किति पडती किति दडती कितिएकांचीं धृतायुधें गळती ॥१५॥
जाणोत्या अत्युग्रा मूर्तश्रीनारसिंहमंत्रास ॥
पाहोनि पावले ते रिपुभट भूपाळ भूत संत्रास ॥ १६ ॥
म्हणति मनुष्य नव्हे हा राक्षस कीं काळ हा खवळला हो ॥
कीं आमुची कराया मूर्त प्रळयाग्नि राख वळला हो ॥ १७ ॥
भीम पुन्हा दुःशासनरक्तें अंजलि भरोनियां डोले ॥
मिटक्या देउनि पाहुनि कर्णसुयोधनमुखांकडे बोले ॥ १८ ॥
पीतों हें रक्त तुझें हांसत होतासि मज जसा भणगा ॥
दुःशासना तसा तूं पुनरपि गौगौ-स्वआननें म्हण गा ॥१९॥
काय करूं काळानें अभय दिलें घेतलासि तूं पदरीं ॥
दुःशासना कुळक्षयमूळा त्राता दुजा तुला न दरीं ॥ २० ॥
ऐसें बोलत हांसत शत्रुरुधिरदिग्धपाणिमुख निकटें ॥
प्रकट महाभैरवसा नाचत गेला जयाच्युता निकट ॥ २१ ॥

---

## सदाचरणाचें धैर्य.

हिंवाळ्यामध्यें कोणे एके दिवशीं हरी नेना आपले घरीं आला तेव्हां मोठ्या रागानें आपली पाटी खालीं टाकून देऊन तो खिडकी जवळ बसला. त्याच्या आईस त्याची चर्या नीट दिसली नाहीं, म्हणून ती त्याच्याशीं कांहीं बोलली नाहीं. तुला काय झालें, असें आई आपणास विचारील असें पहिल्यानें हरीस वाटलें होतें; पण ती कांहींच बोलली नाहीं तेव्हां त्याच्यानें बोलल्याशिवाय राहवेना. मग तोच बोलूं लागला.

हरी.— विठू गोरा हा फार खट्याळ आहे; त्याचें मला पुन्हा दर्शन देखील नको.

आई.— कोण विठू गोरा? आणि त्यानें तुझें काय केलें?

हरी.— तो नुकताच शाळेंत येऊं लागला आहे; त्याला येऊन पुरते पंधरा दिवस देखील झाले नाहींत. तो कोठें तरी निघून जाईल तर फार बरें होईल; कारण त्याचें पुन्हा दर्शन घेऊंनयेसें मला वाटतें. आज सकाळीं मी त्याला बोललों कीं, तुझा भोंवरा क्षणभर मला दे; तेव्हां तो मला म्हणाला कीं, मीं भोंवरा दिला तर तुला शाळेंत यावयास उशीर होईल, ह्याकरितां मी देणार नाहीं. मला उशीर झाला तर, आई, त्याचें काय बरें गेलें? बरें तें असो; मग आम्ही हिशेब करावयास लागलों तेव्हां माझा हिशेब झाला नव्हता म्हणून मीं त्याला म्हटलें कीं, त्वां हिशेब कसकसा केला आहे तो मला पाहूं दे. तो म्हणाला कीं, एकमेकांच्या पाट्या पाहून उतरणें हें बरोबर नाहीं, ह्याकरितां मी आपली पाटी तुला दाखविणार नाहीं. त्याच्या मनांत काय होतें तें मी समजलों. त्याला वर्गामध्यें पहिला नंबर पाहिजे होता, म्हणून त्यानें आपला हिशेब मला पाहूं दिला नाहीं.

हरीच्या आईनें त्यावेळेस कांहींच उत्तर केलें नाहीं; पण जेव्हां तो वृत्तीवर आला, आणि निजायाला जाऊं लागला, तेव्हां तिनें सकाळची गोष्ट काढून मोठें प्रियकर भाषण केलें. ती म्हणाली कीं, कायरे हरी, सकाळीं विठूनें तुला भोंवरा दिला असता तर तुझें मन खेळाकडे गुंतून तुला शाळेंत जाण्याचे वेळाचें भान राहिलें नसतें, ह्याकरितां त्यानें केलें तें बरोबर केलें.

आणि त्वा त्याच्या पाटीवरून हिशेब उतरला असता, तर पंतोजीला फसविल्याप्रमाणें झालें असतें; ह्याकरितां त्याचे मनांत तुझ्याविषयीं कांहीं वाईट नसून त्वां त्याजवर रागावून त्याची कागाळी सांगितली, तें नकरितां उलटा त्याचा उपकार मानावयाचा होता, कारण सकाळीं तूं दोनवेळां वाईट काम करण्याचे बेतांत होतास, तरी त्यानें तुला तें करूं दिलें नाहीं. खेळण्याचे वेळेस तुला भोंवऱ्याची गरज लागेल तर तूं विठू गोरा ह्यापाशीं माग, आणि ज्या वेळीं तुला हिशेब करितां येणार नाहीं त्यावेळेस त्याला विचार, पण दुसऱ्याचे पाटीवरील हिशेब कधींही आपले पाटीवर उतरून घेऊं नको.

झोंपीं जाण्याचे पूर्वीं आईनें सांगितलेल्या गोष्टींचा हरीनें पुष्कळ विचार केला, आणि विठू हा खट्याळ नाहीं अशी आईचे बोलण्यानें त्याची पक्की खातरी झाली नाहीं, ह्याकरितां दुसरे दिवशीं त्याची परीक्षा पाहण्याचा त्यानें निश्चय केला. दुसरे दिवशीं शाळेंत गेल्यावर त्याला जे हिशेब तयार करावयाचे होते त्यांतला एक त्याला फार कठीण पडला, तेव्हां त्यास वाटलें कीं, विठूची परीक्षा पाहण्याला ही संधी बरी आहे. मग तो विठूपाशीं जाऊन, हा हिशेब मला समजावून सांग, म्हणून बोलला. विठूनें लागलाच फार खुशीनें आपले शक्तीप्रमाणें हरीला तो हिशेब समजावून सांगितला, आणि त्याला त्या दिवसाचा धडा समजण्याविषयींही त्यानें त्याला मदत केली. मग विठू हरीशीं बोलू लागला.

विठू०—रे हरी, मला असें वाटतें कीं, मी काल तुझ्याशीं तुटक पणानें वागलों, असें तुझ्या मनांत येऊन तुला राग आल

असेल; पण मीं तसें केलें नाहीं. तूं असें समज कीं, मला जें करावयास योग्य दिसलें तेंच मात्र मीं केलें. अशा मार्गानें वागणें हें कधीं कधीं फार कठीण पडतें खरें, तरी तसें वागण्याचा यत्न करावा असा निश्चय मीं केला आहे. मी पहिल्यानें मुलांस बहुतकरून आवडणार नाहीं, पण ते मला वास्तविक आवडतात. आणि जें काम मला अयोग्य वाटतें तें जेव्हां ते करावयास सांगतात तेव्हां मात्र मीं त्यांचें ऐकत नाहीं, असें त्यांस लवकरच दिसून येईल, मग मी त्यांला आवडेन. रे, हरी, तुझा भोंवरा मोडला आहे तो उद्यांपर्यंत नीट होणार नाहीं हें मला ठाऊक आहे, म्हणून तूं आतां माझा भोंवरा घेऊन, दोन प्रहरीं खेळ. मीं तुला फार खुशीनें भोंवरा देतों.

मग कांहीं दिवस लोटल्यावर हरीच्या आईनें त्यास विचारिलें, कायरे हरी, हल्लीं तुझें आणि विठू गोरा ह्याचें कसें आहे? मग हरी बोलला, आई, विठूसारखा तर मुलगा ह्या पृथ्वीवर विरळा. आपले सर्व कृत्यांचा परमेश्वरापाशीं झाडा द्यावा लागेल, असा विचार केल्याशिवाय तो कोणतेंही काम करीत नाहीं. पहिल्यानें मुलें त्याला हांसत असत, व नांवें ठेवीत असत, पण हल्लीं तो सर्वांस फार आवडतो, कारण तो इतका धार्मिक व गुणी असून शाळा सुटल्यावर खेळावयाला नेहमीं तयार असतो. आम्ही आपले धडे तयार करण्याकारितां झटल्यावर जें जें आम्हांस समजत नाहीं तें तें तो समजावून देतो; पण आम्हीं मुळींच यत्न केला नाहीं, तर तो कांहींच सांगत नाहीं. तो शाळेंत आहे म्हणून आमचा तेथील वेळ फार सुखानें जातो.

विठू गोऱ्याप्रमाणें सर्व मुलें धैर्य धरून सन्मार्गानें चालण्याक-

रितां झटतील, तर फार चांगलें होईल. कांहीं वेळ त्यांना हें फार कठीण जाईल; त्यांच्या मनांतला हेतु नकळल्यामुळें पहिल्यानें इतर मुलें त्यांस हंसतील; पण शेवटीं त्यांच्या शाळेंतील सर्व मुलें त्यांचा सन्मान राखून त्यांच्यावर प्रीति करितील, ह्यांत संशय नाहीं. ते ज्या ज्या शाळेंत जातील त्या त्या शाळेंतील इतर मुलांस सुख होईल; आणि त्यांच्या चांगले वर्तणुकेमुळें परमेश्वराचीही त्यांजवर फार कृपा होईल.

## अंद्रोक्लीज आणि सिंह.

प्राचीनकाळाचेठायीं यवन लेकांच्या देशामध्यें अंद्रोक्लीज ह्या नांवाचा एक मनुष्य एका गृहस्थाच्या घरीं गुलाम होता. त्याचा धनी त्यास फार छळीत असे, ह्यामुळें तो अगदीं त्रासून गेला होता; आणि त्यास असें वाटूं लागलें होतें कीं, आतां मला मरण येईल तर फार बरें होईल. त्यास आपल्या दुःखाचें निवारण करण्याचा कांहीं उपाय सुचेना, तेव्हां त्यानें मनांत असा विचार केला कीं, आपण आतां येथून पळून जावें, हाच उपाय चांगला आहे. तो आपले मनांत म्हणाला कीं, सरकारांतून मला धरणें येईल त्यावेळीं मी सांपडलों तर सरकार माझे हाल हाल करून मला ठार मारील, हें मला पक्कें ठाऊक आहे; पण जिवंत राहून हाल सोसावे ह्या पेक्षां एकदम मरावें हें फार बरें. सांपडलों नाहीं तरी मला रानांतच राहिलं पाहिजे; आणि तेथें तर भयंकर श्वापदांशिवाय दुसरे कोणाची वस्ती नाहीं; पण मनुष्य माझे जे हाल करितात त्यांपेक्षां तीं श्वापदें खचीत अधिक करणार नाहींत; ह्याकरितां लोकांचा गुलाम होऊन हाल सोसावे ह्यापेक्षां त्या पशूं वरच विश्वास ठेवावा हें बरें.

असा निश्चय केल्यावर सवड साधून तो आपले धन्याचे घरांतून निघून पळून गेला, आणि कांहीं कोसांवर मोठें अरण्य होतें त्यांतील झाडींत लपून राहिला. त्या ठिकाणींही त्या बिचाऱ्याची अशी अवस्था झाली कीं, एका संकटांतून पार पडून आपण दुसरे संकटांतच पडलों, असें त्यास वाटूं लागलें. त्या रानामध्यें मनुष्याचें वारें देखील नव्हतें. त्यांतून दिवसभर फिरत असतां त्यास वरचेवर कांटे बोंचत असत, व त्याला भूक लागली, पण त्या ओसाड रानांत खावयास कोठून मिळणार? शेवटीं तो फार थकला, आणि अगदीं निराश झाल्यामुळें, आतां मरण येईल तर फारच बरें, असें त्यास वाटूं लागलें. पुढें दैववशात् एक गुहा त्याच्या दृष्टीस पडली. तींत जाऊन तो स्वस्थ निजला.

हा बापुडा गुहेंत जाऊन फार वेळ झाला नाहीं तों त्याला मोठा भयंकर शब्द ऐकूं आला. तेव्हां, ही एका मोठ्या श्वापदाची गर्जना आहे, असें त्यास वाटून तो फार घाबरला. तो दचकून उठला, आणि कोठेंतरी पळून जावें अशा बेतानें गुहेच्या तोंडाशीं आला, तों एक मोठा भयंकर सिंह आपणाकडे येत आहे असें त्याच्या दृष्टीस पडलें. मग, आपणास आतां कोठें पळून जातां येणार नाहीं, अशी त्याची पक्की खातरी झाली. त्या बिचाऱ्यास असें वाटलें कीं, आपण आतां प्राणास खचीत मुकतों; पण तो सिंह अगदीं सावकास आपणाकडे येत आहे, आणि त्याची मुद्राही क्रूर नाहीं, असें त्यानें पाहिलें, तेव्हां त्याला मोठें आश्चर्य वाटलें. त्या सिंहानें दीनवाणा शब्द काढिला, त्यावरून त्याला मनुष्याचे साह्याची गरज आहे असें अंड्रोक्लीजास दिसून आलें.

अंद्रोक्लीज हा आत्या धारिष्टवान् होता, आणि सिंह गरीब आहे असें पाहिल्यावर तर त्याला फार धीर आला. त्या सिंहास काय होत आहे हें तो निरखून पाहूं लागला तेव्हां त्याच्या दृष्टीस असें पडलें कीं तो सिंह एके पायानें लंगडत आहे, आणि तो पाय जखम लागल्यामुळें अगदीं सुजून गेला आहे. जसजशी सिंहाची सौम्य वर्तणूक त्याच्या दृष्टीस पडूं लागली तसतसें त्याचें भय अगदीं जात चाललें. मग सिंहाच्या जवळ जाऊन वैद्य रोगाची परीक्षा करितो त्याप्रमाणें त्यानें त्या दुखावलेल्या पायाची परीक्षा केली, तेव्हां त्यास असें समजलें कीं त्या पायांत एक मोठा कांटा शिरला आहे, आणि त्यामुळेंच तो पाय सुजून लंगडा झाला आहे. तो पाय हातानें धरून अंद्रोक्लीज परीक्षा करूं लागला, तेव्हां त्या सिंहाला कांहीं क्रोध न येतां तो ह्याशीं लाडीगोडी करूं लागला. त्यावरून आपले पायांतला कांटा मींच काढावा असें त्याचे मनांत आहे, हें अंद्रोक्लीज समजला. मग त्यानें त्या सिंहाचे पायांतला कांटा काढिला, आणि सूज आली होती त्या ठिकाणीं दाबून तेथून पुष्कळ पू काढिला; तेव्हां सिंहास जें प्रथम दुःख होत होतें तें अगदीं होईनासें झालें.

आपला पाय बरा झाला असें त्या सिंहास समजतांच तो कुत्र्याप्रमाणें मोठ्या आनंदानें उड्या मारूं लागला. तो आपलें मोठें शेपूट हालवून अंद्रोक्लीजाचे हातपाय चाटूं लागला, आणि आपणावर त्याचे फार उपकार झाले असें तो त्यास नाना प्रकारांनीं दर्शवूं लागला. तेव्हांपासून तो अंद्रोक्लीजाचा पाहुण्याप्रमाणें आदरसत्कार करीत असे. तो शिकारीस जात असे

तेव्हां जें कांहीं त्यास मिळे त्याचा वांटा तो आपल्या मित्राला दिल्याशिवाय खात नसे. ह्याप्रमाणें त्या सिंहाचे पाहुणचाराचा उपभोग करीत करीत अंद्रोक्लीजानें त्याच रानटी स्थितींत कित्येक दिवस घालविले. पुढें एके दिवशीं तो रानामध्यें असावधपणानें फिरत असतां कांहीं शिपायांनीं त्याला धरून नेऊन त्याचे धन्याचे स्वाधीन केलें. जे गुलाम आपले धन्याचे घरांतून पळून जातील त्यांचे पुष्कळ हाल करून त्यांस जिवें मारावें असा त्या देशांतल्या कायद्याचा ठराव होता, त्याप्रमाणें त्याची तेथें चौकशी होऊन आपले धन्यापासून पळून गेल्याचा त्याजवर अपराध लागू झाला; मग तेथील सरकारचा असा हुकूम झाला कीं, एक मोठा भयंकर सिंह आणून त्याला पुष्कळ दिवस उपाशीं ठेवावें, आणि त्याला पुष्कळ त्वेष येऊन तो कावराबावरा झाला, म्हणजे अंद्रोक्लीजाचें शरीर फाडून त्याचे तुकडे तुकडे करण्याकरितां तो सिंह त्याच्यावर सोडावा.

सर्व तयारी झाल्यावर त्या बिचाऱ्या मनुष्यास मोठे पटांगणांत उघडें बोडकें यावें लागलें. त्यावेळेस चोहोंबाजूंच्या भिंतींवर हजारों लोक ह्या घोरकृत्याचा तमाशा पाहण्याकरितां जमले होते.

मग एक भयंकर किंकाळी ऐकूं आली तेव्हां सर्व लोकांच्या आंगांवर शहारे आले, आणि ते पाहूं लागले तों एका पिंजऱ्याचें तोंड उघडें केलें होतें त्यांतून एक सिंह चवताळून बाहेर आला. ज्याचें रूप अकराळ विकराळ, केश उभारलेले, आणि डोळे लालभडक, असा तो भयंकर सिंह जेव्हां तोंड पसरून धांवत आला तेव्हां, अंद्रोक्लीजाचे पुढें मृत्यु मूर्तिमंत

घेऊन आ करून उभा राहिला आहे, असें सर्व लोकांस वाटलें मग सर्व गलबला एकदम बंद झाला, आणि सर्वांनीं अंद्रोक्लीजाकडे डोळे लाविले. हा आतां खचीत प्राणास मुकतो, असें सर्वांस वाटलें, म्हणून सगळे लोकांस त्याची दया आली, पण काय फळ? इतक्यांत असें झालें कीं तो सिंह त्या बापड्या मनुष्याचा प्राण न घेतां उलटें त्याच्या पायांशीं दबून बसला, आणि विश्वासूक कुत्रा आपले धन्याचे हातपाय जसा चाटितो तसा तो सिंह त्या मनुष्यास चाटून त्याजबरोबर लाडिकपणानें वागूं लागला. चुकलेलें मूल एकाएकीं दृष्टीस पडलें म्हणजे जसा आईला आनंद होतो त्याप्रमाणें अंद्रोक्लीजास पाहून त्या सिंहाला आनंद झाला. त्यासमयीं तेथें जितके लोक मिळाले होते तितक्यांस हा चमत्कार पाहून मोठें आश्चर्य वाटलें. त्यावेळेस त्या शहरचा सुभेदारही तेथें होता तो अंद्रोक्लीजास मोठ्यानें हाक मारून बोलला, हा अपूर्व चमत्कार कशानें घडला हें आम्हांस कांहींच समजत नाहीं, तर सिंह हा जात्या फार क्रूर व निर्दय असून एके क्षणांत आपला मुळचा स्वभाव कसा विसरला, आणि गरीब निरुपद्रवी प्राण्याप्रमाणें कसा आचरण करूं लागला, हें तूं आम्हांस नीट समजावून सांग.

अंद्रोक्लीजानें त्या मंडळीस रानांतलें सर्व वर्तमान सांगितलें, आणि तो शेवटीं असें बोलला कीं, ज्यानें रानामध्यें मला मित्र मानून माझे पाहुणचार केले तो हाच सिंह होय. ही गोष्ट जेव्हां त्यानें सांगितली तेव्हां असले क्रूर प्राणी देखील उपकार जाणतात, आणि त्यांस दया येते, हें पाहून सर्वांस मोठें आश्चर्य वाटलें, आणि फार आनंद झाला. मग, ह्या गरिबाचे अपराधाची क्षमा

करावी, म्हणून सर्व लोकांनीं एकत्र होऊन तेथील सुभेदाराची प्रार्थना केली; तेव्हां तो त्यांचे अर्जास मान्य झाला. मग ज्या सिंहानें अंद्रोक्लीजास दोनदां जीवदान दिलें होतें तो सिंह त्या सुभेदारानें त्यास बक्षीस देऊन त्यास सोडून दिलें.

---

## आवश्यक पदार्थांचा अभाव आणि अंगवैकल्य ह्यांविषयीं.

जो पदार्थ श्रम केल्यावांचून सहज प्राप्त होतो त्याची वास्तविक योग्यता मनुष्याच्या ध्यानांत येत नाहीं, असा साधारण नियम आहे. पहा बरें, हवा, पाणी, उजेड, उष्णता, इत्यादिक पदार्थ विशेष मेहनत केल्यावांचून सर्वांस प्राप्त होतात, त्यामुळें त्यांची वास्तविक योग्यता कोणी समजत नाहींत. परंतु ह्या पदार्थांपैकीं एखादा पदार्थ ज्या ठिकाणीं मिळत नाहीं त्या ठिकाणीं कोणा एकास कांहीं वेळपर्यंत नेऊन ठेवावें, म्हणजे त्या पदार्थाची वास्तविक योग्यता त्याच्या ध्यानांत येईल.

सुमारें १०० वर्षांमागें बंगाला प्रांतांत सुराजउद्दवला म्हणून एक नवाब होऊन गेला, त्यानें १४६ इंग्लिश लोकांस कैद करून एका लहानशा खोलींत कोंडून एक रात्रभर तेथेंच ठेविलें. त्या खोलींतली हवा मोकळी नसल्यामुळें सर्व लोक अगदीं गुदमरून गेले, आणि उजाडल्यावर नवाबाच्या लोकांनीं पाहिलें तों १४६ सां पैकीं १७ असामी मात्र जिवंत होते. तेही आतां मरतील घटकेनें मरतील असे होऊन पडले होते; बाकीचे तर हवा नसल्यामुळें तडफडून मरून गेले होते. ह्या अनर्थांतून जे लोक त्यावेळेस वांचले होते त्यांस, मोकळ्या हवेची वास्तविक योग्यता

काय, हें विचारिलें असतें तर ते मात्र खरी योग्यता सांगते. कारण मोकळी हवा मनुष्याला नसली तर त्याचा जीव कसकसा तडफडतो, ह्या गोष्टीचा अनुभव त्यांस पक्का आला होता

पाण्याची वास्तविक योग्यता काय हें मारवाड प्रांतांतील लोकांस पुशिलें पाहिजे. ते लोक पाणी म्हटलें म्हणजे तेल, तूप ह्याप्रमाणें मानितात. तेंच पाणी ज्या लोकांस मनमुराद मिळतें त्यांस पुसा बरें; ते असें म्हणतील कीं, पाणी सर्वांस अवश्य पाहिजे, त्यावांचून कोणाचें चालणार नाहीं, इतकेंच. परंतु त्यांस मारवाडांतील लोकांप्रमाणें प्रसंग नाहीं, ह्यामुळें त्यांच्या मनांत पाण्याची वास्तविक योग्यता यावयाची नाहीं.

हवा, पाणी, अशा प्रकारच्या अनेक गोष्टी ईश्वरानें मनुष्यास सुख होण्याकरितां दिल्या आहेत. फार लांब कशाला, मनुष्याचे हात, पाय, इंद्रियें, हीं त्यास दिलीं आहेत त्यांपासून रात्रंदिवस त्याला किती सुख होत आहे ह्याचा विचार करा बरें. ह्या अवयवांपैकीं किंवा इंद्रियांपैकीं एकास जरी यत्किंचित् दुःख झालें, तरी मनुष्य अगदीं भांबावून जातो, त्यास कांहीं सुचेनासें होतें. ह्या गोष्टीचा अनुभव थोडाबहुत सर्वांसच आहे. असें असतांही ज्या ईश्वरानें मोठ्या कृपाळूपणानें हीं साधनें दिलीं त्याचे उपकार मनुष्य मनांत कधीं तरी आणितो काय? इतकेंच कीं जेव्हां एखादा व्यंग पुरुष दृष्टीस पडतो, आणि तो व्यंग असल्यामुळें त्याचे फार हाल होतात असें त्याला वाटतें, तेव्हां मात्र, त्या पुरुषापेक्षां मी फार सुखी आहें हें मनुष्याच्या ध्यानांत येऊन तो ईश्वराचे उपकार स्मरला तर स्मरतो. कोणी एखादा व्यंग पुरुष दृष्टीस पडला असतां पाहणारा विचारी असला तर त्यास, आपण व्यंग मनुष्यापेक्षां

किती सुखी आहों, हें समजतें. पाहणाऱ्यानें ह्याहीपेक्षां पुढें विचार केला तर, आपण फार सुखी आहों, इतकेंच समजून तो स्वस्थ बसणार नाहीं; तर तो स्वतः आपल्या मनाला म्हणेल कीं, मला जे हे अवयव व जीं हीं इंद्रियें प्राप्त झालीं आहेत त्याचे मुख्य उद्देश निराळेच आहेत; ते असे कीं तोंडानें ईश्वराचे गुण गावे, डोळ्यांनीं ईश्वराचें ह्या सृष्टींतलें कौतुक पहावें, कानांनीं, त्याचे गुणानुवाद ऐकावे. हातांनीं गरीब गुरीब, अनाथ, व्यंग, इत्यादिकांस आपणापासून होईल तितकी मदत करावी; आपणापाशीं द्रव्य असल्यास त्याचा सद्व्यय करावा; अंतःकरणानें सर्वकाळ परमेश्वराविषयीं विचार करावा, आणि मनुष्यास सुख देण्याकरितां त्यानें काय केलें आहे हें सूक्ष्मदृष्टीनें पाहून त्याचे उपकार मानावे, अशा रीतीचे आहेत. तो आपल्या मनाला असें विचारील कीं, आजपर्यंत मीं ह्या डोळ्यांनीं जें जें पाहिलें, कानांनीं जें जें ऐकिलें, तोंडानें जें जें बोललों, व हातांनीं जें जें केलें त्यांत वर सांगितल्या उद्देशानुरूप कांहीं तरी आहे, किंवा सर्वच व्यर्थ आहे? अशा प्रकारचा विचार हरएक मनुष्यानें सर्वकाळ करीत असावें. आणि तो जर नकरील, तर त्याच्या मनांत आतां कांहीं येणार नाहीं; परंतु ईश्वरापुढें न्याय होईल तेव्हां मनुष्याला आपआपल्या पापपुण्याचा झाडा द्यावा लागेल, ह्यांत संशय नाहीं.

---

## आंधळ्यांविषयीं.

ह्या सृष्टींत कितीएक लोकांस डोळे नाहींत, कितीएकांस कान नाहींत, कितीएकांस वाणी नाहीं; असे व्यंग लोक बहुत आहेत. असल्या लोकांविषयीं विचार करूं लागलें असतां, किंवा ते दृष्टीस

पडले असतां, त्यांजविषयीं दया उत्पन्न होऊन अंतःकरणास फार वाईट वाटतें; परंतु अलीकडे आंधळे, मुके, व बहिरे ह्यांसही लिहिणें वाचणें, वगैरे गोष्टींचें ज्ञान होण्याचे मार्ग कितीएक बुद्धिमान् व दयालु पुरुषांनीं काढिले आहेत, हें ऐकून त्यांजविषयीं कळवळा बाळगणाऱ्या लोकांस अत्यंत आनंद होईल ह्यांत संशय नाहीं.

आंधळ्या मनुष्याचें लक्ष्य दृश्यपदार्थांकडे मुळींच जात नाहीं, ह्यामुळें तें इतर इंद्रियांच्या विषयांकडे विशेष लागतें, म्हणजे डोळस माणसापेक्षां आंधळ्या माणसाचीं दुसरीं इंद्रियें तीक्ष्ण असतात, ह्यामुळें त्यास डोळस माणसापेक्षां स्पर्शानें ज्ञान चांगलें व लवकर होतें, त्यास कानांनीं शब्दज्ञान चांगलें होतें, आणि नाकानें गंधज्ञानही चांगलें होतें. ह्याप्रमाणें, डोळस लोकांस नेत्रेंद्रियापासून ज्या गोष्टींचें ज्ञान होतें त्यांपैकीं पुष्कळ गोष्टींचें ज्ञान आंधळ्यांस दुसऱ्या इंद्रियांपासून करून घेतां येतें.

लेखन, वाचन, भूगोलविद्या, इत्यादि विद्यांचें ज्ञान आंधळ्यांस मुख्यत्वेंकरून स्पर्शेंद्रियाच्या योगानें करून देतां येतें. ह्या खेरीज कागद वगैरे छापणें, सूत काढणें, वस्त्रें विणणें, बुरुडकाम करणें, वगैरे पुष्कळ गोष्टी त्यांस शिकवितां येतात.

आंधळ्या लोकांस शिकविण्याची युक्ति काढिली आहे ती मोठी नामी आहे. ज्या कृपाळू पुरुषानें ती काढिली असेल त्याला मेहनत किती पडली असेल, व काळ किती लागला असेल, हें त्याचा तोच जाणे. ती युक्ति जर निघाली नसती, तर आंधळ्यांस वर सांगितलेल्या गोष्टींचें ज्ञान होण्याचा दुसरा मार्गच नव्हता.

इंग्लंद, स्कात्लंद ऐर्लंद, व यूरोपखंडांतील फ्रान्स वगैरे दुसरे देश ह्यांमध्यें आंधळ्यांस विद्या व कलाकौशल्य शिकविण्याच्या शाळा घातल्या आहेत.

आंधळ्यांस स्पर्शेंद्रियाच्या योगानें छापील पुस्तक वाचतां यावें ह्यासाठीं मोठी चमत्कारिक तजवीज काढिली आहे.

मूलाक्षरें लोखंडाचीं ओतलेलीं असतात. त्यांच्या कडा फार तीक्ष्ण असतात, त्या अशा कीं त्यांस बोटानें स्पर्श करितांच ही अमुक आकृति आहे असें स्पर्श करणाऱ्याच्या ध्यानांत यावें. लांकडाच्या चार तसू खोलीच्या मोठमोठ्या पेट्या करून त्यांस औरस चौरस दोन तसूंचे, पुष्कळ खणं केलेले असतात, आणि एका खणांत वर सांगितलेल्या प्रकारच्या एकाच अक्षराचे किंवा चिन्हाचे अनेक ठसे ठेविले असतात. एका पेटींत लहान आकृतीचीं अक्षरें व दुसऱ्या पेटींत मोठ्या आकृतीचीं अक्षरें असतात. स्पर्शेंद्रियाच्या योगानें आंधळे अक्षरें ओळखण्यास शिकतात; त्यांस अक्षरओळख झाली म्हणजे छापखान्यांतील कारखानदार असतात ते त्यांस शब्द जुळण्यास सांगतात; आणि शब्द जुळतां आले म्हणजे त्यांजकडून वाक्यें जुळवितात. इतक्या गोष्टी त्यांस आ- ल्यानंतर त्यांजकडून छापखान्यांत पाहिजे तो मजकूर जुळण्याचें काम करवितात.

आंधळेलोकांसाठीं जीं पुस्तकें छापतात तीं जाडे आणि बळकट अशा कागदावर छापितात. प्रथमतः ते कागद खूब भिजवितात, त्यामुळें अक्षरांचे ठसे त्यांजवर चांगले उठतात, म्हणजे ज्या आंगानें कागद ठशांवर टाकावा त्याच्या दुसऱ्या आंगास अक्षरें चांगलीं स्पष्ट हाताला लागावयासारखीं उठतात. आंधळे

पूर्वी अक्षरें ओळखण्यास शिकलेले असतात, म्हणून कागदावर त्या ओळी उठल्या असतात त्यांजवर बोट फिरविलें म्हणजे त्यांस छापिलेला मजकूर साफ वाचतां येतो. ह्या युक्तीमुळें त्यांची स्वभाषा त्यांस वाचतां येऊन दुसऱ्या भाषा वाचण्यांत व बोलण्यांतही ते तयार होतात.

आंधळ्यांस लिहितां यावें म्हणून त्यांचा कागद चौकटींत बसविलेला असतो. कांहीं दिवसांमागें असें होतें कीं ते जें लिहीत तें त्यांस वाचतां येत नसे, परंतु एका आंधळ्याच मनुष्यानें अशी युक्ति काढिली कीं कागद लिहितेवेळेस त्याच्या खालच्या आंगास एक रेशमी कापडाची घडी घालावी, म्हणजे कागदावर जीं अक्षरें लिहावीं त्यांचे ठसे त्या रेशमाच्या कापडावर उठतील. मग त्यावरून बोट फिरविलें असतां जें असेल तें सहज वाचतां येईल. ह्या युक्तीप्रमाणें आंधळे हल्लीं आपण लिहिलेला मजकूर वाचतात.

त्यांस भूगोलविद्या शिकविण्याकरितां जाडे कागदांवर नकाशे तयार केले आहेत, ते असे कीं निरनिराळ्या देशांच्या मर्यादांच्या ठिकाणीं तारा बसविल्या आहेत. शहरें, बेटें, पर्वत, नद्या, सरोवरें, रेतींचीं मैदानें, इत्यादिकांच्याही निरनिराळ्या खुणा केल्या आहेत.

गायनाचीं पुस्तकें त्यांस वाचतां यावीं म्हणून आरोह अवरोह ज्याप्रमाणें असतात त्याप्रमाणें लांकडाच्या फळीवर रेघा काढिलेल्या असतात.

पारिस शहरांत एक शाळा आहे तेथें छापण्याचें काम आंधळ्यांस फार उत्कृष्ट रीतीनें शिकविलें आहे. आंधळ्यां-

वेषयीं एक पुस्तक झालें आहे तें दुसऱ्यांच्या मदतीशिवाय केवळ आंधळ्यांनींच छापिलें आहे.

---

## बहिरे आणि मुके ह्यांविषयीं.

नेत्रांच्या द्वारानें जें ज्ञान व्हावयाचें तें आंधळ्यांस स्पर्शेंद्रियाच्या द्वारानें करून देतां येतें. त्यांस वाचतां येण्यासाठीं जाडे कागदावर ठसेछाप उठवून पुस्तकें तयार केलीं आहेत, तीं वाचून त्यांतील मजकूर त्यांस समजतो. ह्याप्रमाणें बहिरे व मुके ह्यांकरितांही खुणांची एक भाषा काढिली आहे, ती त्यांस नेत्रांच्या द्वारें समजते.

जे मुके कांहींएक शिकले नसतात तेही आपल्या मनांतील स्थूल गोष्टी दुसऱ्यांस समजाविण्याकरितां कांहीं खुणा करीत असतात, त्या खुणाच त्यांची जन्मभाषा म्हटली तरी चिंता नाहीं. ह्या खुणा सर्व देशांतल्या बहुतकरून सारख्याच मिळतात त्यांस रात्र अथवा झोंप हिची खूण करणें झाल्यास, ते डोळे मिटून एक क्षणभर हातावर डोकें टेंकितात; भुकेची खूण करणें असल्यास, आंगठ्याला चारी बोटें लावून तोंडाशीं हात नेतात; पाणी पिण्याची खूण करणें असल्यास, पांची बोटें जुळून तोंडाला लावितात. आणखीही अशा बहुत प्रकारच्या खुणा आहेत; परंतु अशा खुणांनीं त्यांस ठोकळ ठोकळ गोष्टीमात्र समजावितां येतात. त्यांस कोणत्याही गोष्टीचें विशेष ज्ञान होत नाहीं. कारण त्यांस शब्द वगैरे कांहींच समजत नाहींत.

कांहीं कृपाळू व बुद्धिमान् लोक होऊन गेले त्यांस ह्या व्यंग लोकांचा कळवळा येऊन त्यांनीं हातांनीं व बोटांनीं खुणा करण्याचा

एक नवीन प्रकार काढिला आहे. त्यांत अमुक खूण केली म्हणजे अमुक वर्ण समजावा, अशा रीतीनें सगळे मूलवर्ण बसविले. आणि ते मूलवर्ण बसतांच शब्द बसवितां येऊं लागले. अशा रीतीनें ती युक्ति सिद्ध झाली.

एखाद्यास असें वाटेल कीं, ही खुणांची भाषा लोकांस समजाविण्याविषयीं व स्वतः समजण्याविषयीं फार उशीर लागत असेल; पण असें नाहीं. मुके लोकांस खुणा करितांना ज्यांनीं पाहिलें आहे ते त्यांच्या जलदीचें मोठें आश्चर्य करितात. ने पाहिजे त्या विषयावर झराझर व बिनचूक ह्या खुणांच्या द्वारें बोलतात; कारण अभ्यासाच्या योगानें त्यांचीं बोटें नेमकीं पडतात.

मुलें एक उलटी भाषा बोलत असतात, तींत दरएक शब्दाच्या प्रारंभीं अकार घालितात, आणि शब्दांचें पहिलें अक्षर असेल तें शेवटीं आणितात; उदाहरण, "तिकडे कशाला जातोस" हें उलट्या भाषेनें "अकडेती अशालाक अतोसजा" असें बोलतात. दुसरी एक मिताक्षरी भाषा लोक बोलत असतात, तींत अमुक अक्षर अमुक अक्षराच्या ठिकाणीं योजावें असा नियम आहे. त्या भाषेंत "तिकडे कशाला जातोस" हें वाक्य "पिअजे अयासा डापोल" असें होतें. तिसरी करपल्लवी भाषा आहे, तींत बोटांवर खुणा बसविल्या आहेत. ह्या सर्व भाषा लहान मुलें देखील बोलतात नवेपणीं अमळशीं तीं अडखळत बोलतात; परंतु एकदां संवय झाली म्हणजे खूब जलद बोलतात. आणि ज्याला अभ्यास नसेल त्याला ती मोडणी ठाऊक असली तरी त्या भाषेंतलें कांहीं समजत नाहीं. त्याप्रमाणेंच मुकेही

आपल्या मनांतील सर्व गोष्टी, ज्यांस आपली भाषा येत असेल त्यांस फार जलद समजावितात, व त्यांच्या मनांतील गोष्टी आपण तेव्हांच समजतात; व मोठमोठ्या विषयांवर देखील बोलतात.

ऐर्लंद बेटांत दब्लिन शहराजवळ ग्लासनेविन म्हणून एक स्थळ आहे तेथें मुक्यांकरितां एक शाळा घातली आहे, तींत सुमारें १३० मुक्यांस जेवायास घालून त्यांजकडून विद्याभ्यास करवितात. दब्लिन शहरांतही एक मुक्यांची शाळा आहे. ह्या दोन्ही ठिकाणीं मुके विद्यार्थ्यांस लिहिणें वाचणें, नकाशे काढणें, वगैरे उपयुक्त गोष्टी बहुत शिकवितात.

आतां वर लिहिल्यावरून ध्यानांत येईल कीं, आंधळ्यांस बहुतकरून सर्व सृष्ट पदार्थांचें ज्ञान श्रोत्रेंद्रिय व स्पर्शेंद्रिय ह्यांपासून होतें. ह्यांखेरीज त्यांस वाणी असते तिच्या योगानें कोणतीही गोष्ट विचारण्यासवरण्यास त्यांस मोठी सोय असते.

मुके व बहिरे ह्यांस वाणी नाहीं त्यांस सर्व ज्ञान काय तें दृष्टीपासून होतें. म्हणजे आंधळ्याचे कान आणि त्वचा हीं डोळ्यांचें बहुतेक काम करितात, आणि बहिऱ्या माणसाचे डोळे कानाचें काम करितात, अशी उलटापालट आहे. परंतु ह्या सृष्टींत असेही थोडेसे लोक आहेत कीं ज्यांस डोळे नाहींत, कान नाहींत, व अर्थात वाणीही नाहीं. त्यांस सृष्ट पदार्थांचें ज्ञान कसें व्हावें? त्यांस काय तें स्पर्शेंद्रिय आहे. दुसरें साधन म्हणून कांहींच नाहीं.

---

## सुभाषित कविता.

### पृथ्वीविषयीं.

फिरे अंतरिक्षीं सदा जेंवि पक्षी ॥ न कांहींच लक्षी न कांहींच भक्षी ॥

जयाला विसांवा कधींही नसावा ॥ मुला सांगरे कोण ऐसा असावा ॥१॥

चक्रापरी भू फिरते सदाही ॥ तरी न कोणी पडती कदाही ॥
तिच्यांत आकर्षण शक्ति आहे ॥ म्हणून पृष्ठावर सर्व राहे ॥२॥

## उत्प्रेक्षा.

नहें नभो मंडल वारिराशी[१२७] ॥ न तारका[१२८] फेंसचि हा तयाशी ॥
न चंद्र हा नावचि चालताहे ॥ न अर्क[१२९] तो तीवर शीड आहे ॥३॥

संताप दे यास्तव चंद्र नोहे ॥ रवी म्हणावा तरि रात्र आहे ॥
हा सागरांतून निघोन गेला ॥ आकाशमार्गी वडवाग्नि ठेला ॥४॥

बहुत समय जातां चंद्र आला घराला ॥
निरखुनि बहु हर्षे दिग्वधू[१३०] त्या वराला[१३१] ॥
भरुनि गगनताटीं शुद्ध नक्षत्र रत्नें ॥
स्वपति वरुनि ओंवाळूनि टाकी प्रयत्नें ॥५॥

हा चंद्रमा उगवला गगन प्रदीप ॥
आहेत शुक्र गुरु मंगळ ज्या समीप ॥
त्यांचा[१३२] प्रकाश भरला गगनोदरांत ॥
तों अंधकार लपला गिरिगव्हरांत[१३३] ॥६॥

येतांचि उदया सूर्य श्री देतो कमळां नवी ॥
संपत्तीचें हेंचि फळ आप्तपोषण सूचवी ॥७॥

धनाहुनी श्रेष्ठ विद्या न नासे न कधीं उणी ॥
न देतां न मिळे कोणा देतां ही होतसे दुणी ॥८॥

### आर्या.

अनुकूळ दैव असतां न समर्थ करावयास हानि यम ॥
होतां तें प्रतिकूळ प्रबळहि दुर्बळचि होय हा नियम ॥९॥

## दारिद्र्या विषयीं श्लोक.

निर्द्रव्या पुरुषा न बंधु भजती त्या मान कोठें नसे ॥
जातां तो धनिच्या गृहा कुशलही त्याला न कोणी पुसे ॥
थोरां पासुनि दूर दूर फिरतो लाजोनि वस्त्रा विणें ॥
वाटे निर्धनता महानरक हा हा धिक् तयाचें जिणें ॥१०॥

दारिद्र्यमित्रा वससी शरीरीं ॥माझ्याच तूं मानुनि सौख्य भारी ॥
परंतु वाटे मज दुःख मोठें ॥ मेल्यास मी जाशिल सांग कोठें ॥११॥

---

## सीतेचा बाप जनक राजा हा सीतेच्या बाळपणींचें सुख आठवितो.

### दिंड्या.

बाइ माझे लाडके सिताबाई ॥
बाळपणचें कौतूक वदूं काई ॥ १ ॥
तुझें पाहतसें बाळपणीं मूख ॥
होय मजला तें काय वदूं सूख ॥ २ ॥
विना कारण रोदन हास्य यावें ॥
तिहीं वदनातें फार शोभवावें ॥ ३ ॥
थोडथोड्या कोंवळ्या दंतपंक्ती ॥
जयामाजी उगवल्या शुभ्रकांती ॥ ४ ॥
जयापासुन बोबडे बोल गोड ॥
निघुन माझें पुरविलें तिहीं कोड ॥ ५ ।
अतां कोठें तें वदन तुझें पाहूं ॥
तुझ्या विरहाचें दुःख किती साहूं ॥ ६ ।

# सीतेच्या विरहानें दुःखित होऊन रामचंद्र म्हणतो.

### साक्या.

कैसा दुःखातें साहूं ॥ कोठें सीतेला पाहूं ॥ ध्रुवपद ॥
पूर्वी दैवें मजला झाला, स्त्रीचा वियोग जेव्हां ॥
होते भेटावया सतीतें, शतशा उपाय तेव्हां ॥ १ ॥
पुढच्या आशेवर बहुधा म्यां, काळक्रमणा केली ॥
आतां तीच्या भेटीचीही, आशा नाहीं उरली ॥ २ ॥
मेळविलें म्यां वानरबळ तैं, सेतु सागरीं रचिला ॥
आतां कोणा सहाय घेऊं, धीरच माझा खचला ॥ ३ ॥
तेव्हां शत्रूशीं म्यां दारुण, युद्धप्रसंग केला ॥
आतां कोणाशीं मी भांडूं न सुचे उपाय मजला ॥ ४ ॥
प्राणसखीचा दुर्भाग्यें म्यां, बुद्ध्या केला त्याग ॥
लावूं कोणा दोष अतां मी, हें माझें अत्यांग ॥ ५ ॥
सीतामुक्ती करितां रामें, दशवदनाशीं केलें ॥
घोर युद्ध हें सर्व जनाला, गाया कौतुक झालें ॥ ६ ॥
पहिला वियोग रिपुघातावधि, होता उघडच लोकीं ॥
आतांचा हा निरवधि आहे, घालिल दुःसह शोकीं ॥ ७ ॥
जरि देहांतुनि निघून जाते, प्राणचि बरवें होतें ॥
वांचुनि नित्य किती सोसावें, दुःसह दुःख अहो तें ॥ ८ ॥
कैसा दुःखातें साहूं ॥ कोठें सीतेला पाहूं ॥

# इंग्लंदवर्णन, प्रकरण पहिलें.

## इंग्लंद देशाचें स्थान आणि तेथील मूळारंभींचा खरा वृत्तांत.

ग्रेत ब्रितन नांवाचें एक बेट आहे त्याचे तीन भाग आहेत; मोठा भाग तो *इंग्लंद देश, उत्तरेस जो भाग तो स्कात्लंद देश, व पश्चिमेस जो भाग तो वेल्स देश; हे तीन देश मिळून ग्रेतब्रितन आहे. त्याच्या पश्चिमेस ऐर्लंद नांवाचें एक दुसरें बेट आहे; ह्या दोहोंच्या मध्यें समुद्राचा फांटा आहे. हीं दोन बेटें मिळून एकच राज्य आहे, तीं एका सरकाराखालीं आहेत, आणि त्यांतील धर्मही एकच आहे, ह्यास्तव पुढील वर्णन जरी विशेषेंकरून इंग्लंद देशाचें आहे, तरी स्कात्लंद, वेल्स, आणि ऐर्लंद ह्या देशांचें बहुधा तसेंच जाणावें. ह्या चारही देशांतल्या मूळच्या भाषा निरनिराळ्या आहेत. हिंदुस्थानापासून इंग्लंद देश सुमारें १२००० मैल वायव्य दिशेस आहे. तेथें ह्या देशापासून रात्रंदिवस चालणाऱ्या गलबतास पोहोंचावयास सुमारें चार पांच महिने लागतात. अलीकडे एक जवळची वाट लोकांनीं काढिली आहे, ती इजिप्त देशांतून आहे. आगबोटींत बसून सुवेज नांवाची संयोगीभूमि आहे तेथपर्यंत जावें, मग इजिप्त देशांतून खुष्कीनें जावें, आणि मग फिरून आगबोटींत बसून इंग्लंदास जावें. ह्या वाटेनें हिंदुस्थानापासून इंग्लंदास एका महिन्यांत पोहोंचतात.

---

*इंग्लंद देशांतील लोकांचें नांव इंग्लिश, स्कात्लंद देशांतील लोकांचें नांव स्काच, वेल्स देशांतील लोकांचें नांव वेल्श, आणि ऐर्लंद बेटांतील लोकांचें नांव ऐरिश, ह्या सर्वांस हिंदुलोक इंग्रज असें म्हणतात.

इंग्लंद देशाचा खरा इतिहास, ख्रिस्ती शकाच्या पूर्वी पन्नास वर्षें जेव्हां *रोमन लोकांनीं तें बेट जिंकून घेण्यासाठीं स्वारी केली, तेव्हांपासून चालू झाला आहे. त्याकाळीं तेथें कला, विद्या, आणि लिपी, ह्यांची कांहींच माहिती नव्हती. ह्यास्तव त्या देशाचा आणि तेथील लोकांचा वृत्तांत त्या काळचे रोमन लोकांच्या बखरीवरून मात्र ठाऊक झाला आहे. त्यांतील गोष्टी अशा आहेत कीं, इंग्लंदांतील बहुत लोक पारध करून अथवा गुरें राखून उदरनिर्वाह करीत असत. त्या देशांत सर्व ठिकाणीं रानें आणि बांबरें होतीं, त्यांचे कांठीं खोपटें बांधून त्यांत ते राहत असत. आणि पाहिजे तेव्हां ते आपल्या मेंढ्यांच्या आणि गुरांच्या चाऱ्याच्या सोईकरितां वारंवार स्थानें बदलीत असत. ते बहुतकरून मास खात असत. पशूंच्या कातड्यांनीं शरीरास झांकीत असत. वरकड सर्व आंगास निळा रंग देत असत. त्यांचे केंस पाठीवर मोकळे पडत. त्यासमयीं ते लोक खोट्या धर्मास अनुसरून होते, ह्यामुळें दुराचरण, क्रूरता, दुष्टस्वभाव, तसाच अविश्वास इत्यादि दुर्गुण त्यांच्या आंगीं असत. त्यांचे गुरु ह्यांस द्रुइद हें नांव होतें. दिवाणी आणि फौजदारी अशा विषयांत सर्व सत्ता त्यांच्याच हातीं होती. आणि कोणी त्यांच्या करण्यास अमान्य झाले असतां त्यांस ते क्रूर शासन करीत असत. ते माणसांचा बळी देत असत. युद्धांत मिळविलेले जे पदार्थ ते आपले देवांस बहुतकरून अर्पण करीत असत. इंग्लंद देश चारशें वर्षेंपर्यंत रोमन लोकांच्या स्वाधीन होता. नंतर त्यांच्या स्वराज्यांत आपआपल्यांत

* रोमन किंवा रोमी म्हणून लोक होऊन गेले त्यांचें राज्य त्या वेळेस प्रबळ आणि मोठें होतें. त्यांची राजधानी रोम शहर.

गांकडे पडल्यामुळें त्यांस तो देश सोडून जाणें प्राप्त झालें. परंतु त्याकाळीं तेथील *ब्रितिश लोकांचा रानवटपणा जाऊन ते कांहींसे सुधारले होते. ख्रिस्ती धर्म प्रथम रोमन लोकांनीं त्या देशांत नेला, तरी ख्रिस्ती शकाच्या सहाव्या शतकापर्यंत तो धर्म त्या देशांत सतत चालत नव्हता. नंतर कोणी रोमन लोकांतील पाद्री ह्यांनीं तो धर्म जिकडे तिकडे चालू करण्याचा आरंभ केला. आपण कोणत्या कामासाठीं आलों हें त्यांनीं तेथील राजास विदित केलें. त्या राजानें त्यांस जें उत्तर दिलें तें सर्वांनीं ध्यानांत ठेवावयाजोगें आहे. तो म्हणाला, आपण ज्या धर्माच्या उद्देशानें येथें आलां आहां तो धर्म विचार करावयाजोगा आहे खरा, परंतु तो नवीन आहे, आणि आमचे पूर्वज ज्या धर्मास अनुसरले त्याचा त्याग एकाएकीं आम्हीं कसा करावा? असो, परंतु आपण येथें स्वस्थ रहावें, कारण कीं, केवळ आमच्या कल्याणास्तव आपण कष्ट सोसून इतके दूर आलां आहां, त्यापक्षीं आम्ही तुमच्या उपजीविकेचें साहित्य करून देऊं; आणि तुम्हीं आमच्या प्रजेस धर्मोपदेश करावा. ह्या वर्तमानाच्या पूर्वींच कितीएक वर्षें त्या राजानें †फ्रेंच राजाचे कन्येशीं लग्न केलें होतें, ती राजकन्या ख्रिस्ती धर्माची होती ह्यास्तव तिला त्या धर्मानें आचरण करण्याविषयीं सर्वदा आज्ञा होती. आणि त्या वृत्तावरून असें दिसतें कीं त्या राजानें आपले राणीची उत्तम आणि पवित्र वर्तणूक पाहून त्याचें मन ख्रिस्ती धर्माकडे कांहींसें वळलें होतें.

---

* ब्रितिश म्हणजे ग्रेतब्रितन बेटासंबंधी जे ते.

† यूरोपखंडांत फ्रान्स नांवाचा देश आहे; त्यांतील लोकांस फ्रेंच म्हणतात.

असो, पुढें त्या राजानें आपल्या बहुत प्रजांनीं *बाप्तिस्मा घेतला असें पाहून आपणही लवकरच घेतला. तेव्हांपासून त्या देशांत ख्रिस्ती धर्म उत्तरोत्तर अधिक प्रगट झाला. आणि त्या काळापासून इंग्लिश लोक व त्यांचें राज्य सुधारल्यामुळें ते लोक इतके नीतिवंत आणि सदाचारी झाले आहेत कीं त्यांच्यापेक्षां अधिक असे दुसरे कोणी लोक नाहींत.

---

## इंग्लंदवर्णन, प्रकरण दुसरें.

### इंग्लंद देशांतील राजधानीचें वर्णन.

इंग्लंद देशांत लहान मोठे बावन्न प्रांत आहेत. तेथील राजधानीचें नांव लंदन. हें शहर तेम्स नदीच्या कांठीं आहे. तेथून त्या नदीचा तीस कोसांवर समुद्राशीं संगम झाला आहे त्या शहराची वस्ती त्या नदीच्या दोन्ही कांठांवर सहा कोस पर्यंत झाली आहे. त्या नदीवर मोठमोठे सहा पूल बांधिले आहेत, ते इतके मोठे आहेत कीं त्यांच्या खालून लहान गलबतें आणि नावा जातांना त्यांस अडचण पडत नाहीं. शेवटील बांधलेल्या पुलास वातर्लू पूल म्हणतात; त्याला दीर्घ वर्तुलाकृति अशा नऊ कमानी आहेत; प्रत्येक कमानीचा व्यास १२० फुटी आहे, आणि उंची ३५ फुटी आहे. त्याचे खांब वीस फुटी जाड आहेत. त्या पुलावरील मधला रस्ता वीस फुटी रुंद आहे. ह्या खेरीज दोहों बाजूंस सात फुटी फरसबंदीचा पायरस्ता आहे. तो पूल बांधावयास ऐंशीं लक्ष रुपये लागले. त्या नगरांत सर्वत्र रेतीची

---

*बाप्तिस्मा म्हणजे ख्रिस्ती धर्मांत प्रवेश करितेसमयीं मुख्य संस्कारविशेष आहे.

जमीन आहे, आणि रावाचें पाणी जावयाकरितां जमिनींतून मोऱ्या बांधिल्या आहेत, ह्याकरितां तेथील घरें सुकीं, स्वच्छ, आणि रहावयाच्या सोईचीं आहेत; म्हणून अशीं उत्तम शहरें फारच थोडीं असतील. त्यांत आठ हजार रस्ते आहेत; व ह्या खेरीज कितीएक स्थानें अशीं आहेत कीं त्यांचे चोहोंकडून घरें बांधून मधले जागेंत बाग केले आहेत. असे चौक* साठ आहेत. घरांची संख्या एक लक्ष साठ हजार† पर्यंत केली आहे. आणि तीं घरें कांहीं चिरेबंदी व कांहीं विटबंदी आहेत; त्यांत कितीएक पांच सहा खण उंचीचीं आहेत. मुख्य रस्ते फार लांब, रुंद, आणि फरसबंदी केलेले आहेत. सर्व रस्त्यांत मधून गाडी जावयाचे मार्ग सडका बांधून दोहों बाजूंना कांहीं उंच व गुळगुळीत फरसबंदी केलेले पायमार्ग आहेत. मुख्य रस्त्यांतून नेहमीं लोकांचा फार मोठा लोट चालत असतो, आणि गाड्या व सुंदर रथ ह्यांचा तर अतिशयच. तेथें दुकानेंही बहुत आहेत, त्यांत जवाहीर, रुपेरी सामान, सुऱ्या, खेळणीं, चिनई सामान, नकशीचीं काचपात्रें, रेशमी माल, जरीच्या फिती, तागाचें कापड, व आणखीही तऱ्हेतऱ्हेचे बहुत चित्र विचित्र अमोलिक पदार्थ रस्त्यांतून दोहों बाजूंनीं कांचेच्या मोठाल्या खिडक्यांतून उत्तम प्रकारें मांडलेले असे दिसतात; ती तरी लंदन शहर पाहण्याची मौज आहे. लंदन शहरांत सहा राजवाडे, आणि ईश्वरभजनाचीं घरें चारशें आहेत. त्यांतून कितीएक अतिशयित मोठीं आणि फारच सुंदर,

---

* त्या स्थानास इंग्लिश भाषेंत स्क्वेर म्हणतात.

† ज्या बुकांतून हें वर्णन घेतलें तें लिहून तीस चाळीस वर्षें झालीं आहेत इतक्यांत वस्ती फारच वाढली आहे.

आहेत. सैंतपालचें देऊळ ह्या नांवाचें मंदिर आहे त्याची लांबी ५०० फुटें आहे, आणि तें संगमरवरी दगडांनीं बांधिलेलें आहे जोत्यापासून घुमटाच्या कळसापर्यंत ३४० फुटें त्याची उंची आहे. ह्या खेरीज आणखीही बहुत उत्तम प्रकारच्या इमारती कामकाजा करितां, विद्येकरितां, आणि कर्मणुकी करितां बांधलेल्या आहेत; त्यांत वेस्तमिन्स्तरहाल नामें एक मंदिर आहे त्यांत मुख्य न्यायसभा, म्हणजे कोर्तें, बसतात. पार्लमेंताचीं गृहें, डाकेचें घर, सरकारसंबंधी पेढी, जकातीचें घर, ब्रितिश म्युजीयम नांवाचें पदार्थसंग्रहाचें घर, ज्यांत देशोदेशीं उत्पन्न झालेले पदार्थ आणि चमत्कारिक जे पदार्थ त्यांचे मासले मिळवून यथाक्रम ठेविले आहेत, आणि नाट्यशाळा, इत्यादि अनेक इमारती आहेत. लंदनांत मुलांस विद्या शिकण्यासाठीं तीन हजार शाळा आहेत. पदार्थविज्ञान आणि मोठमोठ्या विद्या ह्यांचा प्रसार करणाऱ्या मंडळींच्या बारा *शाळा आहेत. कलाकुशलतेस आश्रय द्यावयास राजांनीं स्थापिलेल्या चार शाळा आहेत, आणि सर्व साधारण पुस्तकशाळा अठरा आहेत. मुंबईतील बादशाही कोर्तासारखीं मोठीं नऊ मुख्य कोर्तें, म्हणजे न्यायसभा, आणि खालचीं कोर्तें, म्हणजे सामान्य न्यायसभा, वेचाळीस आहेत; ह्यांशिवाय न्यायप्रकरणाचे नियम व कायदे शिकावयाच्या शाळा चवदा आहेत, त्यांमध्यें वकील लोक त्या नियमांचा व कायद्यांचा अभ्यास करीत असतात. मोठ्या बंदिशाळा चवदा, आणि लहान पांच आहेत. धर्मकृत्याच्या उद्देशानें बांधलेलीं घरें अनेक आहेत. आजारी आणि गरीब ह्यांस फुकट औषधें

---

* शाळा म्हणजे त्यात्या कामा करितां नेमलेल्या इमारती.

टेण्याकरितां वीस घरें आहेत; आणि रोग्यांस बरें करण्याचीं घरें म्हणजे हास्पितालें, सव्वीस आहेत, त्यांत रोग्यांस घेऊन बरें करितात. ह्यां खेरीज वृद्ध आणि अशक्त ह्यांस राहण्याकरितां अठरा धर्मशाळा आहेत. पोरकीं मुलें, विधवा, आंधळे, आणि मुके, ह्यांकरितां आश्रयासाठीं अनेक शाळा आहेत. ह्याशिवाय नानाप्रकारच्या विपत्ती दूर करण्याकरितां, किंवा कमी करण्याकरितां आणखीही अनेक प्रकारच्या बहुत मंडळ्या आहेत. लंदन शहरामधील मनुष्यांची गणना सुमारें१४००००० केली आहे, त्यांच्या खाण्यास प्रतिवर्षास १६०००० गुरें, १०६६००० मेंढरें, शिवाय त्याचप्रमाणें वांसरें व डुकरें लागतात. आणि कोंबड्यांची व मासोळीची तर संख्याच नाहीं. शाकभाजी, फळफळावळ, इत्यादिकांचा एकंदर खर्च प्रतिवर्षीं दहा लक्ष रुपये होत आहे. तेम्स नदींतून, आणि तिशीं मिळालेला एक ओहोळ आहे त्यांतून पाणी बहुत प्राप्त होतें, तें पाणी यंत्रेंकरून वर चढवून, भूमींतून नळ बांधून, सर्वांचे घरांत नेलें आहे. शहरांतील रस्ते नेहमीं रात्रभर प्रकाशित असतात. गांवां बाहेरही दोन तीन कोसपर्यंत प्रकाश असतो. त्या कामास पूर्वी तेल लावीत असत, परंतु सांप्रत ग्यास ह्या नांवाचा ज्वालाग्राही पदार्थ जो कोळशांच्या किंवा तेलाच्या धुरापासून सिद्ध होऊन चुन्याच्या पाण्यांतून जाऊन स्वच्छ होतो, तो तेलाच्या ठिकाणीं लावीत असतात. आणि तो इतर जातीच्या प्रकाशापेक्षां तेजानें विशेष आणि खर्चानें तर कमी आहे. ग्यासाच्या कारखान्यापासून जमिनींतून पितळी किंवा लोखंडी नळीच्या द्वारानें तो धूर ज्या ज्या स्थळीं प्रकाश पाहिजे त्या त्या स्थळीं नेला आहे. प्रत्येक

नळीचे तोंडास लहान मळसूत्र जडलें असतें तें फिरविलें म्हणजे धूर निघूं लागतो; त्यास दिव्याची जोत लागतांच तो मेणबत्ती-सारखा जळूं लागतो, आणि फिरून तें मळसूत्र उलटें फिरविलें म्हणजे तत्काळ विझतो. ह्याप्रमाणें त्या शहरांत फरसबंदी रस्ते, आणि पाणी व प्रकाश ह्यांचा पुरवठा, इत्यादिक नानाविध सुखोपयोगी आणि अनुकूल अशा कृत्यांचा खर्च सरकारावर पडत नाहीं. परंतु त्याजविषयीं पार्लमेंतांत कायदा असा ठरत असतो कीं, ज्या लोकांचें ह्या कृत्यांपासून हित होतें त्यांपासून तो खर्च भागण्याकरितां पट्टी घ्यावी; किंवा अशीं कामें कोणी कंपनी स्वीकारिती. कांहीं योजिलेलें काम साधावयास कितीक लोक पुढील लाभाच्या आशेनें कांहीं द्रव्य जमवितात, त्यांचे मंडळीस कंपनी म्हणतात. त्या देशांत लंदन शहराखेरीज दुसरीं एकुणीस शहरें आहेत, त्यांत दहा हजारांपासून एक लक्षपर्यंत लोक आहेत, व त्यांचाही बहुतकरून असाच प्रकार आहे. आणि सामान्य शहरें व गांव तर असंख्य आहेत.

---

## इंग्लंदवर्णन, प्रकरण तिसरें.

### हवा, वनस्पति, जनावरें आणि धातु ह्यांविषयीं.

### हवेचें वर्णन.

ह्या हिंदुस्थान देशांतील हवेपेक्षां इंग्लंदांतील हवा हिंवाळ्यांत फार थंड असते, व उन्हाळ्यांत कमी उष्ण असते. ह्या देशांत सूर्याचा ताप प्रखर असतो, उन्हांतून बाहेर हिंडतांना इजा होते; तसा प्रखर ताप इंग्लंदांत नाहीं. वर्षांतून एखादे दिवशीं थोडा वेळपर्यंत ऊन्ह कडक पडून लोकांला जाचतें, परंतु

सामान्यतः कोणत्याही ऋतूंत कोणत्याही वेळीं उन्हांत फिरलें तरी इजा होत नाहीं. हिंवाळ्यांत इंग्लंदामध्यें थंडी इतकी कडक पडते कीं पाणी थिजून त्यावर मनुष्यें व गाड्या ह्यांस खुशाल फिरतां यावें इतकें कठीण होतें. थंडीनें पाणी थिजलें म्हणजे त्यास इकडील लोक बर्फ म्हणतात. इंग्लंदांतील मुलांस हिंवाळ्यांत थिजलेल्या पाण्यावर, म्हणजे बर्फावर, खेळण्याची मोठी हौस वाटते. कितीएक नुसते जोडे घालूनच बर्फावरून निसरत जातात. कितीएक खडावांसारिखे लांकडाचे तुकडे करून त्यांच्या खालीं लोखंडाच्या बांकदार पट्टया बसवून त्यांवर जोड्यांसुद्धां पाय ठेवून मोठ्या वेगानें निसरत जातात. अशा कृत्यांची तरुण मुलांस मोठी करमणूक आहे. थंडीच्या दिवसांत थंडीनें जमीन इतकी कठीण होते कीं शेतांत खणणें, नांगरणें, वगैरे शेतकाम शेतकऱ्यांच्यानें फारसें करवत नाहीं. कधीं कधीं असें होतें कीं पाण्याची वाफ आकाशांत जाते ती थंडीनें थिजून कापसासारखी पांढरी व मऊ होऊन जमिनीवर जिकडेतिकडे पडून तिनें जमीन झांकून जाते, ह्याचा शेतकऱ्यांस फार उपयोग होतो. तो असा कीं, जमिनींत पेरलेलें बीं थंडीच्या योगानें न बिघडतां ह्या पदार्थाच्या आच्छादनानें बचावलें जातें. तसेंच झाडांवर दंवाचे कण थिजून त्यांनीं झाडें अशीं पांढरीं दिसतात कीं जणो तीं शुभ्र वस्त्रांनीं वेष्टित केलीं आहेत. त्यावेळेस झाडांला पानें नसतात.

नोवेंबर, दिसेंबर, जान्युवारी, आणि फेब्रुवारी हे चार महिनेपर्यंत हिंवाळा जबर असतो. मार्च महिन्यांत वारा थंड आणि तीक्ष्ण असतो. एप्रिल महिन्यांत हवा बदलून थंडी कमी होत जाते, आणि झाडें फुटूं लागतात. गवताला माज येतो

मे महिन्यांत सर्व वनस्पतींची वृद्धि होते, व जमिनीस तजेला येतो. जून महिन्यांत जिकडे तिकडे जमीन गवतानें झांकलेली, व झाडें पानांनीं व फुलांनीं भरलेलीं दिसतात. उन्हाळ्याचे दिवस म्हटले म्हणजे जून, जुलई, आणि आगस्त हे तीन महिने आहेत. तरी ह्या महिन्यांतील ऊन्ह कडक नसतें, सुमाराचें असतें. ह्या देशांतील हिंवाळ्याचें ऊन्ह आणि तेथील उन्हाळ्याचें ऊन्ह ह्यांचा सरासरी सारखेपणा आहे. परंतु ह्या देशांत हिंवाळ्यामध्यें सकाळीं व संध्याकाळीं जशी हवा फार थंड असते तशी तेथील उन्हाळ्यांत होत नाहीं. तेथें पावसाळा अमुक महिनेपर्यंत आहे असें नाहीं; बारा महिनेही बहुतकरून तीन चार दिवसांआड पाऊस पडत असतो. कधीं आठ पंधरा दिवसपर्यंत पडत नाहीं असें होतें, पण तसें थोडें. हिंवाळ्याच्या चार महिन्यांत व जुलई महिन्यांत बहुतकरून पाऊस फार पडतो. तसेंच अमुक दिवसांत, किंवा अमुक महिन्यांत, अमुक दिशेचा वारा सतत सारखा वाहतो, असें नाहीं. कधीं कधीं वारा दोन तीन दिवसपर्यंत जोरानें वाहतो, तरी ह्या देशांत वावटळी व तुफानें एकाएकीं होतात तसें तेथें होत नाहीं.

---

## वनस्पतींचें वर्णन.

इंग्लंद देश केवळ सपाट नाहीं, उंच सखल आहे. तेथील जमीन बरीच पिकाऊ आहे. तींत गहूं, जव, ओत्स, बटाटे, आणि पुष्कळ प्रकारचे उत्तम भाजीपाले, आणि अनेक प्रकारचीं उत्तम फळें ह्यांचें पीक उत्कृष्ट असतें. मसाले, तांदूळ, मका, खरबुजें, तरबुजें, नारिंगें, आंबे, अननस, वगैरे धान्यें व फळें हीं पिकण्या-

पुरता सूर्याचा ताप नसतो, म्हणून तेथें पिकत नाहींत. तरी भात, मसाले, नारिंगें, वगैरे धान्यें व फळें दुसऱ्या देशांतून आणावयाजोगीं जीं आहेत तीं इतकीं आणितात कीं बाजारांत पाहिजेत तितकीं विकत मिळतात. जीं फळें उष्णतेच्या कमताईमुळें तेथें पिकत नाहींत, व नासण्याच्या भयानें दुसऱ्या देशाकडून फारशीं आणवितां येत नाहींत, तीं फळें तेथें श्रीमंत लोक मोठा पैसा खर्च करून करामतीनें उत्पन्न कारितात, असें कीं मोठमोठीं घरें कांचांचीं करून पूर्व, पश्चिम, आणि दक्षिण ह्या दिशांकडून सूर्याचे किरण आंत घेतात, व उत्तरेचे बाजूस एक आगीचें घर करून त्यांतील उष्णता नळयाच्या योगानें त्या घरांत सोडितात. अशा युक्तीनें उष्णतेचा पुरावा करून त्या घरांत फळझाडें लावितात. त्यांस जीं फळें येतात तीं पुष्कळ व उत्तम प्रकारचीं असतात. अशा रीतीनें खरबुजें, तरबुजें, अननस, द्राक्षें, वगैरे फळें उत्पन्न कारितात. बागांत व मळ्यांत उत्पन्न होणारीं फळें पुष्कळ प्रकारचीं व उत्तम रसाळ अशीं आहेत. त्यांच्या पिकाचे हंगाम एकामागून एक असे क्रमानें असतात. हरएक प्रकारचीं फुलझाडें श्रीमंत लोकांच्या बागांत लावलेलीं असतात, व गरीब लोकांच्या झोपड्यां भोंवतीं देखील लावितात, तेणेंकरून शोभा फारच दिसते. इराण देशाच्या गुलाबाची प्रसिद्धि फार आहे, त्या नामांकित गुलाबापेक्षांही उत्तम प्रकारचे सुवासिक गुलाब इंग्लंदांत उत्पन्न होतात. त्यांचा रंग पांढरा, तांबडा, पिंवळा, नारिंगी, वगैरे अनेक प्रकारचे असतात. कितीएक गेंददार, कितीएक एकेरी, कितीएक मोठे, कितीएक लहान असतात. कितीएकांचीं उभीं झाडें असतात, कितीएकांचे वेल असतात. असे नानाजातींचे गुलाब बारा महिने फुलतात, त्यामुळें

जिकडे तिकडे त्यांचा घमघमाट सुटलेला असतो. तसेंच लिली, मर्तल, कार्नेशन, आणि जरेन्यम् ह्या नांवांचीं फुलें आहेत त्यांचाही सुवास जिकडे तिकडे पसरत असतो. इंग्लंदांतील मुळचीं जीं फुलें आहेत त्यांचा तर फार चमत्कारिक मधुर वास आहे. इंग्लंदची हवा म्हटली तर फुलांला फार अनुकूल आहे, अशी कीं कोणत्याही देशांतून फूलझाड नेऊन तेथें लाविलें असतां रंग, रूप, वास, हीं कमीं होत नाहींत, किंबहुना अधिक होतात.

---

## जनावरांचें वर्णन.

इंग्लंद देशांत सिंह, वाघ, लांडगे, इत्यादिक क्रूर हिंसक जनावरें अगदीं नाहींत, तसेंच सर्प, विंचू, इत्यादिक विखारी जीव नाहींत. सापाची एक जात आहे, पण ती फारशी नाहीं. मागें लांडगे फार असत, पण ते फार वर्षांपासून नाहींतसे झाले. मुरकुटें चिलटें, वगैरे त्रासदायक लहान जीव फारसे नाहींत. ढेंकूण, पिसा हीं फारशीं नाहींत; तरी जेथें दाटीमुळें स्वच्छता कमी असते तेथें कांहीं असतात. घोडे, गाई, कुत्रीं, मेंढरें, वगैरे ग्राम्यपशु अनेक प्रकारचे आहेत. ते सर्व आंगानें मोठे, ढबदार, आणि स्वभावानें गरीब, असे असतात. तेथील मेंढरांवर जी लोंकर येते ती फार दाट व उत्तम प्रकारची असते. कारण कीं ह्या जनावरांची थळ चांगली राखण्याविषयीं लोक फार जपतात, आणि त्यांची बरदास्त चांगली ठेवितात. इंग्लंदांत नानाप्रकारचीं कोंबडीं, बदकें, वगैरे पांखरें उत्तम जातींचीं आहेत. खाण्यास योग्य अशा माशांच्या जाती पुष्कळ आहेत.

### धातूंचें वर्णन.

सोनें, रुपें, आणि रत्नें ह्यांच्या खाणी इंग्लंदांत नाहींत, पण शिसें, कथील, तांबें, आणि लोखंड ह्यांच्या पुष्कळ धनत्तर खाणी आहेत. संगमरवरी दगड आणि इमारतींच्या कामाचे दुसरे दगड हे जमिनींत पुष्कळ सांपडतात. तसेंच सेंधेलोण व शिशाच्या पेनसलीचे दगड ह्यांची समृद्धि आहे. दगडी कोळसा म्हणून जो दगडासारखा काळा पदार्थ जमिनींतून काढितात त्याच्या तर खाणी पुष्कळच आहेत. ह्या कोळशांत कस फार असतो व तापही फार असतो. हा कोळसा लवकर पिचत नाहीं. इंग्लंदांत हरएक कामाकडे, म्हणजे सैंपाक करणें, शेकोटी करणें, भट्टी पेटविणें, वगैरे कामांकडे ह्याच कोळशांचा फार उपयोग करितात.

---

## इंग्लंदवर्णन, प्रकरण चवथें.

### इंग्लंदाच्या राज्यव्यवस्थेचा प्रकार.

इंग्लंदांतील राज्याच्या व्यवस्थेचा प्रकार चमत्कारिक आहे. तेथें राज्य चालविणारा राजा आहे, व त्याची सत्ताही चालते, परंतु एकट्या राजाच्या मनास येईल तसें राज्य चालत नाहीं. तेथें पार्लमेंताच्या दोन सभा आहेत. त्यांत एक सभा बडेलोकांची, आणि एक रयतलोकांच्या प्रतिनिधींची. कायदा ठरवावयाचा असला, तर राजा, बडेलोकांची सभा, व प्रतिनिधींची सभा, ह्या तिघांच्या संमतीनें कायदा ठरतो. कोणत्या गोष्टीला ह्या तिघांतून जर एक प्रतिकूळ झाला, तर तो कायदा सिद्ध होत नाहीं. ह्याप्रमाणें राजाच्या सत्तेला पार्लमेंताच्या सभा प्रतिबंधक आहेत.

राजास राज्याभिषेक होतो ते समयीं राजा विधिपूर्वक शपथ करितो कीं, पार्लमेंताच्या संमतीनें जे कायदे ठरले किंवा ठरतील त्यांप्रमाणें व देशाच्या मामूल शिरस्त्याप्रमाणें मी राज्यकारभार चालवीन. *प्रातेस्तंत धर्माचा संभाळ करीन. तसेंच धर्माध्यक्ष आणि धर्ममंडळी ह्यांचे जे कायद्याप्रमाणें अधिकार आहेत त्यांचें मी रक्षण करीन.

आरमाराचे सरदार आणि लष्करांतील सरदार ह्यांची नेमणूक करणें राजाकडे आहे. दुसऱ्या देशांशीं युद्ध करणें, सल्ला करणें, तसेंच पार्लमेंताची सभा जमविणें किंवा कांहीं दिवसपर्यंत तहकूब करणें किंवा आहे ती मोडून नवी जमविणें, ह्या सर्व गोष्टींचा अधिकार राजास असतो, तरीं पार्लमेंतांतील दोन्ही सभांच्या संमतीवांचून त्याच्यानें कायदा करवत नाहीं, व नवा कर बसवत नाहीं.

राज्याधिकार वंशपरंपरेनें चालतो. गादीवर बसलेला जो राजा त्याचे मागून बसणारा जो राजपुत्र तो जर प्रातेस्तंत धर्मास अनुसरणारा नसला, तर त्यास राज्याधिकार मिळत नाहीं. मग त्याच्या खालचा वारसदार जो प्रातेस्तंत धर्मास अनुसरणारा असेल त्यास तो अधिकार मिळतो. राज्याधिकाराविषयीं प्रथम पुत्र, तो नसेल तर कन्या, †कन्या नाहीं तर भाऊ किंवा त्याचा वंश, ह्या रीतीनें सत्ता चालते.

---

*प्रातेस्तंत धर्म म्हणजे इशवी शकाच्या सोळाव्या शतकांत धर्माची चालीची सुधारणूक झाली त्या सुधारलेल्या प्रकाराला प्रातेस्तंत ही संज्ञा आहे.

† हल्लीं जी गादीवर राणी आहे ती मागील राजाची औरस कन्या नव्हे; ती पुतणी आहे.

इंग्लंदांतील बडे लोकांस ही लार्द पदवी आहे, म्हणून बडे लोकांची जी सभा तिला लार्दांची सभा असें म्हणतात. बडे लोकांमध्यें दूक, मार्किस, अर्ल, वैकौंत, आणि बारन अशा कितांच्या पांच पदव्या आहेत. ह्या पदव्यांच्या बडे लोकांची संख्या एकसारखी *नियमित राहत नाहीं. राजाची खुशी असेल तर त्यास कोणाला कोणत्याही पदवीवर चढविण्याचा अखत्यार आहे. ह्या सगळ्या पदव्यांच्या बडे लोकांस लार्दांच्या सभेंत बसण्याचा वंशपरंपरेनें अधिकार असतो. ह्याशिवाय मुख्य दोन धर्माध्यक्ष, ज्यांस आर्चबिशप म्हणतात, त्यांस आणि त्यांच्या खालचे धर्माध्यक्ष, ज्यांस बिशप म्हणतात, त्यांस लार्दांच्या सभेंत बसण्याचा अधिकार आहे. गादीवर बसलेला राजा व ह्याच्या मागून बसणारा राजपुत्र ह्यांस लार्दांच्या सभेंत बसण्याचा अखत्यार नाहीं. इतर राजपुत्रांस बसण्याचा अखत्यार आहे. देशांतील सर्व कोर्तांवर लार्दांची सभा हें मुख्य कोर्त आहे, ह्याच्या पुढें अपील करण्यास दुसरें कोर्त नाहीं. लार्दांच्या सभेंत जो निवाडा होईल तो शेवटला आहे. कांहीं विशेष विषयांबदल मुख्य कोर्त म्हटलें, तर **राजा दर इजलास कौन्सिल** ह्या अर्थाचें नांवाचें कोर्त आहे. त्या कोर्तापुढें त्या मुकदम्याबदल दुसरें स्थळ नाहीं. ह्या देशांतून विलायतेस जीं

---

* सन १८५२ ह्या वर्षी लार्दांच्या सभेंत बसणारे बडे लोक इंग्लंदांतील दूक २०, मार्किस २१, अर्ल १११, वैकौंत २२, आणि बारन २००, आर्चबिशप २ व बिशप २५, त्यां शिवाय स्कात्लंद देशांतील बडे लोक ह्यांचे १६ प्रतिनिधि आणि ऐर्लंदांतील बडे लोकांचे प्रतिनिधि २८ आणि धर्माध्यक्षांचे प्रतिनिधि ४ इतके होते.

अपिलें जातात तीं राजा दर इजलास कौन्सिल ह्या कोर्टांत जातात.

प्रतिनिधींची सभा म्हणजे देशांतील प्रजा आपले तर्फेनें बोलणें बोलावें, व आपलें हित वाढवावें, म्हणून ज्यांची योजना करितात ते जे प्रतिनिधि त्यांची सभा. साधारण सर्व लोकांस प्रतिनिधि नेमण्याच्या कामांत संमति देण्याचा अधिकार नसतो ज्यांच्या पदरीं घर दार, शेतवाडी, उदीम, व्यापार, किंवा वजनदारी, ह्यांतून कांहींतरी असेल त्यांस मात्र असतो. तसेंच लार्डांच्या सभेंत बसणारे जे बडे लोक त्यांसही प्रतिनिधि नेमण्याच्या कामांत संमति देण्याचा अधिकार नाहीं. प्रतिनिधींच्या सभेला इंग्लंदांत कामन्स लोकांची सभा असें म्हणतात.

सगळ्या देशाचे प्रांत ५२ आहेत, त्यांतून प्रतिनिधि पाठवितात. त्यांत जे मोठे प्रांत आहेत त्यांतून चहूंपासून सहांपर्यंत पाठवितात, आणि लहान आहेत त्यांतून दोन दोन पाठवितात. तशींच जीं मोठीं शहरें आहेत त्यांतून तीन किंवा चार पाठवितात, आणि त्यांहून लहान आहेत त्यांतून त्यांच्या मोठेपणाप्रमाणें एक किंवा दोन पाठवितात.*

पार्लमेंताच्या सभेंत जाऊन बसण्याबद्दल कोणास खर्च किंवा वेतन मिळत नाहीं. तरी प्रतिनिधींच्या सभेंत सभासद होणें ही मोठी अब्रूची गोष्ट आहे म्हणून मोठमोठे लोक ह्याची बळें इच्छा करितात. प्रतिनिधींच्या सभेंत बसण्याची योग्यता सर्वांस

---

* इसवी सन १८५६ ह्या वर्षी इंग्लंद व वेल्स ह्यांजकडून आलेले ४९६ प्रतिनिधि, स्काट्लंदाकडून आलेले ५३, आणि ऐर्लंदाकडून आलेले १०५ एकंदर ६५४ प्रतिनिधि बसत होते.

नाहीं. कायद्याप्रमाणें ज्याच्या पदरीं अमुक शेतजमीन आहे त्यासच ती मिळते. म्हटलें असतां ह्या कामास उत्कृष्ट बुद्धीचे चतुर, निस्पृह, आणि अक्रूदार असे पुरुष प्रजांनीं प्रतिनिधि नेमावे, परंतु ह्यांचा कांहीं नेम राहत नाहीं. जो लोकांचीं मनें वळवितो त्यास ती पदवी मिळते. कायद्याप्रमाणें सात सात वर्षांनीं प्रतिनिधींची पहिली सभा बदलून नवी सभा मिळाली पाहिजे. मध्यें राजाची मर्जी असली तर ती सभा बदलण्याचा अखत्यार राजाला आहे.

पार्लमेंताची सभा बहुतकरून ज्यान्युवारी महिन्यापासून आगस्त महिन्यापर्यंत भरत असते. परंतु काम पडल्यास पाहिजे तेव्हां ती सभा भरविण्याचा अधिकार राजास आहे. ह्या सभेमध्यें ज्या विषयांचे विचार होतात ते विषय दोन प्रकारचे आहेत. म्हणजे थोड्या लोकांकडे ज्यांचा संबंध असे कांहीं विषय, आणि सर्व लोकांकडे ज्यांचा संबंध असे कांहीं विषय आहेत. पहिल्या प्रकारचे विषय म्हटले म्हणजे, कालवे खणणें, नवे रस्ते बांधणें, रानाला आवार घालणें, कांहीं कामाकरितां मंडळी जमविणें, असल्या गोष्टींचा कायदा करून परवानगी देणें, इत्यादि आहेत. दुसऱ्या प्रकारांतले विषय म्हटले तर, राज्यांतील व्यवस्था करणें, उदमाची व्यवस्था ठेवणें, जे लोक दुसऱ्या देशांत जाऊन तेथें वसाहत करितात त्यांचा बंदोबस्त करणें, आणि कर व जकात बसविणें हे आहेत.

कायदा करण्याची रीत येणेंप्रमाणें आहे. कोणा सभासदास कांहीं नवा कायदा करावा, किंवा पहिला एखादा कायदा फिरवावा, असें वाटल्यास तो किंवा त्याच्या तर्फेनें दुसरा कोणी

सभासद सभेस सूचना करितो कीं, मी कायद्याविषयीं बोलणार आहें. मग त्याच्या मनांत ज्या प्रकारचा कायदा करावयाचा असेल त्या प्रकारचा मजकूर कागदावर लिहून तो *कागद सभेस देतो. तो वाचून त्याचा विचार तेथें तीन वेळां होतो. पहिल्या वेळेस वादविवादाच्या अंतीं सर्व सभासदांचें अनुमत घेतात. बहुतांनीं अनुमत दिलें तर दुसऱ्यानें त्याचा विचार होतो. त्या वेळेसही शेवटीं फिरून सर्वांचें अनुमत घेतात. त्यांत बहुतांनीं मान्य केल्यावर तिसऱ्यानें विचार होतो, तेव्हांही बहुतांनीं मान्य केला म्हणजे सभेंतून पार पडला. मग तो कागद दुसऱ्या सभेकडे पाठवितात; तेथेंही त्याचप्रमाणें त्याचा तीन वेळां विचार होऊन बहुसंमतानें पसंत झाला तर तो राजाकडे पाठवितात. तो राजानें पसंत केला म्हणजे चालू होतो. मुळींच जर तो पहिल्या सभेनें नापसंत केला तर पुढें जात नाहीं. कदाचित् पहिल्या सभेंत पसंत झाला पण दुसऱ्या सभेनें नापसंत केला, तरी रद्द होतो. तसेंच दोहों सभांनीं पसंत केला असतांही राजानें जर नापसंत केला, तर तो कायदा चालावयाचा नाहीं. एकूण दोनही सभा व राजा ह्या तिघांस पसंत झाला तरच नवा कायदा कायम होतो, किंवा पहिला फिरतो.

नव्या कायद्याविषयीं कधीं असें होतें कीं जो विषय नवा ठरावयाचा असेल तो लोकांच्या हिताचा असतो, परंतु त्याचें बीज कोणाच्या मनांत येत नाहीं; म्हणून त्याविषयीं प्रथम अनुमत कोणी देत नाहीं. तेव्हां तो तसाच राहतो. फिरून दुसरे वर्षीं तो सभेपुढें आणितात, तरी नापसंत होतो. असा बहुतवेळां जरी

---

* ह्या कागदास इंग्रजी भाषेंत बिल म्हणतात.

नापसंत झाला तरी वारंवार सभेंत तो विषय प्रगट करण्यास सभासदांस किंवा त्यांच्या तर्फेनें दुसऱ्यास अधिकार आहे. शेवटीं काळेंकरून त्या गोष्टीचें बीज लोकांस समजल्यावर त्याविषयीं अनुमतें बहुत पडतात, आणि तो कायदा ठरतो.

नवा कायदा करण्याविषयींच्या मजकुराचा कागद कोणत्याही सभेपुढें प्रगट करण्याचा सभासदांस अधिकार आहे. तरी लोकांपासून पैका घेणें, किंवा कर पट्टी बसविणें, ह्या गोष्टीचा विचार प्रथम प्रतिनिधींच्या सभेमध्यें मात्र होतो, प्रतिनिधींच्या सभेकडून आल्यावांचून लार्डांच्या सभेंत ह्याविषयीं कोणाला कागद देण्याचा किंवा विचार करण्याचा अधिकार नाहीं.

---

# इंग्लंदवर्णन, प्रकरण पांचवें.

## इंग्लंदांतील लोक व त्यांचें परस्पर दळणवळण.

ह्या देशांतील लोकांपेक्षां इंग्लंदांतील लोकांचा शरीराचा बांधा उंच, व हाडगातही मोठें आणि बळकट असतें. त्यांची छाती विशाळ असते. तिकडून आलेले लोक पाहून त्यांचा रंग गोरा आहे हें तर सर्वांस ठाऊकच आहे. जे इंग्लिश लोक नेहमीं इंग्लंद देशांत राहतात, आणि ज्यांची प्रकृति चांगली असते, त्यांच्या गालांवर टवटवीत लाली आली असते. त्यांचे डोळे अनेक रंगांचे असतात: कोणाचे निळे, कोणाचे अस्मानी, कोणाचे घारे, कोणाचे पिंगट, व कोणाचे भोरे. आंग्लोसाक्सन म्हणजे इंग्लंदांतील मूळचे लोक, ह्यांचे डोळे अस्मानी रंगाचे असतात, अशी लोकांत प्रसिद्धि आहे. तसेच त्यांचे केंसही

अनेक रंगांचे असतात; कोणाचे पिंगट, कोणाचे भोरे, कोणाचे काळे. काळे डोळे व काळे केंस हे बहुतांस नसतात, थोड्यांस असतात; आणि ज्यांस असतात त्यांचीं देखील बुबुळें फार पांढरीं, व आंगाचा रंग फार गोरा असतो. इंग्लिश लोकांमध्यें जातीचा कांहीं भेद नाहीं. ते आपण एकच आईबापांचीं लेंकरें व सर्व आपण भाऊबंद आहों, असें मानितात. बडे लोकांतील पहिल्या प्रतीचा सरदार, किंबहुना राजाही, सर्वांहून खालच्या पदवीच्या हलक्या नीच मनुष्याच्या हातचें पाणी प्याला असतां त्याला कोणी दोष ठेवीत नाहीं, व त्यालाही मी बाटलों, असें वाटत नाहीं. त्या लोकांत जातीचा भेद जरी नाहीं तरी पदवीचा भेद व कुळाचा भेद मोठा आहे. पहिल्या प्रतीचे बडे लोक म्हटले म्हणजे राजाच्या वंशांतील पुरुष, म्हणजे त्याचे पुत्र व भाऊ, व भावाचे पुत्र, व चुलते, वैगेरे हे आहेत. त्यांस प्रिन्स, आणि बायकांस प्रिन्सेस, असा किताब आहे. प्रिन्स म्हणजे राजकुमार असा अर्थ होतो. त्यांच्या खालीं दुसऱ्या पदवींत ड्यूक, मार्किस, अर्ल, वैकौंत, आणि बारन, ह्या पांच पदव्यांचे बडे लोक आहेत. ह्या बडेलोकांच्या खालीं मध्यम प्रतीचे लोक आहेत, त्यांमध्यें बारोनेत व नैत हे किताबवाले आहेत. ह्यांशिवाय ज्यांस वर सांगितलेले किताब नसून पिढीजादे श्रीमंत, ज्यांपाशीं वडिलोपार्जित जमीन किंवा पैका पुष्कळ आहे ते, व धर्माधिकारी म्हणजे लोकांस धर्मोपदेश करणारे, व कायद्यांचा अभ्यास करून कोर्तांत वकिलाचें काम चालविणारे, व वैद्यशास्त्राचा अभ्यास करून वैद्यकी करणारे, व आफिसांतील मोठ्या पगाराचे कारकून, व साऱ्यानें पुष्कळ जमीन घेऊन शेतकीचा

धंदा करणारे, तसेच परदेशांशीं उदीम व्यापार करणारे, व हाताखालीं कारागीर ठेवून हरएक शिल्पाचा कारखाना चालविणारे, आणि फौजेंतील व आरमारावरील सनदी हुद्देदार, हे मोडतात. ह्या मध्यम पदवींतील लोकांस जेन्त्री म्हणजे गृहस्थलोक म्हणतात. ह्यांचें सामान्य लक्षण पाहिलें असतां, जे लहानपणापासून विद्याभ्यास करितात, व जे गृहस्थांशीं सहवास ठेवितात, सभ्यरीतीनें वागतात, हलक्यांची संगत धरीत नाहींत, व ज्यांचा धंदा हातच्या कसबाचा नव्हे पण बुद्धिकौशल्याचा असतो, अशा योग्यतेचे लोक तेच ह्या गृहस्थलोकांत गणिले जातात. त्यांच्या खालीं कनिष्ठपदवीचे लोक आहेत. कनिष्ठपदवींत थोडीशी जमीन सान्यानें घेऊन शेतकी करणारे, दुकानदार, आपल्या हातानें शिल्पाचें काम करणारे, आफिसांतील हलक्या पगाराचे कारकून, घरांतील चाकरलोक, आणि सर्व प्रकारचे मजूरलोक, हे आहेत. खालच्या पदवींतील कोणी मनुष्यानें आपल्या उद्योगावर किंवा कसबावर बराच पैका मिळविला, तर तो खालची पदवी सोडून मध्यम पदवींत शिरतो. हा पदवींचा भेद सांगितला, ह्याशिवाय दुसरा भेद आहे, तो कुळाचा भेद होय; तो असा. ज्याचे पूर्वज बहुत दिवसां पासून बडेलोकांत आहेत, किंवा ज्याच्या कुळांत बहुत पिढ्यांपासून कोणीं चाकरी केली नाहीं, व उदीम व्यापार केला नाहीं, व हातानें काम धंदा केला नाहीं, केवळ घरचे सुखी असून घरच्या द्रव्यावरच प्रपंच चालवितात, त्यांस कुलीन म्हणतात. ह्यांची अबरू नुसत्या पदवीवाल्यांच्या अबरूपेक्षां मोठी आहे. कारण राजाच्या मनांत येईल त्यावेळीं त्यांस कोणालाही मोठी पदवी देतां येईल, परंतु त्याच्यानें कुलीनपणा कोणाला देववणार नाहीं. खालच्या पदवीच्या

मनुष्यानें मोठी शिपाइगिरी करून दाखवून बडे लोकांची पदवी मिळविली, अशी गोष्ट बहुत वेळां घडून आली आहे.

इंग्लंदांत बडे लोकांची व श्रीमंत गृहस्थलोकांची अबरू मोठी आहे खरी, तरी तेथें सदाचरणाची इतकी मातबरी आहे कीं कोणी बडेलोकानें किंवा कुलीन मनुष्यानें कुमार्गाचा अंगीकार केला, असें लोकांस समजलें, किंवा त्याविषयीं संशय आला, तर त्याला लोक आपल्या पंक्तीस घेत नाहींत. ह्या गोष्टीचें तारतम्य खालच्या पदवीचे लोक देखील ठेवितात. कोणी मनुष्य अबरूदार, श्रीमंत, कुलीन, असा असूनही कुमार्गानें वर्ततो, तर त्याची चाकरी करण्यापेक्षां जो ह्यापेक्षां हलका आहे पण सदाचारसंपन्न आहे त्याची चाकरी खुषीनें व लवकर पतकरितात.

ह्या हिंदुस्थान देशांत अशी चाल आहे कीं बापाची जिंदगी स्थावर किंवा जंगम असेल ती सर्व पुत्रांस सारख्या विभागानें मिळते. तेणेंकरून वंशपरंपरागत जमीन, धन, किंवा वृत्ति ह्यांचे विभाग होतां होतां कालगतीनें तीं क्षीणदशेस पावतात. आणि त्याचे वंशज दरिद्री होतात. इंग्लंददेशांत तशी चाल नाहीं. वडिलोपार्जित जो जमीनवगैरे स्थावर माल असतो तो वंशपरंपरेनें वडील पुत्रासच मिळतो, त्याचे विभाग होत नाहींत. बापानें स्वतां मिळविलेलें जें द्रव्य असतें त्याची व्यवस्था करणें हें मात्र बापाच्या खुशीवर आहे. सर्व पुत्र लहान आहेत तोंपर्यंत बाप त्यांजकडून विद्याभ्यास करवितो. मग ज्येष्ठ पुत्र खेरीज करून बाकीचे पुत्र तितक्या वयांत आले म्हणजे कोणाला वैद्यकीचें, कोणाला कोर्तांतील वकिलाचें, कोणाला धर्मोपदेशकाचें, अशीं कामें शिकण्यास लावितो, अथवा लष्करांतील किंवा आरमारावरील सनदी हुद्याचें काम मिळवून देतो. त्याप्रमाणें

ते निर निराळ्या धंद्यांवर पैका मिळवून आपापला संसार करितात बापापाशीं द्रव्य असतें तें तो मरतेवेळेस आपल्या खुशीप्रमाणें पुत्रांस वांटून देतो. त्याविषयीं कोणी कुरकूर करीत नाहीं. अशा रीतीनें जीं कुळें पहिल्यापासून संपन्न असतात तीं दरिद्रदशेस पावत नाहींत. व नवीन उद्योग करून संपत्ति मिळविणें सर्वांस भाग पडतें. आणि देशामध्यें पिढी दरपिढी चांगले सधन घरचे सुखी अशा श्रीमंत लोकांची, बडे लोकांची, व गृहस्थ लोकांची, मंडळी चिरकाल कायम राहते. आणि देशकल्याणाकरितां विद्वान् व युक्तिवान्, उद्योगी लोकांस द्रव्यद्वारा आश्रय देण्यास ते समर्थ असतात. तेणेंकरून उद्योगी लोकांस मोठाले उद्योग करण्याविषयीं उत्तेजन येतें. स्थावरजिंदगीविषयीं विभाग न करावे अशी रीत जर नसती, तर मोठमोठालीं कुळें थोडक्याच पिढ्यांनीं दारिद्रदशेस पावून त्यांचें मोठपणाचें नांवमात्र राहिलें असतें. व नांवाचे बडे लोक ह्यांची प्रतिष्ठा जाऊन, राजाची खुशामत करून तो देईल त्यानें आपली उपजीविका करावी, असें करणें त्यांस प्राप्त झालें असतें.

वर सांगितलेल्या विषयांचें निरूपण विस्तारेंकरून करूंलागल्यास, लोक फार सुधारून उत्तम अवस्थेस पोहोंचले त्यांच्या पैशाचा परंपरेनें कसा व्यय होतो ह्याविषयीं मोठा ग्रंथ होईल. इतकेंच मात्र सांगतों कीं, ज्या देशांत बहुत प्रकारच्या पदार्थांचा निरंतर खप होतो, मग ते पदार्थ त्या देशांत उत्पन्न झालेले असोत किंवा बाहेरून आणिलेले असोत, तसेंच ते देहनिर्वाहाचे असोत किंवा ऐषआरामीचे असोत, ते पदार्थ आपल्या देशांत उत्पन्न करण्याचें किंवा बाहेरून आणण्याचें काम त्या देशांत

बहुत मनुष्यांस मिळून त्यांचें उपजीवन चालतें हें उघडच आहे. तसेंच श्रीमंतलोकांस जे ऐषआरामीचे व सुखोपभोगाचे पदार्थ लागतात, ते तयार करून देण्याच्या व आणून देण्याच्या कामांकडे जे लोक गुंततात, त्या लोकांसाठीं अन्न वस्त्र इत्यादि पदार्थ उत्पन्न करण्याच्या व तयार करण्याच्या कामांस दुसरे लोक लागून त्यांचा उदरनिर्वाह होतो.

बाहेरून पदार्थ आणावे लागतात, असें सांगितलें, तर ते पदार्थ आणण्यास गलबतें पाहिजेत; तेव्हां तीं गलबतें बांधण्याच्या कामांत बहुत कारागीर लोकांस काम मिळून त्यांचा चरितार्थ चालतो. तसेंच, गलबतें तयार झालीं म्हणजे तीं चालविण्यासाठीं नावाडी लोक पाहिजेत, ते त्या कामास लागून बहुतांस खावयास मिळतें. आणि अन्य देशांहून जे पदार्थ आणावयाचे असतात त्यांच्या मोबदला आपल्या देशांतून दुसरे पदार्थ नेले पाहिजेत. ते पदार्थ उत्पन्न करण्यास बहुत लोकांस कामें मिळून त्यांची उपजीविका सुखानें चालते. ह्या रीतीनें बडेलोकांचें व गृहस्थलोकांचें द्रव्य हें देशाचे कल्याणास कारण होतें. असें कीं, ते लोक देहनिर्वाहाच्या व ऐषआरामीच्या पदार्थांकरितां जें द्रव्य खर्च करितात, त्या द्रव्यानें उदम्यांस व शिल्पकारांस व शेतकऱ्यांस उत्तेजन होऊन त्यांचा निर्वाह चालतो. अशा रीतीनें तें द्रव्य सर्वांस परंपरेनें उपयोगीं पडतें. ह्या देशांत अशी चाल आहे कीं कुटुंबांतील सर्व पुरुष आपआपल्या मिळकतीचें द्रव्य एकत्र करितात, आणि सर्व मिळून त्याचा उपभोग घेतात, तशी चाल इंग्लंदांत नाहीं. तेथें एका कुटुंबांतील पुरुष वयांत आल्यावर वेगळे होतात. मग बापानें दिलेलें

द्रव्य किंवा आपण मिळविलेलें द्रव्य जो तो आपआपल्या खुशी-प्रमाणें खर्चितो, किंवा सांठवितो, किंवा मनास येईल त्याप्रमाणें त्याची व्यवस्था करितो. ह्यांत कोणास वाटेल कीं, ह्या रीतीनें हरएकाची स्वार्थबुद्धि वाढत असेल, व जो तो आपापलेंच कल्याण करूं पाहत असेल, तर असें नाहीं. वास्तविक पाहिलें असतां ह्या गोष्टीचा परिणाम अगदीं निराळाच होतो. ते भाऊ जरी वेगळे राहिले तरी त्यांच्या मनांतील बंधुप्रेम सुटत नाहीं. व ते जाणतात कीं, एका आईबापाच्या पोटीं जे जन्मले त्यांनीं एकमेकांस मदत करावी, एकमेकांच्या उपयोगीं पडावें, हा त्यांचा धर्म होय. म्हणून कोणा एखाद्या भावास मदत पाहिजे, तर दुसरे भाऊ प्रेमभावानें व बंधुधर्मानें त्यास मदत करितात, व ज्यास मदत केली तो तरी असें समजतो कीं, ही मदत माझा हक्क आहे म्हणून मला मिळाली असें नाहीं, तर बंधुप्रेमानें ही मदत मिळाली, ह्या मुळें मी ह्यांचा उपकारी आहें. येणेंकरून मदत करणाऱ्यांची व मदत मिळविणाऱ्यांची प्रीति उत्तरोत्तर अधिक अधिक वाढत जाते. अशा करण्यांत बंधु एकत्र राहून आपापलें द्रव्य एके ठायीं केल्यानें जो कलहरूप आणि द्वेषरूप परिणाम व्हावयाचा तो होत नाहीं.

ज्या लोकांची पदवी समान आहे ते लोक बहुतकरून एकमेकांची संगत धरितात. कारण, सारखी प्राप्ति, सारखा उद्योग, आणि बहुतेकांचे विवाहादिसंबंधानें कुटुंबाचें नातें, हीं स्नेहास कारणें होतात. उमदे लोक, व पार्लमेंताच्या सभेंत बसणारे प्रतिनिधि, आणि घरचे संपन्न गृहस्थ, हे वर्षांतून कांहीं दिवस लंदन राजधानींत असतात, व कांहीं दिवस आपआपल्या गांवीं असतात.

गांवांतील त्यांच्या हवेल्या सर्वप्रकारें सोईच्या व ऐषआरामीच्या आणि सुखोपभोगाच्या पदार्थांनीं भरलेल्या असतात. त्या लोकांची जशी संपत्ति असते तसतशा त्यांच्या हवेल्या व हवेल्यांचे भोंवतालचे बागबगीचे, रमणा, वगैरे जमीन, व घरांतील सामान, व घोडे, गाड्या, रथ, व त्यांचे पोशाख, असतात.

बडेलोक व संपन्न गृहस्थ ह्यांचीं सुखें दोन प्रकारचीं असतात. एक विषयोपभोगापासून सुख आणि एक परस्पर संगतीपासून सुख. विषयोपभोगाचें सुख म्हटलें म्हणजे नाच, तमाशे, नाटकें, घोड्यांच्या शर्यती, अनेकप्रकारच्या हरजितीचे खेळ, ह्यांपासून झालेलें सुख. कितीएकांचें खाण्यापिण्याच्या सुखाकडे लक्ष फार असतें, त्यांत नवे नवे प्रकार काढावे व त्यांची रुचि घ्यावी. परस्पर संगतीचें सुख म्हटलें तर, चार इष्टमित्र मंडळी एकत्र मिळून ज्या गोष्टींविषयीं सर्वांची आस्था असते अशा गोष्टींवर परस्पर वादविवाद, भवति न भवति, इत्यादि संभाषण झाल्यानें एकमेकांचें मन एकमेकांस कळतें, व परस्परांची प्रीति एकमेकांवर लागते, ह्यापासून जें सुख होतें तें. पार्लमेन्ताचे सभासदांपैकीं चार मंडळी एखाद्याचे घरीं मिळाली तर राज्यप्रकरणाच्या गोष्टी सहज त्यांच्या बोलण्यामध्यें निघतात. ज्या दिवसांत पार्लमेन्तसभा चालू असते त्या दिवसांत तर विशेषेंकरून त्या गोष्टींची वाटाघाट चालते. परंतु एखाद्याचे घरीं मित्र मंडळी, म्हणजे निरानिराळ्या धंद्यांचे पुरुष व तशा त्यांच्या बायका अशी मंडळी मिळाली असतां तींत सदाचरणाविषयीं व धर्माविषयीं आपल्या देशाची व अन्य देशांची स्थिति कशी आहे, व सदाचरण आणि धर्म ह्यांची वृद्धि कशी करावी, व आपल्या शेजारीं गरीबगुरीब

लोक राहतात त्यांची स्थिति कशी सुधारावी, व अलीकडे नवीन युक्ति, नवें कौशल्य कोणतें कसें निघालें; व अलीकडे कोणकोणतीं नवीं बुकें छापिलीं, ह्या गोष्टी निघतात, व त्यांविषयीं बहुत प्रकारचें संभाषण होतें, तणेंकरून सर्वांचीं मनें रंजतात. अशा मंडळींत बहुतकरून सुशिक्षित बायका कांहीं वाद्यें वाजवितात, व कांहीं गाणें म्हणतात, तणेंकरून त्या मंडळीला फारच उत्साह होतो. मेजावर जिकडे तिकडे चित्रें, नकाशे, तसबिरा, व दुसरे मौजेचे चमत्कारिक पदार्थ मांडलेले असतात त्यांजकडे पाहून सहजच त्यांविषयीं संभाषण होतें, तसेंच त्यांच्या कलेविषयीं व नामांकित चित्रकाराविषयीं संभाषण चालतें.

जे गृहस्थ घरचे सुखी आहेत, म्हणजे ज्यांच्या पदरीं जमीन पुष्कळ असून सारा मिळतो, किंवा नक्त पैक्यावर व्याज मिळतें, म्हणून उपजीविकेसाठीं ज्यांस धंदा करावयास नलगे, असे जे आहेत ते आपल्या शेजारीं जे गरीबगुरीब राहतात त्यांची सुधारणूक करण्याविषयीं आणि त्यांचें कल्याण वाढविण्याविषयीं काळजी धरून बरेंच लक्ष लावितात. ते व त्यांच्या बायका व त्यांच्या कन्या गरीबगुरीब लोकांच्या मुलांसाठीं शाळा घालून त्यांचा खर्च चालवितात. आपण स्वतां जाऊन त्या शाळांची देखरेख ठेवितात, व कधीं कधीं स्वतां मुलांस शिकवितात. तसेंच गरीब लोकांमध्यें परस्परांकरितां वस्त्रें व हिंवाळ्यांत कोळसे, सर्पण, व दुखणाइतांस औषधपाणी, व ते दुखणाईत आहेत तोंपर्यंत त्यांच्या पोटास खर्च, इत्यादि कामांस मदत करणाऱ्या निरनिराळ्या मंडळ्या आहेत त्यांची देखरेख करितात, व त्यांचा हिशेब ठेवितात, व गरीब लोकांच्या झोंपड्यांत जाऊन त्यांचा

समाचार घेतात, व त्यांस बुद्धिवाद सांगतात, व त्यांच्या अड-चणी दूर करितात. ह्या रीतीनें परस्परांचा परस्परां विषयीं मनो-भाव उत्तम प्रकारचा होतो. ह्या देशांत गरीब लोकांचा आणि श्रीमंत लोकांचा संबंध पाहिला असतां श्रीमंतांपासून आपणांस कांहीं लाभ होईल ही आशा धरून गरीब लोक त्यांचें आर्जव करितात, आणि त्या आर्जवामुळें मात्र श्रीमंत गरिबांस कांहीं देतात, इतकेंच काय तें. परंतु इंग्लंदांत तशी गोष्ट नाहीं. तेथें गरीब लोकांची दया श्रीमंत लोकांस फार येते, व ते श्रीमंत लोक गरिबांस संकटसमयीं हरएक प्रकारें मदत करितात, व त्यांच्या दुःखानें आपण दुःखी होतात. ह्यामुळें गरीब लोकही आपल्या शेजारच्या श्रीमंताचें कल्याण पाहून परम संतोष पाव-तात. आणि श्रीमंतास दुःख किंवा संकट प्राप्त झालें तर ते वास्तविक दुःखी होतात. तसेंच पूर्वीं कोणी श्रीमंत असून कालेंकरून गरिबीस आला असतां त्याच्यानें मदत करवत नाहीं; तरी त्याचा मान सत्कार पहिल्याप्रमाणें ठेवितात, किंबहुना ह्यावेळीं विशेष ठेवितात. ह्यामुळें परस्परांच्या प्रीतिसुखाची उत्तरोत्तर वृद्धि होत जाते.

---

## इंग्लंदवर्णन, प्रकरण सहावें.

### न्याय करण्याचें प्रकरण आणि कायदे.

इंग्लंदांत न्याय करण्याच्या सभा म्हणजे कोर्ते येणें प्रमाणें आहेत.

१ अपिलाचें एक सुप्रीम कोर्त आहे, ज्यास प्रिवी कौन्सिल म्हणतात. हें कोर्त हौस आफ् लार्ड्स, म्हणजे बडे लोकांची सभा,

ह्याची जुदिशल कमिती, म्हणजे न्यायखात्याची कमिती आहे. ह्या देशांतील लोक राजा होता तेव्हां किंग्कौन्सिल म्हणत असत, आणि आतां राणी आहे म्हणून क्वीनकौन्सिल म्हणतात, तें हेंच.

२ साधारण कायदे, म्हणजे पार्लमेन्तानें केलेले आक्त व प्राचीन संप्रदाय, ह्यांच्या अन्वयें ज्यांत इनसाफ होतो अशीं तीन मुख्य अव्वल कोर्तें आहेत. त्यांचीं नांवें हीं आहेत, क्वीन्सबेंच म्हणजे राणीचें बैठकीचें कोर्त, एक्सचेकरचें कोर्त, आणि कामन प्लीज्चें कोर्त. ह्या तीन कोर्तांत साधारण देणें घेणें, वतनवृत्ति, हक्क, वगैरे सर्व गोष्टींचे दावे चालतात. ह्या प्रत्येक कोर्तांत पांच पांच न्यायाधीश असतात. ह्या तीन कोर्तांपैकीं एखाद्या कोर्तास कांहीं गोष्टीचा संशय पडल्यास हे पंधरा जज्ज एकत्र बसून त्या गोष्टीचा निर्णय करितात. ह्याप्रमाणें हें तीन कोर्तांच्या निवाड्यावर अपीलकोर्त होतें. ह्या तीन कोर्तांत जूरीची वहिवाट आहे, म्हणजे जूरीच्या ठरावाप्रमाणें इनसाफ होतो.

३ चान्सरी ह्या नांवाचें एक कोर्त आहे. जे दावे चालविण्यास दुसऱ्या कोर्तांस कायदे किंवा अखत्यार नाहीं ते दावे येथें चालतात. ह्या कोर्तांत जूरीची वहिवाट नाहीं; केवळ न्यायाधीशाच्या मतानें इनसाफ होतो. ह्या कोर्ताच्या मुख्य न्यायाधीशाला लार्दचान्सलर हा किताब आहे. त्याच्या हाताखालीं दोन चार नायब आहेत, ज्यांस वैसचान्सलर असा किताब आहे. ह्यांचीं निरनिराळीं स्वतंत्र कोर्तें आहेत. ह्या चान्सरी कोर्ताच्या पोटीं एक अपिलाचें कोर्त आहे. ह्या अपील कोर्तांत दोन न्यायाधीश असतात.

४ एक्लीजीआस्तिकलकोर्त, आणि आदामिराल्तीकोर्त, ह्या नांवांचीं

दोन कोर्तें आहेत. ह्यांत मृतपत्राविषयींचे दावे, व देवळाविषयींचे व धर्मखात्यांतील कित्येक गोष्टींविषयींचे दावे, समुद्रावर गलबताला गलबत लागल्याविषयींचे दावे, आणि वैगारशी गलबतांविषयींचे दावे ह्यांची चौकशी होते. ह्या कोर्तामध्यें *क्याननला आणि †रोमनला ह्या कायद्यांच्या अन्वयें इनसाफ होतो.

५ विवाहाविषयींचे दाव्याचें कोर्त. ह्यांत विवाहसंबंधी दाव्यांचा इनसाफ होतो. हें कोर्त अलीकडे नवेंच स्थापिलें आहे.

६ वर सांगितलेलीं पांच प्रकारचीं वरिष्ठ कोर्तें ह्यांशिवाय पांचशें रुपयांहून कमी रकमांच्या दाव्यांची चौकशी करण्याकरितां कौन्तिकोर्त ह्या नांवाचीं कोर्तें सर्व देशांत जागोजाग स्थापिलीं आहेत.

वर सांगितलेल्या वरिष्ठ कोर्तांतील न्यायाधीशाचा मान फारच मोठा असतो. लार्द चान्सलर म्हणून जो चान्सरी कोर्ताचा मुख्य न्यायाधीश हा तर राणीचे घराण्यांतील पुरुष खेरीज करून सर्व गृहस्थ बडे लोकांचे वर आहे. ह्या न्यायाधीशांची पदवी उगीच राणीच्या लोभानें किंवा प्रधानांच्या लोभानें मिळत नाहीं. ज्याची विद्या अधिक, ज्याची बुद्धि विशाळ, जो कायद्यांमध्यें फार वाकबगार, त्यालाच ही पदवी मिळते. पूर्वीं राजाची मर्जी जोंपर्यंत न्यायाधीशावर असे तोंपर्यंत त्याची जागा कायम राही; राजाची गैरमर्जी झाली तर राजा त्यास बरतर्फ करी परंतु आतां तशी गोष्ट नाहीं; जोंपर्यंत न्यायाधीशाची वर्तणूक चांगली आहे तोंपर्यंत त्याची जागा काढण्यास राजा देखील

* क्याननला म्हणजे धर्माधिकाऱ्यांच्या सभांनीं केलेले कायदे.
† रोमनला म्हणजे रोमच्या एका बादशाहानें केलेले कायदे.

समर्थ नाहीं. सांप्रत कोणाच्या तोंडाकडे त्यास पहावयाला नको. निःपक्षपातानें न्याय करणें हेंच त्यास पाठबळ आहे.

वर सांगितलेलीं वरिष्ठ कोर्तें हीं लंदन शहरांत आहेत. तेथें दूरच्या लोकांस येण्याची इजा न पडावी म्हणून त्या वरिष्ठ कोर्तांतील पंधरा न्यायाधीश वर्षांतून दोनवेळां फौजदारी खटलीं व दिवाणी खटलीं ह्यांची चौकशी करण्यासाठीं प्रांतोप्रांतीं फिरतात; तेव्हां त्यांस सरकित जज्ज म्हणतात. हे न्यायाधीश एकेक ठिकाणीं दोन दोन जातात; आणि हरएक प्रांताच्या मुख्य शहरामध्यें ते आपली कचेरी करितात. ह्या कचेरींत फौजदारी व दिवाणी ह्या खटल्यांचे इनसाफ होतात. प्रांताच्या मुख्य शहरास हे न्यायाधीश गेल्यावर व तेथें कचेरी केल्यावर त्या मुख्य शहरांत जे फौजदारी प्रकरणीं अपराधी पुढें चौकशी होण्यासाठीं तुरुंगांत ठेविलेले असतात ते तेथें चौकशीस आणवितात. ह्या कचेरींत इनसाफ करण्याची रीत म्हटली म्हणजे मुंबईतील बादशाही कोर्तांतील इनसाफ करण्याच्या रीतीप्रमाणेंच आहे. ज्यावर अपराध केल्याची फिर्याद झाली असते तो कैदी कोर्तांत आणितात, मग फिर्यादीकडले व कैदीकडले साक्षीदार येऊन जूरीच्या समोर साक्ष देतात. जूरी म्हणजे बारा माणसांची मंडळी, हीं माणसें शपथ घेतात कीं, आम्हां पुढें साक्षीदार साक्ष देतील ती ऐकून घेऊन पक्षपात न करितां आम्ही निवाडा करूं. जूरीच्या मतावर कैदीचें काय तें बरें वाईट व्हावयाचें. जूरीचीं माणसें स्वतंत्र असतात. कैदी अपराधी ठरून त्यास शिक्षा मिळावीच असें त्यांच्या मनांत येण्यास हेतु नसतो; किंबहुना तो निरपराधी ठरून सुटावा असें त्यांच्या मनांत असतें. जूरीची

वहिवाट जेथें आहे तेथें कैदीवर जुलूम करावयाचा न्यायाधीशाचे मनांत असला तरी त्याचें कांहीं चालत नाहीं. बादशाही कोर्ते खेरीज करून ह्या देशांत जूरीची चाल नाहीं, म्हणून कैदीचें बरें वाईट काय तें एकट्या न्यायाधीशाच्या मतावर असतें. तो तर सरकारचा चाकर सरकारचा पगार खाणारा असतो.

कैदीच्या बऱ्याविषयीं आणखी एक मोठी गोष्ट आहे, ती अशी. जूरीचें काम चालविणाऱ्या माणसांतून कैदीस वाटेल तर, हा मनुष्य माझ्या चौकशींत नको, अशा प्रकारें कारण दाखविल्या वांचून चोवीस माणसें नाकारायास त्यास अधिकार आहे. पुढें योग्य कारण दाखविलें तर पाहिजेत तितकीं माणसें नाकारायास त्यास अधिकार आहे. ह्यावरून पक्षपात किंवा लांच किंवा जबरी ह्यांच्या योगानें कैदीचें वाईट होण्याचा संभव थोडाच. ह्या कचेरींत न्यायाधीशाकडे काम इतकेंच आहे कीं साक्षीदारांनीं साक्षी दिल्या त्यांचा चांगला विचार करून शेवटीं त्यांचा सारांश जूरीवाल्यांस कळवावा, व त्यांतील विशेष गोष्टींकडे लक्ष्य लावावें, आणि त्या त्या अपराधाविषयींच्या कायद्याची माहिती करून द्यावी. मग जूरीनें निवाडा केल्यावर कायद्याप्रमाणें अपराधानुरूप शिक्षा द्यावी, किंवा अपराध लागू न झाल्यास, सोडून द्यावें, हें आहे. इंग्लंदांतील कोर्तांचें काम चालत असतांना आंत जाण्यास कोणास बंदी नाहीं. कोर्तांतील चौकशी दिवाणी प्रकरणीं असो किंवा फौजदारी प्रकरणीं असो, ती इमानानें व निष्पक्षपातानें उघडपणें जज्ज करितो. लांच घेणें हें कोणास ठाऊकच नाहीं.

इंग्लंदांतील कायदे कांहीं लिहिलेले आहेत, व कांहीं फार प्राचीन काळापासून चालत आलेल्या संप्रदायावर आहेत. लिहिलेल्या कायद्यांपैकीं कांहीं फार जुने आहेत व कांहीं नवे केलेले आहेत. लोकांच्या वर्तणुकींत जसा फेरफार होतो तसे कायदे बदलून नवे जुने करितात. ह्या देशांतील हिंदूंच्या धर्मशास्त्रांत जे कायदे आहेत ते अद्याप पर्यंत फिरले नाहींत, लोकांचें ज्ञान किती जरी वाढलें, विद्या किती जरी वाढली, रीतीभातींत किती जरी फेर पडला, तरी त्यांचें शास्त्र बदलत नाहीं.

इंग्लंदांतील लोकस्थितीचें हें एक मोठें लक्षण आहे कीं कायद्यांची सत्ता सर्व लोकांवर सारखी चालते. राणीला देखील कायद्याच्या अमलांत राहणें भाग पडतें. श्रीमंत आणि दरिद्री ह्या सर्वांचा कायदा एकच आहे. कधीं कधीं संभावित कुलीन अब्रूदार अशा मनुष्याच्या हातून अपराध झाला असतां त्यास शिक्षा मिळूंनये व त्याची अपकीर्ति होऊंनये म्हणून त्याच्या आप्तांनीं पुष्कळ उद्योग केला, परंतु तो व्यर्थ जाऊन गरीब लोकांस जी शिक्षा तीच त्यास मिळाली, असें अनेकवेळां झालें आहे. निष्पक्षपाताचा न्याय सर्वांस सारखा मिळावा, सर्व लोकांची मालमत्ता निरुपद्रव रहावी, कोणास इजा नव्हावी, सर्व लोक आपआपल्या खुद्द जातीचे मुखत्यार असावे, कोणीं कोणावर जबरी करूं नये, ह्या गोष्टीं विषयीं पार्लमेन्टानें फार बंदोबस्त केला आहे. ह्या देशांत बेगारीस माणसें धरण्याची चाल होती तशी तेथें नाहीं, व बाजारचा माल बळेंच घेऊन मनास येईल ती किंमत द्यावी, हें तर तेथें कोणास माहीतच नाहीं.

*खून वगैरे मोठ्या अपराधांस मात्र फांशीची शिक्षा आहे. खोटा लेख करणें, घरास आग लावणें, घर फोडून किंवा एरवीं चोरी करणें, असल्या अपराधांस काळ्या पाण्यावर पाठविण्याची शिक्षा देतात; नाहींतर इंग्लंदांतच तुरुंगांत ठेवून अपराधाच्या तारतम्यानें सक्तमजुरी करवितात. इतर अपराधांबद्दल कितीएकांस केवळ तुरुंगांत ठेवितात. कितीएक अपराध्यांस तुरुंगांत ठेविल्यावर एकदां किंवा दोनदां बांधून फटके मारवितात.

शहरोंशहरांस शहरच्या बंदोबस्ताकरितां दरवर्षास हुद्देदारांची नेमणूक होत असते. हे हुद्देदार लहानसान अपराधांची चौकशी करून अपराध्यांस शिक्षा करितात. व हरएक प्रकारें आपल्या शहराची देखरेख ठेवितात. बहुतकरून मुख्य हुद्देदार ह्यांस मेयर आणि त्यांचे मदतगार ह्यांस आल्दरमान असें नांव असतें. ज्या शहरास सरकारांतून सनद मिळाली असते, त्या शहरांत हे हुद्देदार असतात. दुसऱ्या शहरांत दुसऱ्या नांवांचे हुद्देदार असतात. लंदन शहराचा जो मेयर आहे त्यास लार्ड मेयर हा किताब आहे. ह्या शिवाय सर्व देशांत जागोजाग पोलीस कोर्त व माजिस्त्रेतांचीं कोर्तें आहेत, ह्यांत लहानसान अपराध्यांची चौकशी होते. व जागोजाग संभावित गृहस्थांस जस्तिस् आफ धि पीस् हा हुद्दा देऊन सरकार त्यांची नेमणूक करितें. ते सामान्य अपराधांची चौकशी करून फैसला करितात. मोठा अपराध असला तर सरकित जज्ज येऊन चौकशी करीत

---

* मागें इंग्लंदांतील कायदे फार क्रूर होते. पुष्कळ साधारण अपराध्यांस फांशीची शिक्षा होती, परंतु अलीकडे कायदे सौम्य झाले, आणि फांशीची शिक्षा फार कमी झाली आहे.

तोंपर्यंत अपराध्यांस तुरुंगांत ठेवितात. हरएक प्रांतांत शेरिफ ह्या नांवाचा हुद्देदार असतो. शेरिफ ह्याला येथें नाझर म्हणतात. शेरिफ ह्याचें काम येणेंप्रमाणें. सरकारचा जो हुकूम येईल तो बजावावा. पार्लमेन्त सभेंत बसण्याकरितां लोकांकडून प्रतिनिधींची नेमणूक करवावी. पार्लमेन्ताला किंवा राजाला कांहीं गोष्टींविषयीं अर्ज करण्याचें लोकांच्या मनांत आलें असतां त्याचा विचार करण्याविषयीं लोक एकत्र जमवावे, अथवा लोककल्याणाच्या हरएक गोष्टीचा विचार करण्यासाठीं लोक मिळवावे. व त्या सभेंत मुख्य स्थानीं आपण बसावें. सरकित जज्ज आले असतां त्यांच्या जवळ हजीर राहून ते सांगतील त्या वेळेस कैदी व साक्षीदार हजीर करावे, व जूरींत बसणाऱ्या लोकांस बोलावणें करावें, व जज्जांनीं जी शिक्षा अपराध्यास देण्याची ठरविली असेल ती बजावावी. हरएक शेरिफाचे हाताखालीं नायब असतो. हीं कामें शेरिफ आपण जातीनें करितो किंवा नायबाकडून करवितो. वर सांगितलेले हुद्देदार मेयर, आल्दरमान, जस्तिस् आफ् धी पीस, शेरिफ ह्यांस सरकारांतून कामाबद्दल वेतन कांहीं मिळत नाहीं, ते अब्रूसाठीं काम करितात. हे कामगार प्रतिवर्षी नवे नवे नेमिले जातात.

---

## इंग्लंदवर्णन, प्रकरण सातवें.

### विद्याभ्यास.

इंग्लंदांतील पहिल्या पदवीचे व मध्यम पदवीचे लोक आपल्या मुलांचा विद्याभ्यास चांगला व्हावा म्हणून त्यांस शाळेंत घालितात. त्या मुलांचा विद्याभ्यास होण्याकरितां दोन प्रकारच्या

शाळा आहेत. एक नेमणुकीच्या शाळा, आणि दुसऱ्या खासगीच्या शाळा. नेमणुकीच्या शाळा म्हणजे मागें कोणी राजानें, किंवा बडे लोकांनीं, किंवा श्रीमंत गृहस्थांनीं, अमुक ठिकाणीं शाळा स्थापून त्या शाळेंत शिक्षकांस वेतनें मिळावीं व अमुक विद्यार्थ्यांस नेमणुकी मिळाव्या ह्यांसाठीं पुष्कळ पैसा ठेविला असतो, ती शाळा नेमणुकीची. अशा शाळांत नेमणुकीच्या विद्यार्थ्यांस विद्या शिकण्याचा खर्च न पडतां विद्या प्राप्त होते, व कोठें कोठें त्यांचा पोटखर्चही चालतो. ह्या शाळांतील शिक्षकाची जागा मिळविण्याकरितां मोठे मोठे विद्वान् लोक यत्न करितात. मग जसजशी त्यांच्या गुणांची कीर्ति असेल तसे तसे बडे लोक व गृहस्थ लोक आपलीं मुलें त्या शाळेमध्यें ठेवून त्यांच्या विद्याभ्यासाकरितां व पोटखर्चाकरितां पदरचा पैका देतात. अशा शाळा इंग्लंदामध्यें पुष्कळ आहेत, त्यां पैकीं ईतन नांवाची एक शाळा आहे तींत सुमारें पांचशें सहाशें मुलगे असतात, त्यांतून सत्तर मुलगे मात्र नेमणुकीचे आहेत, वरकड सारे पैका देऊन शिकणार आहेत. त्यांतील बाहेर गांवचे आपला पोटखर्चही देतात. तसा दुसऱ्या शाळांतही विद्यार्थ्यांचा भरणा मोठा असतो. त्या शाळांत पैका देऊन जे विद्याभ्यास करितात त्यांस शिकविण्याबद्दल व पोटखर्चाबद्दल मिळून दर मुलास एक हजारापासून अडीच हजार रुपयांपर्यंत वर्षास खर्च पडतो.

खासगीच्या शाळा म्हणजे कोणी विद्वान मनुष्य आपण होऊन शाळा घालितो, आणि जे मुलगे येतील त्यांपासून पैका घेऊन त्यांस शिकवितो, मग त्याचे गुण जसे असतील, व त्याची

मेहनत जशी असेल, त्याप्रमाणें त्याच्या शाळेंत मुलांचा भरणा होतो. अशा शाळांत नेमणुकी नसतात. ह्या शाळांत गुरूच्या गुणांप्रमाणें, किंवा त्याच्या इच्छेप्रमाणें मुलगे दहांपासून शंभर सवाशें पर्यंत असतात. ह्या शाळेंत विद्येच्या व पोटाच्या खर्चा बदल वर्षास दोनशें रुपयांपासून हजार पंधराशें रुपयांपर्यंत खर्च पडतो. ज्या शाळेमध्यें पैसा थोडा पडतो त्या शाळेंत शिकणें व खाणें त्या मानाचेंच असतें.

पांच वर्षांच्या वयापासून दहा वर्षांच्या वयापर्यंत मुलगे शाळेंत जाऊं लागतात. त्यांत ज्यांच्या आईबापांस मुलगे लहान असतां त्यांस शिकविण्यास फावतें ते कांहीं वर्षे घरींच शिकून मागाहून शाळेस जातात. आणि ज्यांच्या आईबापांस मुलग्यांना शिकविण्यास अडचण असते ते मुलगे लवकरच शाळेस जातात मुलगे घरीं असतां शाळेस जाण्याच्या अगोदर आपल्या देशभाषेंतील पुस्तकें वाचण्यास शिकतात, व सात आठ वर्षांचे होत तों पर्यंत घरीं राहिले तर लातिन भाषेंतील शब्दरूपावळी व धातुरूपावळी वगैरे शिकतात. तसेंच लिहिणें व गणित ह्यांचा थोडा थोडा अभ्यास करूं लागतात. शाळेंत जाऊं लागल्यावर मुलग्यांचें लक्ष विशेषकरून लातिन भाषा व ग्रीक भाषा ह्यांच्या अभ्यासाकडे लागतें. ह्या भाषांची माहितगारी चांगली झाली असतां प्राचीनकाळच्या रोमन लोकांचे व ग्रिक लोकांचे इतिहास, आणि त्यांचे पदार्थविज्ञान, कला कौशल्य, इत्यादि विषयांवरील ग्रंथ शिकल्यानें मनुष्याची बुद्धि विशाळ होते, मन प्रशस्त होतें, आणि त्या भाषांच्या माहितीनें इंग्रजीभाषेचेंही ज्ञान पक्कें होतें, व लिहिण्याची व बोलण्याची पद्धति प्रौढ

रीतीची येते, असा लोकांचा समज आहे; म्हणून गृहस्थ लोकांस त्या भाषा शिकणें आवश्यक आहे. ह्या शाळांत गणित, भूगोलविद्या, लिहिणें, चित्रें काढणें, नृत्य, वगैरे विद्या शिकविण्याकरितां निरनिराळे शिक्षक असतात. ते मुलग्यांस आपापली विद्या शिकवितात. ह्या शाळांतील विद्याभ्यास संपल्यावर बडे लोकांचे मुलगे व श्रीमंत गृहस्थांचे मुलगे, व उपाध्याचें काम करण्यास इच्छिणारे, व कोर्तातील वकिलीचें काम पुढें शिकणारे, व वैद्यकीचें काम शिकण्यास इच्छिणारे मुलगे, हे आक्सफोर्द किंवा केंब्रिज येथील *युनिवर्सितींत जाऊन आणखी मोठ्या विद्यांचा अभ्यास करितात. ह्या युनिवर्सितींत विद्येची वृद्धि होण्याकरितां नेमणुकी दोन तीन प्रकारच्या आहेत. पहिल्या शाळेंत विद्याभ्यास करून जे चांगले प्रवीण झाले असून पुढील विद्यांचा अभ्यास करण्याकरितां ऐपत नाहीं अशा विद्यार्थ्यांचा पुढें तीन चार वर्षें अभ्यास चालावा म्हणून कांहीं नेमणुकी आहेत. त्या नेमणुकीस बहुतकरून स्कालरशिप नांव आहे. जे विद्यार्थी श्रीमंत नाहींत ते उत्तम परीक्षा देऊन ती नेमणूक मिळवितात. ज्यांचीं आईबापें संपन्न आहेत ते तर पैका देऊन विद्याभ्यास करितात. मागें ज्या नेमणुकीच्या शाळा सांगितल्या त्या शाळांच्या स्थापणाऱ्यांपैकीं कितीएक गृहस्थांनीं ह्या युनिवर्सितींतही आपल्या पैशानें नेमणुकी करून ठेविल्या आहेत, कीं शाळांत उत्तम अभ्यास करून तयार झालेले विद्यार्थी ह्यांनीं आक्सफोर्द किंवा केंब्रिज येथील

* ज्या विद्यालयांत सर्व विषयांच्या विद्या शिकण्याची सोय आहे त्यास युनिवर्सिती म्हणतात. बहुतकरून युनिवर्सितींत अनेक विद्यालयें असतात.

विद्यालयांत येऊन इकडच्या नेमणुकी घेऊन विद्याभ्यास करावा. आतां येथें विद्याभ्यास संपूर्ण करून जे विद्वान् झाले त्यांस आश्रय होण्यासाठीं कांहीं मोठाल्या नेमणुकी आहेत. ह्या नेमणुकी विद्वान् लोक मिळवून सुखानें राहतात. ह्या नेमणुकीस फेलोशिप हें नांव आहे. ह्या नेमणुकी ज्यांस मिळतात ते विद्येसंबंधीं अनेक प्रकारचीं कामें करितात. कोणी खालच्या पदवीचे विद्यार्थी, म्हणजे पुढील अभ्यास करण्याकरितां जे आले, त्यांस विद्या शिकवितात. व विद्या संपल्यावर त्यांची परीक्षा घेतात. व कोणी नवे ग्रंथ रचितात. ह्या प्रमाणें ते विद्येची वृद्धि करितात. पैका देऊन विद्याभ्यास करणारे पुष्कळ असतात; नेमणुकी घेऊन विद्याभ्यास करणारे थोडे असतात, कांकीं सर्वांस नेमणुकी मिळणें कठीण आहे. पैका देऊन विद्याभ्यास करणारे ह्यांच्या तीन प्रती आहेत, बडे लोकांचे पुत्र, श्रीमंत गृहस्थांचे पुत्र, आणि साधारण गृहस्थांचे पुत्र; ह्या तीन प्रतींच्या विद्यार्थ्यांचे * झगे निरनिराळ्या तऱ्हेचे असतात. आणि नेमणुकी घेऊन शिकणारे विद्यार्थी ह्यांचे झगे निराळे असतात.

पुढें व्यापार, दुकानदारी, कारागिरी, कोर्तांतील खटलीं तयार करणें, शस्त्रवैद्याची विद्या, औषध तयार करण्याची विद्या, हीं कामें शिकावयास इच्छिणारे मुलगे ते सुमारें पंधरा सोळा वर्षांचे वयांत शाळा सोडितात. आणि जें काम ते पुढें शिकणार त्या कामाचे वहिवाटणारे पुरुष असतील त्यांचे शिष्य होऊन राहतात. कोणी पांच, कोणी सहा, कोणी सात वर्षांच्या कैलानें शिष्यपणा

* यूनिवर्सितींत जे विद्याभ्यासास जातात त्यांस तेथील निशाणाची झगाटोपी वेगळीच घालावी लागते.

करितात. त्यांचीं त्या कौलाचीं वर्षे भरलीं, व ते त्यात्या कामांत वाकबगार झाले, म्हणजे कोणी पदरच्या पैशावर स्वतां तो तो धंदा करूं लागतात. आणि जवळ पैसा नसला तर दुसऱ्याच्या हाताखालीं काम करून उपजीविका करितात. ह्या देशांतील चाल आहे कीं जो बापाचा धंदा तोच मुलानें करावा, पण इंग्लंदांत तशी चाल नाहीं. ज्या कामाकडे ज्याचें मन लागतें तें काम तो शिकून तोच धंदा चालवितो.

शाळांसंबंधीं एक गोष्ट येथें सांगावयाजोगी आहे, ती अशी कीं, विद्यार्थी शाळेंत विद्याभ्यास करीत असतां, व पुढें धंद्याचा अभ्यास करीत असतां, पदवीचा भेद ठरवीत नाहींत. बडेलोकाचा मुलगा व व्यापाऱ्याचा मुलगा एका वर्गांत बरोबर शिकतात, व सारखीच शिक्षा भोगितात. लष्करांतील सनदी हुद्देदाराची जागा किंवा आरमारांतील सनदी हुद्देदाराची जागा जर बडेलोकाच्या मुलानें पतकरली, तर त्याला प्रथम सर्वांहून खालची जागा मिळते; आणि इतरांप्रमाणें त्याला वागावें लागतें. ह्यास उदाहरण. मागील राजा ह्यानें आरमारावरची चाकरी पतकरली, तेव्हां त्याची अगोदर खालच्या जाग्यावर नेमणूक झाली होती.

श्रीमंत लोक आणि घरचे सुखी लोक बहुतकरून आपले मुलगे विद्याभ्यासाकरितां शाळेंत पाठवितात, तरी सारेच आपले मुलगे शाळेंत घालितात असें नाहीं. कांतर कितीएकांस भय वाटतें कीं, शाळेंतील मुलां पैकीं एखादा मुलगा दुर्वृत्त निघाला असतां त्याच्या संगतीनें आपले मुलगे बिघडतील, म्हणून ते आपल्या घरीं शिक्षक चाकरीस ठेवून मुलांकडून विद्याभ्यास करवितात. शाळेंत ज्या विद्यांचा अभ्यास चालतो त्या विद्या हा घरचा शिक्षक मुलांस

शिकवितो. जी एखादी विद्या ह्या शिक्षकास शिकवितां येत नाहीं ती विद्या शिकविण्यास दुसरे शिक्षक कांहींवेळ रोज येतात.

मुलगे शाळेंत घालण्याचा जितका परिपाठ आहे तितका मुली शाळेंत घालण्याचा नाहीं. संभावित लोकांच्या बहुत स्त्रिया आपल्या मुलींचा विद्याभ्यास घरींच आपण चालवितात. ज्या स्त्रिया सुशिक्षित आणि विद्यासंपन्न पण तादृश द्रव्य पदरीं नाहीं, किंवा शिकविण्याची ज्यांस हौस असते, त्या स्त्रिया आपणच आपल्या मुलींस विद्या शिकवितात. ज्या स्त्रिया इतका शिकविण्याचा श्रम घेण्यास कंटाळतात, किंवा ज्यांस इतर कामांमुळें अवकाश सांपडत नाहीं, त्या मुलींस विद्या शिकविण्याकरितां कोणी शिकविणारी स्त्री घरीं चाकरीस ठेवितात. अशा शिक्षक बाया इंग्लंदांत बहुत आहेत. जे लोक रोजगारी असतात, पण घरचें द्रव्य किंवा जमीन वगैरे कांहीं नसतें, ते लोक जिवंत आहेत तोंपर्यंत त्यांचीं कुटुंबें सुखी असतात, पण ते निवर्तल्यावर कुटुंबांचे माणसांस फार अडचण पडते. तेव्हां त्यांच्या अविवाहित मुली व त्यांच्या बायका दुसऱ्याच्या घरीं चाकरीस राहून मुलींस विद्या शिकविण्याचें काम पतकरितात. तसेंच, बाप जिवंत आहे पण त्याला प्राप्ति थोडी, आणि कुटुंब मोठें, मुलें फार, ह्यामुळें खर्च भागत नाहीं, तशा कुटुंबांतील सुशिक्षित मुली असतात त्याही हें शिकविण्याचें काम करितात.

मुलींचा विद्याभ्यास म्हटला म्हणजे आपल्या भाषेचें चांगलें ज्ञान, म्हणजे त्या भाषेचें व्याकरण व शुद्ध रचना हीं अवश्य समजलीं पाहिजेत. शुद्ध लिहितां यावें, व अक्षरें वळणदार असावीं. स्वभाषेमधल्या उत्तम कवींचे गद्यरूप व पद्यरूप ग्रंथ ह्यांची

चांगली माहिती असावी. तसेंच गणितविद्या, भूगोलविद्या, इतिहास, व कोणत्या विशेष गोष्टी कधीं घडल्या ह्यांची बरीच माहिती असावी. फ्रेंच भाषेचा अभ्यास बहुतेक मुली करितात, व इताल्यन भाषाही बहुत शिकतात. वाद्यें वाजविणें व चित्रें काढणें ह्या कलाही बहुतकरून मुली शिकतात. साधें शिवणकाम ह्याचें ज्ञान तर सर्वांस आवश्यक आहे. ह्यां शिवाय नानाप्रकारचीं कशिद्याचीं कामें हौसेसाठीं किंवा पुढें कर्मणूक व्हावी ह्यासाठीं शिकतात.

घरची बाई, किंवा तिच्या हाताखालची शिक्षक बाई, मुलींस विद्या शिकविते; तरी फ्रेंचभाषा, इताल्यनभाषा, वाद्य वाजविणें, नृत्य करणें, चित्रें काढणें, हे विषय शिकविण्याकरितां बहुतकरून नेमलेल्या वेळेस बाहेरून कोणी शिकविणारे पुरुष किंवा शिकविणाऱ्या स्त्रिया येतात. पुढें नृत्य करण्याचा बेत नसला तरी शरीराची ठेवण चांगली व्हावी, व उठणें, बसणें, चालणें ह्यांत अडाणीपणा नसावा ह्याकरितां नृत्य शिकवितात.

मुलींस घरींच विद्या शिकविण्याचा बहुत परिपाठ आहे, तरी कितीएक लोक आपल्या मुली विद्याभ्यासाकरितां मुलींच्या शाळेंत पाठवितात. मुली घरीं राहून ज्या विद्या शिकतात त्याच विद्या शाळेंत जाणाऱ्या मुली तेथें शिकतात. तरी घरीं केलेल्या अभ्यासानें जशी बुद्धि सुदृढ व विशाळ होते तशी शाळेंतील अभ्यासानें होत नाहीं; आणखी, बहुत मुली एके ठिकाणीं जमल्या असतां मुलींचें मन चोख व मर्यादशीळ असावें तसें राहणें कठीण, अशी कितीएकांची समजूत आहे.

मुलींच्या ज्या शाळा आहेत त्या सर्व घरगुती आहेत. त्यांच्या मालकिणी स्त्रिया असतात, व शिकविणाऱ्याही स्त्रिया अस

तात. मुलांच्या शाळेंतिल्याप्रमाणें ह्या मुलींच्या शाळांतही दर मुलीस दोनशें रुपयांपासून हजार पंधराशें रुपयांपर्यंत वर्षास खर्च पडतो.

मुलांच्या आणि मुलींच्या सर्व शाळांत वर्षांत दोन वेळ सुटी असते. थंडीच्या दिवसांत दीड महिना आणि उष्णकाळीं दीड महिना. ह्या सुट्यांचें मुख्य कारण म्हटलें तर शिक्षकांस विश्रांति व्हावी, आणि मुलांस आईबापांच्या समागमाचें सुख मिळावें, हें आहे. बहुत करून शाळा मुलांच्या घरांपासून दूर असतात, ह्यामुळें मुलें शाळेंत असतां त्यांस आईबापांची भेट होत नाहीं.

गरीब लोकांच्या मुलांकरितां ज्या शाळा आहेत त्या निराळ्या प्रकारच्या आहेत. बहुतकरून हरएक गांवांत बडेलोक व गृहस्थ लोक धर्मबुद्धीनें पैसा जमवून धर्मार्थ गरिबांच्या मुलांकरितां शाळा स्थापितात. कोणे गांवीं मुलगे व मुली ह्यां करितां एकच शाळा असते; कोणे गांवीं मुलग्यांची वेगळी व मुलींची वेगळी शाळा असते. त्या शाळांत मुलें विद्याभ्यासापुरतीं मात्र जातात; त्यांचें खाणें, पिणें, निजणें, हें त्यांच्या त्यांच्या आईबापांच्या घरीं असतें.

ह्या शाळांत विद्याभ्यासाकरितां फार पैसा द्यावा लागत नाहीं. शिकविणाऱ्यांचा पगार व किरकोळ खर्च त्या जमलेल्या पैशाच्या पुंजींतून मिळतो. तरी बहुतकरून दरएक मुलाला महिन्यास तीन चार आणे पर्यंत फी पडते. ह्या शाळांमध्यें गरीब लोकांचीं मुलें इंग्रेजी भाषा, लिहिणें, वाचणें, हिशेब हीं शिकतात, व ह्यां शिवाय कितीएक शाळांमध्यें भूगोल आणि व्याकरण ह्यांचा

अभ्यास करितात. ह्या गोष्टींशिवाय मुली अनेक प्रकारचें शिवणकाम शिकतात. इसवी सन १८११ ह्या सुमारें मद्रासें-तील दाक्तर बेल साहेब ह्यानें मुलांकडून मुलांस शिकविण्याची चाल काढिली ती अलीकडे सुधरून ह्या गरीब लोकांच्या मुलांच्या शाळांत चालू आहे. ह्या शाळांत मुलें एकदोन वर्षांमध्यें चांगलें वाचावयास शिकतात. तरी मेहनत करणें, लक्ष लावणें, बेताबातानें काम करणें, ह्या गोष्टींच्या सवयी चांगल्या लागाव्या म्हणून, आणि बैबल वाचून त्यांतील परमार्थाचें ज्ञान व्हावें म्हणून, बहुतकरून सहा सात वर्षेंपर्यंत मुलें शाळेंत राहतात. गांवांतील उपाध्या किंवा त्याची स्त्री ह्या शाळेंत मुलें अभ्यास कसा करितात, व कशीं वागतात, ह्याची देखरेख करण्याकरितां वरचेवर येत असतें. आणि वर्षांतून केव्हां तरी एकदां गांवांतील संभावित व बडेलोक जमून ह्या शाळेची प्रसिद्ध परीक्षा होते; तेव्हां चांगल्या मुलांस बक्षिसें मिळतात. परीक्षा झाल्यावर मुलें व त्यांचें आईबाप ह्यांस उत्तम भोजन मिळून समारंभ समाप्त होतो.

वर सांगितल्या शाळांशिवाय दुसऱ्या प्रकारच्या शाळा अशा आहेत कीं दर आदितवारीं उपाध्या किंवा त्याची स्त्री, अथवा गांवांतील धार्मिकगृहस्थ किंवा स्त्रिया, त्या शाळांत जाऊन मुलांकडून बैबल वाचवून त्यांस धर्माच्या गोष्टींचा उपदेश करितात. ह्या शाळांत धर्माचें ज्ञान करून घेण्यासाठीं सोळा, अठरा, वीस वर्षांच्या वयांचीं देखील मुलें जातात.

गरीब लोकांच्या मुलांसाठीं कोठें कोठें नेमणुकीच्याही शाळा असतात. त्यांपैकीं कोठें लष्करांत चाकरी करून मेलेल्यांच्या

पोरक्या मुलांकरितां, व कोठें आरमारावर चाकरी करून मेले-ल्यांच्या मुलांकरितां, व कोठें आंधळ्या मुलांकरितां, व कोठें मुके, बहिरे, पांगळे अशा मुलांकरितां शाळा असतात. ह्या शाळांत मुलांस ठेवून घेऊन, अन्नवस्त्र देऊन, विद्या शिकवितात. आंधळे, पांगळे, बहिरे, मुके अशा मुलांस जी विद्या साधेल तीच विद्या शिकवितात. व पुढें त्यांच्या हातून जीं कामें होऊं शकतील तीं कामेंही शिकवितात.

## इंग्लंदवर्णन, प्रकरण आठवें.

### धर्म व धर्मखातें.

इंग्लंद देशांतील लोकांचा धर्म म्हटला म्हणजे ख्रिस्ती धर्म आहे, असें सर्वांस माहीत आहेच. त्या धर्माचीं मुख्य लक्षणें हीं आहेत. पहिलें लक्षण, मनुष्यास आपल्या पुण्याच्या बळानें उत्तम गति प्राप्त होत नाहीं, प्रतिनिधीच्या द्वारानें प्राप्त होते. तो प्रतिनिधि कोण म्हटला तर परमेश्वराचा पुत्र जो येशू ख्रिस्त तोच होय. मनुष्य आपल्या पहिल्या चांगल्या अवस्थेपासून भ्रष्ट झालें. त्याला ती पहिली अवस्था फिरून मिळावयाची नाहीं, हें पाहून येशूला दया येऊन परमेश्वराच्या आज्ञा मनुष्यानें मोडल्या होत्या त्या आपण पाळाव्या, आणि परमेश्वराच्या आज्ञा मोडल्यामुळें जो दंड मनुष्यास योग्य झाला होता तो आपण सोसावा, म्हणून त्यानें मनुष्यजन्म घेतलें. दुसरें लक्षण, मनुष्याचें अंतःकरण व स्वभाव हीं भ्रष्ट झालीं, म्हणून ईश्वरास मान्य होईल अशी आत्मनिष्ठ भक्ति व सेवा त्याजपासून घडूं शकत नाहींत. त्या घडाव्या ह्यासाठीं त्याचें अंतःकरण व स्वभाव हीं पवित्र

आत्म्याच्या योगानें पालटलीं पाहिजेत. कां तर केवळ बाहेरच्या आचरणानें परमेश्वरास संतोष होत नाहीं. तिसरें, देव एकच असून त्यामध्यें तीन व्यक्ति आहेत, म्हणजे बाप, पुत्र, आणि पवित्र आत्मा. ही गोष्ट फार खोल व गूढ आहे, म्हणजे मनुष्याच्या बुद्धीस अगम्य आहे, तरी देवानें ही गोष्ट बैबलाच्या द्वारें कळविली, म्हणून आपण मानिली पाहिजे. चवथें, सज्जनांस स्वर्गाचें सुख आणि दुष्टांस नरकांच्या यातना प्राप्त व्हावयाच्या त्या अक्षय आहेत, त्यांस अंत नाहीं. ह्या युगाच्या समाप्तीस सर्व मनुष्यांच्या बरेवाईटाची चौकशी होणार आहे, ती चौकशी करण्याकरितां आकाश लोकांतून येशूख्रिस्त आपल्या पराक्रमी दूतां सुद्धां पृथ्वीवर उतरून येणार आहे. त्यावेळेस मेलेलीं मनुष्यें ह्यांचे देह व आत्मे ह्यांचा फिरून संयोग होऊन तीं जिवंत उठतील. जीं जिवंत असतील त्यांचे देह बदलतील. मग सर्व लहान मोठे आपापल्या देहांत घडलेल्या कर्मांचा झाडा देण्याकरितां येशू ख्रिस्ताच्या न्यायासनापुढें उभे राहतील. ज्यांनीं ख्रिस्तावर भाव ठेविला त्यांचा तो भाव खरा होता ह्याला प्रमाण पटण्याकरितां त्यांचीं सत्कर्मे परमेश्वर प्रसिद्ध करील, आणि दुष्ट लोकांस देव शासन करितो हा न्यायच आहे हें दाखविण्याकरितां त्या दुष्ट लोकांचीं दुष्कर्मे तो प्रसिद्ध करील. त्यावेळेस हरएक काम व हरएक गुप्त गोष्ट हीं बरीं असोत किंवा वाईट असोत, त्यांची चौकशी देव करील. मग ज्यांनीं वाईट कर्मे केलीं असतील त्यांस तो अक्षय्य नरकवास देईल, आणि ज्यांनीं सत्कर्मे केलीं असतील त्यांस अक्षय्य सुखाचें जीवन देईल. खिस्ती लोकांचें जें बैबल म्हणजे धर्मपुस्तक आहे त्यांत जीं मतें

सांगितलीं आहेत त्यांतील हा सारांश फार संक्षेपानें सांगितला आहे. काय मानावें व कोणतें कसें आचरण करावें ह्याविषयीं बैबलांत जें सांगितलें आहे तेंच इंग्लंदांतील धर्ममंडळीस मान्य आहे. त्या खेरीज परंपरागत ज्या तोंडातोंडींच्या धर्मप्रकरणीं गोष्टी आहेत त्या मान्य नाहींत.

इंग्लंदांतील सरकारसंबंधाचें जें *धर्मखातें आहे त्यांत धर्माध्यक्ष, म्हणजे लोकांस धर्माचा उपदेश करणारे जे पाद्री लोक, त्यांच्या तीन पदव्या आहेत, म्हणजे बिशप, प्रीस्त, आणि दीकन. बिशप हे मुख्य धर्माध्यक्ष, हे अठ्ठावीस आहेत. त्यांच्या खालीं दोन पदव्यांचे धर्माध्यक्ष प्रीस्त व दीकन हे सुमारें वीस हजार आहेत. ज्याला धर्माध्यक्ष होण्याची इच्छा असते त्यानें प्रथम दीकनाची पदवी स्वीकारावी. दीकन ह्यास सर्व अधिकार नसतात. जो दीकन झाला त्यानें वर्ष दोन वर्षें दीकन पदवीची वहिवाट करावी, म्हणजे त्याला वरची प्रीस्ताची पदवी मिळते. प्रीस्ताची पदवी मिळाली म्हणजे धर्माध्यक्षपणाचे पूर्ण अधिकार मिळतात. बिशप हे सर्वांवर चौकशी करणारे आहेत; त्यांची नेमणूक सरकाराकडून प्रीस्तांपैकीं कोणाची तरी होते. बिशपांपैकीं दोन मुख्य आहेत, त्यांस आर्चबिशप असें नांव आहे. उपाध्येपणाचे वहिवाटीविषयीं सर्व इंग्लंद

* वर जें धर्मखात्याचें वर्णन केलें तें केवळ इंग्लंदास लागू आहे. स्कातलन्दांतील सरकारी खात्यासंबंधी क्रम वेगळा आहे. ऐर्लन्दामधील सरकारी धर्मखात्याचा क्रम इंग्लंदांतील धर्मखात्याच्या क्रमाप्रमाणेंच आहे. तरी ऐर्लन्दामध्यें सरकारी खात्यास अनुसरणारे थोडे आहेत, पण रोमनक्याथालिक फार आहेत.

देशाचे विभाग केले आहेत. प्रत्येक विभागावर एकेक धर्माध्यक्ष प्रीस्त किंवा दीकन नेमिला आहे. कोठें थोडक्या लोकांचा विभाग असला तर एकाकडे दोन विभाग असतात. एखाद्या विभागांत लोकांचा भरणा फार असला तर त्यावरचा धर्माध्यक्ष आपल्या हाताखालीं अनेक धर्माध्यक्ष ठेवितो. तसें कितीएक विभाग एकेका बिशपाच्या हाताखालीं असतात. त्यांतील धर्माध्यक्ष व धर्मखात्यांतील सर्व प्रकरणें ह्यांची देखरेख तो ठेवितो. एकेका विभागावर जो धर्माध्यक्ष नेमिला असतो त्याचें मुख्य काम असें आहे कीं नेमिल्या वेळेस लोक देवळांत मिळाल्यावर त्यानें देवाची प्रार्थना करावी व लोकांस उपदेश करावा, आणि त्याच्या अधिकारा खालचे लोकांच्या घरोघर जाऊन परमार्थाविषयीं त्यांचा समाचार घ्यावा व त्यांस बुद्धिवाद सांगावा, आणि गांवांत गरीब लोकांच्या शाळा असतील त्यांची चौकशी ठेवावी, आणि आपल्या अधिकारा खालच्या लोकांच्या हिताविषयीं चिंतन करावें, व हर एक प्रकारें आपल्याकडून होईल तितका उद्योग करावा. त्या धर्माध्यक्षावर त्याच्या अधिकारा खालचे लोक बहुत करून प्रीति ठेवितात, व त्याचा सत्कारही करितात. हे धर्माध्यक्ष सदाचारसंपन्न व विद्वान् असतात. धर्माध्यक्षांच्या निर्वाहासाठीं भूमीच्या उत्पन्नाचा दहावा हिस्सा योजिला आहे, आणि बहुतकरून प्रत्येक विभागांत देवळाजवळ राहण्यास घर व कांहीं जमीन धर्माध्यक्षास मिळते. धर्माध्यक्षाचा अधिकार देणार व देखरेख ठेवणारे असे जे बिशप त्यांची प्राप्ति मोठी असते; परंतु सामान्य धर्माध्यक्षांची प्राप्ति थोडी असते, अशी कीं ती त्यांच्या संभावितपणानें निर्वाहास बहुत करून पुरत नाहीं. त्यांच्या पदरीं स्वयें संपादिलेलें किंवा वडिलोपार्जित

धन नसलें, तर त्यांला गृहस्थ लोकांच्या मुलांस विद्याभ्यास करविण्याचें काम पतकरावें लागतें. गृहस्थ लोकांच्या मुलांस विद्या शिकविण्याचें काम बहुत करून धर्माध्यक्षांकडेसच असतें. धर्माध्यक्षपणाची वृत्ति परंपरेनें चालत नाहीं. तसेंच, धर्माध्यक्षपणाचें काम अमुककुळांतल्याच मनुष्यानें करावें,असा नियम नाहीं. कोणत्याही स्थितींतील व पदवींतील मनुष्यास चांगली विद्या व पाहिजेत ते गुण असले म्हणजे धर्माध्यक्षाची पदवी घेण्यास मोकळीक आहे. परमेश्वराचें प्रसिद्धपणें भजन आणि ख्रिस्ती धर्माचीं मतें व आचरण ह्यांविषयीं लोकांस उपदेश ह्या कामांकरितां साता वारांतील रविवार हा दिवस नेमिलेला आहे. ह्या दिवशीं कोणत्याही प्रकारचा धंदा व कामकाज करूनये, असा कायदा आहे. म्हणून उदमी आपलीं हिशेब लिहिण्याची गादी सोडितो, दुकानदार आपलें दुकान बंद करितो, कारागीर आणि शेतखण्या आपापलीं कामें बंद ठेवितात, आणि आपापल्या घरीं कुटुंबांत बसून विश्रांति व सुख भोगितात. परमेश्वराचें प्रसिद्धपणें भजन करण्याच्या ज्या वेळा नेमल्या असतात त्यावेळांत मातबर व गरीब आपणा सर्वांचा जो उत्पन्नकर्ता परमेश्वर त्याच्या पुढें एकत्र मिळतात.

---

## इंग्लंदवर्णन, प्रकरण नववें.

### चाकर लोक.

ह्या हिंदुस्थान देशांत जातिभेदाचा प्रचार फार, ह्यामुळें चाकर लोक कामापेक्षां जास्त ठेवावे लागतात. परंतु इंग्लंद देशांत जातिभेद नाहीं, म्हणून चाकर लोक थोडे ठेवल्यानें पुष्कळ काम होतें. इंग्लंदांत घरचीं कामें बहुत करून बायका

माणसें करितात. ह्यास उदाहरण, इंग्लंदांतील एका संपन्न संभावित गृहस्थाच्या घरची गोष्ट सांगतों. ह्याच्या घरीं चाकरीस पांच बायका व चार पुरुष राहिले होते. त्यांचा काम करण्याचा प्रकार असा होता. एक बायको त्या गृहस्थाच्या मडमेची जातीची चाकरी करीत असे. जशी ह्या देशांत एकेक मडमेजवळ एकेक आया असते तशी ही बाई त्या मडमेचे कपडे करी, व टोप्या करी, वेणी फणी करी, आणि शिवाय हर तऱ्हेचें शिवण काम करी. दुसरी बायको स्वयंपाकीण होती. तिसरी बायको त्या स्वयंपाकणीच्या हाताखालीं खटपट करी. ही ताटें, तबकें, भांडीं धुऊन पुसून साफ करीत असे. चवथी बायको घर झाडणें, बैठक घालणें, बिछाना घालणें, खुर्च्या, मेज वगैरे पुसणें, इत्यादि कामें करीत असे. शिवाय फावल्या वेळेस शिवण कामही करी. आणि पांचवी बायको मुलें संभाळीत असे. सहा वर्षांच्या वयापासून बारा वर्षांच्या वयापर्यंत चार नातवंडें त्या गृहस्थाचीं होतीं, त्यांस खाऊं घालणें, त्यांचे कपडे करणें, वगैरे सर्व काम करून त्या मुलांचे कपडे शिवण्यास ही हात भार लावी. इंग्लंदांत पुरुष लोकांचीं बनातीचीं डगली वगैरे खेरीज करून इतर कपड्याचें सर्व शिवणकाम बायकाच करितात. कांहीं शिवणकाम चाकरीच्या बायका फावल्या वेळेस करितात, व कांहीं काम घरच्या नाया स्वतः करितात. ह्याहून जास्त काम असलें तर बाहेरच्या बायकांपाशीं मोलानें शिवावयास देतात. हरएक गांवीं किती एक बायका लोकांचें शिवणकाम मोलानें घेऊन त्यावर आपला उदरनिर्वाह करितात. जे चार पुरुष चाकरीस राहिले होते त्यांचीं कामें येणेंप्रमाणें. एक जण

खिजमतगाराचें व पट्टेवाल्याचें अशीं दोन्ही कामें करीत असे; म्हणजे कोणी बाहेरून गृहस्थ आला, तर त्यास दरवाजा उघडून आंत पोहोंचवावें, कोणाला निरोप किंवा कागद पोहोंचविणें झाल्यास पोहोंचवावा, व धनी लोक जेवायाला बसले म्हणजे त्यांच्या जवळ उभें राहून त्यांची चाकरी करावी, आणि चांदीचें सामान व कांचेचें सामान साफ करावें. दुसरा चाकर तीन घोड्यांची चाकरी करून त्यांस संभाळीत असे; पण तो घोड्या बरोबर धांवत नसे. ह्या देशांतल्या चालीप्रमाणें इंग्लंदांत मोतद्दार धन्याबरोबर घोड्यापुढें धांवत नसतो. कदाचित् आपण घोड्यावर बसून मोतद्दार न्यावा असें यजमानास किंवा यजमाननीस वाटल्यास, त्याला निराळ्या घोड्यावर बसवून बरोबर नेतात, असा संप्रदाय आहे. केव्हां बाहेरचे पाहुणे जेवावयास आले, तर त्यावेळेस हा दुसरा माणूस काम करायास जवळ हजीर राही. आणि तो सुऱ्या, कांटे, व जोडे साफ करी. तिसरा चाकर माळ्याचें काम करीत असे. आणि चवथा चाकर त्या माळ्याच्या हाताखालीं खटपट करीत असे. हा चवथा चाकर गुरें संभाळी, गाईचें दूध काढी, आणि शिवाय आड काम आल्यास तेंही करी.

ह्या गृहस्थाच्या कुटुंबाचीं माणसें चार मुलांसुद्धां बारा होतीं, तर इतकेजणांची चाकरी करण्यास चाकरीचीं माणसें थोडीं असें कोणास वाटेल, तरी ह्या देशांत मोठा अधिकारी साहेब लोक ह्याजपाशीं पुष्कळ चाकर लोक असल्यानें त्यांच्या कडून जें सुख त्यास मिळतें, तितकें, किंबहुना त्याहून जास्त, थोड्या चाकर माणसांपासून त्या गृहस्थाचे कुटुंबास सुख मिळत असे. ह्या गोष्टीला जातिभेदाचा अभाव हें एक कारण आहे खरें.

कांतर इंग्लंदांत एक चाकर कोठें गेला, किंवा दुखण्यास पडला, तर दुसरा चाकर पुढें होऊन त्याचें काम चालवितो. मेज मांडणें व जेवणाच्या वेळेस जवळ राहून चाकरी करणें, व बाहेरून आलेल्यांसाठीं दार उघडणें, हें ज्या पुरुषाचें काम असतें तो पुरुष जवळ नसला तर घर साफ ठेवणारी बायको पुढें येऊन त्याचे मोबदला.त्याचें काम करिते. स्वयंपाकीण जर हजीर नसली तर दुसरी हर कोणी चाकरीची बायको आपल्या शक्ती-प्रमाणें तिचें काम चालविते. ह्या देशांत तर ज्या कामाचा जो चाकर तें काम तो असला तरच होतें. तो जर कोठें गेला तर तो येईपर्यंत धन्याला खोळंबावें लागतें. जातिभेदामुळें त्याचें काम चालवायास दुसरा कोणी चाकर पुढें होत नाहीं.

दुसरी एक गोष्ट अशी आहे कीं ह्या देशांत दुपारच्या वेळेस उन्हामुळें कांहीं वेळ झोंप घ्यावी, किंवा उगीच आडवें तरी पडावें, असें बहुतांस वाटतें; परंतु इंग्लंदांतील हवा निराळी म्हणून ह्या गोष्टीची इच्छा तेथें होत नाहीं, व अगत्यही पडत नाहीं. ह्यामुळें ह्या देशांत जो वेळ दिवसास निजण्यांत फुकट जातो तो तेथें वांचतो. आणखी असें आहे कीं इंग्लंदांत चाकरीचीं माणसें रात्रीं धन्याच्या घरींच निजतात, आणि सर्व चाकरमाणसांचें खाणें एकेठायीं होतें, ह्यामुळें ह्या देशांतील चाकरांचा घरीं जाण्यायेण्याकडे व निरनिराळा स्वयंपाक करण्याकडे जो वेळ मोडतो तो वेळ त्यांचा न मोडून कामाची हरकत होत नाहीं. ह्या देशांत हमाल आणि भिस्ती हे चाकरीच्या माणसांत मोडतात, परंतु इंग्लंदामध्यें ह्या कामाचे चाकर नसतात; कांतर हीं कामें करण्याची तेथें गरज नाहीं. तेथें मेना, पालखी, नालकी अशा

जातींचीं वाहनें बाळगीत नाहींत, म्हणून भोयांचें काम पडत नाहीं; आणि पंखा हालवून धन्याला वारा घालावा इतकी उष्णताही तेथें नाहीं. ह्या देशांत खुर्च्या मेज वगैरे घरांतील सामान पुसून साफ करण्याचें काम हमाल करितो तें काम तेथें चाकरीस ठेविलेली बायको करिते किंवा पहिला चाकर खिजमतगार करितो. येथें पाण्याचा पुरवठा भिस्त्याकडून होतो तो तेथें पाण्याचे नळ बहुतकरून घरोघर आणिलेले असतात त्यांजकडून होतो. नळाचें मळसूत्र फिरविलें म्हणजे पाहिजे तितकें पाणी मिळतें. जेथें नळ नाहीं तेथें बहुतकरून आंगण्यांत विहीर असते. त्या विहिरीचें पाणी शेंदावें लागत नाहीं; विहिरींत बंब उभा केलेला असतो तो हालविला म्हणजे पाणी आपाप वर येतें. ह्या युक्तीनें पाणी काढण्याचा श्रम आणि वेळ वांचतात. निजावयाच्या खोलींत जें पाणी पाहिजे तें घर साफ करणें व बिछाना घालणें ह्या कामाकरितां जी बायको चाकरीस ठेविलेली असते ती पुरविते, आणि दुसरीं चाकरीचीं माणसें आपआपल्या कामाकरितां पाणी नेऊन ठेवितात.

पांघुरणें धुण्याचें काम आणि इस्तरी करण्याचें काम इंग्लंदांत बायकाच करितात. ह्या कामासाठीं एक दोन बायका मुद्दाम चाकरीस ठेवितात. ज्याच्या घरीं अशा बायका नाहींत ते बाहेर मोलानें देऊन काम करवितात. ह्या कामावर उपजीविका करणाऱ्या कितीएक स्त्रिया असतात.

इकडल्याप्रमाणें इंग्लंदांत पांघुरणें नदींवर नेऊन दगडावर आपटून धूत नाहींत, घरींच वस्त्रांस साबण लावून तीं ऊन पाण्यांत चोळून चोळून धुतात.

चाकर लोकांचा नाषता करण्याचा वेळ सकाळीं बहुतकरून आठ वाजतां असतो. त्यावेळेस घांट वाजविली म्हणजे चाकर माणसें जमतात. त्यांत बायका असतात त्या चहा पितात, व लोण्याबरोबर पाव खातात. आणि पुरुष असतात ते शिळी सागोती किंवा पनीर आणि पाव खातात; व बीर म्हणून जो सातूंचा रस तो पितात. नंतर एक वाजतां ताजी सागोती, भाजीपाला, पाव, आणि कांहीं पक्वान्नें खातात. त्यावर बीर किंवा पाणी पितात. फिरून रात्रीं सुमारें आठवाजतां सकाळच्या नाषत्याप्रमाणें खाणें खातात.

वर जें उदाहरण दिलें आहे हें मध्यम प्रतीच्या गृहस्थाच्या घरांतील व्यवस्थेस बरोबर लागतें; तेरी जशी पदवी व संपत्ति तशी चाकर लोकांची मंडळी कमी जास्त असते. बडे लोक आणि फार संपन्न गृहस्थ लोक, ज्यांच्या घरीं गाड्या घोडीं पुष्कळ, ज्यांच्या हवेल्या मोठ्या, ज्यांचे बागबगीचे पुष्कळ, व ज्यांच्या घरीं पाहुण्यांचा रगडा फार असतो, त्यांच्या घरीं कामाप्रमाणें हरतऱ्हेचीं चाकरमाणसें पुष्कळ असतात. आणि थोड्या माप्तीचे गृहस्थ व व्यापारी ह्यांच्या घरीं एकदोन बायका व कदाचित् एखादा पुरुष इतकीं माणसें चाकरीस असतात. अशा घरांत कांहीं सोपीं कामें घरच्या घरधनिनीस करावीं लागतात, हें उघडच आहे; तसेंच मुलें जशीं जशीं मोठीं होतात तशीं तशीं तींही घरांतील कांहीं कामें करितात.

इंग्लंदांत चाकर लोकांस हाक मारून बोलाविण्याची चाल नाहीं. तर घांट वाजवून बोलावितात. चाकर माणसें जेवावयास बसलीं असतां निकडीच्या कामावांचून त्यांस उठवीत नाहींत. अर्ध्या

जेवणांतून उठविण्याचें पाप आहे, असें तेथें कोणी समजत नाहींत, परंतु चाकर माणसांवर ममता असते, व त्यांच्या सुखाकडे लक्ष असतें, म्हणून धनी त्यांची मुरव्वत ठेवितो.

इंग्लंदांतील बहुत करून चाकर माणसांची धन्यावर भक्ति असते. धन्याच्या हिताकडे त्यांचें लक्ष असतें, व इमानानें धन्याची चाकरी करितात. ह्या देशांत चाकर लोकांची आपल्या धन्यावर तितकी भक्ति नसते, व आपल्या धन्याच्या हिताकडे त्यांचें तितकें लक्षही नसतें. किंबहुना प्रसंग सांपडल्यास आपल्या धन्याला नाडून आपली धन करावयास चुकत नाहींत. असें बहुतकरून ज़री आहे, तरी ह्या देशांतही किती एक चाकर लोक विश्वासू असतात. तेथें तरी सर्वच इमानी असतात असा अर्थ नाहीं; परंतु तेथें इमानी फार आणि येथें थोडे इतकेच.

## इंग्लंदवर्णन, प्रकरण दहावें.

### लग्न.

इंग्लंदांत थोरापासून लहानापर्यंत लोकांचा समज असा आहे कीं, आपण उदरनिर्वाहार्थ रोज रोज किती जरी कष्ट केले, व आपलें अंतःकरण किती जरी खिन्न झालें, तरी जर घरीं सुख आहे, म्हणजे बायको चांगली सुशील आहे, तिची आपणावर भक्ति व प्रीति आहे, मुलेंबाळें आहेत तीं आपणावर प्रीति करितात; व मुलांचे लाड आपल्या हातून घडतात, असें आहे तर ते कष्टसे वाटत नाहींत, व चित्तास समाधानही होतें. तेथें आपली बायको आपली दासी आहे, किंवा आपणाहून हलक्या पदवीची आहे, असें पुरुषास वाटत नाहीं. तीं आपल्या सारखी, आपल्या बरोबरीची व आप-

ली मित्र आहे असें तेथील पुरुष समजतात. म्हणून ह्या देशां-
तल्या सारखी तेथें चाल नाहीं. तेथें अशी चाल आहे कीं प्रत्येक
पुरुषानें, आपल्या संतोषास येईल तेव्हां, आपल्या आवडीस येईल
ती स्त्री बायको करावी. ह्या देशांत आई बाप, आपल्या मुलांची
इच्छा व आवड न पाहतां, आपल्याच मतानें वधूवर पाहून
नेमितात. तसें तेथें नाहीं. तेथें पुरुषास एखाद्या स्त्रीची ओळख
पडली असतां तिचें रूप, स्वभाव, मन, ज्ञान, विद्या, रीतीभाती, हीं सर्व
आवडलीं, तर तो तिची प्रीति आपणाकडे ओढून घेण्याचा प्रयत्न
चालवितो. त्याचा तो प्रयत्न सफळ झाला, आणी दोहोंकडील
वडिलांनीं अनुमोदन दिलें, म्हणजे यथाकाळीं त्यांचा विवाह होतो.
कधीं कधीं मुलाचा बाप किंवा विशेषें करून मुलीचा बाप दुसऱ्या
पक्षाचें कूळ चांगलें नाहीं, किंवा घरदार करायाला धन असावें तसें
नाहीं, इत्यादि कारणानें अनुमोदन देत नाहीं, असें झाल्यास तें
प्रकरण तसेंच राहतें. घरदार करावयास द्रव्य नाहीं हेंच कारण
जर दर्शविलें, तर तो पुरुष रोजगार धंदा करून द्रव्य मिळवूं
लागेपर्यंत, किंवा ज्यानें विक्षेप घातला त्याचें मन वळे पर्यंत, तें
तहकूब मात्र राहतें. खालच्या प्रतींतल्या गृहस्थांच्या मुली बहु-
तकरून लग्न केल्यावांचून राहत नाहींत. मध्यम प्रतीच्या गृह-
स्थांच्या मुली लग्नावांचून राहतात अशा पुष्कळ आहेत. ह्या
गोष्टींचीं कारणें अनेक आहेत. एक कारण असें अहे कीं निर्वा-
हासाठीं बहुत पुरुष देशांतरास जातात. किती एक फौजेंत किंवा
आरमारावर चाकरी धरितात, आणि किती एक मोठ्या विद्यालयां-
तल्या नेमणुकीच्या जागा मिळवितात. त्या जाग्यांवर जोंपर्यंत पुरुष
आहेत तोंपर्यंत लग्न करण्याचा त्यांस प्रतिबंध असतो. ह्या गोष्टींनीं

नवऱ्यांपेक्षां नवरे कमी होतात असें होतें. आणि दुसरें एक कारण असें आहे कीं इंग्लंदामध्यें चाकरीची हरएक जागा भरलेली असते, चाकरी लवकर मिळत नाहीं. जाग्यांपेक्षां उमेदवार फारच असतात, म्हणून घरदार करण्यापुरता पैका मिळविण्यास मोठी अडचण पडते.

घरदार करण्यासाठीं जितका पैका जवळ असावा तितका ज्यांपाशीं नाहीं ते असा विचार करतात कीं, एखाद्या थोराची चांगली गुणवती मुलगी जी आपल्या प्रीतीस पात्र होण्यास योग्य आहे ती जर तिच्या बापाच्या घरांतून काढून आपल्या घरीं आणिली, तर तिला तिच्या बापाच्या घरीं जसे सुखोपभोग मिळतात तसे आपल्या घरीं मिळणार नाहींत, म्हणून तिला दुःख वाटेल; तस्मात् विवाह करूनये हें बरें. असें मनांत आणून बहुत पुरुष लग्नावांचून तसेच राहतात.

विवाहित स्त्रीची मानमान्यता अविवाहित स्त्रीपेक्षां अधिक आहे खरी, व जिचा विवाह सुखानें यथायोग्यपणें झाला तिच्या भावाबंदांस व इष्टमित्रांस मोठा आनंद होतो खरा; तरी अविवाहित राहिलेल्या स्त्रीला कांहीं लांछन नाहीं, व तिची अब्रूही कमी नाहीं. किंबहुना जसे तिचे गुण व जशी तिची विद्या त्याप्रमाणें लोकांत तिची योग्यता असते. लोक तिला मानितात, व चौघांत तिला हर एक प्रसंगीं आमंत्रण येतें. अविवाहित स्त्रियांपैकीं किती एक स्त्रिया विद्याभ्यास करून कीर्ति मिळवितात. अविवाहित स्त्रियांस घरचें काम थोडें, म्हणून त्यांस फुरसत पुष्कळ सांपडते. ह्यामुळें गरीब लोकांचा समाचार घेणें, व त्यांच्या मुलांस शिकविणें, व रोग्यांस औषधपाणी देणें, वगैरे कामें त्यांच्या हातून फार घडतात.

मुलीचा बाप जर धनवान् आहे तर तो मुलीच्या लग्नाच्या वेळेस कांहीं द्रव्य आंदण देतो. त्या द्रव्यावर त्या मुलीचीच सत्ता असते. त्या द्रव्याचें व्याज जरी संसारखर्चाकडे लागलें, तरी मुद्दल रकम घेण्यास नवऱ्यास अधिकार नाहीं. कदाकाळीं ती विधवा झाली तर तें द्रव्य तिच्या चरितार्थास उपयोगीं पडतें.

खालच्या प्रतीच्या लोकांत जेव्हां वधूवरांच्या लग्नाचा संकेत होतो, तेव्हां ते गांवच्या उपाध्यास, म्हणजे पाद्रीस, आपला बेत कळवितात; मग तो पाद्री लागोपाठ तीन आदितवारीं देवळांत मंडळी जमली म्हणजे सर्वांस जाहीर करितो कीं, अमुक पुरुषाचा अमुक स्त्रीशीं विवाह होणार आहे, त्याविषयीं कोणाला हरकत सांगणें असल्यास सांगावी. असें झाल्यावर जर कोणीं हरकत सांगितली नाहीं, तर त्यांचें लग्न होण्याला मोकळीक आहे असें समजावें.

ह्या देशांत लग्नाच्या वेळेस जसा मोठा खर्च व समारंभ करावा लागतो, व पुष्कळ क्रिया कराव्या लागतात, तसें इंग्लंदांत करावें लागत नाहीं. ह्याप्रसंगीं ह्या देशांतल्या चालीप्रमाणें मांडव, मानपान, आहेर, पोशाख, मंडळीभोजन, नाच, रंग, वाद्यें, ह्यांकडे पैका खर्च होत नाहीं, तर पुढें लग्न होणार त्या बेतानें जो पदरीं थोडाबहुत पैसा जमविला असतो तो आपल्या घरांत मेज, खुर्च्या, भांडीं, वगैरे सामान जें लग्न झाल्यावर अवश्य पाहिजे त्याकडे खर्च करितात. लग्न झाल्यावर पुरुष आपल्या बापाच्या घरांत प्रायः राहत नाहीं. निराळें घर करून बायकोला घेऊन निराळा राहतो.

इंग्लंदांत पुरुषाकडून स्त्रियांस जितका मान आहे तितका दुसऱ्या कोणत्याही देशांत नसेल. बायकोला मारणें, किंवा

शिवीगाळ करणें, किंवा तिच्या समक्ष ओंगळ शब्द बोलणें, किंवा बीभत्स भाषण करणें, हें मोठें लाजिरवाणें व पाजीपणाचें काम आहे, असें लोक समजतात.

इंग्लंदांतील बायकांस पडदपोशी नाहीं; व परकी पुरुषाबरोबर बोलण्याचालण्यास, व बसण्यास, व काम करण्यास कांहीं शंका नाहीं. दिवसास त्या एकट्या जरी बाहेर फिरावयास गेल्या, तरी त्यांस कांहीं भय नाहीं. असें आहे तरी त्यांमध्यें पातिव्रत्यधर्म आणि मर्यादशीलता हे गुण जसे आहेत तसे दुसऱ्या देशाच्या बायकांच्या आंगीं थोडेच असतील.*

उत्तम पदवीच्या लोकांमध्यें विवाहाच्या पूर्वीं कोणी स्त्रीनें दुराचरण केलें, असें ऐकण्यांत कधीं आलें नाहीं. कनिठ पदवीच्या लोकांत अशी गोष्ट कधीं कधीं घडते, त्यामुळें लोकांत त्या स्त्रीची अप्रतिष्ठा व बेअब्रू होते. ज्यापुरुषाशीं तिनें दुराचरण केलें त्या पुरुषाबरोबर जरी तिचें पुढें लग्न झालें, तरी तिला लांछन लागलें तें लागलेंच. विवाह झाल्यानंतर व्यभिचारकर्म उत्तम, मध्यम, कनिष्ठ ह्या प्रतींमधील कोणत्याही प्रतीच्या स्त्रियांस क्वचित् घडतें.

---

## इंग्लंदवर्णन, प्रकरण अकरावें.

### कालक्षेप.

मागील वर्णनावरून दिसून आलेंच आहे कीं ह्या हिंदुस्थानांतील लोकांपेक्षां इंग्लंदांतील लोक चपळ आणि उद्योगी आहेत.

---

* रात्रीं अंधारांत कोणी बायको बाहेर फिरावयास एकटी गेली, तर तिला लोक दोष ठेवितात, व तिजविषयीं संशय धरितात.

घरोघर प्रतिदिवशीं सकाळीं नऊ तास वाजण्याच्या सुमारें कुटुंबाचीं मनुष्यें नाषत्याला एकत्र जमतात. ज्या घरांत ईश्वर-भजनाची निष्ठा असते त्या घरांतील घरधनी नाषत्याच्या अगोदर किंवा नाषता झाल्यावर, चाकर माणसें घरच्या मनुष्यां बरोबर जमवून आपण बैबलाचा कांहींसा भाग वाचतो, व त्याचा अर्थ ही सांगतो, आणि मग सर्वांनीं गुडघे टेंकल्यावर तो देवाची प्रार्थना करितो. नाषता झाल्यावर कुटुंबांतील पुरुष आपापल्या उद्योगास लागतात, आणि बाया घरगुती कामांकडे गुंततात. म्हणजे, कोणी चाकर माणसांच्या कामाची देखरेख करितात, कोणी मुलांस विद्या शिकवितात, कोणी पुस्तकें वाचितात, कोणी पत्रें लिहितात, कोणी शिवणकाम करितात. मग मध्यान्हाच्या सुमारें तिफिण म्हणून जो अल्पाहार तो करावयास सर्व जमतात. तिफिण झाल्यावर बाहेरच्या कामांकडे, किंवा करमणुकीच्या कामांकडे, सर्व लागतात. ज्या घरांत तीन चार तरुण मुली असतात, त्यांपैकीं एकजण बापाबरोबर किंवा भावाबरोबर घोड्यावर बसून बाहेर हवा खाण्यास जाते; दुसरी बागेमध्यें काम करिते; बागेंतील सोपें काम, म्हणजे फुलझाडांचे तखते दांताळ्यानें कचरा काढून साफ करणें, पडणारीं फुलें बांधणें, कोमेजलेलीं व वाळलेलीं फुलें काढून टाकणें, आणि सर्व बाग नीट नेटका आहे कीं नाहीं ह्याची देखरेख करणें, हें इंग्लंदांतील बायांचें आवडतें काम आहे; तिसरी व चवथी गरीब लोकांच्या समाचारास किंवा गरिबांच्या मुलांच्या शाळेच्या देखरेखीस जातात. अशा उद्योगांत दोन तीन तास घालवून मुख्य जेवणाची वेळ होईपर्यंत फिरून घरांतील नानाप्रकारच्या कामांत वागूं लाग-

तात. जेवण झाल्यावर संध्याकाळीं मुली वाद्यें वाजवितात व गाणीं म्हणतात. नाहीं तर बाप किंवा भाऊ एखादें चमत्कारिक पुस्तक मोठ्यानें वाचीत बसतो, आणि मुली व दुसऱ्या बाया शिवणकाम करितां करितां तें ऐकत असतात. ह्याप्रमाणें सर्व मनुष्यें आपापला काळ सुखाची व हिताची प्राप्ति होई असा घालवितात. निजावयाची वेळ आली म्हणजे प्रीतिपूर्वक एकमेकांचा निरोप घेऊन सारींजणें आपापल्या खोलींत निजावयास जातात. ज्या घरीं देवभक्तीची निष्ठा असते त्या घरीं निजावयास जाण्याच्या अगोदर सर्व चाकर लोकांसहवर्तमान एकत्र जमून देवाची प्रार्थना करितात.

वर सांगितलेली गोष्ट जे गृहस्थ घरचे सुखी आहेत त्यांच्या घरची होय. गरीब लोकांची गोष्ट अशी आहे कीं, घरचा पुरुष जेवणाची वेळ खेरीज करून सूर्य उगवल्यापासून मावळेपर्यंत कामांत खपत असतो. त्याची बायको घरामध्यें राहून स्वयंपाकाचें काम करिते, मुलांचा संभाळ करिते, मुलांचीं व नवऱ्याचीं व आपलीं वस्त्रें शिवते आणि फाटलेलीं नीट करिते, घर झाडून झुडून व घरांतील सामान घांसून पुसून स्वच्छ ठेविते, आणि फावलेल्या वेळेस बाहेरचें शिवण काम मोलानें घेऊन शिवते, किंवा विकावयासाठीं जाळीदार कापड तयार करिते. खेडे गांवांत जे गरीब लोक राहतात त्यांच्या बायका कधीं कधीं शेतामध्यें कामें करितात. उन्हाळ्यांत, म्हणजे जून व जुलई ह्या महिन्यांत, शेतकरी हिंवाळ्यासाठीं गवताचा पुरवठा करण्याकरितां आपल्या कुरणांतील गवत माणसांकडून कापवून खालीं टाकितो, तें गवत कांट्यानें पसरणें, व उलथें

पालथें करणें, व वाळल्यावर दांताळ्यानें गोळा करणें, ह्या कामांत बायकांस किती एक दिवस उद्योग मिळतो. पुढें आगस्त महिन्यांत जेव्हां गव्हांची कापणी होते तेव्हां गरिबांच्या बायका आपल्या मुलांस घेऊन जाऊन शेतांत पडलेल्या ओंब्या टिपितात. अशानें धान्याचा बराच संग्रह करितात. सुती कापड व रेशमी कापड व लोंकरीचें कापड वगैरे विणण्याचे कारखाने जागोजाग पुष्कळ आहेत त्या कारखान्यांत जे गरीब लोक काम करितात त्यांच्या बायकांस व मुलींस बहुत करून त्याच कारखान्यांत दररोज कांहीं तासपर्यंत उद्योग मिळतो. खेडे गांवांत जे गरीब लोक राहतात त्यांच्या मुली, घरीं राहिल्यानें फारसा नफा व्हावयाचा नाहीं म्हणून, त्या चवदा पंधरा वर्षांच्या वयाच्या झाल्या म्हणजे त्यांचे वडील त्यांस कोठें तरी चाकरीस ठेवण्याचा प्रयत्न करितात. जे कोणी समजदार आहेत ते ज्या घरीं आपल्या मुली चाकरीस ठेवणार त्या घरीं जर चाकरीच्या सर्व कामाची चांगली माहितगारी हो-ण्याची सोई आहे, व घरचा धनी व धनीन हीं चाकर माणसांवर ममता करितात, त्यांस सन्मार्गाचा उपदेश करितात व कुमार्गापा-सून राखितात, असें आहे, तर वेतनाच्या मोठ्या लाभावर दृष्ट न देतां त्याच घरीं आपल्या मुली ठेवण्यास त्यांस फार संतोष वाटतो. गरीब लोकांचीं घरें बहुत करून दोनमजली असतात; त्यांत खालच्या मजल्यामध्यें एक दोन खोल्या व वरच्या मजल्यावर एक दोन खोल्या असतात. त्यांच्या घरांत विस्तव ठेवण्यासाठीं भिंतींत लोखंडाच्या कठड्याची आगटी असते, आणि थंडी निवारायास भिंगांच्या खिडक्या असतात. एक दोन मेजें, दोन चार *खुर्च्या

---

* इंग्लंदांतील लोक भुईवर बसत नाहींत. किती ही गरीब असला तरी एखादी खुर्ची किंवा पाट, चवरंग, कांहीं तरी बसावयास पाहिजे.

खणांची पेटी, सुऱ्या कांटे, कांहीं चिनी भांडीं, व चहाचे पेले वगैरे जिनसा, इतकें सामान बहुत करून सर्वांजवळ असतें. इतकें सामान बाळगण्याचें सामर्थ्य नाहीं असे गरीब लोक थोडेच आहेत.

खेडेगांवांतील गरीब लोकांच्या घरांभोंवतालीं लहानसान बागबगीचे असतात. त्यांत ते शाकभाजी व फळफळावळ आपल्यासाठीं उत्पन्न करितात. आणि बहुतकरून त्या बागांत दरवाज्याजवळ फुलझाडें लावितात.

---

# इंग्लंदवर्णन, प्रकरण बारावें.

## वेष.

उत्तम पदवीचे व मध्यम पदवीचे साहेब लोक इंग्लंदाहून ह्या हिंदुस्थानांत पुष्कळ येऊन राहिले आहेत, म्हणून त्यांचे वेष कोणत्या तऱ्हेचे कसे हें येथील बहुतांच्या पाहण्यांत आलें आहेच, सांगावयास नको. तर ह्यांच्या वेषाच्या ज्या तऱ्हा तशाच इंग्लंदांतील कनिष्ठ पदवीच्या लोकांच्या वेषाच्या सरासरी तऱ्हा असतात. इतकाच फेर कीं त्यांचीं वस्त्रें हलक्या मोलाचीं, जाड, टिकाऊ, व थंड हवेमुळें अधिक उबेचीं, असतात.

तेथील हलक्या पदवीच्या बायकांचा वेष येणेंप्रमाणें आहे. आंगांत पहिल्यानें तागाच्या जाड कापडाचा * कमीज घालितात. त्यावर कांचोळीसारखें एक वस्त्र घालितात. त्यावरून दोहोंकडे दोन खिसे कमरेस बांधितात. त्यांवर परकरासारखीं कमरेपासून

---

* बायकांच्या व पुरुषांच्या कमीजाच्या आकारांत थोडासा भेद आहे.

पायांच्या घोंट्यांपर्यंत अशीं एकावरएक दोन वस्त्रें नेसतात. आंतील वस्त्र फलानिलाचें आणि वरचें जाड कापडाचें असतें. सर्वांच्यावर रंगीत छिटाचा झगा घालितात. आणि गळ्याला गळेबंद रंगीत रुमालाचा बांधितात. व झग्याला मळ न लागावा म्हणून पोटापासून गुडघ्यांच्या खालपर्यंत पुढच्या आंगास एक मळवस्त्र बांधितात, पायांत उन्हाळ्यामध्यें जाड सुती व हिवाळ्यांत लोंकरीचे पायमोजे घालितात, व त्यांवर जाड कातड्याचे जोडे चढवितात, आणि डोईस मलमलीची टोपी घालितात. ह्याप्रमाणें त्यांचा घरांतील वेष असतो. बाजारांत किंवा कांहीं कामाकरितां बाहेर जावयाचें असतें, तर्‍हां डोईला गवती किंवा काळ्या रेशमाची टोपी घालितात. आंगावर उन्हाळ्यांत शाल, आणि हिवाळ्यांत सकलादीची घोंगी घेतात. पांढऱ्या छिटाचे, किंवा रेशमी कापडाचे, अथवा मलमलीचे, झगे खालच्या पदवीच्या बायकांनीं घालूं नयेत, व चवदा पंधरा वर्षं वयास झालीं म्हणजे बायकांच्या डोकीस टोपी नेहमीं असावी, असा संप्रदाय आहे.

पुरुषांचा वेष येणेंप्रमाणें आहे. टिकाऊ व जाड अशा तागाच्या कापडाचा कमीज, गळ्याला रंगीत किंवा काळ्या रुमालाचा गळेबंद, पायांत कातड्याची, किंवा जाड बनातीची, अथवा कोणत्याही प्रकारच्या जाड कापडाची विजार असते. आंगांत बनातीची बंडी, पायांत सुती किंवा लोंकरीचे पायमोजे, त्यांजवर टिकाऊ जाड कातड्याचे जोडे. बंडीच्यावर तागाच्या कापडाचा सईल आंगरखा, ह्याला छातीवर व खांद्यावर चूण केलेली असते. हा आंगरखा गुडघ्याखालीं येतो. बाहेर जायाचें असलें तर डोईस टोपी घालितात, घरांत टोपी घालीत

नाहींत, डोकें मोकळें ठेवितात. डोकीचे केंस फार लांब राखीत नाहींत, कातरून आंखूड करितात.

---

# इंग्लंदवर्णन, प्रकरण तेरावें.

## मार्गक्रमण.

इंग्लंदांत अनेक चमत्कारिक गोष्टी आहेत, त्यांत एका स्थळापासून दुसऱ्या स्थळास जाण्याची जी उत्कृष्ट सोय आहे ती फार चमत्कारिक आहे. ही गोष्ट येथील लोकांनीं पाहिली असतां त्यांस फारच कौतुक व आनंद वाटाया जोगा आहे. असें कौतुक व असा आनंद थोडक्याच गोष्टींनीं वाटणार. ह्या देशांत मोठ्या श्रीमंत मनुष्यास ग्रामांतरीं जावयाचें असलें, तर आपण निघाल्याचे अगोदर पुढें तरतूद करण्याकरितां त्यास आपलीं माणसें पाठवावीं लागतात. त्यांनीं पुढें जाऊन जाग्याची व सामानाची तरतूद केली पाहिजे, आणि मध्यें नदी, नाले असले तर ते उतरण्यास नावेची वगैरे सिद्धता करून ठेविली पाहिजे. आणि त्या गृहस्थास निघतांना आपले घोडे, आपलीं माणसें, व मेज, खुर्च्या, बिछाना वगैरे आपलें सामान बरोबर घेणें भाग पडतें. मग असा सरंजाम घेऊन तो गृहस्थ दिवसास सुमारें दहा बारा कोस चालतो. इंग्लंदांतील मार्ग चालण्याची गोष्ट फार वेगळी आहे. तेथें बहुतकरून हरएक मोठ्या शहरापासून हरएक मोठ्या शहरापर्यंत लोखंडी रस्ते केलेले आहेत, त्यांवरून आगीच्या गाड्या चालतात. त्यांमध्यें बसून, श्रम न होतां व वेळ न मोडतां, सुखानें दर तासास पंचवीस मैलांपासून साठ मैलांपर्यंत जातां येतें. ह्या गाड्या मध्येंमध्यें नेमलेल्या जागीं माणसें

उतरण्यासाठीं व घेण्यासाठीं थोडा वेळ थांबतात. आणि मार्गस्थांस जेवण करण्यासाठीं दिवसांतून दोनवेळ किंवा तीनवेळ उभ्या राहतात. मार्गस्थांच्या जेवणाच्या वगैरे सोईकरितां जागोजाग घरें बांधलेलीं आहेत. त्या घरांत जेवणाची अगदीं तयारी केलेली असते.

लोखंडी रस्ते जिकडे नाहींत तिकडे शहरापासून शहरापर्यंत, गांवापासून गांवापर्यंत, व खेड्यापासून खेड्यापर्यंत देखील, सडका बांधिल्या आहेत; आणि नद्या, नाले ह्यांजवर भक्कम मजबूद दगडीपूल बांधिले आहेत, आणि त्या सडकांवर टप्प्याच्या गाड्या चालतात. ह्या गाड्यांमध्यें, आंत चार किंवा सहा माणसें बसण्याची, व बाहेर दहा बारा माणसें बसण्याची सोय असते. ह्या गाड्यांस चार किंवा सहा मोठाले नामी घोडे लावून दर तासास आठ दहा मैलांच्या वेगानें हरएक मोठ्या गांवापासून दुसऱ्या मोठ्या गांवापर्यंत नेहमीं चालवितात. नेमलेली वेळ आली म्हणजे, बसणारीं माणसें असोत किंवा नसोत, गाडी निघाल्यावांचून राहत नाहीं. ह्या गाड्यांचे घोडे दहादहा बाराबारा मैलांच्या टप्पावर बदलतात. ह्या गाड्यांमध्यें आंत बसल्यास वीस रुपये व बाहेर बसल्यास सुमारें दहा रुपये देऊन दर दिवसास सुमारें ऐंशीं किंवा शंभर मैल सुखानें जातां येतें. अशा भाड्याच्या गाडींत अनेक प्रकारचीं माणसें बसावयास येतात, त्यांच्या बरोबर बसणें ज्या श्रीमंतास आवडत नाहीं तो आपल्यासाठीं वेगळीच गाडी नेमून घेतो, किंवा आपली घरची गाडी घेऊन घोडेमात्र भाड्याचे घेतो. त्या गाडीसही टप्पाटप्पावर घोडे बदलतात.

ह्या देशांत वाटसरांस उतरण्यासाठीं गांवोंगांव चावड्या, देवळें, किंवा धर्मशाळा वगैरे घरें असतात, परंतु तीं रिकामीं उघडीं असतात, त्यांत सामान कांहींच नसतें. इंग्लंदांतील गोष्ट तशी नाहीं; तेथें गांवोगांव वाटसरांस उतरण्यासाठीं मोठालीं घरें बांधिलेलीं असतात, व त्या घरांत भोजनाची, निजण्याची, वगैरे हरएक प्रकारची चांगली सोय असते, व खटपटीकरितां चाकरमाणसेंहीं असतात. कोणी वाटसरू तेथें उतरावयास आला असतां त्यापासून पैसा घेऊन त्याला पाहिजे तशी सोय करून देतात. कोणी श्रीमंतलोक उतरावयास आला तर त्या साठीं वेगळीच खोली सजविलेली असते. त्या खोलींत बसून आपल्या घरच्या सुखाप्रमाणें तो सुख भोगितो. त्या खोली-बद्दल निराळा पैसा द्यावा लागतो. कोणी साधारण वाटसरू आला तर तो सर्व साधारण खोलींत, म्हणजे पाहिजे त्यानें येऊन बसावें, जेवावें, अशा खोलींत, बसून जेवितो. गरीब पायीं चालणारे वाटसरू ह्यांच्या साठीं त्यांच्या योग्यतेप्रमाणें घरें निराळींच असतात, त्यांत ते उतरून आपलें साधें जेवण करून सुख भोगितात.

जे लोक घोड्यांवर व गाड्यांत बसून जातात येतात त्यांस रस्ते नीट करण्याबद्दल कर द्यावा लागतो. त्या पैशानें रस्त्यांची दुरुस्ती होत असते. पायीं चालणाऱ्या लोकांसाठीं सडकांच्या बाजूस कोठें कोठें उंच रस्ते केलेले असतात, तरी पायीं चालणाऱ्यांस त्याबद्दल कांहीं कर द्यावा लागत नाहीं. परंतु त्या रस्त्या वरून कोणीं घोडे किंवा गाडी चालविली तर त्याला दंड पडतो.

टप्याच्या गाड्या व टप्याचे घोडे व भाड्याच्या गाड्या आणि वाटसरू उतरण्याचीं घरें ह्यांचा बहुतकरून संबंध असतो,

म्हणजे त्यांचे मालक एकच असतात. कोठें हा व्यापार एकज-णच करितो, आणि कोठें चार सरकती मिळून करितात. इंग्लंदांत कामकाजाकरितां व मौजेकरितां लोकांचें जाणेंयेणें फार होतें, ह्यामुळें ह्या व्यापारापासून व्यापाऱ्यांस बराच नफा होतो.

---

# इंग्लंदवर्णन, प्रकरण चवदावें.

## धर्मकृत्यांच्या मंडळ्या व शाळा.

सांप्रतकाळीं इंग्लंदांत लोकोपकाराची जी कोणतीही गोष्ट सांगावयाजोगती आहे त्या गोष्टीविषयीं मंडळी जमलेली आहेच, ही मोठी चमत्कारिक गोष्ट आहे. ह्या गोष्टीचें जितकें कौतुक वाटतें तितकें लोकस्थितींतल्या दुसऱ्या कोणत्याही गोष्टीचें कौतुक वाटावयाचें नाहीं. त्या मंडळ्यांत एक मंडळी मोठी आहे, तिला, स्वदेशीं व परदेशीं बैबल नामक पवित्र पुस्तक प्रसिद्ध करणारी मंडळी, असें म्हणतात. बैबलाचें, म्हणजे, जुन्या करा-राच्या व नव्या कराराच्या पुस्तकांचें, भाषांतर हरएक देशाच्या भाषेंत करून छापून त्या त्या देशांतील लोकांत प्रसिद्ध करावें असा त्या मंडळीचा हेतु असतो. सन * १८२५ ह्या वर्षीं त्या मंडळीचा वसूल सुमारें दहा लाख रुपये झाला होता. तेव्हांपासून वाढत वाढत सन १८५७ ह्या वर्षीं सुमारें चवदा लाख रुपये वसूल झाला. ही मंडळी प्रथम सन १८०४ ह्या वर्षीं स्थापित झाली, तेव्हांपासून सन १८२५ पर्यंत सर्व बैब-लाच्या व नव्या कराराच्या मिळून एक कोट प्रती ह्या मंडळीच्या

---

* ह्या मराठी पुस्तकाचें मूळ इंग्रेजी पुस्तक सन १८२५ ह्याचे सुमारास रचिलें होतें.

हातून वांटल्या गेल्या; आणि सन १८५७ पर्यंत तर ३२३८९७५९ प्रती वांटल्या गेल्या. दुसरी एक मंडळी आहे ती स्वदेशीं आणि परदेशीं शाळा घालण्याची मंडळी आहे. ही मंडळी इंग्लंदांत आणि इतर देशांत परस्पर शिकविण्याच्या रीतीच्या शाळा स्थापण्यास मदत करिते. मिशनरी पाठविणाऱ्या मंडळ्या अनेक आहेत. ज्या देशांतील लोकांस ख्रिस्ती धर्म ठाऊक नाहीं त्या देशांतील लोकांस त्या धर्माचें शुभवर्तमान सांगण्याकरितां मिशनरी ह्या नांवाचे धर्मोपदेशक पाठवावे, हा ह्या मंडळ्यांचा हेतु आहे. धर्म प्रकरणाचीं लहान लहान पुस्तकें करून छापवून प्रसिद्ध करणाऱ्या मंडळ्या अनेक आहेत. ह्या वर सांगितलेल्या सर्व मंडळ्यांचा खर्च सर्व पदवींच्या लहान मोठ्या लोकांनीं स्वसंतोषानें दिलेल्या वर्गणीच्या पैशांतून भागतो. ह्यांचा खर्च सरकार चालवीत नाहीं. ह्यांचा व सरकारचा संबंधच नाहीं. ज्यांची खुशी आहे तेच पैसा देतात. फारच गरीब लोक, चाकर लोक, मजूर लोक, मुलें ह्यां पैकींही बहुतेकांस आपला अन्नवस्त्राचा आवश्यक खर्च भागून जें द्रव्य उरतें तें मेवामिठाइच्या किंवा छानछोकीच्या कामांकडे खर्चण्यापेक्षां ह्या धर्मकार्यास देण्याचा अधिक संतोष वाटतो. ह्याला एक उदाहरण सांगतों. *मी इंग्लंदांत होतों तेव्हां माझ्या घरापासून सुमारें दीड कोसावर एक खेडें होतें तेथें मी बगींत बसून कधीं कधीं जात असें. त्या खेड्यास जाण्याची वाट कुंपलेल्या शेतांतून होती, म्हणून कुंपणाचीं फाटकें उघडण्याकरितां जवळच्या झोंपडींतील एका लहान मुलास मी बहुतकरून बरोबर नेत असें. त्यास मेहनती बद्दल रोज दोन पैसे देऊन

---

* हें म्हणणें मूळ इंग्रजी पुस्तक कर्त्याचें आहे.

माघारा लावीं. एके दिवशीं म्यां त्यास विचारिलें कीं, अरे जिंम, मी तुला दोन पैसे देतों त्यांचें तूं काय करितोस बरें? त्यानें उत्तर केलें, महाराज, ते मी आदित्यवारपर्यंत राखून ठेवितों, आणि त्या दिवशीं मिशनरी मंडळीस देण्याकरितां मी अमक्यापाशीं देत असतों.

वर सांगितलेल्या सर्व मंडळ्यांचें मुख्य स्थान म्हटलें म्हणजे लंदन शहर आहे. तरी ह्यांच्या संबंधाच्या शाखा बहुत करून हरएक गांवांत असतात. ह्या शाखामंडळ्या पैसा जमवून मुख्य मंडळ्यांकडे पाठवितात. ह्या वरच्या मंडळ्या सर्व लोकांच्या संबंधाच्या आहेत, त्यांशिवाय बहुत करून हर एक गांवांत व खेड्यांत त्यात्या गांवच्या गरीब लोकांच्या कल्याणासाठीं तेथील राहणारे परोपकारी लोकांच्या मंडळ्या असतात. त्यांपैकीं सेविंग्सब्यांक, म्हणजे गरीब लोकांनीं गांठीं केलेला पैसा ठेवण्याच्या पेढ्या, आहेत, त्यापेढींत गरीब लोकांनीं थोडा जरी पैसा ठेविला तरी त्याबदल त्यांस व्याज मिळतें. त्या पेढ्यांची वहिवाट गांवचे गृहस्थ लोक करीत असतात. त्यागृहस्थांस जरी त्याबद्दल नफा कांहीं नाहीं, तरी आपल्या गांवच्या गरीब लोकांच्या हितासाठीं श्रम घेऊन महिन्याच्या महिन्यास अमुकवेळेस लोकांनीं आणिलेला पैसा घेण्याकरितां व ठेविलेला पैसा लोकांनीं मागितला असतां तो परत देण्याकरितां बसत असतात. गरीब लोकांस वस्त्रें पुरविण्याच्याही मंडळ्या आहेत. त्यांची वहिवाट येणेंप्रमाणें. ह्या मंडळींतल्या असाम्या बहुतकरून बायका असतात, त्या प्रत्येकीं दर आठवड्यास आणा दोन आणे ह्याप्रमाणें पैसा एका गृहस्थाच्या बाईपाशीं आणून देतात, व ती बाई प्रत्येक

जणीचा पैसा घेऊन त्यांत आपल्या पदरचा कांहीं पैसा घालून तो सगळा पैसा जिच्या तिच्या नांवानें लिहून जतन करून ठेवि-ते. मग वर्षाच्या अंतीं जिचा जितका पैसा जमला असेल तितक्या पैशांत जी बायको आपणास अमुक वस्त्रें पाहिजेत म्हणून सांगते तीं वस्त्रें तिला ती बाई घेऊन देते. ह्या शिवाय आपआपणांत परस्पर हित करणाऱ्या मंडळ्या आहेत; त्यांत बायकांच्या निराळ्या व पुरुषांच्या निराळ्या असतात. त्यांचा क्रम असा आहे. प्रत्येक असामीनें आपल्या प्राप्तींतून दर महिन्यास सुमारें एक रुपया भरावा. जोंपर्यंत शरीरास समाधान आहे तोंपर्यंत त्या पैशांतून कोणास कांहीं मिळत नाहीं, परंतु कोणी दुखण्यास पडलें तर ठरावाप्रमाणें त्यास पोटास व औषध पाण्यास द्रव्य मिळतें. कोणी स्त्री बाळंतीण झाली तर तिच्या बाळंतपणाच्या खर्चास कांहीं पैसा मिळतो. कोणाला म्हातारपणामुळें काम करवत नाहींसें झालें, तर त्याच्या पोटास कांहीं पैसा मिळतो, व कोणी वारलें तर त्याच्या मूठमातीसही कांहीं मिळतें. गांवांत जे कोणी संभावित गृहस्थ असतात ते बहुत करून ह्या मंडळ्यांस आश्रय देतात, म्हणजे आपलीं नांवें मंडळींत लिहून पैसा भरितात, परंतु आपण त्यांतून घेत नाहींत. कितीं एक संभावित स्त्रियाही असेंच करितात; तेणेंकरून त्या गरीब मंडळ्यांचा विशेष नफा होतो. ह्यामंडळ्यांचा पैसा जमवून ठेवणें, व त्यांतून खर्च करणें, ह्या कामांची वहिवाट बहुत करून संभावित गृहस्थांपैकीं कोणी करितो. वहुतकरून मोठ्या गांवांत एक दोन हास्पिताळें असतात त्यांत दुखण्यास पडलेल्या गरीब लोकांस घेऊन त्यांस औषधपाणी देतात, व कोणाचा हातपाय दुखावला असला तर नीट करितात.

त्या हास्पिताळांत दुखणेकऱ्यांची शुश्रूषा करण्याकरितां कितीएक बायका असतात. त्या उत्तमरीतीनें त्यांची चाकरी करितात.

---

## रामचंद्र सीताविरहानें दुःखित होऊन सीतेला उद्देशून म्हणतो.

दिंड्या.

प्रिये लंके माझारि रावणानें ॥
तुला नेउन ठेविल्या कारणानें ॥
अम्हीं केले सदुपाय तें अनेक ॥
अतां त्यांतिल कामास ये न एक ॥ १ ॥
व्यर्थ जेथें सुग्रीवसख्य व्हावें ॥
वानरांचें ही वीर्य वृथा जावें ॥
जांबुवंता न स्फुरे बुद्धि कांहीं ॥
मारुतीचीही गती जेथ नाहीं ॥ २ ॥
विश्वकर्म्याचा पुत्र नळ त्याची ॥
मार्ग करण्याला शक्ति नसे साची ॥
लक्ष्मणाचे शर जेथ जाति वायां ॥
प्रिये असती कोणत्या अशा ठायां ॥ ३ ॥

---

## सीतेला तिची सखी म्हणते.

दिंड्या.

निराशेनें जाहलें उदासीन ॥
चित्त तुझें विप्रियें[१३७] फार खिन्न ॥

करुण वचनें याचिया होय दीन ॥
तरी सौजन्यें असे सुप्रसन्न ॥ १ ॥
तुझें आधीं चित्त तें महोदार ॥
दीर्घ विरहें उत्सुक असे फार ॥
तया पाहोनी न करितां उशीर ॥
अला प्रेमाचा पूर त्या गभीर ॥ २ ॥
चित्त तूझें वाटतें चंद्रकांत ॥
पुढें येतां प्रिय पूर्णचंद्र कांत ॥
प्रेम पाझर सूटला तया भारी ॥
घडे स्वाभाविक कोण तया वारी ॥ ३ ॥

---

## स्फुट कविता.

### श्लोक.

शास्त्रें फार अपार जीवित तुझें अत्यल्प कीं मानवा ॥
तेंही विघ्नशताभिभूतचि असे नाहींच रे वानवा ॥
घेईं यास्तव सारभूतचि असे जो अंश त्यातें बुधा ॥
घेतो हंस जसा पयोऽन्वितजला पासून एक्या दुधा ॥ १ ॥
भल्याच्या संगानें अवगुण असे तो गुण दिसे ॥
खळाच्या संगानें सुगुण तरि तो लोपत असे ॥
जसें खारें पाणी पिउनि घन तें गोड करिती ॥
फणी दुग्धातेंही पिउनि गरळातेंचि वमती ॥ २ ॥

### आर्या.

गुणवत्संबंधानें, नीचहि पावे सदा महत्त्वास ॥
पुष्पांच्या संबंधें, सूत्रालाही घडे शिरीं वास ॥ ३ ॥

दिंड्या.

खळा येतें साधुत्व साधुसंगें॥
दुष्टसंगें साधुत्व तें न भंगे॥
पुष्पसंगें मातीस वास लागे॥
मृत्तिकेचा पुष्पांत गुण न वागे॥ ४ ॥

श्लोक.

प्रयत्नें वाळूचे कण रगडितां तेलहि गळे॥
तृषार्ताची तृष्णा मृगजळ पिऊनीहि वितळे॥
सशाचेंही लाधे विपिन फिरतां शृंगहि जरी॥
परंतू मूर्खाचें हृदय धरवेना क्षणभरी॥ ५ ॥

अन्योक्ति श्लोक.

कर्णाला कटुशब्द सोडुनि उगा बा बैससी तूं जरी॥
काका आम्रतरूवरी मग तुला कोकीळ मानूं तरी॥
कीं वस्तु स्थळवैभवें करुनियां मोठेपणा पावती॥
नेपाळेश्वरभाळलग्न चिखला कस्तूरिका मानिती॥ ६ ॥
येथें समस्त बहिरे बसतात लोक॥
कां भाषणें मधुर तूं करिसी अनेक॥
हे मूर्ख ज्यांस किमपीहि नसे विवेक॥
रंगा वरूनि तुजला गणितील काक॥ ७ ॥
बैसोनी सखया पिका उगिच तूं मार्गप्रतीक्षा करीं॥
जो आंबे फुलती सुगंध सुटती येई मधू तों वरीं॥
तेव्हां सार्थकतेस पावतिल बा हीं गोड वाक्यें तुझीं॥
सध्या ग्रीष्म असे धुळी उडतसे दे दुःख नेत्रांस जी॥ ८ ॥

# हिंदुस्थान देश.

हिंदुस्थान देश म्हटला तर फार प्रसिद्ध आणि सर्व प्रकारें वर्णनीय असा योग्य देश आहे. फार प्राचीन काळापासून मोठे मोठे योद्धे राजे ह्या देशा विषयीं लोभाविष्ट होऊन हा जिंकून घेण्यास प्रवृत्त झाले आहेत; आणि दूरदूरचे देशांतील व्यापारी लोक प्रलोभित होऊन येथें व्यापार करण्या करितां आले आहेत. फार प्राचीन काळापासून हा देश विद्या, कला, कौशल्यें ईहींकरून संपन्न झाला आहे. तरी येथीलविद्या, कला, कौशल्यें हीं अन्य-देशांतल्या विद्यादिकांपेक्षां अगदीं भिन्न आहेत. तसाच हा देश शास्त्रें, धर्म, आचार, इत्यादिकांच्या नियमांनींही पहिल्यापासून संपन्न आहे, परंतु ते नियमही इतर देशच्या लोकांच्या नियमांहून वेगळे आहेत.

ह्या देशास हिंदुस्थान हें नांव पडलें आहे, तरी हें नांव ह्या देशांतलें नव्हे. हें बाहेरच्या लोकांनीं दिलें आहे. फारशी भाषेंत हिंदु म्हणजे काळा, ह्या वरून इराण देशांतील लोकांपेक्षां ह्या देशांतील लोकांचा वर्ण काळा आहे, म्हणून ह्या देशांतील लोकांस हिंदू म्हणजे काळे लोक, असें त्या इराणी लोकांनीं नांव दिलें असावें, आणि हिंदुस्थान म्हणजे काळे लोकांचा देश असें नांव पडलें असावें. हें बहुतांचें मत आहे.

ह्या शब्दाची उत्पत्ति दुसरे प्रकारचीही साजाया जोगी आहे. कोणी अशी कल्पना कढितात कीं, सकाराचे जागीं हकाराचा उच्चार कोठें कोठें होतो, जसें, एकुणहत्तर सत्तर इत्यादि, म्हणून, वायव्य दिशेकडून जे लोक इकडे येतात त्यांस प्रथम ह्या देशाची मर्यादा जो सिंधुनद तो लागतो. तेव्हां सिंधु ह्याचे जागीं हिंदु असा

उच्चार झाल्यावरून सिंधुनदाच्या तीरचे किंवा पलीकडचे जे लोक ते हिंदु, आणि त्यांचें स्थान तें हिंदुस्थान असें म्हणण्याची प्रवृत्ति त्या लोकांत पडली असावी.

प्राचीनकाळीं ग्रीक लोक व रोमन लोक ह्यांनींही ह्या देशास इंदिया हें नांव दिलें, त्याचींही उत्पत्ति अशीच असावी, म्हणजे सिंद ह्याचे जागीं हिंद होऊन हकार सोडून इया प्रत्यय जोडिल्यानें इंदिया असें झालें. प्राचीनकाळीं ह्या देशांतील लोक आपल्या देशास भरतखंड किंवा भारतवर्ष हें नांव देऊन बोलत असत. अर्वाचीनकाळीं हिंदू ह्या शब्दाचें धोरण धर्माकडे लागलें आहे; कारण कीं हिंदू म्हटला म्हणजे वेद, शास्त्रें, पुराणें ह्यांजवर ज्याची श्रद्धा तो, असें समजतात, आणि हिंदुस्थान म्हटलें म्हणजे अशाच लोकांचा देश. हिंदुस्थान ह्या शब्दाचा दुसरा एक विशेष अर्थ आहे, तो असा, नर्मदा नदीच्या उत्तरेकडील जो ह्या देशाचा भाग त्याला विशेषेंकरून हिंदुस्थान म्हणतात.

आतां हिंदुस्थान ह्याचा पहिला अर्थ घेऊन त्याच्या सीमा सांगतों. उत्तरेस हिमालय पर्वत; ईशान्येस व कांहीं पूर्वेस ब्रह्मपुत्रनद आणि अराकान देशांतील डोंगर; आग्नेयीस व कांहीं पूर्वेस बंगालचा उपसागर; दक्षिणेस व नैर्ऋत्येस हिंदीमहासागर; आणि वायव्येस व कांहीं पश्चिमेस सिंधु नद. ह्याची लांबी एकंदर २७ अक्षांश आहे. म्हणजे, कुमारिका केप उ० अ० ८—५ ह्यापासून हिमालयपर्वताचें शिखर उ० अ० ३५ ह्यापर्यंत आहे. ह्यालांबीचे भूगोलशास्त्राच्या मानानें १६२० मैल, आणि साधारण ब्रिटिश मैल १८८० होतात. एकंदर रुंदी २९ रेखांश

आहे, म्हणजे, पू० रे० ९२ ह्या ठिकाणीं काशाय देशांत कांहीं डोंगर आहेत तेथपासून वायव्येकडे सिंधु नदाचें मुख पू० रे० ६७ तेथपर्यंत आहे. ह्या रुंदीचे भूगोल शास्त्रमानाचे मैल १४०० आणि साधारण ब्रितिश मैल १६२० होतात. ह्या सीमांचे आंत ह्याचें क्षेत्रफळ म्हटलें म्हणजे भूगोलशास्त्राचे मानानें ११००००० चौरस मैल, आणि साधारण मानानें १२८०००० चौरस मैल इतकें होतें.

प्राचीन काळचे ग्रीक लोक व रोमन लोक इंदिया म्हणून जो देश समजत असत, त्यांत अफगानिस्ताना पासून चीन देशापर्यंत जितके देश आहेत तितके मोडत असत. ह्या मोठ्या राष्ट्राचे ते दोन भाग करीत असत, म्हणजे गंगेच्या अलीकडील इंदिया, आणि गंगेच्या पलीकडील इंदिया. येथें गंगा म्हणजे भागीरथी असें समजावें. इंग्लिश सरकारचें राज्य इंदिये मध्यें पसरलें आहे तें हिंदुस्थानाची सीमा उलंघून गंगेच्या पलीकडील इंदियेंत गेलें आहे.

ह्या मोठ्या अफाट भूप्रदेशांत हर तऱ्हेची भूरचना आहे. कोठें डोंगराळ देश, कोठें मैदानें, कोठें वाळवंटें, कोठें नद्या, कोठें उंचवटे, कोठें दलदली, इत्यादि आहेत.

हिंदुस्थानाचे स्वतःसिद्ध मोठे विभाग पाहिले असतां तीन आहेत, म्हणजे उत्तरेकडील हिंदुस्थान, मधलें हिंदुस्थान, आणि दक्षिणे कडील हिंदुस्थान. कोणी ग्रंथकारानें सहा विभाग कल्पिले आहेत; ते येणेंप्रमाणें,

१ पहिला विभाग, हिमालय पर्वत संबंधीं डोंगराळ देश.

२ दुसरा विभाग, सिंधुनदाच्या तीरची सपाटीचा देश.

३ तिसरा विभाग, भागीरथीच्या तीरचा सपाटीचा देश.

४ चवथा विभाग, मधलें हिंदुस्थान म्हणजे नर्मदेच्या उत्तरेकडील देश.

५ पांचवा विभाग, दक्षिण देश, म्हणजे नर्मदा आणि कृष्णा ह्यांच्या मधील देश.

६ सहावा विभाग, केवळ दक्षिणेकडील शेवटचा प्रदेश.

---

## हिंदुस्थानाची सांप्रतची स्थिति.

बंगाला, मुंबई, व मद्रास हे तीन प्रेसिडेन्सी, म्हणजे इलाखे, आणि वायव्य दिशेकडील प्रांत, पंजाबप्रांत व सेंत्रल प्राविन्सज हे तीन दुसरे इलाखे, हे सर्व इंग्लिश सरकारचे, आणि ह्यां शिवाय एतद्देशीय राजांचीं संस्थानें, असे हिंदुस्थानाचे विभाग आहेत.

मुख्य सरकारची गादी बंगाल इलाख्यांत आहे. त्याची राजधानी कलकत्ता शहर आहे.

आपण ज्या इलाख्यांत राहतों तो मुंबई इलाखा गवर्नर दर इजलास कौन्सिल ह्यांच्या अमलांत आहे. कौन्सिलामध्यें कमांदरइन् चीफ् म्हणजे मुख्य सेनापति, आणि सिविल खात्याचे दोन साहेब लोक असे तीन असामी असतात.

मुंबई इलाख्याचे भाषाभेदाप्रमाणें चार विभाग होतात. ते सिंध, गुजराथ, महाराष्ट्र, आणि दक्षिण महाराष्ट्र, म्हणजे ज्यांत कानडी भाषा लोक बोलतात तो देश, असे आहेत.

ह्या प्रत्येक विभागाचे पोटविभाग जिल्हे आहेत. ह्या जिल्ह्यांत जमाबंदीच्या, वसुलाच्या, आणि न्यायाधीशीच्या कामांवर कलेक्तर, जज्ज, आणि त्यांचे असिस्तंत युरोपियन व एतद्देशीय लोक नेमिले आहेत.

मुलकी खात्यांत रेविन्यू कमिशनर हे मुख्य आहेत, व न्याय-खात्यांत हे कोर्त हें मुख्य आहे.

ह्या शिवाय रेसिदेंत व पोलितिकाल एजेंत ह्या नांवांचे कामगार आहेत. हे कामगार इंग्लिशसरकार व त्यांची प्रजा हा एक पक्ष आणि इंग्लिश सरकारच्या ताब्यांतील व स्नेहांतील संस्थानी राजे हा एक पक्ष ह्या दोहों पक्षांच्या मध्यें राहून उभयतांचा सलूख राखण्याची, व बिघाड झाल्यास तो मिटविण्याची, तजवीज ठेवितात. असे कामगार गुजराथेंत बडोद्यास, काठेवाडास, आणि दक्षिणेंत कोल्हापुरास व सांवंत वाडीस आहेत.

इसवी सन १८५८ पर्यंत हिंदुस्थानाचा अंमल हानरबल ईस्त इंदिया कंपनी ह्यांनीं इंग्लंदच्या सरकारच्या तर्फेनें चालविला होता. परंतु ह्या वर्षीं छत्रपति श्री महाराणी विक्तोरिया हिनें पुढें खुद सरकारांतून ह्या देशावर अंमल चालविण्याचा निश्चय करून ह्या अर्थाचा जाहीरनामा केला, तो जाहीरनामा राणी साहेबांच्या हुकुमावरून नोवेंबरच्या पहिल्या तारखेस सर्व ठाण्यांठाण्यांत प्रसिद्ध केला.

## हिमालय पर्वतांची ओळ.

हिमालय ह्या शब्दाचा अर्थ हिम म्हणजे थंडी आणि आलय म्हणजे घर असा आहे. चीन देशापासून हिंदुकुश पर्वतांपर्यंत जी मोठी डोंगरांची ओळ आग्नेयीकडून वायव्येकडे लागत गेली आहे त्या ओळींतील एका भागास हिमालय हें नांव लागतें. तो भाग कोणता म्हटला तर ह्या ओळीवरून ब्रह्मपुत्रनद ज्या ठिकाणीं दक्षिणेस येतो त्या ठिकाणापासून, म्हणजे उ० अ० २८—१५ व पू०रे० ९६ एथपासून, तेर सिंधुनद ज्या ठिका-

णावरून दक्षिणेस येतो तेथपावेतों, म्हणजे उ० अ० ३५ आणि पू० रे० ७५ एथपावेतों, जो त्या ओळीचा भाग त्यास हिमालय पर्वतांची ओळ असें म्हणतात. ह्या पर्वतांच्या ओळीचा रोख म्हटला तर ब्रह्मपुत्रनदापासून गंडकीनदीपर्यंत पश्चिमेकडे आहे, आणि तेथून सिंधुनदापर्यंत वायव्य दिशेकडे आहे. ह्या सगळ्या ओळीची लांबी १९०० मैल आहे. रुंदी सरासरी १५० मैल आहे. ह्या ओळीच्या डोंगरांनीं व्यापलेला जो प्रदेश त्याचें क्षेत्रफळ सुमारें १६०००० चौरस मैल आहे, असा अजमास केला आहे.

हिमालय पर्वतांची सरासरी उंची समुद्राच्या सपाटीपासून १५७०० फूट आहे, असा सुमार काढिला आहे. परंतु ह्या ओळींतील कितीएक डोंगरांचीं शिखरें ह्याहूनही फारच उंच आहेत. त्यां पैकीं कितीएक शिखरांचीं नांवें व उंची सांगतों.

| | नांवें. | उंची फूट. |
|---|---|---|
| १ | रालदंग,.................. | २१४११ |
| २ | जम्नोत्तरी,.................. | २११५५ |
| ३ | बदरीनाथ,.................. | २३४४१ |
| ४ | जवाहीर,.................. | २५७४९ |
| ५ | कूनलस,.................. | २२५१३ |
| ६ | धवलगिरि.................. | २६८६२ |
| ७ | गोसाईस्थान,.................. | २४७४० |
| ८ | सलपु,.................. | २४२४३ |
| ९ | चमलारी,.................. | २६००० |
| १० | एवरेस्त,.................. | २९००० |

ह्या मुख्य ओळीचे कण्यावरून पलीकडे जाण्याचे घाट सुमारें २० माहीत आहेत. त्यांपैकीं घोडीं जाण्या येण्या जोगे थोडकेच घाट आहेत. जे बिकट घाट आहेत त्यांवरून मेंढरांवर ओझीं घालून नेण्याचा संप्रदाय आहे. ह्या घाटांची उंची समुद्राच्या सपाटी पासून १०००० फुटांपासून १८००० फुटांपर्यंत आहे.

मुख्य घाटांचीं नावें सांगतों. काश्मिरापासून उत्तरेकडील लदाक प्रांतास जाण्यास मध्यें कंद्रीबाल म्हणून घाट आहे. चिनाब नदीची उत्तर थड आणि लदाक प्रांत ह्यांच्यामध्यें जो घाट आहे त्याचें नांव पारालाह. त्या घाटाची उंची सुमारें १६५०० फूट आहे. शातुल, बुरेंदो, आणि पीमिंग ह्या नांवांचे तीन घाट सतलज नदीच्या थडीवरून उत्तरेकडे चालले आहेत. सतलज नदीच्या वरील थडीस चापरंग म्हणून चीन लोकांचें एक ठाणें आहे, तिकडे जाण्यास भागीरथीच्या तासांतून घांगतांग ह्या नांवाचा घाट आहे. हा घाट घोडीं जाण्याजोगा आहे. ह्याची उंची सुमारें १०१५० फूट आहे. उत्तर हिंदुस्थान आणि तिबेत ह्यांच्या मध्यें एक नेती म्हणून घाट आहे, त्याची उंची १६८१४ फूट आहे. ह्या घाटानें काफल्यांची रहदारी फार चालते. कालीनदीची थडी आणि तिबेत देशांतील जें दंपो म्हणून स्थान ह्यांच्या मध्यें दुरा नांवाचा घाट आहे, त्याची उंची सुमारें १७७९० फूट आहे ह्या घाटावरून रहदारी फार असते. गंडकी नदीच्या उगमाजवळ मास्तंग ह्या नांवाचा एक घाट आहे. गंडकी नदीच्या पूर्वेस जे घाट आहेत त्यांची माहिती अगदीं थोडी आहे.

हिमालय पर्वतांच्या ओळीवर नेहमीं बर्फ असतें; परंतु दक्षिणेकडील उतरणीवर आणि उत्तरेकडील उतरणीवर बर्फ सारखें पडत

नसतें. दक्षिणेकडील उतरणीवर फार असतें. तिबेतांत उन्हाळ्यामध्यें १६६०० फूट उंची पर्यंत बर्फ असत नाहीं, त्याच्यावर बर्फ असतें, आणि दक्षिणेकडील उतरणीवर १२४०० फुटांचे उंचीवर बर्फ लागतें.

ह्या डोंगरांत गंधक, तुरटी, सैंधव, सोन्याची माती, तांबें, शिसें, लोखंड, सुर्मा ह्यांच्या खाणी सांपडतात. नेपाळांतल्या खाणींत तांबें, शिसें, आणि गंधक हीं पुष्कळ सांपडतात.

दक्षिणे कडील उतरणीवर आणि उत्तरेकडील उतरणीवर वनस्पति आणि लागवड हीं सारखीं नसतात. दक्षिणे कडील उतरणीवर १०००० फुटांहून वरती लागवड होत नाहीं, आणि ९५०० फुटांवर मनुष्याची वस्ती नाहीं. देवदारू नांवाचे वृक्ष ह्या पर्वतांवर फार असतात, ते १०३०० फुटांपर्यंत चांगले पोसतात; तरी ११००० फुटां पलीकडे ते क्वचित् आढळतात; सांपडले तर लहान असतात. तेथून १२००० फुटांपर्यंत एक दोन जातींच्या मात्र वनस्पति असतात. उत्तरेकडील उतरणीवर १३००० फूट उंची पर्यंत मनुष्यांची वस्ती आहे. १३५०० फुटांपर्यंत धान्याची लागवड होते; आणि १७५०० फूट उंचीपर्यंत कांहीं झाडें असतात. ह्यावरून दिसतें कीं ह्या उतरणीवर दक्षिणे कडच्या उतरणीपेक्षां ३००० फूट अधिक उंची पर्यंत झाडें होतात. येथील धान्यें म्हटलीं तर गहूं, सातू, बरग, वगैरे आहेत. ह्या डोंगरांवर जीं जनावरें आहेत तीं बहुतकरून रवंथ करणारीं आहेत. घोड्यांचे भेद थोडे आहेत. उत्तरेकडील उतरणीवर रानघोडे आहेत, आणि यक म्हणजे वनगाई, घेरल म्हणून बकऱ्याची जात, कस्तूरिका मृग, नीलगौ, आणि हरणाचे

एक दोन भेद आहेत. येथील पांखरें म्हटलीं तर चकोर, कोकिल, तांबड्या पायांचे कावळे, आणि पारवे, हे आहेत.

---

## गंगा म्हणजे भागीरथी.

भागीरथीचा उगम हिमालय पर्वतांवर उ० अ० ३१ आणि पू० रे० ७९ व ८० ह्यांचा मध्य ह्या सुमारास झाला आहे. ह्या नदीचे दोन उगम आहेत. एक भागीरथी आणि एक अलकनंदा. त्यांपैकीं पश्चिमेकडील प्रवाह ती भागीरथी, आणि पूर्वेकडील प्रवाह ती अलकनंदा. भागीरथीचा प्रवाह अलकनंदेहून लहान आहे, तरी हिंदुलोकांमध्यें हिचीच मान्यता अधिक आहे. ह्या नदीला भागीरथी हें नांव उगमापासून तें तहत समुद्रापर्यंत सारखें चालत आहे. जेव्हां जेव्हां ह्या नदीचा उल्लेख करण्याचा प्रसंग येतो तेव्हां तेव्हां भागीरथी ह्या नांवानेंच करितात. कारण कीं, गंगा हें नांव जितक्या तीर्थांच्या नद्या आहेत तितक्यांसही लागतें.

भागीरथीचा उगम दिल्लीपासून दोनशें मैलांवर उत्तर वायव्य दिशेस हिमालय पर्वतांत गंगोत्री पासून १२ मैल उत्तरेस धनुष्याकार गोमुखनांवाचें एक तीर्थ आहे तेथें होतो. बर्फ पडून पडून तें घट्ट जमून त्या बर्फाचा पर्वता सारखा एक मोठा ढीग झाला आहे त्याच्या तळाशीं हें गोमुख तीर्थ आहे. ह्याची उंची समुद्राच्या सपाटी पासून १३८०० फूट आहे. उगमा पासून निघते त्या ठिकाणीं भागीरथीच्या पात्राची रुंदी सरासरी २७ फूट, आणि खोली सरासरी १ फूट आहे. श्रीनगराहून नैर्ऋत्य दिशेस ९ मैलांवर उ० अ० ३०—९ आणि पू०

रे० ८८—३३ ह्या सुमारास देवप्रयाग आहे त्या ठिकाणीं भागीरथीचा आणि अलकनंदेचा संगम होतो. दोघींचा संगम झाल्यावर तेथें पात्राची रुंदी १८ वार झाली आहे. आणि तेथ पासून गंगा हें दुसरें नांव तिला प्राप्त झालें. ती हरिद्वार येथें डोंगरांतून बाहेर निघून हिंदुस्थानाच्या मैदानावरून वाहूं लागते. हरिद्वारापाशीं हिची उंची समुद्राच्या सपाटी पासून १०२४ फूट आहे. हरिद्वारा पासून समुद्रापर्यंत १३५० मैल लांब गलबतें चालावयाजोगा हिचा प्रवाह झाला आहे. उगमापासून हरिद्वारापर्यंत कोठें दक्षिणेकडे कोठें नैर्ऋत्येकडे असा प्रवाह चालला आहे. हरिद्वारापासून पुढें उ० अ० २५—२५ आणि पू० रे० ८१—१० ह्या सुमारास यमुनानदीशीं संगम होतो, तेथ पर्यंत प्रवाह आग्नेयीदिशेकडे वाहतो. तेथून पुढें राजमहालशहरापर्यंत पूर्वेकडे वाहतो तेथून पुन्हा आग्नेयीकडे वळतो, मग पुढें दक्षिणेकडे वळून उ० अ० २२ आणि २१—३० आणि पु० रे० ८० आणि ९०—४० इतक्या प्रदेशामधून अनेक मुखांनीं समुद्रास मिळतो. उगमापासून मुखां पर्यंत भागीरथीची लांबी सुमारें १५०० मैल आहे.

समुद्रापासून अलीकडे सुमारें २०० मैलांवर भागीरथीचे फांटे फुटूं लागतात, व चिमट्याचा प्रदेश होऊं लागतो. फांटे तर पुष्कळच फुटले आहेत. त्यांत दोहोंकडचे दोन फांटे मुख्य आहेत. त्यांत पूर्वेकडील फांटा मोठा आहे, व गंगेचा मुळचा प्रवाह त्यांतूनच चालला आहे, आणि गंगा हें नांव त्यासच आहे तरीं पश्चिमे कडील फांटा जो कासिमबाजारावरून जातो, त्यास हिंदुलोक खरी भागीरथी मानितात; आणि पूज्यता व पावनता

तीसच आहे असें म्हणतात. त्या फांट्यास पुढें हुगळी हें नांव झालें आहे. ह्या मुख्य दोहों फांट्यांच्या मधला जो प्रदेश तो सारा मळईचा आहे. हा प्रदेश सुमारें २०० मैल रुंदीचा आहे. ह्यांतून अनेक फांटे एकमेकांपासून फुटून पुन्हा एकमेकांस मिळून पुन्हा वेगळे होऊन शेवटीं बारांपासून विसांपर्यंत मुखांनीं समुद्रास मिळतात. ह्या मुखांच्या लगत्याचा जो प्रांत त्यास सुंदरबन म्हणतात. तेथील हवा फारच वाईट व रोगकारक आहे. तेथें झाडी किर्र आहे, तींत वाघ वगैरे जनावरें पुष्कळ राहतात.

हरिद्वारापासून प्रयागापर्यंत भागीरथीचा प्रवाह सरळ चालला आहे. आणि तासाची रुंदी १ मैला पासून १॥ मैला पर्यंत आहे. पुढें प्रवाहास वळणें फार झालीं आहेत. घोगरा, सोन, आणि गंडकी ह्या तीन नद्यांचा संगम झाल्यावर प्रवाहाच्या रुंदीची सीमा झाली. समुद्रा पासून अलीकडे ६०० मैलां पर्यंत तासाची रुंदी अर्ध्या मैलापासून तीन मैलां पर्यंत आहे. पाणी अगदीं थोडें होतें तेव्हां तासाची रुंदी पाऊण मैल मात्र असते. यमुनेचा संगम होण्याच्या पूर्वीं कोठें कोठें कधीं कधीं भागीरथीला पायउतार होतो. यमुनेचा संगम झाल्यावर पात्राची खोली फार वाढली. भागीरथीला पुढें अनेक नद्या मिळाल्या तरी पात्राची रुंदी वाढली नाहीं, पण खोली अधिक झाली. समुद्रापासून ५०० मैल अलीकडे पात्राची खोली एकसारखी ३० फूट आहे. प्रवाहा बरोबर रेती किंवा गाळ वाहून येतो त्यामुळें मुखांजवळच्या प्रवाहा मध्यें भाटी व दांडे पडून गलबतें चालण्यास अटकाव होतो. गंगेला मोठा पूर येतो तो पावसाळ्यांत सतत पाऊस लागल्या मुळें येतो हें ठीकच

आहे. पण डोंगरांत पाऊस पडल्यामुळें एप्रिल महिन्याच्या अखेरीस पाणी वाढूं लागतें तें जून महिन्याच्या अखेरीस बंगाल्यांत अजून पाऊस पडला नाहीं तोंच एकंदर पंधरा सोळा फूट पाणी वाढतें. पुढें पावसाळ्यांत ब्रह्मपुत्र नद व गंगा ह्यांच्या लगत्यास जो बंगाल्याचा खालचा प्रांत तो सपाटीचा असल्यामुळें जलमय होऊन जातो. पुढें तें पाणी अक्टोबर महिन्यापासून उतरूं लागतें. पाणी सर्व गेल्यावर जिकडे तिकडे गाळ बसलेला दृष्टीस पडतो.

भागीरथीच्या मुखांतून जें समुद्राच्या भरतीचें पाणी येतें तें क्रमानें चढत नाहीं; तर समुद्राची भरती समा होण्याच्या सुमारास आली म्हणजे एकदम पाण्याचा लोंढा घोड्या प्रमाणें मोठ्या वेगानें धांवत येतो. पूर्णिमेस आणि अमावास्येस हा लोंढा फारच मोठा असतो. कधीं कधीं हा लोंढा २०० मैलां पर्यंत जाऊन पोहोंचतो. ह्या लोंढ्याची उंची मुखाजवळ बारा फूट असते. हा लोंढा कधीं सगळ्या तासांतून जात नाहीं, अर्ध्या तासांतून जातो; तो कधीं ह्या बाजूनें कधीं त्या बाजूनें जातो. त्याचा शब्दही मोठा भयंकर असतो. ह्या लोंढ्याला घोडा असें म्हणतात.

गंगानदीचा उपयोग म्हटला तर फारच आहे. व्यापाराचा हा एक मोठा मार्गच आहे. गंगा आणि तिला मिळणाऱ्या नद्या ह्यांत डोंगरांपर्यंत देखील सहा महिने गलबतें चालविण्याची सोय असते. ह्या नदींत गलबतांच्या कामावर उपजीविका करणारे असे लोक एकलक्षाहून अधिक असतील. ह्या नदीच्या कांठीं जितकीं भरवस्तीचीं शहरें व गांवें आहेत तितकीं दुसऱ्या कोणत्याही नदीच्या कांठीं नसतील. त्यांत काशी शहर हें मुख्य आहे.

भागीरथीला प्रयाग नांवाचीं पांच स्थानें प्रसिद्ध आहेत. त्यां पैकीं मुख्य प्रयाग, अलाहाबादेजवळ गंगा यमुना ह्यांचा संगम झाला आहे, तेथें आहे. दुसरे चार प्रयाग, म्हणजे देवप्रयाग, रुद्रप्रयाग, कर्णप्रयाग, आणि नंदप्रयाग, हे हिमालय पर्वतांच्या लगत्यास श्रीनगराचे प्रांतांत आहेत. ह्यां शिवाय आणखी फार प्रसिद्धीचीं क्षेत्रें व तीर्थें म्हटलीं तर, गंगोत्री, गंगाद्वार, हरिद्वार, उत्तरमानस मोंगिराजवळ, जनगिरि, आणि हुगळीच्या मुखाजवळ सागर किंवा गंगासागर, नांवाचें बेट आहे, हीं आहेत.

ह्या नदीचा प्रवाह सुमारें १२ रेखांश आणि सुमारें १० अक्षांश इतक्या प्रदेशांतून चालला आहे. हा सगळा प्रदेश बंगाल इलाख्यांत व वायव्येकडील प्रांतांच्या इलाख्यांत मोडतो.

ब्रह्मपुत्र नदाचा आग्नेयीकडे अनेक फांटे फुटून भागीरथीशीं संबंध झाला आहे. शिवाय भागीरथीला पुष्कळ नद्या मिळाल्या आहेत त्यांत ज्या फार प्रसिद्ध त्या येथें लिहिल्या आहेत.

उत्तरे कडून मिळणाऱ्या, १ यमुना, २ गोमती, ३ घोगरा, ४ गंडकी, ५ कौशिकी, ६ रापती, ७ भोगावती, ८ रामगंगा, ९ महानंदा, आणि १० तिस्ता. दक्षिणेकडून मिळणाऱ्या, १ तानसी, २ कर्मनाशा, ३ सुवर्णभद्र नद किंवा शोणभद्र नद, अथवा सोन.

---

## सिंधुनद.

सिंधुनद ह्या नांवाची मोठी नदी ही हिंदुस्थानाच्या वायव्य दिशेकडील व कांहीं पश्चिम दिशेकडील सीमा आहे. हिंदुलोकांच्या पुराणांत कितीएक नद्यांस पुल्लिंग करून नद असें नांव दिलें आहे. त्या नदां पैकीं हा एक नद आहे. युरोपियन लोक

ह्या नदीस इंदस् म्हणतात. हा शब्द सिंधुशब्दाचा अपभ्रंश होय. कारण कीं, रोमन लोकांनीं सिंधु ह्या बद्दल सिंदस् असा शब्द केला, मग सकाराचे स्थानीं हकार होऊन हिंदस् असा शब्द झाला, नंतर हकाराचा लोप करून इंदस् असा युरोपियन लोकांनीं उच्चार केला.

ह्या नदीचा उगम हिमालयाच्या उत्तरेस तिबेत देशामध्यें कैलास म्हणून जो मोठा पर्वत आहे त्याच्या पायथ्याशीं मानस सरोवराजवळ उ ० अ ० ३१—२० आणि पू ० रे ० ८१—१५ ह्या सुमारास झाला आहे. सतलजनदीचाही उगम तेथेंच जवळपास आहे असेंही समजलें आहे.

हिमालयाच्या पलीकडे ह्या नदीला सिंगकाबाब ऊर्फ सिंगचु म्हणजे सिंहमुखी, असें नांव आहे. ही नदी उगमा पासून निघाल्यावर वायव्य दिशेकडे लदाक देशांतून वाहते. त्या देशांत वाहत असतां हिला दुसऱ्या अनेक नद्या येऊन मिळतात. त्यां पैकीं मुख्य नदी शयोक म्हणून आहे. हिचा संगम झाल्यावर सिंधुनदाचें पात्र मोठें होऊन त्यास आबिसिंद असें नांव प्राप्त झालें आहे.

ही नदी उ ० अ ० ३५—३४ आणि पू० रे० ७४—२६ ह्या सुमारास हिमालय पर्वतांच्या खिंडींतून दक्षिणेकडे निघते ती तशीच नीट अटक शहरापर्यंत, म्हणजे उ० अ० ३३—५४ आणि पू ० ७२—१८ पर्यंत, वाहत जाते. ही डोंगरांतून बाहेर निघाली तोंच वायव्य दिशेकडून गिलगीत ह्या नांवाची एक मोठी नदी येऊन हिला मिळाली आहे.

अटक नांवाचें स्थान प्रसिद्ध आहे, तेथपर्यंत ह्या नदींत खा-

लून गलबतें जातात, पुढें जात नाहींत. हिंदुस्थानांतून अफगानिस्तानांत जे लोक जातात व तिकडून इकडे येतात त्यांस ही नदी उतरण्याचें मुख्य स्थान हेंच आहे.

अटक येथें सिंधुनदाचें पात्र २६० वार रुंद आहे; आणि पाणी फार खोल असून मोठ्या वेगानें चालतें. नदीपार उतरण्यास ह्या ठिकाणीं नावांचा पूल केला आहे. अटक शहराजवळ पश्चिमेकडून काबूल नांवाची एक मोठी नदी येऊन हिला मिळते.

अटक शहराच्या सुमारास सिंधुनदाला अटकनदी हें नांव प्राप्त झालें आहे. हिंदुलोकांस ही नदी उतरून पार जाण्याचा निषेध आहे ह्यावरून, किंवा इकडून पश्चिमेकडे जाण्यास मध्यें नदीचा मोठा अटकाव आहे ह्यावरून, अटक हें नांव पडलें असावें.

अटक शहरापासून कालाबाग येथपर्यंत दक्षिण-नैर्ऋत्य दिशेकडे ही नदी मोठ्या सपाट्यानें वाहत चालली आहे. कालाबाग येथें नदीची रुंदी सुमारें २५० वार झाली आहे. कालाबागाचे दक्षिणेस उ० अ० ३२—५७ आणि पू० रे० ७१—३६ ह्या सुमारास ही नदी सपाटीच्या मैदानावर गेल्यामुळें रुंद व संथ झाली आहे. तेथपर्यंत पाणी स्वच्छ असतें. कालाबागा पासून मिटनकोटापर्यंत ३५० मैलांच्या टप्प्यांत नदीच्या डगरी इतक्या ठेंगण्या आहेत कीं नदीला थोडासा पूर आला तरी तासा बाहेर पाणी पसरतें.

मिटनकोटाच्या अमळ दक्षिणेस उ० अ० २८—५५ आणि पू० रे० ७०—२८ ह्या सुमारास पंजाबांतल्या प्रसिद्ध पांच नद्या एकत्र मिळून जी एक मोठी नदी झाली, जिला पंचनद असें नांव

पडलें आहे, ती पूर्वेकडून येऊन सिंधुनदाला मिळते. तेथून समुद्रापर्यंत सुमारें ४७५ मैलांचें अंतर आहे.

मिटनकोटाखालीं पंचनदाचा संगम झाल्यावर नदीची रुंदी सुमारें २००० वार झाली आहे. मिटनकोटापासून रोरी गांवापर्यंत नदीचा प्रवाह नैर्ऋत्य दिशेकडे वाहत आहे. रोरीजवळ नदीच्या तासांत खडकांचीं चार बेटें आहेत; त्यां पैकीं मोठें जें बेट त्याचें नांव बकर, त्यावर मोठा बळकट असा एक किल्ला बांधिला आहे. रोरीजवळ नदीला दोन फांटे फुटले आहेत. एक पश्चिमेकडे आणि एक पूर्वेकडे. पूर्वेकडील फांट्याचा प्रवाह वाळवंटाच्या मैदानांत मुरून जातो; आणि पश्चिमेकडील फांटा सेहवानाजवळ पुन्हा सिंधुनदाला मिळतो.

सेहवानाच्या दक्षिणेस सुमारें ८० मैलांवर आणि हैदराबादेच्या उत्तरेस सुमारें १२ मैलांवर फलेली म्हणून एक मोठा फांटा फुटला आहे. तो आग्नेयी दिशेकडे गंज नांवाच्या डोंगरापर्यंत वाहत जातो. तेथें त्यास दुसरा एक फांटा फुटतो, तो पश्चिमेकडे वळून त्रिकल येथें सिंधुनदास फिरून मिळतो. तेथ पासून सिंधुनदाचा दलता, म्हणजे चिमट्यांतला प्रदेश, लागतो.

फलेली म्हणून जो फांटा आग्नेयी दिशेकडे चालला त्यास पुढें गोनी हें नांव प्राप्त झालें. पुढें हैदराबादेच्या खालीं ५० मैलांवर गोनी ह्याचे दोन फांटे झाले, ते पुढें दुसऱ्या फांट्यांस जाऊन मिळाले आहेत.

सिंधुनदाला अनेक मुखें आहेत. त्यां मध्यें कोरी म्हणून जें अगदीं पूर्वेकडील मुख ती एक मोठी खाडी आहे. ह्या खाडीचें पाणी खारट असतें. परंतु जेव्हां नदीला पूर येतो तेव्हां पाणी गोड होतें.

हैदराबादे जवळ सिंधुनदाची रुंदी ८३० वार आहे. तेथून खालीं ६५ मैलांवर तत्ता म्हणून शहर आहे तेथपासून पात्र अरुंद होत गेलें आहे. तत्त्याचे दक्षिणेस नदीचे दोन फांटे होतात. एक पश्चिमेकडे बगाड नांवाचा फांटा आणि एक दक्षिणेस सात्ता नांवाचा फांटा. सात्ता ह्यालाही अनेक फांटे फुटले आहेत. हा फांटा पश्चिमेकडे वळून कुकेवारी नांवाच्या मुखानें समुद्रास मिळतो. हें मुख सर्व मुखांपेक्षां मोठें आहे, ह्याची रुंदी ११०० वार आहे. ह्या मुखा जवळ मोठी भाट पडली आहे, म्हणून तारवांस जाण्या येण्यास मोठी अडचण पडते.

ह्या सिंधुनदाच्या खाड्या, म्हणजे मुखें, पुष्कळ आहेत. त्यांतून ११ मुखें सांगावया जोगीं प्रसिद्ध आहेत. त्यांचीं नांवें पूर्वेकडून पश्चिमेकडे अशीं, १ कोरी, २ सीर, ३ मल, ४ काहील, ५ कुकेवारी, ६ केदीवारी, ७ हजामारी, ८ रिचेल, ९ जोआ, १० पितियानी, आणि ११ पित्ती. इतक्या मुखांनीं सिंधुनद समुद्रास मिळाला आहे.

समुद्राचे भरतीचें पाणी खाडींतून तत्ता शहरा पर्यंत जातें. सिंधुनदामध्यें मगर पुष्कळ आहेत. मासे पुष्कळ प्रकारचे आणि उत्कृष्ट जातीचे आहेत. ह्या नदाच्या कांठांवर जे लोक राहतात त्यांस सर्वदा पाण्यांत वागण्याचा व पाण्यांतील व्यापार करण्याचा सराव फार आहे.

सिंधुनदाची एकंदर लांबी उगमापासून समुद्राच्या संगमा पर्यंत सुमारें १६५० मैल आहे. त्यांत उगमापासून अटक शहरा पर्यंत लांबी सुमारें ७०० मैल आणि तेथपासून समुद्रा-

पर्यंत ९५० मैल लांबी आहे. पुढें सिंधु नदा वरून व्यापाराची सोय वाढत वाढत फार होईल अशी सर्वांस आशा आहे.

## ब्रह्मपुत्र नद.

हिमालय पर्वतांतून ज्या मोठ्या तीन नद्या निघतात त्यांपैकीं हा ब्रह्मपुत्र नद अगदीं पूर्वेकडे आहे. सिंधुनदाप्रमाणें ह्या नदीलाही नद अशी संज्ञा आहे. पुराणांत हा ब्रह्म्याचा पुत्र अशी कल्पना केली आहे, म्हणून पुल्लिंगी ब्रह्मपुत्र नद असें नांव पडलें असावें.

ह्या नदाच्या उगमाविषयीं मतभेद आहे. कोणी म्हणतात कीं तिबेत देशामध्यें सानपू म्हणून जी मोठी नदी आहे, जिचा उगम मानस सरोवराजवळ आहे, तीच ही नदी इकडे आली आहे. परंतु ह्या गोष्टीचा निश्चय झाला नाहीं. इतकें मात्र खचीत आहे कीं तीन नद्या मिळून हा एक नद झाला आहे. त्यांचीं नांवें दिहोंग, दिबोंग, आणि लोहित हीं आहेत. ह्या तीन नद्या हिमालयावरून दक्षिणेकडे उतरून असामच्या वरल्या प्रांतांत एकत्र होतात.

दिहोंग ह्या नदीचा शोध उ० अ० २८—१५ आणि पू० रे० ९५—१० येथपर्यंत काढिला आहे. हीच नदी सानपू असली तर असेल असें वाटतें. दिबोंग नदी ही मधली आणि तीनही नद्यांपैकीं लहान आहे. हिचा उगम उ० अ० २८-१० आणि पू० रे० ९७ ह्या सुमारास आहे. ही नदी उ० अ० २८-१५ व पू० रे० ९६ ह्या सुमारें डोंगरांवरून उतरून असाम देशांत प्रवेश करिते. तिसरी नदी लोहित नद हाच ब्रह्मपुत्र नदाचा खरा प्रवाह व खरें मूळ असें तेथचे लोक म्हणतात.

हा लोहित नदही दोन नद्या मिळून झाला आहे. त्या नद्या तालुका आणि तालूदिंग ह्या नांवांच्या आहेत. ह्यांचे उगम तिबेत देशांत उ० अ० २८ आणि २९ व पू० रे० ९७ आणि ९८ ह्यांच्या मध्यें आहेत. ह्या दोन नद्या मिळून एक नदी होऊन ती नैर्ऋत्य दिशेकडे वाहून लांगतान म्हणून जो हिमालयाच्या ओळीचा पूर्वेकडील भाग आहे तो उतरून ब्रह्मकुंडांत पडते. त्या ब्रह्मकुंडांतून बाहेर निघाल्यावर हिला ब्रह्मपुत्र नद हें नांव प्राप्त होतें. तेथें ह्या नदाची रुंदी २०० फूट आहे. मग ६० मैलपर्यंत बहुतकरून पश्चिमेकडे वाहून गेल्यावर सध्य नांवाच्या गांवा खालीं सुमारें १५ मैल उ० अ० २७—५० आणि पू० रे० ९५—३० ह्या सुमारास दिहोंग आणि दिबोंग ह्या नद्यांचा संगम होतो. ह्यांचा संगम झाल्यावर हा ब्रह्मपुत्रनद असाम देशामधून नैर्ऋत्य दिशेकडे वाहतो. हा असामांतून वाहत असतां ह्याची रुंदी एकसारखी नाहीं, कोठें थोडी कोठें फार आहे. कोठें प्रवाह दुभागून मध्यें बेटें पडलीं आहेत, त्या बेटांपैकीं एक बेट माजूली ह्या नांवाचें आहे, तें ७० मैल लांब आणि १० मैल रुंद इतकें मोठें आहे.

ब्रह्मपुत्रनद असाम देशांतून वाहत असतां ह्याला किंबहुना साठ नद्या येऊन मिळतात. हा असामांतून पार पडल्यावर बंगाल्यांत रंगपूर प्रांतांत प्रविष्ट होतो. मग प्रथम दक्षिणेकडे मग आग्नेयीकडे वळून गारो नामक डोंगरांच्या पश्चिमेकडील टोंकास वळसा घालून, तेथून दक्षिण नैर्ऋत्य दिशेकडे फिरून, भागीरथीच्या पूर्वेकडील फांट्याशीं मिळून त्याबरोबर बंगालच्या उपसागरांत उ०अ० २२—५१ आणि पू० रे० ९०—४० ह्या सुमारास पांच मैल रुंदीच्या मुखानें समुद्रास मिळतो.

हा नद बंगाल्यांतून वाहत असतां ह्याला सुरमा, बरक, आणि गुमती ह्या नद्या पूर्वेकडून येऊन मिळतात, आणि गदद, नीलकुमर, तिस्ता, आणि मेघना, ह्या नद्या पश्चिमेकडून जाऊन मिळतात. ह्यांपैकीं शेवटची मेघना, ही नदी ब्रह्मपुत्र नदापेक्षां केवळ लहान असून हिचा संगम झाल्यावर ब्रह्मपुत्र ह्या नांवाचा लोप होऊन मेघना हेंच नांव पुढें समुद्रापर्यंत चालतें. ही चमत्कारिक गोष्ट आहे.

ब्रह्मपुत्रनदास ज्या नद्या येऊन मिळतात त्यांतून गाळ फार वाहून येतो, ह्यामुळें ब्रह्मपुत्रनदाचें पाणी गढूळ आणि दाट असतें; आणि पूर येतो तेव्हां पाण्यावर फेंस फार असतो. एप्रिल महिन्यांत पाण्यास चढ लागतो, तेव्हांपासून आगस्त महिन्याच्या प्रारंभापर्यंत पाणी चढत असतें, मग उतरूं लागतें. बंगाल्यामध्यें ह्या नदाला पायउतार नाहीं, तरी भागीरथीप्रमाणें तारवें येण्या जाण्याची सोय ह्याला नाहीं; आणि ह्या नदाचा तितका उपयोगही नाहीं.

---

## हिंदुस्थानांतील भाषा.

हिंदुस्थानांतील केवळ अडाणी भाषा खेरीज करून सुधारलेल्या पंचवीस भाषा आहेत. त्यां विषयीं कांहीं विशेष वर्णन केलें पाहिजे.

ह्या हिंदुस्थानामध्यें पूर्वीं लोकांच्या बोलण्यांत होत्या परंतु आतां नाहींत, फार वर्षांपासून प्रचारांतून गेल्या, अशा तीन भाषा आहेत. १ संस्कृत भाषा, २ पाली भाषा, आणि ३ प्राकृत ऊर्फ सारस्वती भाषा.

संस्कृत भाषा ही मुख्यत्वें हिंदुलोकांच्या धर्माची भाषा होय. त्यांचे वेद, शास्त्रें, पुराणें, वगैरे जे धर्मसंबंधी ग्रंथ व विद्यासंबंधी ग्रंथ आहेत ते सर्व संस्कृत भाषेंत लिहिलेले आहेत.

पाली म्हणून जी भाषा ती बौद्ध धर्मानुसारी लोकांच्या धर्माची भाषा आहे.

प्राकृत ऊर्फ सारस्वती ही भाषा कोणाच्या धर्माची म्हणून आहे असें नाहीं. परंतु संस्कृत नाटकामध्यें स्त्रियांचीं व हलके जातीं-च्या पात्रांचीं संभाषणें ह्या भाषेंत लिहितात. ह्या भाषेस बाल-भाषा असेंही म्हणतात.

ह्या तीन भाषांपैकीं संस्कृत भाषा ही प्राचीन होय. तिजपा-सून प्राकृत भाषा झाली. पाली भाषा ही संस्कृत भाषेपासूनच झाली असावी असें दिसतें. ग्रंथकारांनीं असा तर्क काढिला आहे कीं यमुना नदीच्या दक्षिणतीरास दिल्लीच्या वायव्य दिशेकडे प्राचीन काळीं जे लोक राहत असत त्यांची व्यवहारांत बोलण्याची ही संस्कृत भाषा होती. ती अलीकडे प्रचारांतून गेली, तेंव्हां याच देशांत लोकांची बोलण्याची ही प्राकृत भाषा संस्कृतापासून झाली. पालीभाषा ही बहार प्रांतांत प्राचीनकाळीं लोकांची व्यव-हारांतील बोलण्याची भाषा होती. ह्या तीन भाषांचा संबंध हिंदुस्थानांतील सर्व भाषांशीं आहे. उत्तरेकडील जितक्या भाषा तितक्या भाषांचें तर मूळ संस्कृत भाषाच होय; आणि दक्षिणेक-डील ज्या भाषा आहेत त्यांचें मूळ जरी संस्कृत नाहीं, तरी त्या भाषांत संस्कृत शब्द पुष्कळ मिश्रित झाले आहेत.

जसे जातींचे तसे भाषांचे पंच गौड आणि पंच द्राविड असे दोन वर्ग हिंदूंचे ग्रंथकार करितात. पंचगौड येणें प्रमाणें. सार-

स्वती, कन्होजी, बंगाली ऊर्फ गौडी, मैथिली ऊर्फ तिरहुती आणि ओढी.

सारस्वती भाषा ही प्रचारांतून गेली म्हणून पूर्वी सांगितलेंच आहे. कन्होजी ह्या नांवाची भाषा सांप्रतकाळीं चालू नाहीं, तरी हल्लीं जी हिंदीभाषा उत्तर हिंदुस्थानांत आहे तिची मूळभूत ही कन्होजी भाषा असावी. त्या हिंदी भाषेंत फारशी शब्द पुष्कळ मिश्रित होऊन हिंदुस्थानी ऊर्फ उर्दू ह्या नांवाची भाषा झाली आहे. बंगाली ऊर्फ गौडी ही बंगाल देशांतील लोकांची बोलण्याची भाषा आहे. मैथिली ऊर्फ तिरहुती ही भाषा तिरहूत म्हणून एक प्रांत आहे. त्यांतल्या एका भागांत राहणारे लोकांची भाषा आहे. ओढी भाषा ही ओढया देश ऊर्फ कटक प्रांत ह्यांतील लोकांची देशभाषा होय.

आतां पंच द्राविड येणें प्रमाणें.—द्राविडी ऊर्फ तामल, महाराष्ट्र ऊर्फ मराठी, कानडी, तैलंगी ऊर्फ तलगू, आणि गुजराथी.

तामल, कानडी, आणि तैलंगी ह्या तीन भाषांत दोन प्रकार आहेत, एक प्राचीन आणि एक अर्वाचीन. प्राचीन प्रकारची भाषा त्यांच्या ग्रंथांत मात्र आहे. आणि अर्वाचीन प्रकारची भाषा बोलण्यांत आहे. ग्रंथांची प्राचीन भाषा अभ्यास केल्यावांचून चांगली समजत नाहीं.

ह्यां शिवाय दुसऱ्या भाषा, असामांत असामी भाषा; नेपाळांत नेपाळी, रोसाली, आणि डोंगरी ह्या भाषा आहेत; काश्मिरांत काश्मिरी भाषा; पंजाबांत पंजाबी भाषा; सिंध देशांत सिंधी

भाषा; राजपुतान्यांत बिकनीरी, मारवाडी, जयपुरी, आणि उदेपुरी ह्या चार भाषा चालतात; हरावती आणि ब्रिज भाषा ह्या यमुनेच्या उत्तरेस मथुरेकडे आहेत; बहार प्रांताच्या दक्षिण भागाकडे मागधी भाषा आहे; माळव्यांत माळवी भाषा; बुंदेलखंडांत बुंदेली भाषा. ह्या सर्व भाषा उत्तरेकडील झाल्या. आतां दक्षिणेकडील भाषा कोंकणी, तुळवी ऊर्फ तुळू, आणि मल्याळी, ह्या आहेत. गारो, कोळी, काठी, गोंड, वगैरे जे अडाणी लोक ह्यांच्या भाषा तिसांहून कमी नाहींत. सारांश.

३ प्रचारांतून गेल्या अशा तीन भाषा.
८ मोठाल्या देशांत भाषा म्हणून चालतात.
२० कांहीं सुधारलेल्या लोकांच्या सुधारलेल्या भाषा.
३० अडाणी लोकांच्या अडाणी भाषा.

अशा अठ्ठावन भाषा ह्या भरत खंडांत सांप्रत चालू आहेत. ही गोष्ट पाहिली तर सहज ध्यानांत येईल कीं हे सर्व लोक एका राज्याच्या सत्ते खालीं होते असें कधीं झालें नाहीं.

ज्या भाषा वर सांगितल्या त्यांशिवाय मुसलमान लोक फारशी आणि अरबी ह्या भाषांचा अभ्यास करितात. पोर्तुगीज लोकांनीं जेथें जेथें आपलीं ठाणीं घातलीं होतीं तेथें तेथें पोर्तुगीज भाषेचा थोडा बहुत प्रचार आहे. इंग्लिश सरकारचा अमल झाल्यावर अलीकडे इंग्लिश सरकारचीं जीं मुख्य संस्थानें कलकत्ता, मद्रास, अणखी मुंबई, व मोठमोठीं शहरें, येथें इंग्लिश भाषेचा अभ्यास बहुत लोक करितात. त्यामुळें इंग्लिश भाषेंतील बहुत शब्द देशभाषांत मिसळले आहेत.

## पत्रव्यवहार.

टपालाचें हासील कमी होऊन देशांतील जवळच्या व दूरच्या गांवांस सारखेंच झाल्यापासून पत्रव्यवहार फारच वाढला आहे. पूर्वी दूरदूरच्या गांवीं पत्र पाठविण्यास जे आठ आणे, बारा आणे, एक रुपया हासील पडत होतें तें आतां अर्धे आण्यावर आलें आहे; आणि हासील कमी झाल्या कारणानें पत्रांचीं संख्या अतिशयित वाढली आहे, आणि त्याबद्दल सरकारचें उत्पन्नही फार वाढलें आहे.

मराठीमध्यें ज्यास पत्र लिहावयाचें असेल त्याच्याशीं जसा संबंध असेल व त्याची जशी योग्यता असेल त्याप्रमाणें लिहिण्याचे माने निरनिराळे आहेत. तीर्थरूप, तीर्थस्वरूप, चिरंजीव, राजश्री, राजमान्यराजश्री, राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री, श्रीमंत राजश्री, वेदशास्त्रसंपन्न, सौभाग्यवती, गंगाभागीरथी, इत्यादि शब्द* व त्यांचीं मिश्रणें ज्यास पत्र लिहावयाचें असेल त्याच्या नांवास जोडतात. कांहीं माने तर दोन तीन ओळी लांब असतात.

पत्रांत कितीही लांब लचक माना असो, परंतु लाखोट्यावर नांव व पत्ता लिहिणें तो स्वच्छ आणि माहिती लावून देण्याजोगा असला तर बरें, नाहींतर पत्र पाठवून फुकट जातें. पत्ता बरोबर नसल्या कारणानें मालक न सांपडल्यास पत्र निवारसी होऊन शेवटीं विसर्जन पावतें, आणि त्याचा पाठविणारा मात्र उत्तराची वाट पाहत राहतो, आणि तें न आल्यामुळें आपल्या आप्तास अथवा स्नेह्यास दोष लावितो.

---

* ह्या मान्यांचा उपयोग कोठकोठें करावा हें शिक्षकानें सांगावें.

पत्र बिन हरकत पोहोंचावें म्हणून त्यावर पत्ता कसा लिहावा ह्या विषयीं मेहरबान देरेक्तर आफ् पब्लिक इन्स्त्रक्शन, मुंबई, ह्यांनीं ज्या सूचना प्रसिद्ध केल्या आहेत त्या खालीं लिहिल्या आहेत.

(१) पत्ता लिहावयाचा तो स्पष्ट व निरनिराळ्या ओळींत लिहावा.

(२) पहिल्या ओळींत, ज्यास पत्र पाठवावयाचें त्या मनुष्याचें नांव व पदवी असल्यास ती, हीं मात्र असावीं. उ०

'रावसाहेब रामचंद्र नारायण फडके'

(३) शेवटचे ओळींत, जेथें पोष्ट हपीस आहे त्या गांवाचें नांव किंवा जिल्ह्याचें नांव हीं मात्र असावीं. उ०

बेळगांव.

किंवा

**जिल्हा सातारा.**

(४) शेवटच्या ओळीच्या अगोदरचे ओळींत गांवाचे विभागाचें नांव मात्र असावें. उ० मंगळवार पेंठ, अथवा तालुक्याचें नांव असावें, उ० हवेली तालुका.

(५) सदरीं लिहिल्या ओळीच्या पूर्वींच्या ओळींत, रस्त्याचें नांव आणि घराचा नंबर हीं असावीं. उ० नंबर ५ लोहारचाळ, अथवा जर त्या गांवीं प्रोष्टहपीस नसेल तर ज्या गांवाचें नांव असावें. उ० पिंपळगांव.

(६) पत्त्याचे दुसरे ओळींत, ज्यास पत्र पाठवावयाचें त्या मनुष्याचा हुद्दा किंवा धंदा, हा असावा. उ० शिरस्तेदार, दुकानवाला, भट, इत्यादि.

27

(७) "ह्यांस" "पाठविण्याचें" इ० निरुपयोगी शब्द मुळींच लिहूं नयेत.

(८) पोष्टाचीं टिकिटें लावणें तीं उजवे हातचे वरच्या कोंपऱ्यावर लाविलीं पाहिजेत, व ज्या गांवांत पोष्टहपीस आहे त्या गांवाचें नांव व जिल्ह्याचें नांव हीं उजवे हातचे खालचे कोपऱ्यावर असलीं पाहिजेत. पाहिजे असल्यास पत्र पाठविणाराचें नांव, डावे हातचे खालचे कोंपऱ्यावर बारीक अक्षरांनीं लिहावें, त्या नांवापुढें "कडून" हा शब्द नसावा.

वरच्या सूचना चांगल्या लक्षांत याव्या म्हणून पत्त्याचे एक दोन नमुने खालीं दाखविले आहेत.

तिकीट लावण्याची जागा

राजमान्य राजश्री विष्णु विठ्ठल केळकर
छापील कागद विकणारा.
नंबर २१९ भाजीआळी
आदितवार पेठ
पुणें

तिकीट

राजश्री गोविंदा बिन सदू
रंगारी
जायखेडें
बागलाण तालुका
खानदेश जिल्हा

तीर्थस्वरूप राजश्री केशव अमृत ठकार

कारकून मामलेदार कचेरी

कऱ्हाड

हरि आबाजी

तिकीट

## सीतास्वयंवर प्रकरणीं.

### ( वामनी श्लोक. )

त्रिशत गण शिवाचे सत्वरें त्या धनुष्या ॥
उचलिति न ढळे जें अन्य देवां मनुष्यां ॥
परि बहुबहु कष्टीं आणिलें चापें रंगीं[१५१] ॥
दचकति नृप सारे देखतां अंतरंगीं ॥ १ ॥
वाटे तयां परम दुर्लभ ती नवोढा[१५२] ॥
जेव्हां पुरोहित म्हणे धनु कां न वोढा ॥
कोणी धरूनि बसले बसल्याचि ठाया ॥
उत्साह बुद्धि न मनामति दे उठाया ॥ २ ॥
तों दशकंठ[१५३] अकुंठ[१५४] विसांभुजिं तें विषकंठ[१५५]धनू उचली ॥
कष्टत कोष्ठ[१५६]वरी द्विज[१५७]ओष्ठहि चावुनि ज्यों[१५८] जरि ने खचली ॥
त्या उपरी दडपे झडपे मग आननपंक्ति धरे[१५९] रचली ॥
वासुनि दांत मुखांत दहांत पडे मति गाढ[१६०]तमीं पचली[१६१] ॥ ३ ॥
म्हणे विश्वामित्र स्वमनिं सकळांचे भरंवसे ॥
कळों आले आतां मजजवळि विश्वंभर[१६२] वसे ॥

तया या श्रीरामाविण जनकजी[१६३] अन्य न वरी ॥
म्हणोनी बोले कीं उठिं रघुपती साधिं नवरी ॥ ४ ॥

श्रीराम तेव्हां मुनिपादपद्मा ॥
वंदी जयाचे स्वपदींच पद्मीं[१६४] ॥
आज्ञा गुरूची म्हणऊनि सांची[१६५] ॥
करीन बोलोनि उठे तसाची ॥ ५ ॥

शृंगारवीरकरुणादि नवां रसांची ॥
लीला जगद्गुरुचिया[१६६] पदसाररसांची[१६७] ॥
स्वप्रेमें[१६८] तो दशम त्यासह त्या नवांतें[१६९] ॥
दावी सभेसि उठतां सुरमानवांतें ॥ ६ ॥

लज्जावती फार तथापि त्याची ॥
शंका न सीता धरि हो पित्याची ॥
म्हणे अहा तात अशा पणातें ॥
केलें तुवां संकट आपणातें ॥ ७ ॥

बहु कठोर म्हणे धनु जानकी ॥
निपट कांसवपृष्ठसमान कीं ॥
रघुपती तरि हा लघु आपण ॥
अहह दारुण तात तुझा पण ॥ ८ ॥

मदनशत्रु[१७०]शरासन हें महा ॥
मदनमूर्तिच केवळ राम हा ॥
करिल सज्य कसें धनु आपण ॥
अहह दारुण तात तुझा पण ॥ ९ ॥

छावा उठे दशरथप्रभुदिग्गजाचा ॥
घे चाप इक्षुसम तें पवि भंगें ज्याचा ॥

शुंडा स्वबाहु उचलोनिच चालिला हो ॥
घेती समस्त नयनीं प्रभुचाचि लाहो ॥ १० ॥
घे इक्षु वारण जसा करपुष्करानें ॥
श्रीराम चाप उचली करपुष्करानें ॥
मोडी सवेंचि सकळांसहि लाज आणी ॥
गेलें नृपाळमुखिंचें उतरोनि पाणी ॥ ११ ॥

गजेंगती जगती प्रति दाविते ॥
वसुमती सुमती सुख भाविते ॥
स्वतनुजातनु जाणतसे धरीं ॥
नवरि ते वरिते मणिकंधरीं ॥ १२ ॥
अर्पी गळां हार जया सुकाळीं ॥
सीता सुखाच्या पडली सुकाळीं ॥
विचित्र वाद्यें जन वाजवीती ॥
सीतापतीचें यश गाजवीती ॥ १३ ॥

## पांडवप्रतापांतील अभिमन्यूचें युद्ध.

ओंव्या.

युद्धास गुंतला अर्जुन ॥ इकडे काय झालें वर्तमान ॥
चक्रव्यूह गुरु द्रोण ॥ रचिता झाला अद्भुत ॥ १ ॥
सुपर्णव्यूह पांडव रचिती ॥ धर्मासि अवघेची रक्षिती ॥
युद्ध मांडिलें अद्भुत रीती ॥ द्रोणें आणि भीमसेनें ॥ २ ॥
नकुळ सहदेव पांचाळ ॥ अवघे युद्ध करिती सबळ ॥
परिचक्रव्यूह भेदावया बळ ॥ कोणासही दिसेना ॥ ३ ॥
धर्म म्हणे असता पार्थ ॥ तरी हा व्यूह भेदिता निश्चित ॥

तों पुढें येऊन सुभद्रासुत ॥ धर्मरायासी विनवीतसे ॥ ४ ॥
तुम्ही मज आज्ञा द्याल जरीं ॥ तरी हा व्यूह भेदीन निर्धारीं ॥
धर्म म्हणे त्या अवसरीं ॥ तूं बाळक कीं सुकुमारा ॥ ५ ॥
मग बोले पार्थनंदन ॥ आम्हां क्षत्रियां रण तेंचि धन ॥
ताता तुमच्या दयें करून ॥ व्यूह भेदून जाईन मी ॥ ६ ॥
परम सुंदर सुभद्रासुत ॥ रूपाशीं तुळितां उणा मन्मथ ॥
दुसरा श्रीकृष्णचि भासे जनांत ॥ विराटजामात जो होय ॥ ७ ॥
श्यामवर्ण राजीवनयन आजानुबाहु सुहास्यवदन ॥
जो पांडवांसि प्राणांहून ॥ आवडता पांचांसही ॥ ८ ॥
ऐसा तो उत्तरावर ॥ रथावरी चढला सत्वर ॥
उदयाद्रीवरी दिनकर ॥ तैसा तेजाळ दिसतसे ॥ ९ ॥
केला धर्मासी नमस्कार ॥ युद्धा निघाला पार्थकुमार ॥
तों सहस्रावधी राजे वीर ॥ व्यूहा मती रक्षिती ॥ १० ॥
व्यूह भेदीत जाय सौभद्र ॥ दहा सहस्र मारिले कुंजर ॥
एक अयुत महावीर ॥ अश्वांसहित पाडिले ॥ ११ ॥
दळासहित राजकुमार ॥ एकल्यावरी सोडिती शर ॥
परि तो आनकदुंदुभिकन्याकुमार ॥ तितुके तोडी क्षणमात्रें ॥ १२ ॥
तितुक्यांचें बाणजाळ ॥ एकसरें भेदी सुभद्राबाळ ॥
जैसें उगवतां सूर्यमंडळ ॥ भगणें सर्व लोपवी ॥ १३ ॥
एक उठतां पक्षिनायकें ॥ असंख्य संहारिते दंदशूकें ॥
कीं सुटतां चंडवात देख ॥ जळदजाळें वितुळविती ॥ १४ ॥
कीं मूढाचें वाग्जाळ समस्त ॥ एक्या शब्दें उडवी पंडित ॥
कीं एकसिंह नाग बहुत ॥ पडती गतप्राण होउनी ॥ १५ ॥
कीं हृदयीं प्रगटतां बोध ॥ सहपरिवारें पळती कामक्रोध ॥

कीं मत्यया येतां ब्रह्मानंद ॥ क्षुद्रानंद विरमती॥ १६ ॥
तैसा एकलाची धनंजयकुमार ॥ परि सैन्यें केलीं अवघीं जर्जर ॥
कोण्ही उचलितां आपुला कर ॥ शस्त्रा सहित छेदीपैं ॥ १७॥
दुर्योधनाचा पुत्र लक्ष्मण ॥ त्याशीं युद्ध करी निर्वाण ॥
घेतला तात्काळ त्याचा प्राण ॥ शिर उडवूनि पाडिलें ॥ १८ ॥
बाण सोडीत धांवला कर्ण ॥ दोंबाणीं विंधिले त्याचे कर्ण ॥
आंग काढूनि भानुनंदन ॥ पळता झाला एकीकडे ॥ १९ ॥
दशबाणीं सुयोधनाखिळिला ॥ द्रोण पांच बाणीं विंधिला ॥
जयद्रथ दूर पळविला ॥ एका बाणें करोनी ॥ २० ॥
अश्वत्थामा कृपाचार्य ॥ हेही पळती गतवीर्य ॥
देखूनि अभिमन्यूचें शौर्य ॥ द्रोण मस्तक डोलवी ॥ २१ ॥
व्यूहा माजी सांपडला पार्थकुमार ॥ सहाजण महावीर ॥
सोडिते झाले निर्वाण शर ॥ एकलिया बाळा वरी ॥ २२
सुकुमार जो सौभद्र ॥ त्या एकल्या हाणिती महावीर ॥
चहूंकडे पाहे सुंदर ॥ आपलें कोणी दिसेना ॥ २३ ॥
एकला युद्ध करी अभिमन्य ॥ कर्णे सोडिले निर्वाण बाण ॥
हातींचें धनू तोडून ॥ बाण भाते छेदिले ॥ २४ ॥
सारथी घोडे ते वेळे ॥ द्रोणाचार्यें मारिले ॥
मग अभिमन्यें खड्ग घेतलें ॥ रथा खालीं उतरला ॥ २५ ॥
जैशी वीज लवोनी जाये ॥ तैसा अभिमन्यू तळपताहे ॥
तों दुर्योधनें खड्ग लवलाहें ॥ एके बाणें छेदिलें ॥ २६ ॥
मग गदा घेऊनि पार्थसुत ॥ अमित वीरांतें पाडित ॥
असतां दुःशासनें त्वरित ॥ गदा छेदिली हातींची ॥ २७ ॥

मग घेऊनि रथचक्र ॥ रणीं तळपे सुभद्राकुमार ॥
जैसा श्रीकृष्ण चक्रधर ॥ तैसा तो वीर दिसतसे ॥ २८ ॥
कर्ण द्रोण दुर्योधन ॥ सोडिती बाणा पाठी बाण ॥
हातींचें रथचक्रही जाण ॥ अश्वत्थामियानें छेदिलें ॥ २९ ॥
तों दुःशासनपुत्र दौःशासनी ॥ वेगें आला गदा घेऊनी ॥
विकळ सौभद्र पडलिया रणीं ॥ त्याचे मस्तकीं घातली ॥ ३०
तेणें चूर्ण झालें शिर ॥ पडला पार्थाचा कुमार ॥
तों अशरीरिणी वदली उत्तर ॥ धर्म युद्ध नव्हे हें ॥ ३१ ॥

## सवध्या पुस्तकांतील कवितांमधील कठिण शब्दांवरच्या टिपा.

१ भक्तिमार्ग.
२ सहजें.
३ वाईट.
४ चांगलें.
५ सुविचार.
६ इच्छा.
७ मन बिघडल्यानें.
८ द्वेष.
९ डोंगाचें ओझें.
१० धैर्य.
११ प्रिय.
१२ सुखदेणारी.
१३ पालवी.
१४ विचित्ररंगाचे.
१५ कळंबाचें झाड.
१६ स्वस्त्रीच्या.
१७ झोंपाळे.
१८ समुदाय.
१९ कावळ्यांचे.
२० ससाण्याचा शब्द.
२१ हतवीर्य.
२२ संपत्ति.
२३ परलोकींचा मित्र.
२४ दुसऱ्याच्याहिताकरितां.
२५ धन.
२६ धन जवळ असणें किंवा जवळून जाणें.
२७ निरंतर.
२८ दुःखस्थान.
२९ दारिद्र्य.
३० फार भयंकर.
३१ स्वकीय.
३२ नरकवास.
३३ ज्या स्त्रीला वाटतें.
३४ कृपणाच्या हातचें.
३५ सुखातिशय.
३६ तीच साध्वी.
३७ खरेपणानें वागणारा.
३८ उणेनव्हत.
३९ हालअपेष्टा.
४० जुव्यानें.
४१ दुसऱ्यावर उपकार.
४२ मद्य.
४३ तमाखू.
४४ लांब केंस.
४५ शिरोवेष्टन वस्त्र.
४६ कमरेला.
४७ माता.
४८ स्त्री.
४९ घाबरी.
५० सुंदर.
५१ सुबुद्धि.
५२ भोंकें पडलेलीं.
५३ चोंचींनीं.
५४ नखक्षत.

५५ शपथ करतें.
५६ पाहून.
५७ शास्त्रनिषिद्ध.
५८ तृप्त झालें.
५९ अश्रु.
६० सिद्ध झाली.
६१ शरणजाण्यास.
६२ वाटणार नाहीं.
६३ मोक्षमार्गास.
६४ सत्पुरुष.
६५ चपराक.
६६ गज.
६७ वर्तन.
६८ दुसऱ्याच्या तेजोबलाच्या गर्वास.
६९ किरणांनीं.
७० सूर्य.
७१ सूर्यकांत.
७२ अग्निसारख्या.
७३ ओकतो.
७४ मर्कटाच्या.
७५ प्रीतीनें.
७६ थकले.
७७ संभाळिता.
७८ प्राण वायु कोंडून धरी.
७९ तो गाढव.
८० द्वेष.
८१ मुंगीला.
८२ देहाभिमान.
८३ अन्याचे.
८४ वियोग.
८५ कामक्रोधादिकांचा वेग.
८६ भीम व दुश्शासन.
८७ अपराध.
८८ दंती म्ह० हत्ती.
८९ पकाररहित.
९० मोठ्या सर्पासारखा.
९१ दुःखदेणारा.
९२ प्राण.
९३ नाशिता.
९४ त्वरित.
९५ इंद्राच्या वज्रानें तोडलेलें.
९६ पर्वतशृंग.
९७ द्रौपदीचा.
९८ वेणी ओढली.
९९ कर्ण.
१०० अश्वत्थामा.
१०१ तान्हेला.
१०२ सिंहासारखा.
१०३ हातीं खड्ग घेतलेला.
१०४ भुईवर पडलेल्यास.
१०५ सर्पाला.
१०६ पायानें.
१०७ स्वाभावि[illegible]
१०८ वज्रपातीं[illegible]
१०९ टिकतें.
११० वज्र.
१११ प्रसवे.
११२ भीम.
११३ रक्त.
११४ प्रतिज्ञा.
११५ आपल्या श[illegible]च्या रक्तरूप उदकास.
११६ तर.